लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल क्रमांक ६ राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा - २००८ करिता पायाभूत सूविधा विकास अहवालातील शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग, नगरविकास विभाग व गृह विभागाशी संबंधीत

बारावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१३

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल क्रमांक ६ राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा - २००८ करिता पायाभूत सूविधा विकास अहवालातील शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग, नगरविकास विभाग व गृह विभागाशी संबंधीत

बारावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(८) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(९) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१०) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)
* (१०अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)
(११) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(१२) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(१३) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(१४) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(१५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१७) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१८) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१९) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(२०) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२१) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(२२) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(२३) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.
(२४) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
** (२५) रिक्त

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)
*** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)
(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दि. ७ जानेवारी, २०१३ रोजी निमनियुक्ती केली.**

**** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.
१४ (अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स.
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
*** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२४ (अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी विधानसभा व दिनांक २ मार्च, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**
**** श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली.**
***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून प्रस्तुत अहवाल सभागृहाला करीत आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा, २००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात आला होता. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा - २००८, पुणे करिता पायाभूत सुविधा विकासावरील निरीक्षणांचा समावेश असलेला हा अहवाल राज्यघटनेच्या कलम १५१ अन्वये महाराष्ट्राच्या राज्यापालांना सादर करण्याकरिता तयार करण्यात आला होता. या अहवालातील नमूद केलेली प्रकरणे, २००६-२०१० या वर्षांकरिता लेख्यांच्या चाचणी तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या प्रकरणांपैकी आहेत. शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग, नगरविकास विभाग व गृह विभागाशी संबंधीत परिच्छेदांवर विचार करून समितीचा बारावा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) तयार करण्यात आला आहे.

समितीने दिनांक ३ व ४ मे, २०१२ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे तसेच दिनांक ८ व ९ जानेवारी, २०१३, दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे प्रत्यक्ष भेट देऊन विभागीय सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

समितीने दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व काही फेरफारांसह संमत केला.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त स्वंतत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. सदरहू कार्यवृत्त परिशिष्ट एक मध्ये देण्यात आले आहे.

उक्त अहवालाच्या संदर्भात समितीच्या बैठकीच्या साक्षीकरिता डॉ.अमिताभ राजन, अपर मुख्य सचिव, गृह विभाग, श्री.जे.एस.सहारिया, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग, श्री.श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, नगरविकास विभाग हे उपस्थित होते.

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र - १ या समितीच्या निमंत्रणावरून बैठकीला उपस्थित होत्या. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व सहाय्याबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

त्याचप्रमाणे श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांनी वेळोवेळी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव यांनी समितीसमोर हजर राहून साक्ष देऊन आपली मते व्यक्त केली. त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

विधानभवन :
मुंबई.
दिनांक : १६ एप्रिल, २०१३

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

अनुक्रमाणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल क्र.६ राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा- २००८ करिता पायाभूत सुविधा विकास अहवालातील परिच्छेद	
(१)	**पार्श्वभूमी**	
(२)	**शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग** i) पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नियोजन (परिच्छेद क्र.२.१.१) ii) अर्थसंकल्प व निधीवाटप (परिच्छेद क्र.२.१.२.१) iii) आकस्मिक निधीतून काढलेल्या रक्कमा अनियमितपणे राखून ठेवणे (परिच्छेद क्र.२.१.२.२) iv) मोबदला देऊन सल्लागारांची नियुक्ती (परिच्छेद क्र.२.२.१) v) मुख्य कामाकरता कंत्राटदारास नियुक्त करणे (परिच्छेद क्र.२.२.३) vi) पुरवठादारामार्फत काम न केल्याने जादा खर्च (परिच्छेद क्र.२.२.३.२) vii) प्रवासी उद्वाहका हका करता अतिरिक्त बाबींचा चुकीच्या दर विश्लेषणामुळे जादा प्रधान (परिच्छेद क्र.२.२.३.३) viii) मुष्टीयुद्ध, टेबल टेनिस व वेटलिफ्टींग सभागृहात वातशितकरण यंत्रणा बसविणे (परिच्छेद क्र.२.२.३.५) ix) बांधकामाचा दर्जा (परिच्छेद क्र.२.२.३.७) x) नंतर निकाली काढण्यासाठी निवासी घरा ऐवजी थ्री स्टार हॉटेल बांधण्याचा पार्याय (परिच्छेद क्र.२.२.४.३) xi) निविदा शर्तीचे क्रमश: शिथलिकरण (परिच्छेद क्र.२.२.४.४) xii) निविदा पश्चात वाटाघाटी व यंत्रणा बहाल करणे (परिच्छेद क्र.२.२.४.५) xiii) अधिमुल्य आदायगीतील दोष (परिच्छेद क्र.२.२.४.६) xiv) भूसौंदर्यकरण, खडकांचे सौंदर्यकरण, शिल्पकला व फळबाग काम (परिच्छेद क्र.२.२.५.१) xv) भाडे तत्तवावर डिझेल जनित्र संच घेणे (परिच्छेद क्र.२.२.५.२) xvi) इलेक्ट्रॉनिक, क्रीडा आणि इतर सामुग्रीच्या खरेदीचे कंत्राट (परिच्छेद क्र.२.२.६) xvii) इलेक्ट्रॉनिक साधनांची खरेदी (परिच्छेद क्र.२.२.६.१) xviii) सनियंत्रण आणि पर्यवेक्षण (परिच्छेद क्र.२.५)	

(३)	**नगरविकास विभाग** i) पायाभूत नागरी सुविधा (परिच्छेद क्र.३.१) ii) पेव्हर ब्लॉक्स पुन्हा लावण्याकरता केलेला टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च (परिच्छेद क्र.३.२.२.३) iii) आयोग्य नियोजनामुळे किंमतीतील तफावत आणि सल्ला मसलितीचे शुल्क यासाठीचा अतिरिक्त खर्च झाला (परिच्छेद क्र.३.३)	
(४)	**गृह विभाग** i) सुरक्षेच्या पायाभूत सुविधा (परिच्छेद क्र.४.१) ii) सुरक्षा साधने आणि वाहनांची खरेदी (परिच्छेद क्र.४.२) iii) दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल्स (परिच्छेद क्र.४.२.१) iv) गस्त वाहने आणि वाहतूक प्रचार वाहने (परिच्छेद क्र.४.२.२) v) रूग्णवाहिका श्वान पथक वाहन,शववाहिनी आणि मिनीबस (परिच्छेद क्र.४.२.३) vi) सुटसुटीत क्ष-किरण यंत्र (परिच्छेद क्र.४.२.४) vii) CCTV कॅमेरे आणि LCD न वापरता पडून राहणे (परिच्छेद क्र.४.३)	

पार्श्वभुमी

नवी दिल्ली येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०१० चा एक उपकार्यक्रम म्हणून तृतीय राष्ट्रकुल युवा स्पर्धा २००८ (CYG) आयोजित केल्या गेल्या. राष्ट्रकुल स्पर्धा २०१० करिता पायाभूत सुविधांच्या विकास कामांची आवश्यकता असल्याने CYG नवी दिल्ली येथे आयोजित करणे व्यवहार्य होणार नाही असे आयोजन समितीला वाटले. राष्ट्रकुल क्रीडा परिषदेने तीन संभाव्य ठिकाणी म्हणजे बेंगळूर, हैद्राबाद व पुणे यांचे मूल्यन केले व त्यांना पुणे सर्वात योग्य ठिकाण वाटले. राष्ट्रकुल क्रीडा परिषदेच्या अध्यक्षांच्या पुणे भेटीनंतर ७ जून २००६ रोजी तृतीय CYG क्रीडा स्पर्धा पुणे येथे १२ ते १८ ऑक्टोबर दरम्यान होण्यासंबंधी औपचारिक घोषणा झाली. ७१ देशांतून १३०० च्या वर खेळाश्डू आणि ३५० अधिकारी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते.

म्हाळुंगे-बालेवाडी पुणे येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा १९९४ करिता बांधलेले शिवछत्रपती क्रीडा संकुल राष्ट्रीय क्रीडा परिषदेच्या मानकांनुसार होते, परंतु आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे नसल्याने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरविणे अनिवार्य होते. महाराष्ट्र शासनाने एप्रिल, २००६ मध्ये CYG करिता ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, मुष्टियुध्द, नेमबाजी, टेनिस व वेटलिफ्टिंग या सहा शाखा चालविण्यासाठी नवीन बांधकाम व विद्यमान सुविधांचे सुशोभिकरण/सुधारणा सांसाठीचे प्रस्ताव तत्वतः मान्य केले. राष्ट्रकुल क्रीडा परिषद आणि तत्संबंधी आंतरराष्ट्रीय परिषदांच्या मानकांच्या दृष्टीकोनातून आवश्यक क्रीडा आणि निवासी सविधा उपलब्ध करण्यासाठी राज्याच्या क्रीडा व युवक सेवा संचालकांनी (DSYS) जुलै, २००६ मध्ये रु. १९२.५० कोटी अंदाजित किंमतीचा सर्वंकष आराखडा बनवला. या दरम्यान ५ जून, २००६ रोजी राज्य व राष्ट्रीसय क्रीडा परिषदेच्या मागणीचा विचार करुन विद्यमान सहा क्रिडा प्रकारांमध्ये आणखी तीन क्रीडा प्रकार म्हणजे कुस्ती, जलतरण व टेबल-टेनिस यांचा समावेश झाला, ज्यामुळे, पायाभूत क्रीडा सुविधा विकास कामाची व्याप्ती वाढविण्याची गरज निर्माण झाली.

सह सचिव, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, संचालक, भारतीय क्रीडा प्राधिकरण, नवी दिल्ली, विभागीय आयुक्त, पुणे व DSYS यांच्या उपस्थितीत ७ जानेवारी, २००७ रोजी झालेल्या बैठकीत आयोजन समितीला आवश्यक असलेली क्रीडा

साधन/इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय आणि सुरक्षा व्यवस्था साधन, इत्यादिची जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे ठरले. त्याकरिता, (२२ जानेवारी, २००७) अंदाजित खर्चात र. २८५.०९ कोटी पर्यंत सुधारणा करण्यात आली.

या दरम्यान, शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे सुरु केलेल्या पायाभूत क्रीडा सुविधा विकास कामांसाठी तांत्रिक मार्गदर्शनासाठी आयोजन समितीने एक सल्लागार संस्था म्हणून क्रीडा तांत्रिक संचालन समिती (GTCC) स्थापन केली (मे, २००७). आयोजन समितीने प्रत्येक स्पर्धा ठिकाणाचे तांत्रिक निकष ठरविण्यासाठी सल्लागार म्हणून कार्यक्रम माहिती सेवा (EKS) नावाची एक स्विस कंपनी देखील नेमली. GTCC व EKS सल्लागारांनी मैदाने/स्पर्धा ठिकाणे येथील आंतरराष्ट्रीय मानकांचा दर्जा गाठण्यासाठी व स्पर्धा संचालनासाठी रु. ७० कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या विशिष्ट अतिरिक्त बाबी सुचविल्या ज्यामुळे शिव छत्रपती क्रीडा संकुल येथील पायाभूत क्रीडा सुविधांच्या अंदाजित किंमतीत रु. २८५.०९ कोटीवरुन रु. ३५५.०४ कोटीपर्यंत वाढ झाली.

शासनाने पुणे महानगरपालिका (PMC) व पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) या नागरी संस्थांच्या अधिपत्याखाली रु. ६२६ कोटी अंदाजित किंमतीच्या पायाभूत नागरी सुविधा निर्माण करण्याचा व अद्ययावत करण्याचा प्रस्ताव मांडला. नियोजन आयोगाचे सल्लागार अध्यक्षस्थानी असलेल्या आंतरमंत्रालयीन पथकाने सप्टेंबर २००६ मध्ये CYG करिता आवश्यक पायाभूत सुविधांची पाहणी करण्यासाठी पुणे येथे भेट दिली. या पथकाच्या शिफारशीच्या व उपलब्ध साधनांच्या आधारे असे ठरले की, नागरी पासाभूत सुविधा प्रकल्पांना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियान (JNNURM) खाली निधी पुरविण्यात येईल व PMC आणि PCMC मार्फत ते राबविले जातील. PMC ला सुरुवातीस रु. २६८.६५ कोटी मार्च, २००७ मध्ये मंजूर केले होते ते ऑगस्ट २००८ मध्ये रु. ४३४.२२ कोटी पर्यंत वाढविले आणि डिसेंबर २००७ मध्ये PCMC ला JNNRM खाली सुयोग्य अशा रस्त्यांच्या पायाभूत सुविधांनी स्पर्धा ठिकाणे जोडण्यासाठी रु. ३१२.१४ कोटी मंजूर केले.

DSYS यांनी मे. २००७ मध्ये CYG करिता सुरक्षा व्यवस्थेसाठी रु. ६७.७० चा प्रस्ताव युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयासमोर सादर केला.

अखेरीस अंदाजित खर्च रु.३५५.०४ कोटी पर्यंत सुधारीत करण्यात आला ज्या ऐवजी क्रीडा मूलभूत सुविधा विकास आणि साहित्य खरेदी वर रु. ४२४.७७ कोटी रक्कम खर्च झाली होती. या खेरीज, नागरी पायाभूत सुविधांवर रु. ७२२.१३ कोटी व सुरक्षाव्यवस्थेवर रु. ९.४० कोटी एवढी रक्कम खर्च झाली.

स्पर्धेचे ठिकाण आणि सामग्रीचा खर्च केंद्र आणि राज्य शासनांनी विभागून करायचा होता आणि नागरी पायाभूत सुविधांवरील खच्र केंद्र, राज्य शासन आणि महानगरपालिकांनी विभागून करावयाचा होता. सुरक्षा व्यवस्थेवरील खर्च राज्य शासनाने करायचा होता. अर्थसंकल्पीय वाटप व प्रत्यक्षातील अभिकरण निहाय वापर खाली संक्षेपित केला आहे.

तपशील	अर्थसंकल्पीय वाटप	निधी मुक्त करणारे	मुक्त केलेलया निधीची रक्कम	झालेला खर्च	कोणाकडून अंमलबजावणी झाली
(रु.कोटीत)					
स्पर्धेचे ठिकाण व साधने	४२५.५०	केंद्र शासन	२१०.००	४२४.७७	DSYS
		राज्य हिस्सा	२१५.५०		
नागरी पायाभूत सुविधा	४३४.२२	केंद्र शासन	१६२.८३	१६२.८३	PMC
		राज्य हिस्सा	६४.७३	६४.७३	
		PMC	९७.६९	९७.६९	
	३१२.१४	केंद्र शासन	१५६.०७	१५६.०७	PCMC
		राज्य हिस्सा	६२.४३	६२.४३	
		PCMC	१७८.३८	१७८.३८	
सुरक्षा व्यवस्था	१८.०३	राज्य हिस्सा	१७.६३	९.४०	CP, पुणे
एकूण	११८९.८९		११६५.२६	११५६.३	

१.१ पर्यवेक्षण व रचना विषयक व्यवस्था पाहणी

CYG - २००८, पुणे करिता असलेली पर्यवेक्षण व रचना पाहण्यासाठी केलेली व्यवस्था खाली संक्षेपित केली आहे.

संयोजक	कार्य
आयोजन समिती	आयोजन समिती स्पर्धा कार्यक्रम संचालनाची प्रमुख होती
क्रीडा स्पर्धा तांत्रिक संचालन समिती (GTCC)	शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुगे-बालेवाडी, पुणे येथे सुरु केलेल्या क्रीडा पयाभूत सुविधा विकासकामासाठी तांत्रिक मार्गदर्शनाकरिता सल्लागार संस्था म्हणून आयोजन समितीने GTCC नेमली.
शिखर समिती (AC)	या समितीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री होते आणि तीत उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री, पाणीपुरवठा मंत्री, वित्त व नियोजन मंत्री, पुण्याचे पालकमंत्री आणि यांचा समावेश होता. केंद्र शासनाकडून निधी मिळविणे आणि तसेच कार्यकारी समिती व पुनर्विलोकन समिती यांना मार्गदर्शन करणे यासाठी ही समिती जबाबदार होती.
आढावा समिती (RC)	जून, २००६ मध्ये स्थापन झालेली आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली, अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त व गृह विभाग, प्रधान सचिव, नियोजन, महसूल, नगर विकास व सार्वजनिक आरोग्य, मुंबई, सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा आणि DSUS यांनी गठित झालेली ही समिती कार्यकारी समितीच्या कामाचे पर्यवेक्षण करणार होती व शासन स्तरावर जलद मंजुरी प्राप्त करणे सुलभ करणार होती.
कार्यकारी समिती (EC)	राज्य शासनाने मे, २००६ मध्ये EC नेमली, विभागीय आयुक्त, पुणे हे तिचे प्रमुख होते व DSYS हे सदस्य

	सचिव होते. पुणे मनपा आयुक्त, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी पुणे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विभाग व उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे हे सदस्य होते. तिच्या जबाबदाऱ्यांमध्ये खालील बाबींचा समावेश होता. • शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे येथील पायाभूत सुविधांचे नियोजन व विकास; • CYG चे प्रशासकीय व तांत्रिक नियोजन; • सर्व प्रकल्पांसाठी निविदा मागवून ती बहाल करणे, आणि • वरील कार्यक्रमांशी संबंधित दैनंदिन निर्णय घेणे
संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे (DSYS)	पायाभूत क्रीडा सुविधांची अंमलबजावणी व CUG, पुणेच्या आयोजनासाठी क्रीडा संकुलात आवश्यक क्रीडा साहित्याची खरेदी ही DSYS यांची जबाबदारी होती.
पुणे महानगरपालिका (PMC) व पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC)	CYG च्या स्पर्धा ठिकाणांपर्यंत प्रवेश सोपा करण्याच्या दृष्टीने सोयीसाठी शहर सुविधांच्या विकास व अद्ययावतीकरण यांची जबाबदारी या पालिकांकडे होती.
पुणे पोलिस आयुक्त (CP)	आवश्यक साधने व वाहने यांची जमवाजमव करुन CYG दरम्यान पुरशा सुरक्षेची खातरजमा करण्यासाठी पोलीस आयुक्त जबाबदार होते.

१.२ लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

खालील बाबींचे निर्धारण करण्याचे लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट होते :

- CYG करीता आवश्यक असलेल्या पायाभूत क्रीडा संविधा निर्मितीचे व इतर साधनांच्या खरेदीचे नियोजन योग्य प्रकारे केले होते;
- आर्थिक व्यवस्थापन कार्यक्षम व प्रभावी होते;

- पायाभूत क्रीडा सुविधांची उभारणी काटकसरीने व कार्यक्षमतेने झाली;
- क्रीडा साधनांची खरेदी काटकसरीने न वेळेत केली गेली;
- आवश्यक नागरी सुविधा काटकसरीने व कार्यक्षमतेने निर्माण झाल्या;
- सुरक्षा व्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या साधनांचे योग्य रितीने निर्धारण करून ती वेळेत खरेदी केली व त्यांचा योग्य वापर झाला.

१.३ लेखापरीक्षणाचे निकष

कार्यसिद्धी लेखापरीक्षण करण्यासाठी अंगीकृत निकषांचे आधार खालीलप्रमाणे :

i) सर्वसाधारण वित्तीय नियम व केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले संबंधित शासन निर्णय,

ii) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका,

iii) सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पांसंबंधी नियोजन आयोग व राज्य शासनाने निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्त्वे,

iv) जवाहरलाल नेहरून राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्त्वे,

v) मनपा च्या कार्यक्रमांचे नियमन करणारे अधिनियम व नियमपुस्तिका.

१.४ लेखापरीक्षणाची व्याप्ती व कार्यपद्धती

पायाभूत सुविधा व इलेक्ट्रॉनिक व क्रीडा साधनांची खरेदी यांच्याशी संबंधित DSYS पुणे यांच्याकडील अभिलेखे, विविध नागरी सुविधा पुरविण्यासंबंधी पुणे मनपा व पिंपरी-चिंचवड मनपा यांच्याकडील अभिलेखे व २००६-२०१० या कालावधीसाठी CYG करीता सुरक्षा व्यवस्थेसाठी साद्यनांच्या खरेदीसंबंधी पुणै पोलीस आयुक्तांकडील उपलब्ध अभिलेखी यांची तपासणी नोव्हेंबर २०१० ते जानेवारी २०११ दरम्यान केली गेली. २३ फेब्रुवारी २०११ रोजी निर्गम परिषद झाली, ज्याला शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव व गृह विभागाचे प्रधान सचिव हे उपस्थित होते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल क्र.६
राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा करिता पायाभूत सुविधा विकास या संदर्भातला क्रीडा विभागाकडून प्राप्त झालेला सविस्तर खुलासा खालीलप्रमाणे आहे.

- ❖ शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथील सुविधा सन १९९४ मध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनाच्या निमित्ताने करण्यात आलेल्या होत्या.
- ❖ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी संकुलामध्ये अथलेटिक्स स्टेडियम, व्हॉलीबॉल इनडोअर हॉल (सद्यस्थितीत वेटलिफ्टींग), जलतरण तलाव (एक जलतरण तलाव व डायव्हिंग सुविधा), टेनिस कोर्ट (मातीचे), कुस्ती हॉल (सध्याचा बॉक्सिंग), जिम्नॅस्टिक हॉल (सध्याचा कुस्ती), कबड्डी खो-खो मैदाने, वेलोड्रोम, बास्केटबॉल मैदान (सध्याचा टेबल-टेनिस हॉल), वसतिगृहे (तीन वसतिगृहे) इ.सुविधा निर्माण करण्यात आल्या.
- ❖ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांनंतर राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने विविध ९ खेळांच्या एकत्रित आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन प्रथमच प्रस्तावित करण्यात आले.
- ❖ मा.मुख्यमंत्री महोदयांनी भारतीय ऑलिम्पिक महासंघास तिस-या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांचे आयोजन राज्यास द्यावे व या स्पर्धा पुणे येथे व्हाव्यात, या स्पर्धा राज्य शासनामार्फत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांना साजेश्या पद्धतीने आयोजित करण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी या पत्रात दिले होते.
- ❖ त्यानुसार दि.०७ जून, २००६ रोजी राष्ट्रकुल क्रीडा महासंघाचे अध्यक्ष श्री.मायकेल फेनेल यांनी तिसरी राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा दि. १२ ते १८ ऑक्टोबर, २००८ या कालावधीत पुणे येथे आयोजित करण्याची घोषणा केली.
- ❖ पहिल्या टप्प्यातील समाविष्ट खेळ : १) अॅथलेटिक्स २) टेनिस ३) बॉक्सिंग ४) वेटलिफ्टींग ५) बॅडमिंटन व ६) शुटींग
- ❖ दुसऱ्या टप्प्यातील समाविष्ट खेळ : १) कुस्ती २) जलतरण व ३) टेबल-टेनिस (एकूण ०९ खेळ)
- ❖ सहभागी देश : ७१. सहभागी खेळाडू व अधिकारी : १,७०० (खेळाडू १२०० + अधिकारी ५००)
- ❖ राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांसाठीच्या पहिल्या टप्प्यातील ०६ खेळ विचारात घेऊन केलेले अंदाजपत्रक आराखडा - रु.१९२.५० कोटी.
- ❖ दुसऱ्या टप्प्यातील नवीन ०३ खेळ विचारात घेऊन केलेले सुधारीत अंदाजपत्रक आराखडा. - रु.२८५.०९ कोटी.
- ❖ आयोजन समिती, गेम्स टेक्निकल कंडक्ट कमिटी (GTCC) यांनी व आंतरराष्ट्रीय सल्लागार (इ.के.एस. कन्सलटंट) - रु.३५५.४० कोटी.
  यांनी स्पर्धांचा आंतरराष्ट्रीय मानकांचा विचार करुन तो दर्जा राखण्यासाठी सूचविलेल्या बाबींमुळे
  करण्यात आलेले सुधारीत अंदाजपत्रक आराखडा.

- ❖ आयोजन समितीच्या गेम्स टेक्निकल कंडक्ट कमिटी (GTCC) यांनी उभारण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधांमध्ये - रु.४२४.७७ कोटी.
  वेळोवेळी सूचविलेल्या बदलाने अंतिम झालेला खर्च.
- ❖ क्रीडा सुविधा उभारणी व क्रीडा स्पर्धा आयोजना साठी प्राप्त झालेल्या निधीचे विवरणपत्र :

क्रीडा सुविधा उभारणीसाठी प्राप्त निधी क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी प्राप्त निधी	:	रु.४२५.५० कोटी. रु. ३२.९५ कोटी. रु.४५८.४५ कोटी.
केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी	:	रु.२१०.०० कोटी.
राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी	:	रु.२४८.४५ कोटी.
एकूण प्रत्यक्षात खर्च	:	रु.४५४.२५ कोटी. (शिल्लक रक्कम रु.४.२० कोटी)

- ❖ शिल्लक रक्कमेतून अद्यापही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे शुल्क रु.३.५० कोटी अदा करावयाचे आहे.
- ❖ विविध समित्या : १) आयोजन समिती (Organising Committee) २) गेम्स टेक्निकल कंडक्ट कमिटी (GTCC).
- ❖ शासनामार्फत नियुक्त समित्या : १) शिखर समिती (Apex Committee) २) आढावा समिती (Review Committee) ३) कार्यकारी समिती (Executive Committee).

१) आयोजन समिती	अध्यक्ष : श्री.सुरेश कलमाडी,	सचिव : श्री.ललित भानोत.
२) गेम्स टेक्निकल कंडक्ट कमिटी	अध्यक्ष : श्री.के.पी.सिंग देव,	सचिव : श्री.ए.एस.व्ही.प्रसाद.
३) शिखर समिती	अध्यक्ष : मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.	सचिव : सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
४) आढावा समिती	अध्यक्ष : मुख्य सचिव	सचिव : सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
५) कार्यकारी समिती	अध्यक्ष : विभागीय आयुक्त, पुणे विभाग,	सचिव : संचालक, क्रीडा व युवक सेवा.

- ❖ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या नियुक्तीनंतर ह्या सुविधा पूर्ण करण्यासाठी केवळ दोन वर्षाचा कालावधी शिल्लक होता. त्यातूनही अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे, निविदा प्रक्रीया करणे, प्रत्यक्षात काम चालू होणे इ. बाबींसाठीचा किमान चार महिन्यांचा कालावधी लक्षात घेता व तिसऱ्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांचा कालावधी हा दि.१२ ते १८ ऑक्टोबर, २००८ हा निश्चित असल्याने केवळ २० महिन्यांमध्ये सर्व सुविधा पूर्ण करणे हे आव्हान समिती समोर होते.

शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या अहवाल क्र.६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, २००८ करिता पायाभूत सुविधा विकास अहवालातील शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग यांनी खालील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले.

२.१.१ पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नियोजन

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे, राज्य शासनाने शिवछत्रपती क्रीडा संकुल पुणे येथील पायाभूत सुविधांचे नियोजन व विकास यांसाठी पुणे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यकारी समिती नेमली (मे, २००६), स्पर्धा व विविध सुविधांच्या आवश्यक विकासाचे नियोजन व अंमलबजावणीसाठी करावयाच्या दैनंदिन कामांसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार या समितीला देण्यात आले. CYG स्पर्धांचे प्रशासकीय व तांत्रिक नियोजन, CYG संकुलाच्या बांधकाम व स्वच्छतेसंबंधीच्या पगकल्पाची मंजुरी, शासनाच्या नियमांनुसार निविदा मागविणे व त्यांची स्विकृती, वास्तुशास्त्रज्ञ व कंत्राटदारांची नियुक्ती, प्राप्त अनुदानातून विशिष्ट सुविधांवरील खर्चाला मान्यता इ. साठी कार्यकारी समिती जबाबदार होती.

आम्हाला असे आढळून आले की, DSYS यांनी राज्य शासनास पाठविलेल्या योजनेत (जुलै, २००६) ॲथलेटिक्स, बॉक्सिग, टेनिस, वेटलिफ्टिंग, करिता विद्यमान क्रीडा सुविधांच्या व वसतिगृहाच्या स्वच्छता/सुधारणा, बॅडमिंटनसाठी नवीन बहुद्देशीय बंदिस्त सभागृहाचे बांधकाम नेमबाजी मैदान व ६०० खोल्यांचे नवीन वसतिगृह यांचे बांधकाम, यांचा समावेश होता (परिशिष्ट १).

कार्यकारी समितीने जून, २००६ मध्ये कंत्राटदाराद्वारे काम करुन घेण्यासाठी आणि क्रीडा संकुलातील प्रस्तावित सुशोभिकरण व पायाभूत सुविधांच्या नवीन बांधकामाचे नियोजन आरेखन व पर्यावेक्षण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करण्याचे ठरविले. DSYS यांनी ऑगस्ट २००६ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती केली, ज्यांची मुख्य कामे पूर्व बांधणी सर्वेक्षण करणे, तपशीलवार अंदाजपत्रके व रेखाचित्रे तयार करणे आणि तांत्रिक अधिकाऱ्यांकडून मान्यता मिळविणे ही होती.

सल्लागारांनी परिगणना केलेली प्राथमिक अंदाजित किंमत रु. १९२.५० कोटी वाढून रु. २८५.०९ कोटी (जानेवारी, २००७) व नंतर रु. ३५५.४० कोटी पर्यंत वाढविण्यात आली (मे,

२००७) आयोजन समिती व GTCC च्या आदेशांवरुन केलेल्या बांक्सिगच्या ठिकाणी अतिरिक्त खोल्या, तरण तलाव, सराव तलाव, बॉक्सिग च्या ठिकाणी बसवलेले तात्पुरते डिझेल जनित्र संच, तंदुरुस्ती केंद्रातील अतिरिक्त साधने, क्रीडा विज्ञान केंद्राची स्थापना, इत्यादी मुळे मुख्यत्वे करुन कामाची व्याप्ती वाढली.

GTCC व OC यांनी सल्लागारांना वास्तवदर्शी अंदाजपत्रक तयार करता यावे म्हणून प्राथमिक नियोजनाच्या टप्प्यावर सर्व गरजांचे निर्धारण करणे आवश्यक होते.

आम्हाला असेही आढळले की क्रीडा व इलेक्टॉनिक साधनांच्या असलेल्या प्रत्यक्ष गरजेचे योग्य निर्धारण झाले नव्हते ज्याची परिणती, वेटलिफ्टिंग व ॲथलेटिक्सची साधन, मुष्टियुध्द गुणमोजणी प्रणाली, इलेक्टॉनिक व्हिडिओ पडदे/गुणफलक यांची जास्तीची खरेदी होण्यात झाली.

२.१.२ वित्तीय व्यवस्थापन

२.१.२.१ अर्थसंकल्प व निधी वाटप

प्रथम प्रकरणातील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे CYG करिता पायाभूत सुविधा व साधन सामुग्रीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून DSYS कडे निधी प्राप्त झाला.

स्पर्धा ठिकाणांचा विकास व साधने यावर DSYS ने डिसेंबर, २०१० पर्यंत एकूण निधी रक्कम रु. ४२५.५० कोटी पैकी रु. ४२४.७७ कोटी खर्च केले (परिशिष्ट २) या खेरीज राज्य शासनाने रक्कम रु. ३२.९५ कोटी तात्पुरत्या खर्चासाठी म्हणून दिली ज्यावर खाली चर्चा केली आहे.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या स्पर्धांच्या सुविधांसाठी केंद्र (रु.२१०.०० कोटी) व राज्य शासनाने (रु.२१५.५० कोटी) असा एकूण रु.४२५.५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला होता, त्यापैकी रु.४२४.७७ इतका निधी खर्च झालेला आहे. याशिवाय अद्यापही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे अंतिम देयक अदा करावयाचे आहे.

२.१.२.२ आकस्मिक निधीतून काढलेल्या रक्कमा अनियमितपणे राखून ठेवणे.

आयोजन समितीने स्पर्धावरील तात्पुरत्या अनपेक्षित स्वरुपाचे खर्च भागविण्यासाठी रु. ३२.९५ कोटीच्या अतिरिक्त निधींची मागणी शासनाकडे केली (ऑगस्ट, २००८). हा निधी स्पर्धा ठिकाण विकास व साधनांकरिता मिळाल्ेल्या रु. ४२५.५० कोटी व्यतिरिक्त अतिरिक्त निधी म्हणून होता.

शासनाने, सप्टेंबर २००८ आणि ऑगस्ट २००९ या कालखंडात तात्पुरता निधी म्हणून रु. ३२.९५ कोटी तीन हप्त्यात राज्याच्या आकस्मिक निधीतून मुक्त केला. या निधीतून DSYS ने रु. २५.१२ कोटी आयोजन समितीकडे वर्ग केले व रु. ७.८३ कोटी स्वत:कडे ठेवले. या निधीतून रक्कम रु. ४.३६ कोटी DSYS ने खर्च करुन रु. ३.४७ कोटी मार्च २०११ अखेर शिल्लक राहिले.

आम्हाला असे दिसून आले की ज्या तीन बाबींवर रु. २.५० कोटी खर्च केले त्यासाठी पायाभूत क्रीडा सुविधांच्या विकासाकरता शसनाने दिलेल्या रु. ४२५.५० कोटींच्या अनुदानात यापूर्वीच तरतूद केली होती. म्हणून आम्हास असे वाटते की, DSYS ने या बाबींवरील तात्पुरत्या खर्चासाठी अतिरिक्त निधींची मागणी करावयास नको होती.

आकस्मिक निधीतून खर्च करण्याबाबत वित्त विभागाने स्पष्टपणे खास नियम केले आहेत (एप्रिल, १९८३). आकस्मिक निधीतून केलेली मागणी कमी/जास्त करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागांची होती. महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तिकेमध्ये दिलेलया नमुन्यातील खर्चाच्या प्रगती अहवालाच्या आधारे हे करावयाचे होते. असे दिसून आले की, जरी DSYS आकस्मिक निधीतून रक्कम प्राप्त करणार होते, खर्चाचा प्रगती अहवाल वित्त विभागाच्या नियम पुस्तिकेप्रमाणे सादर केला नव्हता. DSYS ने सादर केलेल्या तात्पुरत्या व्यवस्थेच्या जमा खर्चाच्या विवरण पत्राची छाननी केली असता आढळून आले की रु. २.४८ कोटी इतकी शिल्लक ३१ मार्च, २०११ अखेर होती असे दिसून आले की रु. ९९ लाख DSYS ने मुदत ठेव स्वरुपात गुंतवले होते. आकस्मिक निधीतून मिळालेली रक्कम शासकीय कोषागारात भरण्याऐवजी DSYS ने अनियमितपणे राखून ठेवली होती.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१) शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००८/(प्र.क्र.३४४/०८)/क्रीयुसे-२, दि.११/०९/२००८ अन्वये रु.१५.०० कोटी प्राप्त यापैकी रु.१४.०० कोटी आयोजन समितीस हस्तांतरीत.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००८/(प्र.क्र.४५०/०८)/क्रीयुसे-२, दि.०७/१०/२००८ अन्वये रु.१०.०० कोटी प्राप्त यापैकी रु.०६.०० कोटी आयोजन समितीस हस्तांतरीत.
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००८/(प्र.क्र.३४४/०८)/क्रीयुसे-२, दि.१२/०८/२००९ अन्वये रु.७.९५ कोटी प्राप्त यापैकी रु.०५.१२ कोटी आयोजन समितीस हस्तांतरीत.

DSYS ने खर्च करावयाच्या बाबी :

अ) दि.२५ ऑगस्ट, २००८ रोजीच्या बैठकीत ठरल्यानुसार प्राप्त झालेल्या रु.०५.०० कोटीतील खर्च

अ.क्र.	खर्चाची बाब	अंदाजे रक्कम	प्रत्यक्ष खर्च
१	वेस्ट मॅनेजमेन्ट सिस्टीम	५०.००	५८,७५,०००/-
२	मेन्टेनन्स ऑफ व्हेन्यूज	५०.००	
३	हाऊसकिपींग	१०.००	
४	वेअर हाऊस	३०.००	--
५	मेडिकल पॉलिक्लिनिक	५५.००	२४,४६,७९४/-
६	गार्डन ऑफ युथ व फाऊंटेन	५०.००	५०,००,०००/-
७	पार्किंग एरिया डेव्हलपमेन्ट	१००.००	२,१४,७९,४९०/-
८	कायम स्वरुपी फर्निचर	१००.००	५५,५६,०००/-
९	ब्रॅण्डिंग	५०.००	५६,२६,३३५/-
	एकूण (अ)		**४,५९,८३,६१९/-**

ब) आयोजन समितीस दि.२२ ऑक्टोबर, २००८ रोजी कळविलेल्या व दि.०२ सप्टेंबर, २००९ रोजी अंतिम केलेल्या खर्चाचा तपशील.

अ.क्र.	खर्चाची बाब	प्रत्यक्ष खर्च
१	भोजनगृह वातानुकूलन यंत्रणा	१७,६२,४४२/-
२	वसतिगृहासाठी सन कंट्रोल फिल्म	८,१८,८६७/-
३	प्रबोधिनी वसतिगृहाचे नूतनीकरण	९,४५,९१८/-
४	ओ.बी.व्हॅन व डी.जी.सेट पार्किंग विकसन	वरील अ.क्र.२ मध्ये एकत्रित
५	प्रत्यक्ष खेळ एरियाचे हाऊसकिपींग	१०,८३,६०५/-
६	अधिकच्या विद्युत पुरवठ्याकरिता डिझेल जनरेटरचे भाडे	१,३४,१७,८५८/-
७	स्पर्धा कालावधीचे विद्युत देयक	७५,३४,०३०/-
८	हॉकी प्ले फील्ड दुरुस्ती	५,००,०००/-
९	ट्रायल गेम्स पाणी पुरवठा व डी.जी.सेट	७०,००,०००/-
	एकूण (ब)	**३,३०,६२,७२०/-**

वरील तक्ता (अ) व तक्ता (ब) ची एकूण रक्कम : **रु.७,९०,४६,३३९/-**

उपरोक्त नुसार दिसून येईल की, DSYS ने वरील बाबींवर खर्च केला पण मिळालेली रक्कम उशीरा म्हणजे सुमारे एक वर्षांनी प्राप्त झालेली असल्याने, रु.४२५.५० कोटीच्या निधीतून त्या देयकांची

अदायगी करण्यात आली. तेंव्हा केवळ या रक्कमेची प्रतिपूर्ती करणे बाकी आहे. त्यामुळे रक्कम राखून ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

सदरची रक्कम आयोजन समितीकडून खालील कारणास्तव वजा करुन घेण्यात आली.

१) आयोजन समितीने दि.२६/०८/२००८ रोजीच्या दोन पत्रान्वये कळविले होते की, कोणतीही नवीन कामे सांगणार नाही.

२) परंतु आयोजन समितीमार्फत अगदी स्पर्धेच्या कालावधीपर्यंत नवीन नवीन कामे सांगणे चालूच होते.

ही रक्कम वसूल करुन घेतली नसती तर, CYG साठी अधिकचा खर्च झाला असता, त्यामुळे प्रलंबित देयके भागविण्यासाठी अधिकची रक्कम मागणी करावी लागली असती. यामुळे शासनावर अधिकचा रु.०३.०० कोटीचा भार पडला असता.

याबाबत सादर करण्यात येते की, शिल्लक रक्कम जरी आकस्मिकता निधीतील असली तरी, ती ज्या बाबींसाठी मागणी करण्यात आली, त्याबाबींचा खर्च ही रक्कम मिळणार या हेतूने पायाभूत सुविधांच्या निधीतून करण्यात आला. त्यामुळे खर्च झालेला आहे फक्त ही रक्कम पायाभूत सुविधांच्या निधीकडे वर्ग करणे आवश्यक होते, ते DSYS कडून झाले नाही. तथापि, रक्कम एकाच आहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या कक्षेत होती.

वरील बाबीवरुन दिसून येईल की, DSYS यांचा रक्कम राखून ठेवण्याचा कोणताही उद्देश नव्हता. तेंव्हा ही बाब लोक लेखा समितीने क्षमापित करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

तथापि, सदर रक्कम रु.३,५२,४६,३६६/- शासकीय कोषागारात चलनाद्वारे भरणा करण्यात आलेली आहे. चलनाची प्रत सोबत जोडली आहे.

या शिल्लक रक्कमेमध्ये मूळ शिल्लक रक्कम रु.३४३९१४९०/- इतकी असून व्याजाची रक्कम रु.८५४८७६/- इतकी आहे.

२.२ पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी

२.२.१ मोबदला देऊन सल्लागारांची नियुक्ती

या अगोदर नमूद केल्याप्रमाणे कार्यकारी समितीने शिव छत्रपती क्रीडा संकुल येथील नियोजित क्रीडा सुविधा सुशोभिकरण व नव्याने क्रीडा सुविधा घटाकंची बांधणी करणे, नियोजन, संकल्प चित्र आरेखन व पर्यवेक्षण करणे कामी सल्लागारांची नियुक्ती करण्याचे ठरविले (जून २००६). त्यानुसार निविदा सूचना निर्गमित केली गेली (जून २००६) व तीन निविदा प्राप्त झाल्या. कार्यकारी समितीने मे.शशी प्रभू आणि असोसिएटस् (SPA) या निम्नतम निविदाकारास सल्लागार म्हणून नियुक्त केले (ऑगस्ट २००६). असे दिसून आले की शशी प्रभू असोसिएटस १९९४ मध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाकरिता शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या बांधकामाकरिता सल्लागार म्हणून होते.

सल्लागारांनी कामाच्य अंदाजित किंमतीच्या (रु.१९२.५० कोटी) ३.५ टक्के सल्ला शुल्क म्हणून निविदेत दर्शविले होते. क्रीडा सुविधांच्या मुख्य सुशोभिकरण व नविन पायाभूत क्रीडा सुविधांच्या कामांची सल्ला कराराची सांगड घातली गेली. १५ टक्के निविदा पूर्व शुल्क आणि ७० टक्के निविदा पश्चात कामांसाठी सल्लागारांना टप्प्याने अदायगी करावयाची होती. निविदापूर्व कामांत बांधकाम पूर्व सर्वेक्षण करणे, सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे, संकल्प चित्र तयार करणे, सक्षम प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता मिळवणे इत्यादींचा समावेश होता. निविदा पश्चात कामांमध्ये अंतरिम अदा देयके प्रमाणित करणे आणि चालू कामांचे पर्यवेक्षण करणे इत्यादीचा समावेश होता. उरलेल्या १५ टक्के रकमेची अदायगी मुख्य कंत्राटदाराने अंतिम देयके सादर केल्यावर प्रत्येकी ५ टक्के समान हप्त्यांत दोष सुधार कालावधी मध्ये आणि दोष सुधार कालावधी अखेर करावयाची होती.

२.२.३ मुख्य कामाकरिता कंत्राटदारास नियुक्त करणे

कार्यकारी समितीने जून, २००६ च्या पहिल्या बैठकीत सुशोभिकरणाचे मुख्य काम आणि क्रीडा संकुलातील पायाभूत क्रीडा सुविधांचे नवीन बांधकाम यांचे कार्यान्वयन करण्यासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्याचे ठरविले. रु. १९५ कोटीच्य कामासाठी निविदा सूचना निर्गमित केली गेली (१३ नोव्हेंबर, २००६) निविदा कागदपत्रांची विक्री २५ नोव्हेंबर, २००६ पासून करावयाची होती परंतु निविदा सूचनेमध्ये बोली सादर करण्यासाठीचा शेवटचा दिनांक नमूद करण्यात आला नव्हता. या कामासाठी एकूण पाच बोली प्राप्त झाल्या.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निविदा सूचनेमध्ये बोली सादर करण्यासाठीचा शेवटचा दिनांक नमूद करण्यात आलेला नव्हता. या कामासाठी एकूण पाच बोली प्राप्त झाल्या होत्या. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, निविदा सादर करण्यासाठीचा दिनांक निविदापूर्व बैठकीत नमूद करण्यात आलेला होता व सर्वांना तो कळविण्यात आलेला होता. (निविदापूर्व बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत शीघ्र संदर्भासाठी जोडली आहे.)

तांत्रिक बोलींचे परिक्षण करण्यासाठी तांत्रिक मूल्यांकन समिती (TEC), गठित करण्यात आली होती (१ नोव्हेंबर, २००६) सार्वजनिक बांधकाम विभागातील (PWD), निवृत्त सचिव, नगर रचना विभागातील निवृत्त संचालक, PWD, पुणे येथील मुख्य अभियंता, सल्लागार आणि DSYS अशा पाच सदस्यांचा त्यामध्ये समावेश होता. TEC च्या पाच सदस्यांपैकी फक्त दोघे (सल्लागार आणि निवृत्त PWD सचिव) तांत्रिक निविदा मूल्यांकन बैठकीला उपस्थित होते. (२६ डिसेंबर, २००६) असे आढळून आले आणि त्यांनी काय्रकारी समितीला बोली निर्धारण अहवाल सादर केला होता. सर्वच्या सर्व पाचही निविदा तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे आढळून आले. पुणे विभागाच्या २००५-०६ च्या महारष्ट्र राज्य PWD जिल्हा दरसूची (DSR) च्या आधारावर नूतनीकरण आणि नवीन बांधकाम यांचे अंदाज पत्रक तयार करण्यात आल्याचे त्यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले होते (डिसेंबर, २००६). क्रीडा पृष्ठभाग, वातानूकूलन यंत्रे, ध्वनि योजना आणि ध्वनिक्षेपण यंत्रणा ह्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी होत्या ज्यांच्यासाठी DSR मध्ये दर उपलब्ध नव्हते. या वैशिष्ट्यपूर्ण बाबींचे दर प्रचलित बाजारभावावर आधारलेले असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले होते.

आर्थिक बोली २८ डिसेंबर, २००६ ला उघडली आणि बीजीएससीटीपीएल ने सर्वात कमी दर रु. २६३.४४ कोटी नमूद केले.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निविदांचे तांत्रिक मूल्यांकन करण्यासाठी निविदा छाननीची कागदपत्रे पाहतांना बैठकीसाठी इतर दोन सदस्य म्हणजे संचालक, क्रीडा व मुख्य अभियंता, सा.बां.विभाग हे उपस्थित होते. तांत्रिक समितीने जरी अहवाल दोघांनी मिळून केलेला आहे, तथापि, तसेच तांत्रिक समितीचा अहवाल अंतिम करतांना कार्यकारी समितीच्या दि.३० डिसेंबर, २००६ च्या बैठकीस तांत्रिक समितीतील चारही सदस्य उपस्थित होते. (कार्यकारी समितीच्या दि.३० डिसेंबर, २००६ च्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.)

बीजीएससीटीपीएल ने नमूद केलेला जास्तीचा दर विचारात घेता नऊ विशेष बाबी वगळून दुसऱ्या विशेष सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून करुन घेण्याबाबत तांत्रिक सल्लागार

समितीने शिफारस केली. सल्लागारांनी कंत्राटदाराला (२ जानेवारी, २००७) इतके जास्त दर नमूद करण्याचे कारण विचारले. ह्याबाबत बीजीएससीटीपीएल ने सांगितले की विशेष सेवा पुरविणाऱ्या संस्थांबरोबर अंतिम दर ठरविण्यास कमी वेळ मिळाल्यामुळे जास्त दर नमूद केले गेले. बीजीएससीटीपीएल ने नंतर दर कमी करण्याचे मान्य केले.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

ही वस्तुनिष्ठ माहिती आहे, त्यामुळे अभिप्राय नाहीत.

सल्लागार शशीप्रभु असोसिएट्स यांच्या प्रमाणेच, बीजीएससीटीपीएल चा सुध्दा १९९४ मध्ये शिव छत्रपती क्रीडा संकुल बांधकामात समावेश होता, आणि त्यांनी एकत्रित काम केले होते.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सल्लागार शशी प्रभू असोसिएटस् यांच्या प्रमाणेच, बीजीएससीटीपीएल या दोन्ही प्रतिष्ठानांची नियुक्ती निविदा प्रक्रीया राबवूनच करण्यात आली आहे. त्यामुळे हे म्हणणे संयुक्तिक ठरत नाही.

बीजीएससीटीपीएल ने (दि. ६ जानेवारी, २००७) हे काम एक टक्का सूट देऊन रु. १९१.७४ कोटींना करण्याचे अखेरीस मान्य केले. त्यांनी तीन विशेष कामांसाठी २३ टक्के सूट देऊ केली. त्यांना तसे इरादापत्र देण्यात आले (१० जानेवारी, २००७), अशा प्रकारे सभेला अनुपस्थित असलेल्या TEC च्या बहुतेक सदस्यांशी विचार विनिमय न करता तयार केलेल्या अहवालाच्या आधारे मुख्य कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कार्यकारी समितीच्या दि.३० डिसेंबर, २००६ रोजीच्या बैठकीस तांत्रिक समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते, त्यामुळे सभेला अनुपस्थित असलेल्या TEC च्या बहुतेक सदस्यांशी विचार

विनिमय न करता तयार केलेल्या अहवालाच्या आधारे मुख्य कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली. हे विधान संयुक्तिक ठरत नाही.

सक्षम प्राधिकारी असलेल्या कार्यकारी समितीने सदर प्रस्तावांच्या अंदाजपत्रकास दिलेली प्रत्यक्ष तांत्रिक मान्यता आणि विशेष बाबींच्या दरांच्या पुष्ट्यर्थ आम्ही प्रत्यक्ष कागदोपत्री पुरावा मागितला. कार्यकारी समिती कडून तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी सल्लागारांची असते. आम्ही मागविल्याप्रमाणे कार्यकारी समिती ने केलेल्या अंदाजपत्रकास दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या संमतीची प्रत DSYS ने दिली नाही.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कार्यकारी समितीने दि.०१ नोव्हेंबर, २००६ च्या बैठकीत रु.१९२.५० कोटीच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देऊनच निविदा प्रक्रीया करण्याविषयी निर्णय घेतला. याचाच अर्थ असा होतो की, कार्यकारी समितीने रु.१९२.५० कोटीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली होती. (कार्यकारी समितीच्या दि.०१ नोव्हेंबर, २००६ च्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.)

DSYS आणि बीजीएससीटीपीएल यांच्यातील वाटाघाटीनंतर, बीजीएससीटीपीएल यांना रु. १९१.७४ कोटींसाठी कामाचे आदेश दिले गेले (फेब्रुवारी, २००७), यात नऊ विशिष्ट बाबींपैकी पाच बाबी ज्या पूर्वी वगळण्यात येणार होत्या त्या अंतर्भूत केल्या होत्या. (ह्या पाच बाबी- कालझीप छपरा ऐवजी जस्तविलेपन केलेले छप्पर, कृत्रिम मार्गिका, लाकडाची फरसबंदी, डेको टर्फ आणि भूसौदर्यकरण).

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांच्या निविदेतून वगळलेल्या कामापोटी खालीलप्रमाणे पुनश्च खर्च झालेला आहे.

कामाचा तपशील	बीजीएससीटीपीएल ने मूळ निविदेत दिलेले दर	बीजीएससीटीपीएल यांना दिलेल्या कामाची रक्कम	याच कामाच्या नंतर निविदा काढून झालेला खर्च
लॅण्डस्केपिंग	८५०९७६०५	२०००००००	८२५४०५५१

हायमास्ट टॉवर्स	९५९०५३१५	निरंक	५६४४७०४६
सॅण्ड ब्लास्टिंग	८८७०००००	निरंक	निरंक
सॅण्ड फिलींग	४००१६५०	निरंक	निरंक
इलेक्ट्रीकल	१६५१५३६२२	१०५६३९२६२	निरंक
HVAC	१९०१६७५९९	१३११०१५९९	निरंक
कालझिप रुफींग ऐवजी गॅल्वॅलूम रुफींग	३४०३६४९५७	५८०४४६३०	निरंक
सिंथेटिक ट्रॅक, वूडन फ्लोअरींग व डेकोटर्फ	१७९३१०६९४	१३८०६९२३४	निरंक
एकूण	**१०६८८७१४४२**	**४५२८५४७२५**	**१३८९८७५९७**

उपरोक्त प्रमाणे निविदेतील काही काम करुन व काही कामावर सवलत घेऊन एकूण निविदेमध्ये व वगळलेल्या कामावर नंतर निविदा काढून केलेला खर्च गृहीत धरला तर एकूण रु.४७.७० कोटींचा फायदा झाल्याचे दिसून येते.

वाटाघाटी केल्यानंतर शेवटी १% सवलत घेण्यात आली, ती रु.१.९३ कोटी इतकी आहे. वरील दोन्ही रक्कमा गृहीत धरल्यास एकूण रु.५०.०० कोटींचा फायदा झाला. परंतु एकूण काम १९१.७४ वरुन ३१८.२० वर गेले त्यामुळे बचत दिसून येत नाही, असे नमूद केले आहे, तथापि, याठिकाणी हे नमूद करावेसे वाटते की, रु.५०.०० कोटीने हीच किंमत वाढून सुमारे रु.३६८.०० कोटी पर्यंत झाली असती व एकूण प्रकल्पाची किंमत रु.४७५.०० कोटीवर गेली असती.

याशिवाय, डिसेंबर, २००७ मध्ये कार्यकारी समितीने बीजीएससीटीपील मार्फत करण्यासाठी रु. ३२.६५ कोटींची सहा अतिरिक्त कामे निविदेशिवाय मान्य केली.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

क्रीडा सुविधा उभारणीचे काम सुरु झाले होते, त्यावेळी सुरुवात झालेल्या कामाचा आढावा घेऊन, आयोजन समिती व गेम्स टेक्निकल कमिटी आणि इ.के.एस.कन्सलटंट यांनी सरावासाठी ॲथलेटिक्स वॉर्मप ट्रॅकसाठी चेंज रुम कॉम्प्लेक्स, नवीन एक जलतरण तलाव, अधिकची इमारत व चेजिंग रुम, नवीन दोन वसतिगृहे, फायनल शुटींग रेंज व अतिरीक्त रस्ते, ही कामे फेब्रुवारी, २००७ मध्ये प्रस्तावित केलेली होती. प्रस्तावित केलेली कामे ही मूळ कामाशी सुसंगत असल्याने, या कामासाठी वेगळ्या निविदा प्रसिद्ध करुन ही कामे हाती घेणे यामध्ये वेळ वाया गेला असता, तसेच विविध कंत्राटदार यांच्यावर निरीक्षण ठेवणे इ. बाबींबाबत अडचणी निर्माण झाल्या असत्या आणि

एकूणच स्पर्धेपूर्वी कामे पूर्ण होण्याबाबत साशंकता निर्माण झाली असती. त्यामुळे विविध अधिकाऱ्यांचे मत घेऊनच रु.३२.६५ कोटींचे कामे मूळ कंत्राटदारांना देण्यात आली, या कामांमध्ये जलतरण तलाव, वसतिगृह, टेबल-टेनिस हॉल, सा.बां.विभागाच्या निवृत्त अधिकाऱ्यांचे मत देखील सोबत जोडले आहे. त्यांनी नमूद केले आहे की, सा.बां.नियम पुस्तिका मधील परिच्छेद क्र.३४-२ व ३४-३ नुसार एखाद्या मोठ्या प्रमाणाच्या कामामध्ये त्याच पद्धतीचे काम मूळ कंत्राटदार निविदा दराने करण्यास तयार असेल तर त्यांनाच द्यावे, कमी दर येतील हे गृहीत धरुन एखादे खाते नवीन निविदा प्रक्रीया करु शकते, परंतु कमी दर येतील याची शक्यता नाही, तसेच एकाच प्रकारच्या कामामध्ये वेगवेगळ्या कंत्राटदारांमध्ये सहकार्य राहीले नसते. परिणामी प्रकल्पाची गती कमी झाली असती.

एकाच कंत्राटदाराशी वाटाघाटी केल्यानंतर इतर कंत्राटदारांना ज्ञात न करता निविदा सूचनेत नमूद केलेल्या कामाच्या व्याप्तीत बदल करण्याने प्रक्रिया परिणामशून्य होऊन परिणामी स्पर्धात्मक दराचा फायदा मिळू शकला नाही.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाच्या जनरल फायनान्स रुल मधील दर्शविण्यात आलेला मुद्दा हा केवळ वाटाघाटी कोणासोबत कराव्यात यासाठी आहे. तसेच याबाबत केंद्रिय दक्षता आयोगाने देखील त्यांच्या दि.१८ नोव्हेंबर, १९९८ च्या पत्रान्वये निम्नतम दरधारका सोबत वाटाघाटी करता येतात, तसेच दक्षता आयोगाच्या दिनांक २५/१०/२००५ च्या पत्रान्वये देखील वाटाघाटी करुन एखाद्या ठरविलेल्या किंमतीपर्यंत येणे शक्य असेल तर वाटाघाटी कराव्यात. असे नमूद केले आहे.

मा.महालेखापालांनी सा.बां.नियमावलीमधील क्र.२०८ खालील टीप-३ चा उल्लेख केला आहे. हा उल्लेख खालीलप्रमाणे आहे.

"जाहीरपणे मागवलेल्या निविदा न आल्याने किंवा त्याबाबत पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने वाटाघाटीने निविदा मागविण्याचे ठरले असेल आणि नंतर काही महत्वाचे बदल करण्यात आले असतील तेंव्हा, ज्या नवीन अटी व शर्तीवर कंत्राटाच्या वाटाघाटी करण्याचे ठरवले असेल त्या अटी व शर्ती, त्या कंत्राटात हितसंबंध/स्वारस्य असणाऱ्या सर्व कंत्राटदारांना कळवण्यात यावेत. मात्र एका कंत्राटदाराने कंत्राटासाठी घातलेल्या अटी दुसऱ्या कंत्राटदाराला कळणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी."

येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, या निविदा निविदा जाहिरात मागवून अंतिम केलेल्या आहेत. वाटाघाटी ह्या निविदापश्चात केलेल्या आहेत व त्या निम्नतम दरधारकांशीच केलेल्या आहेत. तसेच कार्यकारी समितीने काढलेल्या निविदा ह्या वाटाघाटी नंतरच्या निविदा नव्हत्या.

२.२.३.२ पुरवठादारामार्फत काम न केल्याने जादा खर्च

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे नऊ विशिष्ट बाबी कामाच्या व्याप्तीमधून वगळल्या होत्या व त्यापेकी पाच बाबींची मागाहून भर टाकली गेली. बॅडमिंटन सभागृह वेटलिफ्टिंग सभागृह, टेबल टेनिस सभागृह यासाठी लाकडी फरसबंदी व टेनिस कोर्ट साठी डेको टर्फ या दोन बाबी होत्या. बीजीएससीटीपीएल चे दर रु. ९२९१.५९ प्रति चौ.मी. व रु. २५३० प्रति चौ.मी. अनुक्रमे कार्यकारी समितीने जानेवारी २००७ मध्ये मान्य केले.

सल्लगारांच्या चौकशीअंती मे फ्री-विल इन्फ्रास्ट्रक्चर यांनी लाकडी फरसबंदी व डेको टर्फ अनुक्रमे रु. ६८२५ प्रति चौ.मी. व रु. १८०० प्रति चौ.मी. या कार्यकारी समितीने मान्य केलेल्या दरापेक्षा खूप कमी दराने पुरवण्याचे मान्य केले असल्याचे आम्हाला आढळून आले. आश्चर्य म्हणजे बीजीएससीटीपीएल यांनी त्याच कंपनीस म्हणजे मे फ्री-विल इन्फ्रास्ट्रक्चर यांना लाकडी फरसबंदी पुरवण्यासाझी नियुक्त केले होते. ज्या पुरवठादाराने प्राथमिक दर नमूद केला होता त्या ऐवजी मुख्य कंत्राटदाराकडून या दोन बाबी करुन घेण्याची परिणती रु. २.२१ कोटींच्या जादा खर्चात झाली.

DSYS यांनी नमूद केले (डिसेंबर, २०१०) की अधिक समन्वय व आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यांनुरुप उच्च दर्जाच्या दुय्यम (सब-बेस) पायासाठी मुख्य कंत्राटदाराच्या कार्यकक्षेत या बाबींचा समावेश करण्यात आला. मोठ्या प्रमाणावर गुंतलेला खर्च विचारात घेता मे. फ्रीविल इन्फ्रास्टक्चर व मुख्य कंत्राटदार यांच्या कामाचा सल्लागारांना समन्वय साधने शक्य झाले असते त्यामुळे हे उत्तर मान्य करण्याजोगे नव्हते.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

याच अहवालातील परिच्छेद क्र.२.२.३ मध्ये नमूद केले आहे की, विशेष बाबींच्या दरांच्या पुष्ट्यर्थ पुरावा सादर केला नाही, या परिच्छेद क्र.२.२.३.२ मध्ये नमूद केल्यानुसार दिसून येते की, दरांच्या पडताळणीबाबतची सर्व कागदपत्रे दर्शविण्यात आली होती.

सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे हे काम मूळ निविदेमध्येच समाविष्ट होते. *

वूडन व डेको टर्फ फ्लोअरींगचे तांत्रिकदृष्ट्या होणे आवश्यक असते. यासाठी आवश्यक असणारे फ्लोअरींग हे काम देखील मुख्य कंत्राटदाराच्या कामाच्या वावामध्ये होते. हे काम देखील कामाच्या वेळेपूर्वी किंवा त्या हॉलच्या वेळेत होणे आवश्यक होते.

तसेच या कामासाठी वेगळ्या निविदा प्रक्रीयेचा अवलंब करावा लागला असता, त्यामध्ये वेळ खर्च झाला असता. सदरचे काम हे मूळ कंत्राटदाराच्या वावामध्ये समाविष्ट केल्यामुळे इतर कामांच्या वेळेत हे काम पूर्ण होऊन या स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित झाल्या. हे काम निविदेमध्ये समाविष्ट करण्यासाठी घ्यावयाच्या दरांसाठी केवळ बाजारभावांचा आधार घेण्यात आलेला होता, ह्या कामासाठी नंतर निविदा मागविल्या असत्या तर कदाचित यापेक्षाही दर जास्त येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याच अहवालातील परिच्छेद क्र.२.२.३.७ मध्ये फोटोसहित वूडन फ्लोअरींग खराब झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे, हे काम बीजीएससीटीपीएल यांनी पुन्हा नव्याने करुन दिले आहे. वूडन फ्लोअरींगसाठी वेगळा कंत्राटदार नेमला असता तर कंत्राटदारांमध्ये समन्वय न साधता हे काम झाले असते, आणि कामाच्या गुणवत्तेमध्ये वरीलप्रमाणे दोष आढळून आला असता तर त्यावेळी केवळ एकमेकांवर दोषारोप करुन काम झाले नसते व एका ठिकाणी वूडन फ्लोअरींग खराब झाल्यावर ते कालांतराने संपूर्ण हॉलचे वूडन फ्लोअरींग खराब होण्यामध्ये परिणती झाली असती, असे झाले असते तर १.६६ कोटी रक्कम वाया गेली असती व पुनश्च त्या ठिकाणी हेच काम करण्यासाठी आजच्या दराने सुमारे रु.०२.०० कोटी किंवा त्यापेक्षाही जास्त रक्कम खर्च झाली असती. म्हणजेच एकूण रु.३.६६ कोटी इतका जादा खर्च झाला असता. त्यामुळे पुरवठादारांमार्फत काम न केल्याने जादा खर्च झाला हे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

२.२.३.३ प्रवासी उद्वाहकाकरता अतिरिक्त बाबींच्या चुकीच्या दर विश्लेषणामुळे जादा प्रदान:-

क्रीडा संकुलाच्या बांधकाम व सुशोभीकरणाच्या मुख्य कंत्राटानुसार बीजीएससीटीपाल यांनी प्रत्येकी रू. २५.५६ लाख निविदा किंमतीस मशीन रूमसह २० प्रवासी क्षमतेचे सात प्रवासी उद्वाहक पुरविणे आवश्यक होते. निधीची मर्यादा लक्षात घेऊन कार्यकारी समितीने ८ मे, २००८ रोजी घेतलेल्या बैठकीत मशीनरूमविना आठ प्रवासी क्षमतेचे पाच उद्वाहक पुरविण्याचे ठरविले.

DYSY च्या अभिलेख्यांवरून पाच उद्वाहकांच्या प्रदानासाठी सल्लागारांनी चुकीचे दर लावल्याचे आम्हाला आढळून आले (जानेवारी , २०११)

आठ प्रवासी क्षमतेच्या उद्वाहकासाठी अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी सल्लागारांनी केलेल्या चौकशी वर मशीन रून विना आठ प्रवासी उद्वाहकाची किंमत प्रत्येकी रू. ९.२५ लाख अशी मे. ओमेगा इलेवेटर्स यांनी नमूद केली (२ एप्रिल, २००८) ज्यासाठी सल्लागारांनी कर व कंत्राटदाराचा नफा धरून अंतिम दर रू. १०.४० लाख इतका परिगणित केला (मे,२००८) असे असूनही मु,य कंत्राटदारास रू. २०.३४ प्रत्येकी इतका दर देय असल्याचा सल्लागारांनी केला.

२० प्रवासी क्षमतेच्या मशीन विना प्रवासी उद्वाहकाची बीजीएससीटीपाल यांनी त्यांची निविदा प्रथम सादर केली (डिसेंबर, २००६) तेव्हा, त्यात किंमत रू. ११.७० लाख प्रति उद्वाहक दर्शविल्याचे कार्यकारी समितीच्या नजरेस सल्लागारांनी आणून दिले नाही. सल्लागारांच्या शिफारशीवरून कार्यकारी समितीने १६ जून, २००८ च्या बैठकीत रू. २०.३४ लाख असा दर मंजूर केला.

हे काम करणाऱ्या बीजीएससीटीपाल यांना पाच उद्वाहक बसविण्यासाठी रू. ९७.७९ लाख अदा केल्यामुळे रू. ४५.७९ लाखांची जादा अदायगी झाली.

DYSY यांनी नमूद केले (जानेवारी, २०११) की, ओमेगा इलेवेटर्सकडून बटवड्याचे वेळापत्रक असे होते की त्यांनी नमूद केलेला दर मान्य करणे शक्य नव्हते.

अधिक क्षमतेचे उद्वाहक त्याच कंत्राटदाराकडे रू. ११.७९ लाख किंमतीस उपलब्ध असताना DYSY यांनी प्रत्येकी रू. २०.३४ लाख इतक्या किंमतीस खरेदी केले असल्याचे उत्तर मान्य करण्याजोगे नव्हते. शिवाय या व्यवहारात कमी क्षमतेचे उदवाहक जास्त किंमतीत खरेदी केले गेले.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात क्रीडा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

हे काम मुख्य निविदेमध्ये नमूद होते.

मूळ निविदेमध्ये दिलेला दर हा आयटम क्र.२४५-२० प्रवासी उद्वाहना (मशीनरुम सह) करिता रु.२५.५६ लाख इतका आहे.

मूळ निविदेमध्ये दिलेला दर आयटम क्र.२४६- २० प्रवासी उद्वाहना (मशीनरुम विना) करिता आयटम क्र.२४५ वर अधिकचा खर्च रु.११.८९ लाख इतका आहे. म्हणजेच २० प्रवासी उद्वाहनाकरिता मशीनरुम विना दर रु.२५.५६ +रु.११.८९ = रु.३७.४६ लाख इतका येतो.

आयटम क्र.२४६ ची मूळ निविदेतील बाब **"Extra for similar feature of the elevators but machine room less elevators. All other technical specifications and terms and conditions including delivery remaining same"** अशी नमूद आहे. त्यामुळे मशीनरुम विना संपूर्ण लिफ्टसाठी हे दर होते ही बाब संयुक्तिक नाही.

सा.बां.विभाग नियम पुस्तिका मधील पृष्ठ क्र.९९ मध्ये (९) अतिरिक्त बाबी मध्ये देखील अ.क्र.२२७(२)(अ) मध्ये नमूद केले आहे."ज्यावेळी अतिरिक्त काम, मंजूर निविदेमध्ये अगोदरच समाविष्ट करण्यात आलेल्या समान कामाशी तुलना करण्याजोगे असेल त्यावेळी प्रभारी अभियंता व कंत्राटदार यांनी परस्परात निश्चित करावयाचा व मंजूर करावयाचा दर, शक्यतोवर, निविदेतील समान बाबीच्या दरावर आधारीत केलेला असावा व विनिर्देशांमध्ये बदल केल्यामुळे जरुर तितका सुधारण्यात आलेला असावा, मात्र विभागाच्या दर अनुसूचीमध्ये अतिरिक्त कामासाठीच्या दराची तरतुद करण्यात आली असेल तर निश्चित करावयाचा दर अशा अनुसूचीत दरापेक्षा अधिक असता कामा नये.

०८ प्रवासी क्षमतेच्या उद्वाहकाची किंमत ही निविदेमध्ये असलेल्या २० क्षमतेच्या दिलेल्या दरांतून निश्चित करण्यात आली. यासाठी उद्वाहक उत्पादकांचे मत घेऊनच ती अंतिम करण्यात आली आहे. जादा बाबींचे दरांची निश्चिती ही मूळ निविदेतील दरांच्या आधारावर निश्चित करण्यात यावी, असे निविदेत नमूद करण्यात आले आहे, त्यानुसार ८ प्रवासी क्षमतेचे उद्वाहकाचे दर निश्चित करण्यात आले.

नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या अहवाल क्र.६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, २००८ करिता पायाभूत सुविधा विकास अहवालातील नगरविकास विभाग यांनी खालील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले.

३.१ पायाभूत नागरी सुविधा

राष्ट्रकुल युवा क्रीडास्पर्धा आयोजित करणे सुकर व्हावे म्हणून नियोजन आयोगाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नर्निर्माण अभियानाद्वारे (JNNURM) स्पर्धाशी संबंधित पायाभूत नागरी सुविधा प्रकल्पांसाठी निधीला मंजुरी दिली (ऑक्टोबर २००६). ही कामे पुणे महानगरपालिका (PMC) आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) यांनी कार्यान्वित करावयाची होती.

JNNURM अंतर्गत PMC आणि PCMC यांच्या क्षेत्रात येणारे अनुक्रमे रु.४३४.२२ कोटी आणि रु.३१२.१४ कोटी किंमतीचे रस्ते सुधार प्रकल्प मंजूर झाले होते. रु.७४६.३६ कोटीपैकी रु.७२२.१३ कोटीचा निधी (PMC रु.३२५.२५ कोटी आणि PCMC रु.३९६.८८ कोटी) उपलब्ध करण्यात आला आणि ऑक्टोबर २०१० पर्यंत त्याचा विनियोग करण्यात आला. याशिवाय, PMC आणि PCMC यांनी त्यांच्या स्वतःच्या रस्ते आणि भुयारी मार्गाच्या कामाच्या निधीतून अनुक्रमें रु.१५ कोटी आणि रु.१०५.०६ कोटी उपलब्ध करून दिले. मंजुर झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (DPR) पायाभूत नागरी सुविधांच्या सुधारणेचा एक भाग म्हणून राष्ट्रकुल युवा स्पर्धा सुरू होण्यापूर्वी रस्त्यांची कामे, विद्युतीकरणाची कामे, बस वाहनतळाची सुविधा, पादचारी भुयारी मार्ग आणि क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्था (ATCS) यांचे बांधकाम करावयाचे होते.

या योजनांपैकी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कित्येक कामे राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेपूर्वी पूर्ण न झाल्याचे आमच्या निदर्शनास आले.

कामाचे स्वरुप	संख्या	CYG पूर्वी देण्यांत आलेली	CYG नंतर देण्यांत आलेली	न देण्यांत आलेली	CYG पूर्वी पूर्ण झालेली	CYG नंतर इ ालेली
PMC - JNNURM						
रस्त्यांची कामे	२३	२२	१	-	१२	४
BRTS	BRTS घटकाचे रु.३२.६७ कोटीचे काम निविदा प्रकियेच्या टप्प्यावर होते					
अंतिम टोकाची कामे	१२	११	-	१	५	१
पादचारी भुयारी मार्ग	४	१	२	१	१	२
क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्थेची कामे	अजूनपर्यंत कोणत्याही कामाला प्रारंभ झाला नाही.					
PMC - स्वनिधी						
रस्त्याची कामे	१	१	-	-	१	-
PCMC - JNNURM निधी						
WBM प्रकिया	१	-	१	-	-	१
रुदीकरण/सुधारणा	१	१	-	-	-	१
भुयारी मार्ग	२	२	-	-	-	२
वाहनांसाठी उपमार्ग	१	१	-	-	-	१

CYG स्पर्धेच्या ठिकाणी सुलभ प्रवेशाकरिता प्रस्तावित पायाभूत सुविधांची आवश्यकता असतानासुध्दा, JNNURM अंतर्गत या स्पर्धांकरिता उपयुक्त असलेली अर्धी-अधिक कामे CYG स्पर्धेपूर्वी पूर्ण झाली नाहीत, यावरुन कामाचे सुनियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी यांचा अभाव असल्याचे दिसून येते.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

माहे ऑक्टोबर, २००८ मध्ये पुणे शहरात राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी बीआरटीएस व बस ताफ्याचे आवर्धनमार्फत सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याबरोबरच, पुणे महानगरपालिकेने शहरातील रेल्वे स्टेशन, विमानतळ व क्रीडा संकुल यांना जोडणाऱ्या महत्वाच्या रस्त्यांचा विकास करण्याचे ठरविले होते. ऑक्टोबर, २००८ मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेपूर्वी सदर काम करण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियानांतर्गत मंजूरी मिळण्याच्या अपेक्षेने, महानगरपालिकेने ऑक्टोबर, २००७ मध्ये बीआरटीएस व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या रस्त्यांना जोडणाऱ्या कामाची निविदा प्रक्रीया सुरु करुन बहुतेक कामाचे कार्यादेश जानेवारी, २००८ मध्ये दिले. अनेक अडथळे तसेच सुधारित रकमेस (ऑगस्ट, २००८) मिळालेल्या मान्यतेचा दिनांक व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा (ऑगस्ट, २००८) यामध्ये कमी कालावधी असूनही, पुणे महानगरपालिकेने पावसाळ्याच्या पाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी लाईन्स टाकणे, फुटपाथ व सायकल ट्रॅक बांधणे इत्यादी कामांसहित बहुतके कामे विनिर्देशाप्रमाणे पुर्ण केलीत. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेपूर्वी खालील रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले. या कामासाठी सप्टेंबर, २००८ पर्यंत रुपये १२३.८५ कोटी एवढा खर्च करण्यात आला.

(१) रामवाडी जकात नाका ते विमानतळ
(२) संचेती हॉस्पीटल ते युनिव्हर्सिटी चौक
(३) बाजीराव रस्ता
(४) शिवाजी रस्ता
(५) नेहरु रस्ता
(६) सणस मैदान परिसरातील रस्ते
(७) पुणे स्टेशन ते फिट्झगेराल्ड पुल
(८) हॉटेल ग्रीन पार्क ते बालेवाडी
(९) शिवाजी नगर ते गणेशखिंड रोड
(१०) एस.पी.कॉलेज

(११) सणस पुतळा ते दांडेकर पुल
(१२) बालेवाडी गावठाण ते वेस्टर्ली बायपास
(१३) जंगली महाराज रोड वाहनतळ विकसीत करणे
(१४) कोथरूड डेपो वाहनतळ विकसित करणे.
(१५) पुणे मनपा मुख्य भवनासमोर वाहनतळ विकसित करणे
(१६) मोलेदिना हॉल वाहनतळ विकसित करणे
(१७) बोपोडी जकातनाका वाहनतळ विकसित करणे
(१८) बाणेर सबवे (बालेवाडी क्रिडा संकुल नजीक)

आतापावेतो निविदा रककम रुपये ४३५.०३ कोटी पैकी रुप९ये ३९२.८२ एवढा खर्च करून प्रकल्पाचे ९० % पेक्षा जास्त काम करण्यात आले आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	निविदा किंमत (रुपये कोटीत)	आतापावेतो झालेला खर्च (रुपये कोटीत)	प्रकल्पाची भौतिक प्रगती.
(१)	बीआरटीएस (राष्ट्रकुल युवा क्रिडा, २००८ साठी पायाभूत सुविधांचा विकास) पीयुएन-०१९	४३५.०३	३९२.८२	नियोजित घटक * मुख्य रस्ता व लिंक रस्ता जोडणी २५ टर्मिनल सोयी व पादचारी भुयारी मार्ग -१४ एकूण घटक ३९ *३० घटक १००% काम पूर्ण (२३रस्ते व ७ टर्मिनल सोयी) *४घटकांची कामे प्रगतीपथावर असून ५ कामे भूसंपादनाअभावी अद्याप सुरु करण्यात आली नाहीत. *सर्वंकष एकूण प्रगती - ९०%

राष्ट्रकुल युवा स्पर्धेपूर्वी १०० टक्के काम पूर्ण करात आले नसले तरी, बहुतेक पायाभूत सुविधाविषयक कामे पुणे शहराचा भविष्यातील विकास व पुढील काळासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्यामुळे या कामावर अनावश्यक खर्च झाला नाही.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

जेएनएनयुआरएम प्रकल्पांतर्गत महापालिकेकडून औंध रावेत रस्त्याच्या कामाच्या अनुषंगाने विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत रक्कम रुपये ३१२.१४ कोटी एवढ्या रक्कमेच्या प्रकल्पास सीएसएमसीच्या दिनांक २८/१२/२००७ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या मान्यतेच्या अनुषंगाने नगर विकास मंत्रालायाकडून अनुदान मंजूर करण्यात आले (पहा प्रपत्र १).

औंध रावेत रस्त्याचे कामाचे कार्यादेश दिनांक ४/८/२००८ रोजी देण्यात आले. एकूण रस्त्याची लांबी १४.५० किमी पैकी, १०.५ किमी रस्त्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत ४ किमी संरक्षण खात्याचे हद्दीतील रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई पुणे रस्त्याचे काम सन २००७ मध्ये सुरू करण्यात येऊन ११.१०.२००८ रोजी राष्ट्रकुल युवा स्पर्धेपूर्वी पूर्ण करण्यात आले (पहा प्रपत्र २). सदर रस्ते हे शहराच्या विकास आराखडयातील असल्याने सदर विकास कामे ही राष्ट्रकुल स्पर्धेशी प्रत्यक्ष निगडीत नव्हते (पहा प्रपत्र ३). या प्रकल्पांसाठी महापालिकेस रक्कम रुपये ३९७.८८ कोटी रुपये मिळाले नव्हते. या कामासाठी जवाहरलाल नेहरु नगर उत्थान अभियानांतर्गत केंद्रशासनाकडून रक्कम रुपये ११७.०५ कोटी व महाराष्ट्र शासनाचे ४६.६२ कोटी मिळून एकूण रक्कम १६३.८७ कोटी इतके अनुदान महापालिकेस प्राप्त झाले आहे.

मुंबई पुणे रस्ता आणि समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) काम महापालिकेने रक्कम रुपये १०५.०६ कोटी खर्च करून स्वतःच्या निधीतून केले आहे. सदर काम हे राष्ट्रकुल युवा स्पर्धेपूर्वी करण्यात आले आहे. बस थांबे व वाहतुक नियंत्रण व्यवस्थेबाबतसीएसएमसी यांनी सूचना दिल्या होत्या परंतु सदर सूचनांचा अंतर्भाव मंजूर विस्तृत प्रकल्प अहवालात नाही.

वर नमूद केलेप्रमाणे सदर कामे ही प्रत्यक्ष राष्ट्रकुल युवा स्पर्धेशी संबंधित नाही. परंतु महापालिकेने सदरची कामे करारातील अटी व शर्ती नुसार राष्ट्रकुल युवा स्पर्धेच्या सुलभ आयोजनाच्या दृष्टीने पूर्ण केलीत.

३.२.२.३ पेव्हर ब्लॉक्स पुन्हा लावण्याकरिता केलेला टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च

PMC ने डिसेंबर २००७ मध्ये संचेती हॉस्पिटल ते युनिव्हर्सिटी चौक यांना जोडणारे पदपथ आणि सायकल मार्गासह वाहतुकीच्या मार्गाचे रु.३८.२९ कोटीचे काम डिसेंबर २००८ पर्यंत पूर्ण करण्यासाठी मे.वालेचा इंजिनिअरिंग लिमिटेड यांना दिले. महापालिका आयुक्त आणि CYG च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्पर्धेआधी कार्यस्थळाला दिलेल्या भेटीमध्ये ऑक्टोबर २००८ पूर्वी काम पूर्ण करण्याविषयी कंत्राटदाराला सूचना दिल्या. कंत्राटदाराने टेलीफोन केबल, जलवाहिन्या, जलनिःसारण वाहिन्या, विद्युत केबल इ. हलवून पेव्हर ब्लॉक लावावयाचे होते. संथ गतीने चाललेल्या कामाच्या प्रगतीमूळे आणि जवळ आलेल्या क्रीडास्पर्धांमुळे कंत्राटदाराने क्रीडास्पर्धेदरम्यान वाहतूक सूलभ व्हावी याकरिता पेव्हर ब्लॉक लावले. राष्ट्रकुल स्पर्धेनंतर पेव्हर ब्लॉक काढून केबल इत्यादी टाकून पेव्हर ब्लॉक पुन्हा बसविण्यांत आले आणि या पेव्हर ब्लॉक काढण्याच्या आणि पुन्हा लावण्याच्या कामासाठी रु.४६.८९ लाख अतिरिक्त खर्च करण्यात आला.

प्रधान सचिव, UDD यांनी विदीत केले (मे २०११) की मोकळी जागा उपलब्ध नसल्याने पेव्हिंगचे काम पूर्ण होण्यापूर्वी वापरात असलेल्या केबल्स हलविता आल्या नाहीत आणि स्पर्धा संपेपर्यंत उपयुक्त असलेल्या केबल्स हलविण्याचे काम पुढे ढकलण्यात आले. तरीही, PMC ला मोकळी जागा वेळेवर उपलब्ध करून देण्यांत अपयश आले. परिणामी, पेव्हर ब्लॉक्स काढून टाकणे आणि पुन्हा लावणे याकरिता रु.४६.८९ लाख टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च झाला.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्तुत कामाचे संबंधित ठेकेदार राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धा २००८ पुर्वी रस्त्याच्या कडेने विविधप्रकारच्या युटिलिटी लाईन्स टाकून त्यावर फुटपाथ करणेचे काम पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यामुळे CAG अहवालातील परिच्छेदानुसार या कामाकरिता झालेला रु.४६.८० लाख एवढा खर्च ठेकेदार यांचे रनिंग बिलामधून वसुल करणेत आला आहे.

यामुळे आता प्रस्तुत कामी महाराष्ट्र शासन अथवा पुणे महानगरपालिका यांना कोणतेही प्रकारचे अतिरिक्त खर्च अथवा नुकसान झालेले नसल्याने सदर आक्षेप वगळण्यात यावा.

नगरविकास व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अभिप्राय नाहीत.

३.३ अयोग्य नियोजनामुळे किमतीतील तफावत आणि सल्लामसलतीचे शुल्क यासाठीचा अतिरिक्त खर्च झाला.

३.३.१ PCMC ने मुंबई-पुणे रस्त्यावरील खंडोबा चौक, आकुर्डी येथे रु.१४.२० कोटीचाभुयारी मार्ग बांधण्याचे काम मे अतुर इंडिया लिमिटेडकडे सोपविले होते (मार्च २००६) ते मार्च २००७ पर्यंत पूर्ण करायचे होते. राज्य शासनाने राज्यातील पुलांच्या कामांना स्थगिती दिल्याने या कामाचा प्रारंभ मार्च ते ऑगस्ट २००६ इतक्या सहा महिने विलंबाने झाला. अपुऱ्या नियोजनामुळे, सेवा रस्ते (SLIP ROAD) आणि दुय्यम रस्ते, भूमिगत रस्त्यांचे रुंदीकरण, जलवाहिन्या आणि जलनिःसारण वाहिन्यांचे स्थलांतर; छोटे बगीचे तयार करणे, फरश्या बसविणे अशा प्रकारचे अतिरीक्त तांत्रिक बदल काम प्रगतीपथावर असताना सुचविण्यांत आले आणि याला जुलै २००९ मध्ये रु. ३१.९५ कोटीसाठी सुधारित तांत्रिक मंजुरी देण्यात आली. ३० महिन्यांच्या विलंबानंतर फेब्रुवारी २०१० मध्ये (सहा महिन्याचा स्थगिती कालावधी वगळून) काम पूर्ण करण्यांत आले आणि ऑक्टोबर २०१० पर्यंत रु.२४.४५ कोटी प्रदान करण्यांत आले. आमच्या असे निदर्शनास आले की, कामाला अतिशय विलंब झाला असतानासुध्दा कंत्राटदाराला वाढीव दराने रु.२.६४ कोटी देण्यांत आले. सल्लागारांकडून आणि PCMC कडून योग्य नियोजन आणि सर्वेक्षण करुन काम केले असते तर हे टाळता आले असते.

PCMC ने या कामासाठीच्या सल्लासेवेपोटी मे. सोविल लि. सल्लागार अभियंता यांची फेब्रुवारी २००४ मध्ये नेमणूक केली. सल्लागाराच्या कामात त्रुटी असल्या तरीही त्यामुळे महानगरपालिकेला झालेल्या नुकसानीकरिता त्याला जबाबदार धरण्याची तरतूद करारात नव्हती. सल्लागाराने योग्य नियोजन न केल्याने वेळ उलटून गेल्यावरसुध्दा सल्लागाराला विस्तारित कालावधीसाठी ऑक्टोबर २०१० पर्यंत रु.२८.६४ लाख अतिरिक्त शुल्क प्रदान करण्यांत आले.

प्रधान सचिव, UDD यांनी सांगितले की (मे २०११), PCMC ने शहरात जास्त चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतःच्या साधनसामुग्रीतून हे काम सुरु

केले होते, तरीही वर नमूद केल्याप्रमाणे PCMC ने किंमतीतील तफावतीपोटी रु.२.६४ कोटी आणि सल्लागाराच्या अतिरिक्त शुल्कापोटी रु.२८.६४ लाखाचा टाळता येण्याजोगा खर्च केला ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

पुणे-मुंबई रस्ता विकास आराखड्याप्रमाणे६१ मी. रुंदीचा आहे. मात्र प्रत्यक्षात तो १५ ते २० मी. रुंदीचा वापरात होता. सदर रस्ता विकास आराखड्याप्रमाणे विकसित करणेच्या कामाची व्याप्ती मुळ कामात वाढलेमुळे व Utility shifting हे काम विविध विभाग/ खाते यांचे असल्याने मनपाच्या नियंत्रणात नव्हते. त्यामुळे सदरची कामे प्रत्यक्षात जागेवर येणाऱ्या अडीअडचणीप्रमाणे करावी लागली आहेत. सल्लागारांना करारानुसार मूळ कालावधीमध्येच काम रावयाचे होते तथापी संपुर्ण कामाचे IIT दिल्ली यांनी सुचविलेल्या BRTS साठी आवश्यक ते बदल करणे आवश्यक असल्याने कामाची व्याप्ती वाढली यामुळे सल्लागारास जास्त वेळ काम करावे लागले. मुळ निविदेपेक्षा जास्त कालावधी साठी काम करावे लागल्याने करारानुसार त्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला अदा करणे मनपास क्रमप्राप्त झाले.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेचे अभिप्राय नाहीत.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

खंडोबा माळ येथील समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) चे कामाबाबत

सदर कामाचे आदेश दि.२ मार्च २००६ रोजी देण्यात आले होते तथापी स्थानिक नगरसेवक यांनी या कामासंदर्भात राज्य शासनाकडे पत्राद्वारे काही तक्रार व शंका उपस्थित केल्यामुळे राज्य शासनाने सदर कामास दि.२१/३/२००६ रोजी स्थगिती दिली व दिनांक ३/८/२००६ रोजी सदर स्थगिती उठविण्यात आली (पहा प्रपत्र ७). महापालिकेने अंतर्गत सदर रस्त्याचे काम मार्च २००६ मध्ये सुरू केले. हे काम राष्ट्रकुल युवा स्पर्धेशी संबंधीत नसून हे काम पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वतःच्या निधीमधून केले आहे.

सदर काम काही तांत्रिक अडचणींमुळे सुरू करण्यास विलंब झाला परंतु फेब्रुवारी २०१० मध्ये समतल विलगकाचे काम पूर्ण करण्यात आले. तसेच मुख्य काँक्रीट रस्त्याचे काम व सेवा रस्त्याचे काम ऑक्टोबर, २००८ पूर्वी पूर्ण करण्यात येवून सदर रस्ता वाहतुकीसाठी दिनांक ११/१०/२००८ रोजी खुला करण्यात आला. सदर कामास उशीर होण्याची कारण पुढील प्रमाणे आहेत. सेवावाहिन्या दुसरीकडे हलविणे, पाणीपुरवठा पाईपलाईनचे रोपण, ड्रेनेज वाहिन्यांचे काम, प्राधान्याने मुख्य रस्त्याच्या कामांच्या आधी हाती घेणे आवश्यक असल्यामुळे सदर काम पूर्ण करण्यास विलंब झाला. सदर काम सुरु करण्यापूर्वी या कामांशी संबंधित विभाग जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसईबी, पीसीएमसी, एमआयडीसी, टाटा टेलिकॉम, आयडिया इत्यादी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी सदर विविध वाहिन्यांच्या स्थानांतरासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आली. या बैठकीस खालील विविध बाबी उपस्थितांच्या निदर्शास आणून देणेत आल्या :-

(१) सदरचा रस्ता यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने रस्त्याखालील भूमिगत वाहिन्यांचे निश्चित स्थान महापालिकेस माहित नाही.

(२) काही भूमिगत वाहिन्या अतिशय जुन्या असल्याने त्यांचे आराखडे सापडत नसल्याने व मूळ विभागाकडे उपलब्ध होत नाहीत.

(३) काही वाहिन्यांसंदर्भात कोणतेही लँडमार्क व सदर वाहिन्यांबाबतच्या संदर्भखुणा ज्या आराखड्यावर दाखविण्यात आल्या होत्या त्या सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरु करण्यापूर्वी तेथील बांधकामे पाडून टाकण्यात आल्याने प्रत्यक्ष कामाच्या जागेवर उपलब्ध नाही.

(४) सदर कामाचा भाग म्हणून महापालिकेने नियोजित रस्त्यांवर मंजूर नकाशानुसार समांतर पद्धतीने पाणीपुरवठा व ड्रेनेज वाहिन्या टाकण्याचे काम केले. रस्त्याची खोदाई करत असताना ज्या काही वाहिन्या रस्त्याच्या मध्ये आल्या त्या स्थलांतरीत करणे व जोडणे याशिवाय मनपास पर्याय उपलब्ध नव्हता. समतल वितलग हा आकुर्डी खंडोबा माल या मध्यवर्ती भागात असून सदर ठिकाणी बहुसंख्य इमारतींचे जाळे आहेत त्यामध्ये शासकीय इमारती, शाळा, औद्योगिक भग, बसथांबे, रेल्वे स्टेशन, रुग्णालये, पेट्रोल पंप, सिनेमागृह इत्यादींचा समावेश आहे. सदर चौक हा प्रचंड वाहतुकीचा आहे.

या बाबींचा विचार करता सदरचे कामास उशीर झाला. तथापि, सदर बाब अपरिहार्य होती. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर कामासाठी संबंधित ठेकेदारास तसेच सल्लागारांना मुदत वाढ देणे आवश्यक झाले. तसेच सल्लागारांशी झालेल्या करारानुसार त्यांना वाढीव कालावधीचे अतिरिक्त शुल्क अदायगी करणे महापालिकेस क्रमप्राप्त झाले.

३.३.२ PCMC ने मुंबई-पूणे रस्त्यावर चिंचवड जवळ महावीर आणि शिवाजी चौक येथे भुयारी मार्ग बांधण्यासाठी मे. जे. कुमार इन्फो प्रॉजेक्टस लिमिटेड यांना रु.२४.६० कोटीचे काम दिले(मार्च २००६), ते काम जून २००७ पर्यंत पूर्ण करायचे होते. राज्य शासनाने राज्यातील पुलाच्या कामांना स्थगिती दिल्याने कामाची सुरूवात मार्च ते ऑगस्ट २००६ इतक्या सहा महिन्यांच्या विलंबाने झाली. काम प्रगतीपथावर असताना, भुयारी मार्गाची रुंदी वाढविणे, चढउताराचे प्रमाण तीन टक्क्यांवरुन दोन टक्क्यांवर नेणे, अतिरिक्त मलनिःसारण वाहिन्या टाकणे, जलवाहिन्यांचे स्थलांतर करणे, विद्युत विषयक कामे इत्यादी अतिरिक्त तांत्रिक बदल सुचविण्यात आले आणि मे २००९ मध्ये रु.५७,७० कोटीच्या सुधारित तांत्रिक कामांना मंजुरी दिली गेली. १२ महिन्यांच्या विलंबानंतर (सहा महिन्यांचा स्थगिती कालावधी सोडून) नोव्हेंबर २००८ मध्ये काम पूर्ण करण्यांत आले आणि ऑक्टोबर २०१० पर्यंत रु.५५.७७ कोटी प्रदान करण्यांत आले.

आमच्या असे निदर्शनास आले की, जर आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा नियोजन आणि निविदा प्रकियेच्या टप्प्यावर विचार केला असता तर विहित दिनांकानंतर काम पूर्ण केल्यावरसुध्दा कंत्राटदाराला वाढीव किंमतीपोटी केलेले रु.७.३५ कोटीचे प्रदान टाळता आले असते. तसेच, PCMC ने ऑगस्ट २००५ मध्ये या कामासाठी सल्लाविषयक सेवेसाठी मे. टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा.लिमिटेड यांची नेमणूक केली. विस्तारीत कालावधीसाठी सल्लागाराला ऑक्टोबर २०१० पर्यंत रु.९६.४८ लाख अतिरिक्त शुल्क प्रदान करण्यांत आले. सल्लागाराचे अयोग्य नियोजन याला कारणीभूत ठरले.

प्रधान सचिव, UDD यांनी सांगितले की (मे २०११) मध्ये विदीत केले की, रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत येत असल्याने जमिनीखालील उपयोगी वहिन्यांची जागा नेमकी माहीती झाली नाही आणि त्यामुळे कामाचे नियोजन करतांना उपयोगी वाहिन्यांचे स्थलांतर विचारात घेतले नव्हते. तरीही वर नमूद केल्याप्रमाणे PCMC ने किंमतीतील

तफावतीपोटी रु. ७.३५ कोटी आणि अतिरिक्त सल्लागार शुल्कापोटी रु.९६.४८ लाख इतका टाळता येण्याजोगा खर्च केला, ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

पुणे-मुंबई रस्ता विकास आराखड्याप्रमाणे६१ मी. रुंदीचा आहे. मात्र प्रत्यक्षात तो १५ ते २० मी. रुंदीचा वापरात होता. सदर रस्ता विकास आराखड्याप्रमाणे विकसित करणेच्या कामाची व्याप्ती मुळ कामात वाढलेमुळे व Utility shifting हे काम विविध विभाग/ खाते यांचे असल्याने मनपाच्या नियंत्रणात नव्हते. त्यामुळे सदरची कामे प्रत्यक्षात जागेवर येणाऱ्या अडीअडचणीप्रमाणे करावी लागली आहेत. सल्लागारांना करारानुसार मूळ कालावधीमध्येच काम रावयाचे होते तथापी संपुर्ण कामाचे IIT दिल्ली यांनी सुचविलेल्या BRTS साठी आवश्यक ते बदल करणे आवश्यक असल्याने कामाची व्याप्ती वाढली यामुळे सल्लागारास जास्त वेळ काम करावे लागले. मुळ निविदेपेक्षा जास्त कालावधी साठी काम करावे लागल्याने करारानुसार त्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला अदा करणे मनपास क्रमप्राप्त झाले. सल्लागाराच्या करारनाम्याची प्रत सोबत जोडली आहे.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेचे अभिप्राय नाहीत.

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

महावीर चौक व शिवाजी चौक चिंचवड समतल विलगक (ग्रेड सेपरटर)

सन २००६ मध्ये सदर कामाचे कार्यादेश देणेत आलेले असून सदर काम हे महापालिकेचे अंतर्गत काम असल्याने ते राष्ट्रकुल युवा स्पर्धेशी संबंधित नव्हते. सदर काम महापालिकेचे निधीतून करण्यात आले. काही तांत्रिक कारणास्तव कामास विलंबाने सुरूवात झाली. सदर समतल विलगकाचे मुख्य कॉंक्रीट रस्ता व सेवा रस्ते यांचे काम ऑक्टोबर २००८ पूर्वी पूर्ण झाले व सदर रस्ता ११ ऑक्टोबर २००८ रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. उर्वरित किरकोळ कामे नोव्हेंबर २००८ मध्ये पूर्ण झाली. सदर कामास उशीर होण्याची कारणे

म्हणजे मुख्य कॅरेज रस्त्याचे कामाआधी सेवावाहिन्यांचे स्थलांतरण करण्यात आले तसेच पाणीपुरवठा, जलनि:सारण, पावसाळी गटर वाहिन्या टाकण्यात आल्या, सदर काम सुरू करण्यापूर्वी या कामांशी संबंधित सर्व विभाग जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसईबी, पीसीएमसी, एमआयडीसी, टाटा टेलिकॉम, आयडिया इत्यादी कंपन्याच्या अधिकाऱ्यांशी सदर विविध वाहिन्यांच्या स्थानांतरासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस खालील विविध बाबी संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थित केल्या.

सदरचा रस्ता या पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने रस्त्या खालील भूमिगत वाहिन्यांचे निश्चित स्थान महापालिकेस माहित नाही.

काही भूमिगत वाहिन्या अतिशय जुन्या असल्याने त्यांचे आराखडे सापडत नसल्याने व मूळ विभागाकडे उपलब्ध होत नाहीत.

काही वाहिन्यांसंदर्भात कोणतेही लँडमार्क व सदर वाहिन्यांबाबतच्या संदर्भखुणा ज्या आराखडयावर दाखविण्यात आल्या होत्या त्या सदर रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू करण्यापूर्वी तेथील बांधकामे पाडून टाकण्यात आल्याने प्रत्यक्ष कामाच्या जागेवर उपलब्ध नाही.

सदर कामाचा भाग म्हणून महापालिकेने नियोजीत रस्त्यावर मंजूर नकाशानुसार समांतर पद्धतीने पाणीपुरवठा व ड्रेनेज वाहिन्या टाकण्याचे काम केले. रस्त्याची खोदाई करत असताना ज्या काही वाहिन्या रस्त्याच्या मध्ये आल्या त्या स्थलांतरीत करणे व जोडणे या शिवाय मनपास पर्याय उपलब्ध नव्हता. समतल विलगक हा चिंचवड स्टेशन या मध्यवर्ती भागात असून दर ठिकाणी बहुसंख्य इमारतींचे जाळे आहेत. त्यामध्ये शासकीय इमारती, शाळा, औद्योगिक भाग, बसथांबे, रेल्वे स्टेशन, रुग्णालय, पेट्रोल पंप, सिनेमागृह इत्यादींचा समावेश आहे. सदर चौक हा प्रचंड वाहतुकीचा आहे. या बाबींचा विचार करता सदरचे कामस उशीर झाला तथापी, सदर बाब अपरिहार्य होती. वरील सर्व बाबींचा विचार करता संबंधित कामासाठी ठेकेदारास तसेच सल्लगांरांना मुदत वाढ देणे आवश्यक झाले. सल्लागारांशी झालेल्या करारानुसार त्यांना वाढीव कालावधीसाठी देय कामाचे अतिरीक्त शुल्क अदायगी करणे महापालिकेस क्रमप्राप्त झाले आहे.

गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या अहवाल क्र.६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, २००८ करिता पायाभूत सुविधा विकास अहवालातील शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग यांनी खालील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले.

४.१ सुरक्षेच्या पायाभूत सुविधा

शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, लोहगाव विमानतळ, पुणे आणि कार्यक्रमादरम्यान शहराला भेट देणाऱ्या अतिमहत्त्वाच्या/महत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेच्या आराखडा पोलीस आयुक्त, पुणे यांनी आखला होता. तयाप्रमाणे, आराखडयामध्ये शुभारंभ आणि समारोप सोहळयासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि संभाव्य अतिरेकी हल्ले या बाबतही विचार केला गेला होता.

४.२ सुरक्षा साधने आणि वाहनांची खरेदी

CYG, पुणे येथील सुरक्षा व्यवस्थेसाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने (DSYS) केंद्र सरकारकडे रु.६७.७० कोटींचा प्रस्ताव पाठवला असला तरी ऑक्टोबर २००७ मध्ये पोलीस आयुक्तांनी, पेलीस महासंचालक, मुंबई, यांच्याकडे फक्त रु. २३.५९ कोटींची साधने आणि वाहनांचे मागणीपत्र या गोष्टी जून २००८ पूर्वी मिळण आवश्यक असल्याचे स्पष्ट करुन सादर केले. प्रतिसादादाखल. राज्य शासनाच्या गृह विभागाने मे ते सप्टेंबर २००८ दरम्यान टप्प्याटप्प्याने रु. १७.६३ कोटी रकमेला मान्यता दिली आणि ऑगस्ट-सप्टेंबर २००८ मध्ये निधी वितरीत केला.

मंजूर केलेल्या रु. १७.६३ कोटींपैकी, फक्त रु. ९.४० कोटी साधनांच्या खरेदीसाठी खर्च केले गेले आणि रु. ५.०५ कोटीच्या साधनासाची खरेदी पूर्ण झाली नसतानाही रु. ३.१८ कोटी प्रत्यर्पित करण्यात आले.

एकूण साधनांपैकी, रु. १.३३ कोटींच्या साधनांसाठी CYG समाप्त झाल्यावर पुरवठा आदेशाद्वारे मागणी केली गेली. त्याचप्रमाणे रु. ४.५६ कोटीची साधने (परिशिष्ठे २०-२१) CYG समाप्त झाल्यावर प्राप्त झाली.

असे निदर्शनास आले की, अनुदानाला मंजुरी देण्यातील आणि त्याच्या वितरणातील विलंबामुळे CYG प्रारंभ् होण्याआधी अतिशय मर्यादित कालावधीमध्ये वाहन आणि साधने प्राप्त

करावी लागली. परिणामी, CYG समाप्त झाल्यावर बरीच साधने प्राप्त झाली. ज्यामुळे पोलीस महासंचालकांना इतर पोलीस ठाण्यांमधून साधनांची जमवाजमव करावी लागली.

खालील परिच्छेदांमध्ये विवेचन केल्याप्रमाणे दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल, सुटसुटीत क्ष-किरण यंत्रे, गस्त आणि वाहतूक प्रचार वाहने, शववाहिका, श्वानपथक टेम्पो, मिनी बसेस, हलकी वाहने, फिरती दुरुस्ती वाहने आणि यारी यांचा वेळेवर प्राप्त न झालेल्या साधनांमध्ये समावेश होता:

ज्ञापन :-

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, २००८ साठी शासनाने पोलीस महसंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रस्तवावनुसार माहे डिसेंबर, २००७ च्या अधिवेशनात रु.१.५३ कोटीची पूरक माणी मंजूर करुन घेतली होती. सदर पूरक मागणीबाबतचा पोलीस आयुक्त, पुणे यांचा प्रस्ताव विचारात घेऊन साधनसामुग्रीस प्रशासकीय मान्यता दि.१५/०२/२००८ रोजीच्या शासन निर्णयाने दिली होती. सदर पुरक मागणीचा निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली होती. तथापि, सदरहू निधी उपलब्ध न झल्याचे पोलीस आयुक्त पुणे यांच्या कार्यालयाने दि.१७/०४/२००८ रोजीच्या पत्राने कळविले आहे.

पोलिस आयुक्त पुणे यांनी सादर केलेल्या रू. २३.५९ कोटीच्या साधनसामुग्रीच्या प्रस्तावावर संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून काही बाबींची संख्या कमी करून व काही बाबी भाड्याच्या तत्वावर घेण्याचे ठरवून रु. १४.०५ कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सहमतीसाठी सादर केला होता. वित्त विभागने काही ममुदद्यदे उपस्थित केले होते सदर मुद्यांचा खुलासा करून वित्त विभागाच्ऋया सहमतीने दिनांक १५/०२/२००८ च्या शासन निर्णयान्वये रु. १४.०५ कोटीचा साधनसामुग्रीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर प्रस्तवासाठी निधी पुरक मागणी रु. १.५३ कोटी वजा करून पोलिस दलाचे आधुनिकीकरण या कार्यक्रमाखालील शिल्लक अंर्थसंकल्पीय तरतूदीतून रु.१२.५२ कोटी रक्कम पुनर्विनियोजनद्वारे उपलब्ध केली होती. प्रस्तुत निधी दिनांक ३१.३.२००८ रोजी उपलब्ध न झाल्याने पोलिस आयुक्त, पुणे यांनी तातडीची खरेदी पध्दतीस मान्यता व निधी पुनरुज्जीवित करून देण्याबाबत विनंती केली होती. शासनाने शासन निर्णय दि.२७/५/२००८ व

दि.१३/०६/२००८ अन्वये अनुक्रमे रु. ६.८८ कोटी व रु. ७.१६ कोटी असे एकूण रु. १४.०४ कोटीच्या साधनसामुग्रीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता दिली होती.

केंद्र शासनाने दि. ३१./२/२००८ रोजी राज्य शासनास पोलीस दलाचे आधुनिकीकरण कार्यक्रमांर्तगत रु. ७.१६ कोटी निधी उपलब्ध करून दिला होता. सदर निधी लक्षात घेऊन एकूण रु. २१.२१ कोटीची साधनसामुग्री खरेदी करण्याचे विचारात घेण्यात आले. त्यातील रु.१४.०४ कोटीच्या खर्चास वरील परिच्छेदातील मान्यता वगळून रु. ७.१७ कोटीच्या खर्चाचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडून मागविण्यात आला होता. पोलीस आयुक्त, पुणे यांनी रु. ४.४९ कोटी रकमेचा प्रस्ताव सादर केला होता. सादर केला होता. सदर प्रस्तावाची छाननी केली असता काही बाबींची पुर्वी मान्यता दिली होती व काही नियमित स्वरुपाच्या बाबींचा समावेश होता असे दिसून आले. अशा बाबींची खरेदी वगळून योजनेत्तर तरतूदीखाली रु. १.६६ कोटी व पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमाखाली राज्याचा हिस्स्यापोटी रु.२.४० कोटी या दोन प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत गृह विभागाने वित्त विभागाकडे त्यातील काही बाबी वगळल्या तदनंतर वित्त विभागाच्या सहमतीने दि.४/०९/२००८ रोजी अनुक्रमे रु. १.१९ कोटी व रु.२.४० कोटीचया साधनसामुग्रीचा खरेदी खर्चांना मान्यता देण्यात आली.

वरील सर्व तपशील पहाता शासनाने राष्ट्रकूल युवा क्रीडा स्पर्धासाठी साधनसामुग्रीस मान्यता शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रथमतः माहे फेब्रुवारी, २००८ व तद्नंतर माहे मे/जुन, २००८ मध्ये दिली होती. केंद्र शासनाच्या पोलीस दलाच्या आधुनिकीकरण योजनेखालील निधी प्रज्ञपत झाल्याने सदर स्पर्धेसाठीच्या साधनसामुग्रीच्या खर्चात वाढ करण्यात आली. सदर प्रकरणी शासनाची साधनसामुग्री खरेदीस मान्यता असल्याने व पुणे शहराची सुरक्षिततेची बाब विचारात घेऊन, मान्यता दिलेल्या साधनसामुग्री खरेदीवरील खर्च राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा समाप्तीनंतर करण्यात मान्यता देण्यात आली.

४.२.१ दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल्स

शासनाने एकूण रु. ४२.५० लाख किंमतीच्या २५ दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल्सच्या खरेदीसाठी मंजुरी दिली (मे २००८). त्वरीत खरेदी आदेशाच्या (UOP) अंतर्गत चार संस्थाकडून निविदा प्राप्त झाल्यावर, खरेदी समितीने मे शोभा ए.एन.ओ.प्रिंटस प्रा.लि., हैद्राबाद यांच्याकडून रु. ३७.९६ लाख रकमेस (प्रत्येकी रु. १.५२ लाख) दुर्बीणयुक्त रात्र-दृष्टी

गॉगल्सच्या खरेदीस मान्यता दिली (सप्टेंबर २००८). तथापि, फक्त रु. २५ लाखापर्यंतची खरेदी करण्याचे अधिकारअसल्याने पेलिस आयुक्तांनी एकूण रु. २४.२९ लाख किंमतीच्या १६ नगांच्या खरेदीसाठी संस्थेकउे मागणी दाखल केली (२४ सप्टेंबर २००८). निविदेनुसार, पुरवठा आदेश निर्गमित झाल्यावर ३० दिवसांच्या आत त्याचा बटवडा होण आवश्यक असूनही पोलिस आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या आदेशात ३० सप्टेंबर २००८ पर्यंत बटवडा करण्याचे नमूद केले होते. CYG संपल्यावर दोन महिन्यानंतर २२ डिसेंबर २००८ रोजी दुर्बिणयुक्त गॉगल्सचा पुरवठा करण्यात आला ज्यामुळे UOP अंतर्गत या वस्तूंची खरेदी करण्याचे उद्दीष्ट असफल झाले.

गृह विभागाच्या सह सचिवांनी पुरवठयातील विलंबावर दंड वसूल करण्याचे विचारधीन होते असे नमूद केले (एप्रिल २०११). तरी CYG दरम्यान गस्त घालताना दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल्स उपलब्ध नव्हते ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर अहवालात दुर्बिणयुक्त रात्र-दृष्टी गॉगल्स उशीरा प्राप्त झाल्याचे शासनाने मान्य केल्याचे नमूद केलेले आहे. सदर प्रकरणी पुरवठादाराने उशिरा पुरवठा केल्याबद्दल रु.६०,७३१/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

४.२.२. गस्त वाहने आणि वाहतूक प्रचार वाहने

शासनाने प्रत्येकी रु. ४.६७ लाख किंमतीची १० गस्त वाहने आणि ३ वाहतूक प्रचार वाहने यांच्या खरेदीस मान्यता दिली (जून २००८). दर करारामध्ये तरतूद केल्याप्रमाणे चार महिल्यांच्या बटवडा कालावधीऐवजी १० दिवसांमध्ये पुरवठा करण्याच्या दर करारातील अटीवर मे.टाटा मोटर्स, मुंबई यांना पुरवठा आदेश दिले (२४ जुलै २००८). तथापि, स्पर्धा संपल्यावर १ डिसेंबर २००८ रोजी वाहने उपलब्ध झाली. अशा प्रकारे, ज्यासाठी या वाहनांची खरेदी करण्यात आली होती त्या CYG दरम्यान ती उपलब्ध नव्हती.

गृह विभागाच्या सह सचिवांनी ही वस्तुस्थिती मान्य केली (एप्रिल २०११) .

ज्ञापनः- :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर अहवालात गस्त वाहने आणि वाहतूक प्रचार वाहने उशीरा प्राप्त झाल्याचे शासनाने मान्य केल्याचे नमूद केलेले आहे.

४.२.३ रुग्ण वाहिका, श्वान पथक वाहन, शववाहिनी आणि मिनीबस

CYG च्या सुरक्षा व्यवस्थेसाठी दोन रुग्ण वाहिका, पाच श्वान पथक वाहने, दोन शववाहिन्या आणि तीन मिनी बसेस च्या खरेदीसाठी शासनाने रु. १.३१ कोटी मंजूर केले (फेब्रुवारी २००८). मार्च २००८ पर्यंत अनुदान वितरीत न झाल्याने, १३ सप्टेंबर २००८ रोजी त्याच वाहनांसाठी शासनाने नवीन मंजुरी आदेश निर्गमित केले. ९ सप्टेंबर २००८ रोजी वरील वाहनांसाठी टाटा मोटर्सने विशेष शासकीय दर देऊ केले. पोलिस आयुक्त, पुणे यांनी वरील वाहनांची थेट टाटा मोटर्सकडून खरेदी करण्यासाठी सुधारीत मान्यतेसाठी (अ) वाहने CYG च्या आधी प्राप्त व्हावीत, (ब) शासनाकडून अतिरिक्त किंमत प्रदान झाल असल्यास, दर कराराच्या मान्यतेनंतर, कंपनीकडून तिचा परतावा केला जावा आणि (क) शासनाने प्रदान केलेल्या किंमतीपेक्षा दर करारामध्ये मान्य झालेले दर अधिक असल्यास शासनाकडून कुठलेही अतिरिक्त प्रदान केले जाणार नाही, या अटींवर प्रस्ताव पाठवला (१६ सप्टेंबर २००८). १० ऑक्टोबर २००८ रोजी शासनाकडून सुधारित मंजुरी प्राप्त झाल्यावर, वाहनांचा त्वरीत पुरवठा करण्यासाठी, पोलिस आयुक्तांनी त्याच दिवशी टाटा मोटर्सना पुरवठा आदेश दिले.

तथापि, एकूण रु. ७६.५२ लाख किंमतीची ही वाहने ८ नोव्हेंबर २००८ ते ९ मार्च २००९ दरम्यान CYG च्या समाप्तीनंतर प्राप्त झाली. अशाप्रकारे, CYG दरम्यान सुरक्षा व्यवस्थेसाठी ही वाहने उपलब्ध नव्हती.

पोलिस महानिरीक्षकांनी इतर पोलीस ठाण्यांमधून वाहनांची तरतूद केली आणि सुरक्षेला कुठलीही बाधा न येता स्पर्धा पार पडल्याचे गृह विभागाच्या सह सचिवांनी नमूद केले (एप्रिल २०११). पुढे असेही नमूद केले की CYG च्या समाप्तीनंतरही सुरक्षा बळकट करण्यासाठी या वहनांचा उपयोग करण्यात आला. वाहनांसाठी त्वरीत मंजुरी मिळण्यासाठी आणि ती प्राप्त करण्यासाठी प्रभावी उपाय न योजल्यामुळे सुधारित मंजूरी घेण्याची गरज निर्माण झाली त्यामुळे वाहनांचा पुरवठा होण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर अहवालात रुग्णवाहिका, श्वान पथक वाहन, शववाहीनी आणि मिनीबस उशीरा प्राप्त झाल्याचे शासनाने मान्य केल्याचे नमूद केलेले आहे.

४.२.४ सुटसुटीत क्ष-किरण यंत्रे

दोन सुटसुटीत क्ष-किरण यंत्राची रु. ५० लाखाची खरेदी करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली (जुन २००८). त्वरीत खरेदी आदेशाच्या अंतर्गत (UOP) पोलिस आयुक्त, पुणे यांनी खरेदी प्रक्रिया प्रारंभ केली आणि खरेदी समितीने शासनाकडून अतिरिक्त अनुदानास मंजुरी मिळाल्यास मे.रोटेक्स इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांच्याकडून रु. ५७.५० लाख किंमतीस (प्रत्येकी रु. ११.५० लाख) अशी पाच यंत्रे खरेदी करण्यास मान्यता दिली. तथापि, पोलिस आयुक्त हयांना रु. २५ लाखापर्यंतची खरेदी करण्याचे अधिकार असल्याने त्यांनी मे.रोटेक्स इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांच्याकडे रु. २३ लाख किंमतीच्या फक्त २ यंत्रासाठी मागणी नोंदविली (सप्टेंबर २००८). १ ऑक्टोबर २००८ पर्यंत त्यांचा पुरवठा होणे आवश्यक असतानाही CYG नंतर २३ जानेवारी २००९ रोजी यंत्रे प्राप्त झाली. सीमा शुल्कात उशीराने नोव्हेंबर २००८ मध्ये सूट मिळाल्याने हा विलंब झाला होता. विक्रेत्याला फेब्रुवारी २००९ मध्ये रु. २३ लाख प्रदान करण्यात आले होते. अशा प्रकारे, CYG दरम्यान सुरक्षा व्यवस्थेसाठी ही यंत्रे उपलब्ध नव्हती.

एप्रिल २०११ मध्ये, गृह विभागाच्या सह सचिवांनी ही वस्तुस्थिती सुनिश्चित केली.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर अहवालात सुटसुटीत क्ष-किरण यंत्रे उशीरा प्राप्त झाल्याचे शासनाने मान्य केल्याचे नमूद केलेले आहे.

४.३ CCTV कॅमेरे आणि LCD न वापरता पडून राहणे

वर उल्लेखिलेल्या यंत्रसामग्री व्यतिरिक्त, DSYS, पुणे यांनी CYG च्या स्थळी एकंदर सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करण्यसाठी CCTV कॅमेऱ्यांची योजना केली होती. मे.वैभव इंटरप्रायजेस, पुणे यांना वेगवेगळया प्रकारच्या कॅमेऱ्यांचा पुरवठा आणि जोडणी करण्यासाठी रु. १.२५ कोटीचे कंत्राट देण्यात आले होते (मार्च २००८) ते ४ जुलै २००८ पर्यंत पूर्ण करायचे होते. स्थळाची पाहणी केल्यावर, मध्यवर्ती संनियंत्रण प्रणाली (CMS) करीता पोलिसांची मागणी पूर्ण करण्यासाठी, DSYS यांनी नवीन निविदा न मागवता सप्टेंबर २००८ मध्ये एकाच विक्रेत्याकडे रु. २२.४२ लाखाचे १४ स्थिर कॅमेरे आणि चार कॅमेरे आणि चार स्पीड डोम कॅमेरे त्याचप्रमाणे रु. १५.७४ लाखाचे चार LCD दूरचित्रवाणी संच यांसाठी दोन आदेश नोंदविले.

CYG नंतर, CMS/नियंत्रण कक्ष पाडण्यात आले आणि रु. १२.४२ लाख तोडणी शुल्क दिल्यावर पुरवठादाराने कॅमेरे काढले (मे २००९). २७ नोव्हेंबर २००९ रोजी यंत्रसामग्रीचा हमी कालावधी संपला होता. १६ नोव्हेंबर २०१० रोजी DSYS यांचे प्रतिनिधी आणि आम्ही केलेल्या संयुक्त पडताळणीमध्ये, भांडारात रु. ३३.६० लाख किंमतीची यंत्रसामग्री पडून असल्याचे आढळले.

असे आढळून आले की, मार्च २००९ मध्ये सुरक्षेच्या कामासाठी हे कॅमेरे हस्तांतरीत करण्यासाठी पोलिस आयुक्त, पुणे यांना DSYS विनंती केली होती; परंतु नवी दिल्ली येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा (CWG), २०१०, दरम्यान CCTV प्रणाली वापरता येईल या मुद्दयावर DSYS ने ती फेटाळली (एप्रिल २००९). तथापि, भांडारात पडून असलेल्या कॅमेऱ्यांची राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेसाठी आयोजक समितीने कधीही मागणी केली नाही, आणि हे कॅमेरे मार्च २०११ पर्यंत भांडारात नुसतेच पडून होते.

भांडारातील साहित्य योग्य प्रकारे बांधून सुरक्षित ठेवले होते आणि ते भविष्यात वापरात येऊ शकले असते असे DSYS ने नमूद केले (मार्च २०११). मागणी केलेल्या या साहित्याची CWG दरम्यान आवश्यकता भासेल या सबबीखाली पोलिस विभागाच्या सुरक्षा कारवाईत वापरण्यसाठी ते हस्तांतरीत केले नव्हते. त्यामुळे हे उत्तर मान्य करता येत नाही. दिर्घ काळासाठी तसेच ठेवल्यामुळे कॅमेरे बिघडून मोठे नुकसान होण्याचा धोका होता ही शक्यता सुध्दा नाकारता येऊ शकत नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

सदर परिच्छेद क्रीडा विभागाशी संबंधित आहे सदर विभागातर्फे याबाबत स्पष्टीकरण सादर करण्यात येईल.

साक्ष :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल क्र.६ राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धा २००८ करिता पायाभूत सुविधा विकास या अहवालासंदर्भात महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या लेखापरिक्षण परिच्छेदासंदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली या साक्षीच्या वेळी प्रधान महालेखाकारांनी The audit objection is, lack of effective planning and execution resulted in non-completion of many city infrastructure works before CYG. Commencement of work without ensuring clear sites resulted in blocking of funds and avoidable expenditure of Rs. 177.04 Crore.

Improper planning without adequate survey and investigation resulted in extra expenditure of Rs. 11.24 crore on account of price variations and consultancy fees.

Working costing Rs. 42 crore in respect of a road work were irregularly awarded by PCMC showing them as extra items of an existing contract for another road work with a view to get these works completed before the CYG. The works were, however, completed after the CYG.

तसेच समितीला असे अवगत करण्यात आले की, "प्रभावी नियोजन व कार्यान्वयन यांच्या अभावामुळे CYG पूर्वी बऱ्याच नागरी सुविधा पूर्ण झाल्या नव्हत्या. मोकळ्या जागेची खात्री न करताच कामाला सुरूवात केल्यामुळे निधी अडकून पडला व रूपये १७७.०४ कोटीचा टाळता येण्याजोगा खर्च झाला. पुरेशा सर्वेक्षण व अन्वेषणा अभावी अयोग्य नियोजनामुळे किंमतीतील बदल व सल्लागार शुल्क यावर रूपये ११.२४ कोटीचा अतिरिक्त खर्च झाला. CYG पूर्वी कामे पूर्ण करून देण्याच्या हेतुने दुसऱ्या रस्त्याच्या कामासाठी विद्यमान कंत्राटाची अतिरिक्त बाब म्हणून चुकीने दर्शवून PCMC ने रस्त्याच्या कामासंबंधी रूपये ४२ कोटींची कामे अनियमितपणे दिली. तथापि, ही कामे CYG नंतर पूर्ण झाली.

उक्त अभिप्रायाच्या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, रूपये १७७.०४ कोटीचा टाळता येण्या जोगा खर्च झालेला आहे. तो कोणत्या बाबींना झालेला आहे ते नगरविकास विभागाने द्यावे. याबाबत सचिवांनी असा खुलासा केला की, पुणे येथे सन २००८ मध्ये राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने BRTS ची अंमलबजावणी करण्याचे योजले होते. सदर प्रकल्पाच्या कामाला जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) मंजुरी मिळण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावेळी फार डिटेलमध्ये इन्व्हेस्टिगेशन करण्यात आले नव्हते. BRTS राज्यात पहिल्यांदाच राबविण्यात येत होती. त्यामुळे अनेक सविस्तर कंपोनंटची माहिती महानगरपालिकेकडे नव्हती. त्यामुळे महानगरपालिकेने ब्लॉक एस्टीमेट तयार करून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला व जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) त्यास मंजुरी देण्यात आली. तद्नंतर या प्रकल्पाचे काम करीत असताना युटीलिटी शिफ्टींग करावे लागते अशा प्रकारच्या काही गोष्टी निदर्शनास आल्या. त्यामुळे कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करावा लागला. त्यामुळे जे ब्लॉक एस्टीमेट केले होते त्या पेक्षा जास्त खर्च कामावर करावा लागला आहे. कोणताही प्रकल्प हाती घेण्यापूर्वी त्याचे सविस्तर सर्वेक्षण केले पाहिजे, तपशीलवार अंदाजपत्रक केले पाहिजे हा महालेखापरीक्षकांचा मुद्दा मान्य करण्यात आला. मात्र ऑक्टोबर २००८ मध्ये CYG होणार होते. त्यामुळे तातडीने काम होणे आवश्यक होते. यासाठी रॅपिड सर्वेक्षण करून प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर करण्यात आला. त्यास केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर निविदा प्रक्रिया ऑक्टोबर २००७ मध्ये सुरू करण्यात आली व जानेवारी २००८ मध्ये कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तपशीलवार अंदाजपत्रकाची वाट बघितली असती तर या प्रकल्पाच्या कामाला बराच विलंब लागला असता. BRTS पुणे शहराची आवश्यकता आहे या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही सचिवांनी पुढे असे ही सांगितले.

त्यावर समितीने PMC आणि PCMC च्या क्षेत्रात आहेत. जी कामे केली आहेत, ती किती कोटी रूपयांची केली आहेत? याबाबत पुणे महानगरपालिका आयुक्तांनी असा खुलासा केला की, PMC च्या क्षेत्रात रूपये ४३४.२२ कोटी रूपयांची कामे मंजूर झाली होती. आपला डीपीआर ४७६ कोटीचा होता. रूपये २६८.६५ कोटी एवढ्या मूळ किंमतीच्या BRTS प्रकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर गाईड लाईन्स करण्यात आल्या. पुणे महानगरपालिकेने दरपत्रकांच्या

आधारे सर्व घटकांचा समावेश असलेला रूपये ४७६.२६ कोटी किंमतीचा डीपीआर केंद्र सरकारकडे सादर केला. त्या शिवाय प्रकल्पाची अंमलबजावणी करणे शक्य नव्हते. तद्नंतर केंद्र सरकारने JNNURM अंतर्गत ऑगस्ट २००८ मध्ये रूपये ४३४.२२ कोटी रूपये मंजूर केले.

समितीने अशी विचारणा केली की, पुणे, बालेवाडी येथे CYG घेण्याचा निर्णय झाला. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत असा निर्णय घेणारी ऑथॉरिटी कोण होती. त्यावर क्रीडा सचिवांनी असा खुलासा केला की, मे-जून २००६ मध्ये पुणे येथे CYG घेण्याचा निर्णय झाला. यामध्ये तीन कंपोनंट होते. शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथील कामाची जबाबदारी शालेय शिक्षण व क्रीडा विभागावर सोपविण्यात आली होती. तसेच, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील शहर सुविधा विकासाची कामे या दोन्ही स्वायत्त संस्थांवर नगरविकास विभागा मार्फत सोपविण्यात आली होती. तिसरा मुद्दा सुरक्षेच्या होता. ती जबाबदारी गृह विभागावर सोपविण्यात आली होती.

शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या आतील कामे क्रीडा विभागाने, नागरी शहर विकासाच्या सुविधेची कामे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तसेच कायदा व सुरक्षाची कामे गृह विभागाने करावीत असा निर्णय कोणी घेतला असे समितीने विचारले असता, क्रीडा सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा सन २०१० मध्ये होणार होत्या व राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा सन २००८ मध्ये होणार होत्या म्हणून विविध समित्या गठित करण्यात आल्या होत्या. आयोजन समिती आणि क्रीडा स्पर्धा तांत्रिक संचालन समिती केंद्र सरकारने नेमली होती. शिखर समिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेखाली नेमण्यात आली होती. आढावा समिती मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली होती. या समितीमध्ये अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त व गृह विभाग, प्रधान सचिव,नगर विकास विभाग, प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग इत्यादींचा समावेश होता. तसेच, कार्यकारी समितीचे प्रमुख विभागीय आयुक्त, पुणे हे होते.

महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये उल्लेख केलेला १७७ कोटी रुपये खर्च अव्वासतव झाल्याचे विभागाने मान्य केले आहे. म्हणजेच विभागाला महालेखापरीक्षकांचा परिच्छेद बरोबर आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता नगरविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले

की, कोणताही प्रकल्प घेण्यापूर्वी सविस्तर सर्वेक्षण झाले पाहिजे, निविदा प्रक्रिये पूर्वी DPR केला पाहिजे हा महालेखापरीक्षकांचा मुद्दा विभागाने मान्य केला आहे. आकडेवारी संदर्भात कोणतेही भाष्य केलेले नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ऑडिट पॅरासंबंधी नगरविकास विभागाच्या माध्यमातून चौकशी झाली आहे काय, असल्यास त्यासंबंधीची माहिती द्यावी.त्यावर नगरविकास सचिवांनी अशी माहिती दिली की, माहे ऑक्टोबर २००८ मध्ये राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा होणार होत्या. त्यासाठी BRTS निर्माण करायची होती. यासाठी डीपीआर तयार करण्यात आला. सुरूवातीला ब्लॉक एस्टीमेट तयार करून केंद्र सरकारला प्रस्ताव सादर करण्यात आला व मार्च २००७ मध्ये रूपये २६८.६५ लाखाच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली व पुढची प्रक्रिया हाती घेण्यात आली. प्रत्यक्ष कामाला सुरूवात केल्यानंतर काही बाबी निदर्शनास आल्या व आणखी काही गोष्टी कराव्या लागतील हे लक्षात आले.

तथापी विभागाला मोठा कालावधी मिळाला होता. त्यामुळे घाईगर्दीने काम करण्याची आवश्यकता नव्हती. असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणले असता नगरविकास सचिवांनी खुलासा केला की, राज्य शासनाने मे २००६ मध्ये विभागीय आयुक्त, पुणे, यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती नेमली होती. या समितीवर शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे येथील पायाभूत सुविधांचे नियोजन व विकासाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. डिसेंबर २००५ मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) लागू झाले. याद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध होणार असल्यामुळे प्रकल्पाचे अंदापत्रक तयार करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले. सदर प्रक्रिया जून २००६ नंतर सुरू झाली. त्यानंतर मार्च २००७ मध्ये प्रस्ताव मंजूर झाला. आठ-नऊ महिन्यामध्ये प्रस्ताव तयार केला गेला व त्याची छाननी केली गेली.

या कामाला उशीर होण्याच्या कारणाबाबत नगरविकास सचिवांनी खुलासा केला की, कामाला उशिरा झाला नसून सन २००७ मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तातडीने कामाला सुरुवात करण्यात आली. परंतु यामध्ये काही दुरुस्तया कराव्या लागल्यामुळे सुधारित निविदेसह हा प्रस्ताव केंद्रशासनाला पाठविण्यात आला व या सुधारित प्रस्तावाला केंद्रशासनाने तातडीने मंजुरी दिली होती.

क्रीडांगणावर प्रेक्षकांना तातडीने पोहचता यावे यासाठी काहीही सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत. उलट या कामामध्ये १७० कोटी रुपये अधिकचे खर्च झालेले आहेत. नियोजन आणि सर्व्हेक्षण व्यवस्थित न केल्यामुळे १७० कोटी रुपये अधिकचे खर्च झालेले आहेत. अगोदरच्या प्रस्तावाचे २६८ कोटी रुपये व सुधारित १७७ कोटी म्हणजे ४४५ कोटी रुपयांचा खर्च वाया गेला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. बीआरटीएसची संकल्पना राबविण्याचे निश्चित कारण काय, होते अशी समितीने विचारणा केली असता पुणे महानगपालिका आयुक्तांनी खुलासा केला की, याचे वेगवेगळे कम्पोनन्ट आहेत. बीआरटीएस साठी प्रथम रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक होते तसेच त्यामध्ये हलकी वाहने, सायकल व पादचारी रस्त्यांचाही समावेश होता. सुरुवातीच्या कामामध्ये रस्त्याच्या खालील कामाचा समावेश करण्यात आला नव्हता. सुधारित अंदाजपत्रक करुन सदर काम ऑगस्ट पर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, आपल्याकडे राईट हँड ड्राईव्ह असल्यामुळे बसचा दरवाजा लेफ्टला येतो व बस स्टॉप सुध्दा लेफ्टला असतात परंतु बीआरटीएसमध्ये बसस्टॉप राईट साईडला केलेले असल्यामुळे लोकांना डाव्या साईडला जाण्यासाठी रस्ता क्रॉस करावा लागतो. तसेच रस्ता क्रॉस करतांना अपघात सुध्दा जास्त होतात. बस स्टॉप उजव्या बाजूला केल्यामुळे ट्रॅफिक सुध्दा जॅम होत असते. विभागाने नियोजन व्यवस्थित न केल्यामुळे १७७ कोटी रुपयांचा खर्च वाया गेलेला आहे असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. त्याला पुष्ठी मिळते. त्यावर पुणे महानगरपालिका आयुक्त यांनी खुलासा केला की, आपल्याकडे राईट हॅन्ड ड्राइव्ह असल्यामुळे बसस्टॉप लेफ्टला केला तर गाडी बरोबर बस स्टॉपला लागून उभ्या करता येत नाहीत, लेव्हलवर उभी करता येत नाही, ड्रायव्हरला त्याचा अंदाज येत नाही त्यामुळे बसस्टॉप राईट साईडला केलेले आहेत. पहिल्या प्रस्तावात बसस्टॉप डाव्या बाजूला होते परंतु त्यामध्ये सुधारणा केलेली आहे. पहिल्या प्रस्तावामध्ये बसचे टिकीट बसमध्ये देण्याचे ठरले होते परंतु त्यामध्ये सुधारणा करुन बस टिकीट बस स्टॉपवर देण्याची सुधारणा केलेली आहे. याबाबत नगरविकास सचिवानी अधिक खुलासा असा केला,की या प्रकल्पाची सुरुवातीची किंमत २६८.६२ कोटी रुपये होती. सुधारित अंदाजपत्रक केल्यानंतर या प्रकल्पाची किंमत ४३४.२२ कोटी रुपये झाली. किमतीमध्ये वाढ झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक करावे लागले. बरोबर नियोजन न झाल्यामुळे किमतीमध्ये वाढ झाली असे ए.जी.चा आक्षेप आहे. खरे म्हणजे

अशा प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकाला केंद्रशासन मान्यता देत नाही. परंतु या कामामध्ये महानगरपालिकेने काही त्रुटी दाखविल्यामुळे या प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक करावे लागले. या सुधारित अंदाजपत्रकाला केंद्रशासनाने मान्यता दिलेली आहे.

सुरुवातीच्या कामामध्ये युटीलीटी शिफ्टींगचा विचार केला गेला नव्हता ही वस्तुस्थिती असल्याचे सचिवांनी मान्य केले. साध्या रस्त्याचे काम करतांना सुध्दा युटीलीटी शिफ्टींगचा विचार केला जात असतो. बीआरटीएसचे काम एवढे मोठे असतांना या ठिकाणी युटीलीटी शिफ्टींगचा विचार का केला गेला नाही? महानगरपालिकेकडे योजना तयार असतात. त्यामुळे महानगरपालिकेने रस्त्याच्या कामासंदर्भात सूचना केल्या हे म्हणणे संयुक्तिक नाही असे समितीने विचारलेल्या प्रश्नावर सचिवांनी खुलासा केला की, त्यावेळेस युटीलीटी मॅपींग तयार नव्हते ही वस्तुस्थिती आहे. रस्त्याच्या खालील पाण्याची पाईप लाईन, विजेची लाईन, टेलिफोनची लाईन याचे युटीलीटी मॅपींग नव्हते.

सन २००८ मध्ये पुण्यामध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते व त्याच्या आयोजनाची तयारी सन २००६ पासून करण्यात आली होती. याचा अर्थ खेळ सुरु होण्याच्या २४ महिने अगोदर कामाला सुरुवात करण्यात आली होती. बीआरटीएसची सुरुवात केवळ पुण्यामध्ये झाली असे नाही तर बीआरटीएसची कामे जगामध्ये अनेक ठिकाणी चांगल्या प्रकारे झालेली आहेत. पुण्यामधील बीआरटीएस अंतर्गत त्यांनी रस्त्याच्या मध्यवर्ती ठिकाणी बसस्टॉप केलेले आहेत. बसच्या मार्गाच्या बाजूला लाईट व्हेईकलसाठी रस्ता आहे, त्याच्या बाजूला सायकलसाठी व त्याच्या बाजूला पादचारी रस्ता केलेला आहे. बीआरटीमुळे १२० फूटाचा रस्ता असेल तर तो ४० फूटाचा झालेला आहे. बीआरटीएस मुळे ट्रॅफिक जॅम झालेली आहे. बीआरटीएसचे सर्व्हेक्षण घाई-घाईने करण्यात आले असून एस्टिमेट सुध्दा घाई-घाईने करण्यात आलेले आहे. पहिले बीआरटीएसचे काम पूर्ण झाले होते व मार्ग सुरु केला होता त्यावेळेस ९ अपघात झाले होते व याबाबत लोकांनी आक्षेप घेतले होते. तसेच बीआरटीएसच्या बाबतीत चांगल्या प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही असा महालेखापालांचा आक्षेप आहे. चांगले नियोजन न केल्यामुळे १७७ कोटी रुपये अधिकचे खर्च करावे लागले आहेत. सुरुवातीलाच रस्त्याच्या युटीलीटी शिफ्टींगचा विचार केला असता तर आपले किमान १००-१२५ कोटी रुपये वाचले असते. साध्या रस्त्याचे काम करतांना सुध्दा युटीलीटी शिफ्टींगचा विचार केला जात असतो तर या ठिकाणी तो का करण्यात आला नाही ? बीआरटीएसमध्ये

वारंवार काम करावे लागले, जे काम करण्यात आले ते समाधानकारक झालेले नाही. जे काही काम झालेले आहे ते घाई घाईने करण्यात आलेले आहे. त्याशिवाय रस्ता तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित झालेले असतांना त्याप्रमाणे हे काम न होता १७७ कोटी रुपये अधिकचे खर्च झालेले आहेत. त्यामुळे बीआरटीएस प्रकल्पाचे ज्यांनी नियोजन केले होते त्यांनाच समिती जबाबदार धरणार आहे. जे काम चार महिन्यात होणार होते ते काम एक महिन्यात का करण्यात आले ? पैसे खर्च करण्याची घाई का करण्यात आली ? त्यावेळेस विभागीय आयुक्त कोण होते ? त्यावर क्रीडा सचिवांनी सांगितले की, सन २००६ मध्ये पी.डी.करंदीकर विभागीय आयुक्त होते व सन २००७ मध्ये डॉ.नितीन करीर हे विभागीय आयुक्त होते. श्री.पी.डी.करंदीकर आता निवृत्त झालेले आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जोपर्यंत श्री. पी.डी.करंदीकर तसेच या कामाच्या संदर्भात ज्या समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या त्या समिती प्रमुखांना समिती समोर साक्षीसाठी बोलावले जाणार नाही तोपर्यंत यातून काही निष्पन्न होणार नाही. योग्य उत्तरे मिळावावयाची असतील तर त्या काळात जे संबंधित अधिकारी कार्यरत होते त्यांना समितीसमोर साक्षीसाठी बोलाविण्यात यावे असा निर्णय सदर बैठकीत समितीने घेतला.

सामाजिक व प्रशासकीय काम करताना आपण सगळे समाजात जबाबदारीने वावरत असतो. १७७ कोटी रुपयांचा वाढीव खर्चाचा प्रश्न हा एकाच मुद्याबाबतचा आहे. अधिकाऱ्यांनी अनियमितता करायची आणि आम्ही जनतेसमोर टार्गेट व्हायचे हे योग्य नाही. या वाढीव खर्चाची जबाबदारी कोणावर निश्चित करावयाची आहे हे शोधून काढण्याचे काम समितीचे आहे. या प्रकरणामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे मंत्री दोषी असतील तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यामध्ये कोणतीही अडचण येण्याचे कारण नाही. समितीने हा मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे. याबाबत नगरविकास सचिवानी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये मूळ प्रकल्प किंमत २६८.६५ कोटी रुपये होती आणि ती किंमत वाढून ४३४.२२ कोटी रुपये झाली. या किंमतीमध्ये जो फरक आहे त्याला वाढीव खर्च समजण्यात यावा, तो खर्च वाया गेला असे म्हणता येणार नाही.युटिलिटी शिफ्टींगचा विषय आहे. हे काम मूळ अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट केले असते तर मूळ अंदाजपत्रक रु.२६८ कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले असते. मूळ अंदाजपत्रकामध्ये ही बाब नव्हती. यावर समितीने विचारणा केली की, बीआरटीएसचे काम करताना या बाबीचा अंतर्भाव करावा लागतो हे सामान्य माणसांना कळते

तर नियोजन करणाऱ्या अधिकाऱ्यांना याची माहिती नव्हती का? याबाबत नगरविकास सचिवानी असे सांगितले की, या कामाचा मूळ अंदाजपत्रकात समावेश केला असता तर किंमत २६८ कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली असती आणि १७७ कोटी रुपयांचा जो फरक आज दिसत आहे तेवढा दिसला नसता. मूळ अंदाजपत्रक २००५-०६ च्या सी.एस.आर. रेटच्या आधारे तयार केले होते. अतिरिक्त बाबींची किंमत जमेस धरुन केंद्र शासनाकडे सुधारित अंदाजपत्रक पाठविले असता केंद्र शासनाने ४३४.२२ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली. काम आवश्यक होते म्हणूनच केंद्र शासनाने मान्यता दिली.

एकूणच कामामध्ये अनियमितता झाली असे समितीचे म्हणणे आहे कारण एखादा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालावधी निश्चित केला जातो, त्यामध्ये एक्स्केलेशनचा क्लॉज असतो. क्रिडा संकुलासाठी तज्ज्ञ अधिकारी नेमणे आवश्यक असताना तसे करण्यात आले नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. परंतु आवश्यक बाबींवर खर्च झालेला आहे असे नगरविकास सचिवांनी आपल्या खुलाशात नमूद केले आहे.

एखादा प्रकल्प राबवावयाचा निर्णय झाल्यास त्या प्रकल्पाचा फिजिबिलिटी रिपोर्ट, व्हायबिलिटी रिपोर्ट, एस्टीमेट तयार केल्याशिवाय तो प्रकल्प राबविता येतो का? अशी समितीने विचारणा केली असता नगरविकास सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, कोणताही प्रकल्प हाती घेताना बारकाईने सर्वेक्षण केले पाहिजे, एस्टीमेट केले पाहिजे. महालेखापालांचा जो आक्षेप आहे त्याच्याशी विभाग सहमत आहे. त्यावेळची विशेष परिस्थिती लक्षात घेऊन या कामाची निवड करण्यात आली. या प्रकरणात हे काम करण्यासाठी २००५-२००६ च्या सी.एस.आर.नुसार ब्लॉक एस्टीमेटच्या आधारे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

नगरविकास सचिवांनी सी.एस.आर.रेटचा उल्लेख केला त्या काळातील रेटनुसार कामाचे एस्टीमेट तयार झाल्यानंतर ठेकेदाराशी करार केला असेल, त्या ठेकेदाराने त्या रेटनुसार करारातील मुदतीप्रमाणे काम करण्याची लेखी हमी दिली असेल, असे असताना सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे कारण काय होते? करारातील अटीप्रमाणे ठेकेदार काम करण्यास मान्यता देत असतो. करारातील अटीप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास सुधारित अंदाजपत्रक आणि वेळेचा विषय निर्माण होतो. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यास ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होतो. या प्रकरणी सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याची गरज का भासली? अशी समितीने विचारणा केली असता नगर विकास सचिवानी

खुलासा केला की, या केसमध्ये युटिलिटी शिफ्टींगचा कम्पोनन्ट होता, त्याचा वाढीव खर्च झालेला आहे. ब्लॉक एस्टीमेटमध्ये त्या कामाचा समावेश नव्हता. ते काम करणे आवश्यक आहे याचा विचार करुन केंद्र शासनाकडे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला आणि केंद्र शासनाने सुधारित रु.४३४.२२ कोटीच्या खर्चास मान्यता दिली.

कॉम्प्लेक्सच्या बाहेर शहरात रस्ते, ड्रेनेज, सौंदर्यीकरण वगैरे जी कामे झाली त्याबाबत फायनल ॲथॉरिटी कोण होती अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, CYG साठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. केंद्र स्तरावर आयोजन समिती व क्रीडा स्पर्धा तांत्रिक संचालन समिती, राज्य शासनाच्या स्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आढावा समिती, विभागीय आयुक्तांच्या स्तरावर कार्यकारी समिती, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांची समिती होती. सीवायजीच्या स्पर्धा ठिकाणापर्यंत सोयी सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी महानगरपालिकांकडे सुपूर्द करण्यात आली होती.

कॉम्प्लेक्सच्या बाहेर करावयाच्या कामांची जबाबदारी दोन्ही महानगरपालिकांकडे होती. त्या महानगरपालिकांनी कामाचे जे एस्टीमेट तयार केले त्याला समितीची मान्यता घेण्यात आली होती की महानगरपालिकांनी स्वतःहून सूमोटो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला होता? तसेच समितीत्याबाबत महालेखाकारांनी यासंदर्भात समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, माहिती दिली की, The Executive Committee consists of Divisonal Commissioner, Pune, DSYS as Member Secretary, the Commissioner of PMC, Commissioner of PCMC,the Collector, Pune, the Chief Engineer, Public Works, Pune Region and the Deputy Chief Architect, Pune. It appears that this Committee is responsible for administrative and technical planning of CYG. They have also tendered award of all projects of planning and infrastructure. The Municipal Corporation was also taken decision under the supervision of Executive Committee. It appears from all above facts that the Executive Committee is responsible in respect of planning of all these works for CYG. यावर समितीने अशी विचारणा केली की, Whether you have taken approval of this Committee before

sending your detail project estimates to the Government of India? Whether the Committee had approved these work estimates?

या संदर्भात खुलासा करताना आयुक्तांनी असे सांगितले की, बीआरटीएसची संकल्पना सांगितली त्या अनुषंगाने हा प्रकल्प जेएनएनयुआरएम अंतर्गत घ्यावा असे नियोजन आयोगाने सांगितले होते. जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रकल्प घ्यायची जी पध्दत आहे त्या पध्दतीप्रमाणे सर्व परवानग्या घेतलेल्या आहेत. राज्य शासनाच्या स्तरावर जी समिती आहे त्यांच्यामार्फत डीपीआर सादर केला जातो. २००६ मध्ये तयार केलेल्या ब्लॉक एस्टीमेटमध्ये जो डीपीआर दिला होता तो ४०६ कोटी रुपयांचा होता. त्यामध्ये युटिलिटी शिफ्टींगचा समावेश नव्हता. तो मार्च, २००७ मध्ये मंजूर होताना २६८ कोटी रुपयांचा झाला. प्रधान सचिवांनी बीआरटीएसचे कम्पोनन्ट काय असतात हे सांगितले. नॅशनल अर्बन ट्रान्सपोर्ट पॉलिसी नोव्हेंबर, २००६ मध्ये आली. नॅशनल पॉलिसी आल्यानंतर डीपीआर सादर केला. त्या अनुषंगाने एलिमेंट दुरुस्त झाले. युटिलिटी शिफ्टींगचा विचार नंतर झाला.

२००५-०६ च्या बेसवर मूळ ब्लॉक एस्टीमेट ४७६ कोटी रुपयांचे सादर केले होते ते २६८ कोटी रुपये एवढे मंजूर झाले. सुधारित अंदाजपत्रकामध्ये जेएनएनयुआरएम अंतर्गत आवश्यक त्या युटिलिटी शिफ्टींगचा समावेश करण्यात येऊन केंद्र शासन स्तरावर प्रस्ताव सादर केल्यानंतर ४३४ कोटी रुपये खर्चास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे सर्व प्रक्रिया वापरुन, विहित पध्दतीने मंजुरी घेण्यात आलेली आहे. देशातील हा पहिला बीआरटीएस प्रकल्प आहे. कमी कालावधीत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. सीवायजीच्या आत जाण्यासाठी रस्ते होते त्या १७ रस्त्यांचा उपयोग झाला असुन अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करुन ही १७ रस्त्यांची कामे पूर्ण केली. जे स्टेडियमपर्यंत जाणारे रस्ते आहेत. सीवायजीच्या आत सुध्दा १८ रस्ते पूर्ण झालेले होते. जानेवारी ते ऑक्टोबर, २००८ या १० महिन्याच्या कालावधीत मेजर कामे पूर्ण करण्यात आली,

हा देशातील पहिला प्रयोग असला तरी त्यामध्ये इतर प्रयोगांचा समावेश होऊ नये ही भावना आहे. त्यामध्ये अनियमितता होऊ नये यासाठी योग्य ती खबरदारी घेणे हे देखील आपले कर्तव्य होते. कॅगने जो आक्षेप घेतला आहे त्याबाबत समर्पक उत्तरे देऊ देता आली नाहीत. उत्तर ज्या कामासाठी निधी दिला आहे, ते काम पूर्ण करण्याची जबाबदारी देखील सोपविलेली आहे. जे चांगले काम केले त्याबद्दल स्वागत करु. परंतु अनियमितता झाली ती

का झाली, नेमकी कुठे अनियमितता झाली? हा प्रश्न समितीसमोर आलेला आहे. त्याचे उत्तर आल्याशिवाय हा प्रश्न वेगळा करता येणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता. विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सुधारित अंदाजपत्रक तयार करुन डीपीआर मंजूर झाला, त्या अनुषंगाने जो खर्च झाला त्याला अधिक खर्च झाला असे म्हणता येईल. अनियमितता झाली असे म्हणता येणार नाही. ४३४ कोटींपैकी ३९५ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. डीपीआरचा जो वाढीव १७७ कोटी रुपये खर्च झाला त्याची कारणे सांगितली आहेत. कमी कालावधीत कामे करावयाची होती, युटिलिटी शिफ्टींगची माहिती सुरुवातीला नव्हती. बीआरटीची संकल्पना मांडताना नॅशनल अर्बन ट्रान्सपोर्ट पॉलिसीच्या गाईडलाईन्स आलेल्या नव्हत्या. त्या गाईडलाईन्स नोव्हेंबर, २००६ मध्ये आल्या होत्या.

महालेखापाल ही एक संविधानिक संस्था आहे. महालेखापाल यांनी नमूद केल्याप्रमाणे १७७ कोटी रुपये मिस मॅनेजमेंटमुळे अधिक खर्च झाले आहेत डीपीआरमध्ये युटिलिटी शिफ्टींगचा समावेश केलेला नव्हता, तो नंतर करण्यात आला, जे काम झाले त्यात बोगस खर्च झालेला नाही ही जी आज समितीला माहिती दिली जात आहे ती महालेखापाल यांना ऑडिटच्या वेळी का देण्यात आली नाही? अशी समितीने विचारणा केली. त्यासंदर्भात प्रधान महालेकाखापाल यांनी पुढील मत व्यक्त केले The venue for holding the CYG had been decided in June 2006. Thus, the DPR were approved as late as in December 2007 and August 2008 respectively. This is the audit objection from us. There was delay in approval of the Project Report.

The next objection is about blocking of funds of Rs. 114.20 crore. The road remained incomplete due to non-acquisition of Defence land. I think this road is now completed. We have also given list of works in our Report which was supposed to be done for CYG. There are total 23 roads out of which 22 roads has been awarded before CYG, 1 road is awarded after CYG, 12 roads completed before CYG and 4 roads are completed after CYG. We think that the Committee consists of Architect and Engineers is responsible for these works.

We have also stated in our report about avoidable extra expenditure on refixing of paver blocks. The extra expenditure of Rs. 46.89 lakh was incurred because of poor planning. We have quoted in our report that "The Principal

Secretary, UDD stated that the utility lines could not be shifted before the paving work due to non-availability of clear site and shifting of utilities was deferred till the event was over. The fact remained that PMC failed to provide clear site in time," It means that there was an extra expenditure because the works were not completed on time.

We have also stated in our report about improper planning resulted in extra expenditure on account of price variation and consultancy fees. We had a wide discussion about all these audit paras with the concerned department before finalisation of our Audit Report.

महालेखाकारांच्या उपरोक्त आक्षेपासंदर्भात विभागीय सचिव यांनी असे नमूद केले की, डीपीआरचा इश्यू होता. त्यातील ४३४.२२ कोटी रुपयांच्या वाढीव खर्चाच्या सुधारित अंदाजपत्रकाला केंद्र शासनाने स्वतंत्रपणे मान्यता दिली आहे. ही अनियमितता आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. खर्चामध्ये जी वाढ झाली ती अशा बाबींमुळे झाली, ज्याचा समावेश मूळ डीपीआरमध्ये नव्हता. युटिलिटी शिफ्टींगचा समावेश त्यात नव्हता. नॅशनल अर्बन ट्रान्सपोर्ट पॉलिसीअंतर्गत जी कामे आवश्यक होती, ते पॉलिसी आल्यानंतर कळले. ती कामे करावी लागली. त्याचा डीपीआरमध्ये समावेश करावा लागला. त्या कामाच्या खर्चाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. त्या कामाचा समावेश सुरुवातीच्या अंदाजपत्रकात केला असता तर खर्च २६८ कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला असता तो खर्च अनावश्यक नव्हता. या कामांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली असल्यामुळे या प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमिता झालेली नाही, म्हणून महालेखापालांनी सदरहू लेखा आक्षेप क्षमापित करावा असे विभागाचे म्हणणे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता जी कामे करणे अत्यावश्यक होते, ती कामे करण्यात आली असल्याचे विभागीय सचिवांनी सममितीस सांगितले

युटिलिटी शिफ्टींगची कामे करणे आवश्यक होते. तरी त्या कामांचा समावेश मूळ अंदाजपत्रकात का करण्यात आला नाही ? याबाबत समितीने विचारणा केली यावर पुणे येथे क्रीडा स्पर्धा येथे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पी.सी.एम.सी. आणि पी.एम.सी.यांनी मार्च, २००७ मध्ये या ठिकाणच्या कामांच्या प्रकल्प अहवालाचे काम तातडीने हाती घेतले. अवघ्या सात ते आठ महिन्यात या कामांना केंद्र शासनाने अंतिम मान्यता दिली. या कामांमध्ये काही कामांचा कम्पोनंट राहिला होता व त्या कम्पोनंटच्या कामाचे नवीन अंदाजपत्रक करण्यात

येऊन, त्यास केंद्र शासनाची मंजुरी देखील घेतली गेली. सदरहू कम्पोनंटची कामे नंतर केली गेली, त्यामुळे अधिकचा खर्च दिसून येत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या ठिकाणच्या मूळ एस्टीमेंटमध्ये सर्व कांमाचा समावेश केला गेला नाही, त्यानंतर युटिलिटी शिफ्टींगची कामे केली गेली व त्या कामांवर अतिरक्त खर्च करुन अनियमितता झालेली आहे असे महालेखापालांचे म्हणणे आहे. युटिलिटी शिफ्टींगच्या कामांचा उल्लेख हा मूळ एस्टीमेटमध्ये केला असता तर हा अतिरिक्त खर्च झाला नसता. तसेच महालेखापलांनी देखील हा ऑडीट ऑब्जेक्शन घेतले नसते. परंतु तसे झालेले नाही. आपण युटिलिटी शिफ्टींगच्या कामांचा मूळ अंदाजपत्रकात समावेश केला नाही, त्याचा परिणाम असा झाला की, युटिलिटी लाईन्स शिफ्ट न करता त्या रस्त्याच्या ठिकाणी पेवर ब्लॉक बसवून फुटपाथ करण्यात आले. त्यानंतर पुन्हा ते पेवर ब्लॉक काढून टाकले. युटिलिटी शिफ्टींगची कामे न करता या विविध कामांवर ४६ लाख रुपयांचा खर्च केला गेला आहे. अशी माहिती समितीने दिली. ४६ लाख रुपये अतिरिक्त खर्च झालेला आहे, तो खर्च ठेकेदारांकडून वसूल करण्यात आला असल्याचे आयुक्तांनी समितीस सांगितले.

राष्ट्रकुल युवा क्रीडास्पर्धे हा खर्च केला गेला. या खर्चाचा उपयोग खेळांच्या स्पर्धेसाठी झाला आहे काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. युटिलिटी शिफ्टींगची कामे नंतर करण्यात आली, त्या कामाचे नवीन अंदाजपत्रक तयार करुन त्यास राज्य शासनाची तसेच केंद्र शासनाची मान्यता घेतली असली तरी राष्ट्रकुल युवा क्रीडास्पर्धेसाठी आवश्यक आवश्यक असलेली अनेक कामे आजच्या स्थितीला अर्धवट अवस्थेत आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेता या कामांच्या बाबतीत आपणाकडून नियोजन केले होते, त्याप्रमाणे बऱ्याचशा गोष्टी नियोजनाप्रमाणे झालेल्या नाहीत. व्यवस्थितपणे नियोजन केले नसल्यामुळे बऱ्याच सुविधांचा फायदा घेता आलेला नाही. ही सर्व कामे सुरुवातीलाच केली असती तर हा जास्तीचा खर्च झाला नसता. त्यावेळी जास्तीचा खर्च झाला असता तर तो खर्च कदाचित समितीला मान्य झाला असता. परंतु जास्तीचा खर्च करुनही त्या कामांचा स्पर्धेसाठी उपयोग झाला नाही असा आमचा आक्षेप आहे, याबाबतीत विभागाचे काय म्हणणे आहे ? त्याचबरोबर राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे पुणे येथे आयोजन केले गेले, त्यावेळी एका एक्सप्रेस हायवेला जोडणारा पूल पुणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी चार ते पाच महिन्यात अहोरात्र मेहनत करुन पूर्ण केले. तसेच त्यांनी पुलाचे देखील काम चांगले केलेले आहे. तो रस्ता बालेवाडीस जोडला आहे.

एखादे काम हाती घेऊन ते अधिकाऱ्यांनी चार ते पाच महिन्यात पूर्ण करुन तेथील वाहतुकीची सोय चांगल्या प्रकारे केली असली तरी दोन-दोन वर्षापूर्वीची कामे आहेत, ती अजून पूर्णत्वास आलेली नाहीत. कामे अपूर्ण राहिल्यामुळे शेवटी कामाचा दर्जा निकृष्ठ होतो. परंतु पुणे महानगरपालिका ही कामे चांगल्या प्रकारे करु शकते. पुणे महानगरपालिकेने वेळेच्या आता कामे पूर्ण केलेली आहेत, असे असताना बीआरटीएसला सदर प्रकल्पाची कामे करण्यास इतकी घाई का झाली होती ? युटिलिटी शिफ्टींगची कामे न करता कामे केली गेली आहेत ही गोष्ट महालेखापालांना पटली नाही. तसेच समितीला देखील ही गोष्ट पटली नाही. याबाबतचे स्पष्टीकरण करण्यास समितीने सांगितले विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मूळ एस्टीमेटमध्ये काही कामांचा कम्पोनंट राहिला होता, ती कामे नंतर करण्यात आली आहेत. बी.आर.टी.एस.बाबत नॅशनल पॉलिसी नंतर आली. त्यात काही कामांचा अंतर्भाव झाला व त्या कामांचा समावेश करुन नवीन एस्टीमेट तयार करुन त्यास केंद्र सरकारची मान्यता घेण्यात आली. त्यानंतर ही युटिलिटी शिफ्टींगची कामे करण्यात आली असा खुलासा केला.

युटिलिटी शिफ्टींगच्या कामासाठी जो अतिरिक्त खर्च केला आहे तो खर्च महालेखापालांना मान्य नाही. सदर खर्च केला गेला ती बाब वेळीच महालेखापालांच्या निदर्शनास का आणून देण्यात आली नाही ? समितीच्या या प्रश्नावर साधारणतः जूनच्या सुमारास अशा प्रकारचा निर्णय घेतला गेला. बी.आर.टी.एस.च्या कामांना राज्य सरकारने मार्च, २००७ मध्ये मंजुरी दिली. त्यानंतर त्या कामाच्या प्रस्तावांना केंद्राने मान्यता दिलेली आहे. सदर कामे पूर्ण करण्यासाठी फक्त सात ते आठ महिन्यांचा कालावधी राहिला होता. त्यामुळे सदर कामांचे एस्टीमेट तातडीने तयार करुन ते केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी लागलीच पाठविण्यात आले. कामाचे एस्टीमेट करुन त्यास राज्य शासनाची मान्यता घेणे, तसेच केंद्र शासनाची मान्यता घेणे या प्रक्रियेसाठी फक्त सात ते आठ महिन्याचा कालावधी मिळाला. तेवढया कालावधीत ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली गेली व त्यानंतर ही कामे पूर्ण केली गेली. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

युटिलिटीज शिफ्टीगच्या कामास मंजुरी कधी घेण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली त्यावर सदर कामे ठराविक कालावधीत पूर्ण करणे अत्यावश्यक होती. ती कामे प्राधान्याने पूर्ण केली. त्यानंतर युटिलिटी शिफ्टींगची कामे करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. याच संदर्भात माहिती देताना तत्कालीन विभागीय आयुक्तांनी

समितीला असे सांगितले की, जेएनएनयुआरएम ही योजना केंद्रात अस्तित्वात आली. त्यावेळी ही योजना ६५ शहरांमध्ये लागू होती. त्या ६५ शहरांमध्ये या योजनेचा निधी मिळविण्याबाबत फार मोठी स्पर्धा होती. सदर योजनेचा निधी मर्यादित होता, तो निधी आपल्या शहरासाठी प्राप्त करुन घेण्यासाठी स्पर्धा फार मोठी होती. आठवडयाच्या दर मंगळवारी केंद्र शासनाच्या अर्बन डेव्हलपमेंट मंत्रालयात निधी वाटपासंबंधी बैठका व्हावयाच्या. वेगवेगळया राज्यांचे लोक, वेगवेगळया राज्याचे लोकप्रतिनिधी, वेगवेगळया राज्याचे मुख्यमंत्री हे त्या बैठकीस उपस्थित राहून आपल्या राज्यासाठी, आपल्या शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असत. महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, नाशिक अशी पाच शहरे निवडण्यात आली. ठाणे, कल्याण हा मुंबई अर्बन ॲग्लोमरेशनचा भाग धरण्यात आला आहे. महाराष्ट्रातील इतर शहरे आहेत त्या शहरांना देखील सातत्याने या योजनेचा निधी मिळावा म्हणून पाठपुरावा होत होता. परंतु सिटी डेव्हलपमेंट प्लॅन तयार करणे हे पहिले बंधन होते. पुणे येथील सिटी डेव्हलपमेंट प्लॅन प्रथम तयार झाला व त्यास केंद्राने मान्यता दिली. या योजनेतील कामे करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरविण्यात आला होता. नदी, ड्रेनेज आणि नंतर रस्ते अशा प्रकारे कामांना प्राधान्यक्रम ठरविलेला होता. नागरिकांना भेडसावणारी जी समस्या असेल ती या प्राधान्यक्रमानुसार त्या कामांचा प्रकल्प अहवाल तयार करुन तो सादर करणे व त्यास मान्यता घेणे आवश्यक होते. पुणे महानगरपालिकेने नदी सुधारणा कामांचा प्रथम प्रस्ताव केला तो प्रस्ताव मंजुरही झाला. त्यानंतर रस्त्याचा प्रस्ताव प्रस्ताव केला. रस्त्याचे प्रस्ताव पाठवित असताना काही काळ अगोदर एमएसएसआयडीसीने एस्टीमेट करुन पुणे शटराचा इंटिग्रेटेड रोड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट तयार केला. एमएसआरडीसीकडून कामाचे ड्रॉफ्ट एस्टीमेट करण्याची पध्दत आहे, त्याप्रमाणे तो प्रस्ताव पीएमसीकडे सादर केला होता. तो प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेच्या प्रक्रियेमध्ये होता. ज्यावेळी जेएनएनयुआरएम ची योजना आली, त्यानंतर आमची कामे मंजुर करावीत म्हणून केंद्राकडे प्रयत्न केला. यासंबंधी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार होते परंतु त्या रिपोर्टसंबंधी १०० टक्के माहिती पीएमसीकडे नव्हती ही वस्तुस्थिती आहे.

पाणी पुरवठयाची पाईप लाईन्सची कामे, ड्रेनेजच्या पाईप लाईन्सची कामे होती, त्यांची एस्टीमेट तयार केली गेली व त्यास मंजुरी देखील घेतली आहे. मंजुरी नंतर ती कामे हाती घेतली गेली. आता ती माहिती पीएमसीकडे उपलब्ध असेल. परंतु त्यावेळी रस्त्याच्या बाजूने किती पाईप लाईन्स आणि किती पाईप लाईन्सचे आपल्याला स्थलांतर करावे लागणार आहे

याची माहिती नव्हती. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नॉर्मस्प्रमाणे ड्रॉफ्ट एस्टीमेट प्रमाणे तरतूद केली. साधारणतः त्यावेळी कामाच्या किंमतीच्या १० टक्के एवढी तरतूद केली गेली असेल. ते एस्टीमेट नंतर केंद्राकडे मान्यतेसाठी पाठविले. सदर एस्टीमेट केंद्राकडे प्राप्त झाल्यानंतर दरम्यानच्या काळात त्यानी त्यांच्या स्तरावर बीआरटीएसची योजना येऊ घातली होती. तुम्ही तुमच्या एस्टीमेटमध्ये अशा अशा प्रकारच्या सुधारणा करा, त्यानंतर तुमच्या कामांचे एस्टीमेट मान्य करु असे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार एस्टीमेटमध्ये सुधारणा केल्या व ते एस्टीमेट पुन्हा केंद्राकडे मान्यतेसाठी परत पाठविले. केंद्र शासनाच्या सी.पी.डब्ल्यू.डी.ने सदरच्या एस्टीमेटची छाननी केली व त्यानंतर त्यास मान्यता दिली. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली होती, त्या एस्टीमेटस्ना मान्यता दिली. केंद्र शासनाच्या सी.पी.डब्ल्यू.डी.ने सदरच्या एस्टीमेटस्ची छाननी केल्यानंतर व मान्यता दिल्यानंतर ती कामे सुरु झाली. या कामाच्या बाबतीत प्राधान्यक्रम ठरविण्यात आले होते, त्याप्रमाणे कामे हाती घेतली गेली. क्रीडा स्पर्धेसाठी अवधी कमी राहिला होता. त्यामुळे क्रीडा संकुलापर्यंत जाणारे जे काही रस्ते होते, त्यांना प्राधान्य देण्यात येऊन ती कामे करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती पुणे महानगरपालिका आयुक्तांनी देखील नाकारलेली नाही. या कामासाठी जेवढा खर्च करावयाचा होता, त्यापेक्षा जास्त खर्च या कामांवर केला गेला आहे. विशेषतः बाणेर रस्त्यावर युटिलिटी शिफ्टींगचे काम एवढया कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य नव्हते. गेम्स सुरु होण्यास थोडाच अवधी राहिलेला होता. म्हणून पुणे महानगरपालिकेने असा निर्णय घेतला की, या रस्त्यावरील युटिलिटी शिफ्टींगचे काम आताच सुरु न करता आहे त्या रस्त्यावर पेवर ब्लॉक बसवून फुटपाथ तयार करु. या रस्त्यावरील युटिलिटी शिफ्टींगचे काम ठेकेदाराने वेळेवर पूर्ण केले नाही. या कामावर ४६ लाख रुपये अतिरिक्त खर्च झाला होता. तो ४६ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च ठेकेदाराकडून वसूल करण्यात आला आहे. सदर रस्त्याचे काम करण्याशिवाय पर्याय राहिलेला नव्हता. कारण त्या रस्त्यावरुन माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान, व्ही.व्ही.आय.पी, व्ही.आय.पी. हे क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनास येणार होते. खेळाडुंची राहण्याची व्यवस्था क्रीडा संकुलात करण्यात आली होती, परंतु बाहेर देशातील काही खेळाडू पुणे शहरात थांबले होते, त्या खेळाडुंना क्रीडा संकुलात येण्यासाठी हाच मार्ग होता. हा अतिशय महत्वाचा मार्ग होता, म्हणून त्या रस्त्याचे काम प्राधान्याने पूर्ण केले. महानगरपालिकेने कामांच्या खर्चात बदल

केला, त्या बदलास त्यांनी मान्यता घेतली आहे. या कामांवर खर्च केला गेला. त्या खर्चाचा खेळाच्या स्पर्धेसाठी उपयोग झाला काय अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय समितीने केला आहे. या बाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, या क्रीडा संकुलात खेळाच्या स्पर्धा बघण्यासाठी येणारे जे नागरिक होते, व्ही.आय.पी.होते, त्यांच्यासाठी सदर रस्त्यांची कामे स्पर्धा सुरु होण्यापूर्वी करण्यात आली. त्या रस्त्यांचा उपयोग व्ही.आय.पी.आणि सर्वसामान्य नागरिकांना जाण्या-येण्यासाठी निश्चितपणे झालेला आहे. मंजूर एस्टीमेटप्रमाणे सर्व कामे पूर्ण करणे शक्य नव्हते. जस जशी गरज पडली, तस तशी कामे केली गेली. तसेच युटिलिटी शिफ्टींगची कामे नंतर हाती घेतली गेली. त्या कामांच्या एस्टीमेटला मान्यता घेऊन ती कामे पूर्ण करण्यात आली. जी कामे केली गेली, त्या कामांचा क्रीडा स्पर्धेसाठी निश्चितपणे फायदा झालेला आहे.

जेएनएनयुआरएम अंतर्गत स्पर्धांशी संबंधित पायाभूत नागरी सुविधा प्रकल्पांसाठी निधीला मंजुरी दिली गेली. त्यात बीआरटीएसच्या माध्यमातून रस्त्यांची कामे हाती घेतली गेली. त्यानंतर युटिलिटी शिफ्टींगची कामे हाती घेतली गेली व त्या कामांच्या एस्टीमेटस्ची सी.पी.डब्लू.डी.यांनी छाननी करुन मान्यता दिली. सी.वाय.जी.शी संबंधित कामे, ही सर्व कामे लिंक-अप करुन टाकलेली असुन ही कामे जेएनएनयुआरएम अंतर्गत झालेली आहेत. ही सर्व कामे सी.वाय.जी.साठी करण्याचे ठरले. नंतर ती सर्व कामे एकत्रित केली आहेत असे वाटते तसेच जेएनएनयुआरएम मधील ही कामे आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता ही जेएनएनयुआरएम अंतर्गतचीच कामे आहेत. केंद्र शासनाच्या सी.पी.डब्ल्यू.डी.यांनी या कामांना मान्यता दिलेली असल्याचे आयुक्तांनी सांगितले यावर समितीने असे सांगितले की, सी.पी.डब्ल्यू.डी.चा या कामांशी काहीही संबंध नसुन ही कामे जेएनएनयुआरएम ची आहेत. ही सर्व कामे लिंकअप केलेली आहेत. कॉमन वेल्थची ही कामे नव्हती. कामांच्या एस्टीमेटमध्ये झालेले बदल, तसेच युटिलिटी शिफ्टींगची कामे नंतर हाती घेणे, युटिलिटी शिफ्टींगच्या कामावर झालेला जास्तीचा खर्च व त्यासंबंधीचे स्पष्टीकरण महालेखापालांना वेळीच सादर करावयास पाहिजे होते. परंतु तसे केले गेले नाही, म्हणून महालेखापालांनी ऑडीट ऑब्जेक्शन काढलेले आहे. त्या ऑडीट ऑब्जेक्शनची चौकशी करावी लागत आहे. कामांच्या एस्टीमेटमध्ये झालेले बदल, युटिलिटी शिफ्टींगची कामे नंतर हाती घेऊन त्या कामांवर जास्तीचा खर्च केला या बाबींची माहिती महालेखापालांना वेळीच का दिली नाही ?

बी.आर.टी.एस.ची कामे, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) असलेली कामे, तसेच सी.पी.डब्ल्यू.डी. ने मान्यता दिलेली कामे ही सर्व कामे सीवायजीच्या कामांशी लिंकअप केली गेली आहेत. या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे ती समितीला सांगावी. These works are not related to CYG.

यावर प्रधान महालेखाकार यांनी यासंदर्भात अधिक माहिती अशी दिली की, We have stated in Chapter 3 of our Report as follows, "To facilitate organization of the CYG, the Planning Commission approved funding of city infrastructure projects relating to the Games through the Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission (JNNURM)."

महालेखाकारांच्या खुलाशानुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, This funding is not for the CYG. The funding is from JNNURM. केन्द्र सरकार के स्तर पर ऐसा निर्णय हुआ है कि शहरों में इन्फ्रास्ट्रक्चर, पानी एवं सीवरेज की हालत खराब है इसलिए इन कामों की दुरुस्ती के लिए केन्द्र सरकार की ओर से निधि उपलब्ध करायी गई है, इसका कॉमन वेल्थ गेम्स से कोई संबंध नहीं है. इस ऑडिट पॅरा से सरकार की इमेज खराब हुई है. समितीच्या उपरोक्त खुलाश्याच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी आपले मत पुढीलप्रमाणे व्यक्त केले To facilitate organisation of the CYG, the planning commission approved funding of city infrastructure projects relatings to the games. यावर समितीने A.G. mixed these works of CYG with JNNURM works. आपण याबाबत ए.जी. कडून स्पष्टीकरण मागवावे. असे व्यक्त केले.

यावर प्रधान महालेखाकार यांनी असा खुलासा केला की, I would like to clarify the point that how we have linked it with CYG? In the Introduction Chapter-I in our Audit Report we have clearly stated as follows.

"The Government proposed the creation and upgradation of civic infrastructure at Pune under two civic bodies, viz. the Pune Municipal Corporation and the Pimpri-Chinchwad Municipal Corporation at an estimated cost of Rs. 626 crore. An inter-ministerial team headed by the Advisor, Planning Commission visited Pune in September 2006 to examine the infrastructure required there for the

CYG. On the basis of the recommendations of the team and the availability of resources, it was decided that the city infrastructure projects would be funded under the Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission.."

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) दिलेला निधी खर्च करण्याच्या बाबतीत काही अटी व शर्ती घातलेल्या होत्या काय ? अशी समितीने विचारणा केली असता, तत्कालीन विभागीय आयुक्तांनी असा खुलासा केला की, पुणे महानगरपालिकेने ठराव करुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) जी कामे प्रस्तावित केली होती त्यामध्ये रस्त्यांची कामे होती किंबहुना त्याही पेक्षा जास्त कामे होती. त्यावेळी स्युवेज ट्रीटमेंट प्लॅण्टच्या कामावर केन्द्र सरकारने भर देण्याचे ठरविले. अन्य कामे मागे ठेवण्याचा निर्णय केन्द्रस्तरावर झाला. २००६च्या मे-जूनमध्ये CYG पुण्यात होणार अशी घोषणा करण्यात आली. या संधीचा फायदा घेण्यासाठी ठराव दुरुस्त करुन तो पुन्हा केन्द्र सरकारकडे सादर करण्यात आला व त्यास मंजुरी देण्याबाबत केन्द्र सरकारला विनंती करण्यात आली. केन्द्र सरकारकडून मंजुरी देखील मिळाली. शहराचे इन्फ्रास्ट्रक्चर अपग्रेड करण्यासाठी मदत होईल हा यामागचा उद्देश होता. या संदर्भात केन्द्रीय अधिका-यांसमवेत बैठक झाली. दिल्लीतील कॉमनवेल्थ युथ गेमच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी जशी तरतूद करण्यात आली होती तशा प्रकारची तरतूद CYG साठी करावी अशी पुणे महानगरपालिकेने स्वतंत्रपणे केन्द्र सरकारला विनंती केली. परंतु ती विनंती केन्द्र सरकारकडून मान्य झाली नाही. ही कामे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाखाली (JNNURM) प्रस्तावित होती. त्यातील काही कामांना CYG मुळे प्राधान्य देण्याचे केन्द्र सरकारने ठरविले. ही योजना सुरुवाती पासूनच जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) होती. त्याबाबतीत पुणे महानगरपालिकेचा ठराव होता. त्याचा फायदा देखील लोकांना झाला. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाची (JNNURM) सर्व प्रक्रिया अवलंबिलेली आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) ६२ शहरांना केन्द्र सरकारने मदत करण्याचे ठरविले. त्यामध्ये नांदेड, औरंगाबाद, नाशिक या शहरांचा समावेश झाला. पुणे शहराच्या प्रश्नाबाबत बोलायचे तर २००५मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) पुण्यामध्ये वेगवेगळी कामे

प्रस्तावित केलेली होती. नंतर २००६मध्ये पुण्यामध्ये CYG घेण्याचे ठरले. पुणे शहराच्या दृष्टीने ही एक चांगली गोष्ट झाली. पुणे शहरामध्ये जी काही कामे करावयाची होती त्या कामांना या CYG मुळे कालमर्यादा आली. या कामांसाठी केन्द्र सरकारची जेवढी ग्रॅण्ट मिळते त्या प्रमाणात राज्य सरकार आणि महानगरपालिकेकडूनही निधी उपलब्ध करुन दिला जातो. या कामांच्या बाबतीत असा मुद्दा समोर आलेला आहे की, ही कामे नॉर्मल कोर्समध्ये, DPR करुन झाली असती तर अधिकचा खर्च टाळता आला असता. परंतु ती कामे तशी न झाल्यामुळे अधिकचा खर्च झालेला आहे. DPR वेळच्या वेळी झाला असता तर ब्लॉक एस्टिमेट करण्याची वेळ आली नसती. दुसरी बाजू अशी आहे की CYG मुळे या कामांना गती आली. पुण्यामध्ये सार्वजनिक स्वरुपाची जी कामे होत होती त्याबाबतीत कोणी हरकत घेण्याचे कारण नव्हते. तसेच ही कामे करण्यासाठी जी घाई करण्यात आली त्याही बाबतीत कुणाचे दुमत नाही. या कामांचा डिटेल प्लॅनिंग रिपोर्ट का करण्यात आला नाही हा प्रश्न समिती पुढे असल्याचे समितीने स्पष्ट केले.

कॉमन वेल्थ गेम्सच्या संदर्भात राज्यामध्ये जी काही कामे झाली त्याची छाननी करुन महालेखाकारांनी रिपोर्ट दिलेला आहे. त्यांना असे वाटते की ही कामे करताना घाई झालेली आहे. ही कामे लवकर पूर्ण व्हावीत अशी सर्वांची इच्छा होती आणि त्याबद्दल कुणाचीही हरकत नाही. पण एका निश्चित दिनांकाच्या आत ही कामे पूर्ण करीत असताना त्या कामांचे जे डिटेल प्लॅनिंग करावयास पाहिजे होते ते त्यावेळच्या ॲथॉरिटीने न केल्यामुळे काही खर्च जादा झाला. कामाचे प्लॅनिंग केले असते तर खर्च कमी झाला असता, असे अे.जी.ंचे म्हणणे आहे. CYG मुळे कामे लवकर करण्याची घाई करण्यात आलेली होती. कामांना कोणाचाही विरोध नव्हता. कामे गतीने करावयाची होती, ती गतीने करण्यास कुणाची हरकत नव्हती, ही कामे गतीने करीत असताना पैशाचा अपव्यय झाला, महालेखाकरांच्या संक्षिप्त अहवालामध्ये असा शेरा आहे की, "CYG पूर्वी कामे पूर्ण करुन देण्याच्या हेतूने दुस-या रस्त्याच्या कामासाठी विद्यमान कंत्राटाची अतिरिक्त बाब म्हणून चुकीने दर्शवून PCMC ने रस्त्याच्या कामासंबंधीची रु. ४२ कोटीची कामे अनियमितपणे दिली. तथापि, ही कामे CYG नंतर पूर्ण झाली." जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत (JNNURM) कामासाठी हा निधी दिलेला होता. ही कामे ठराविक मुदतीमध्येच पूर्ण झाली पाहिजेत अशा प्रकारच्या अटी व शर्ती नव्हत्या. मग हे पैसे CYG साठी आले होते आणि CYG संपल्यानंतर ते खर्च करण्यात

आले असा चुकीचा पॅरा लिहिण्याची आवश्यकता नव्हती. असे मत समितीने व्यक्त केले. तसेच जी कामे करावयाची होती ती वेळेत पूर्ण व्हावीत असा आग्रह लोकप्रतिनिधींनी देखील धरला होता. जो काही निधी त्या कामासाठी प्राप्त झाला होता तो त्या कामावर खर्च झालेला आहे ही वस्तुस्थिती असल्याचे समितीने नमूद केले असता यावर तत्कालीन आयुक्तांनी अशी माहिती दिली की, महालेखाकारांनी अहवालात रु.१७७.०४ कोटीचा खर्च टाळता आला असता असे म्हटले आहे. या संदर्भात पुणे महानगरपालिकेशी संबंधित असलेले दोन मुद्दे पहिला मुद्दा असा आहे की, याच्या डीपीआरला मंजुरी उशिरा घेतली. दुसरा मुद्दा असा आहे की, ४६ लाख रुपये इतका खर्च अनावश्यक आहे तो दोन वेळा झाला आहे हे दोन मुद्दे असून ११७ कोटी रुपये अनावश्यक खर्च झाला तो तपशिलामध्ये नाही, तो कुठून आला? या प्रॉजेक्टला पहिल्यांदा मान्यता मिळाली आणि त्यानंतर फायनल मान्यता मिळाली त्यामधील फरक १७७ कोटी रुपये आहे. त्यामुळे हा खर्च अनावश्यक आहे का, तो टाळता आला असता का या प्रश्नाचे उत्तर शोधावयाचे असेल तर जे काम झालेले आहे ते टाळता आले असते का, ते काम करण्याची गरज होती का या संदर्भात समितीसमोर असे सांगितले की, हे काम करण्याची गरज होती पण ते मूळ अंदाजपत्रकात धरलेले नव्हते, हे मान्य केलेले आहे. त्या संदर्भात कारणे देखील दिलेली आहेत. ती कामे नंतरच्या अंदाजपत्रकात धरलेली आहेत आणि त्या अंदाजपत्रकाला पुणे महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाकडून मान्यता मिळाली आहे. रिवाईज एस्टिमेटला राज्य शासनामार्फत मान्यता मिळालेली आहे त्यानंतर त्या अंदाजपत्रकाला केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. त्यांना त्यातील कुठलेही काम अनावश्यक वाटले असते तर त्यांनी ते निश्चितपणे वगळले असते. तसेच त्यातील काही कामे सीपीडब्लूडीने वगळली आहेत ती प्रत्यक्ष त्या कामामध्ये धरलेली नाहीत. म्हणून १७७ कोटी रुपयांचा खर्च टाळण्यासारखा होता किंवा टाळला पाहिजे होता असे नाही. तो करणे आवश्यक होते पण तो खर्च मूळ एस्टिमेटमध्ये धरला नव्हता हे मान्य केलेले आहे. त्या संबंधीची जी कारणे सांगितलेली आहेत ती योग्य असून ती कारणे मान्य करण्यात यावीत. पैशाचा अपव्यय, गैरव्यवहार किंवा अपहार झालेला नाही. पेव्हर ब्लॉकवर ४५ लाख रुपये खर्च झालेला आहे तो एक्स्ट्रा खर्च झालेला आहे तो कॉन्ट्रॅक्टरकडून वसूल केलेला आहे.

रु.१७७ कोटीचा खर्च टाळता आला असता असे कॅगचे मत आहे. कॅगने अहवाल दिल्यानंतर महापालिका, राज्य शासन तसेच केंद्र शासन यांच्याकडून खुलासा घेतलेला आहे.

या संदर्भात कॅगला दोष देण्याचे काही कारण नाही. कॅगला जे वाटले ते त्यांनी आपल्या अहवालात दिलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले.

यावर महालेखाकारांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, We have made a audit Report. C.A.G. Report No-6, "Infrastructure Development for Commonwealth Youth Games-2008" Everything which is related to infrastructure, we have covered it in our audit. We have taken all this from the record which was made available to us.

महालेखाकारांच्या दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने असे सांगितले की, Whatever audit objections have been raised by the CAG and whatever we have heard on this issue, let us have detailed discussion on this and after that we will come to conclusion.

समितीने यापुढे स्पष्ट केले की, ए.जी.ंनी जो आकडा काढलेला आहे तो मोठा आहे. रु. १७७ कोटींची कामे केली नसती तर पुन्हा चार-पाच वर्षांनी तो खर्च करावा लागला असता. उशिरा का होईना कन्सर्न ॲथॉरिटीच्या हे लक्षात आले म्हणून खर्च वाढला. एखाद्या प्रॉजेक्टचा खर्च वाढणे यामध्ये काही चूक नाही. खर्च वाढल्यामुळे काम चांगले झाले पाहिजे क्वालिटीपूर्ण काम झाले पाहिजे आणि लोकांना त्याचा फायदा झाला पाहिजे. या ठिकाणी कॅगच्या अहवालातील १७७ कोटी रुपयांचा प्रश्न नाही. आपण सर्वजण लोकप्रतिनिधी आहोत. अंदाजपत्रक ४७४ कोटी रुपयांचे असेल, हजार कोटी रुपयांचे असेल किंवा पाचशे कोटी रुपयांचे असेल जे नियोजन करतात त्यांच्यावर विश्वास ठेवून कामे करण्यात येतात. ज्यांनी नियोजन केलेले आहे त्यांच्या हे लक्षात आलेले नाही. नियोजन चुकले हे मान्य करण्यात आलेले आहे. रु. १७७ कोटीचा खर्च जास्त झालेला आहे त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही पण बदललेल्या परिस्थितीमध्ये हा प्रश्न निर्माण होतो की, एक प्रॉजेक्ट करीत असताना १० अनुषंगिक गोष्टी कराव्या लागतात. कन्सर्न माणसाचे व्हीज्युलायझेशन नव्हते, व्यवस्थित प्लॅनिंग नव्हते त्यामुळे ही कामे यामध्ये धरावयाला स्कोप मिळाला. प्लॅनिग ४५० कोटी रुपयांचे केले असते तर कॅगला आणि आपल्याला असे मत मांडता आले नसते. डी.पी.आर.साठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानामार्फत (JNNURM) पैसे आले त्याप्रमाणे काम केले असते तर विषय संपला असता. संबंधितांनी नियोजन बरोबर केले नाही.

ज्या बाबी आयटम नंतर घेण्यात आल्या त्या आधीच का घेण्यात आले नाही, त्यामुळे नियोजन कमी पडले काय याचा समितीला जरुर विचार करावा लागेल. ॲग्रीमेंटमध्ये काय लिहिले होते, कोणाची जबाबदारी काय होती हे सर्व पहावे लागेल यासाठी या संबंधीची सर्व कागदपत्रे समितीला पाठविण्यात यावीत असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

या अनुषंगाने नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी असा खुलासा केला की, या योजनेचे नियोजन का करता आले नाही याचे कारण स्पष्ट होणे आवश्यक आहे. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यात आले होते पण त्याचा CYG करिता उपयोग झाला नाही या दोन मुद्याच्या संदर्भात बोलावयाचे आहे. युटिलिटी लाईन्सची सविस्तर माहिती विभागाकडे नसते. नेमक्या डेफ्टिंग करिता किती खर्च येणार आहे, याचा अंदाज नसतो. प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर रस्ते विकसित करण्याकरिता प्रयत्न करावे लागले. त्यामुळे डेफ्टिंगचा खर्च वाढला. मूळ अंदाजपत्रकात युटिलिटी लाईन्सचा समावेश नव्हता त्यानंतर तो करण्यात आला. प्रत्यक्षात बीआरटीएस चा प्रस्ताव दिला नव्हता तर तो रस्त्याचा प्रस्ताव दिला होता. शहर विकास आराखड्याचा तो एक भाग होता. केंद्र शासनाकडे तो सादर केला होता.

यावर समितीने आपले अभिप्राय देताना असे सांगितले की, केंद्र शासनाकडे पहिल्यांदा सादर करण्यात आलेला प्रकल्प जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाचा (JNNURM) नव्हता त्यानंतर तो जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानामध्ये (JNNURM) घेतला गेला. त्यामुळे त्यांच्या नियमाप्रमाणे तो करावा लागला, त्यामुळे खर्च वाढला आहे. या बाबतीत ए.जी.ंचे म्हणणे असे आहे की, हा जो खर्च वाढला आहे तो टाळता आला असता. यावर हा खर्च टाळता येण्याजोगा होता असे नाही तर ही कामे देखील आवश्यक होती असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी दिले. ही कामे आवश्यक होती तर तुम्हाला ती आधी का सूचली नाहीत. रस्ते करण्याची घाई का करण्यात आली? याबाबतीत रु.१७७ कोटी रुपयांची अफरातफर करण्यात आली असे कोणीही म्हटलेले नाही. समितीला तसे वाटत नाही पुरावे मिळाल्या शिवाय समिती असे म्हणणार नाही.

सन २००६-२००७ मध्ये जे अधिकारी काम करीत होते, त्यांना १५ दिवसामध्ये समितीसमोर बोलावून त्यांच्या कडून याबाबतीत अधिक खुलासा घेण्यात यावा. या अधिकाऱ्यांना अगोदर दोन वेळा संधी उपलब्ध झाली होती त्यावेळी ते सांगू शकले असते की, ही बाब आमच्या लक्षात आली नाही ही आमची चूक झाली असून १७७ कोटी रुपयांचा खर्च टाळता

आला असता. २००६-२००७ मध्ये जे अधिकारी कार्यरत होते, त्यांचे याबाबत काय म्हणणे आहे तेही कळले पाहिजे असे समितीने सांगितले.

यावर तत्कालिन विभागीय आयुक्तांनी समितीला असे सांगितले की, ज्यावेळेस ब्लॉक एस्टीमेट तयार केल्यानंतर ते केंद्र शासनाकडे पाठविणे आवश्यक होते. त्याठिकाणी चढाओढ होते आणि शेवटी निधी मर्यादित स्वरुपात मिळतो. त्यामुळे आपला नंबर अगोदर लागावा यासाठी प्रयत्न केले जातात आणि जेव्हा संधी मिळाली तेव्हा हे एस्टीमेट वाढविण्यात आले.त्यावेळी आपल्याकडे सल्लागार नव्हता. मग पुणे महानगरपालिकेने केलेल्या प्रस्तावामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रस्तावातील रक्कम वाढविण्यात आली आणि जेव्हा ही बाब मंजुरीच्या टप्प्यामध्ये आली तेव्हा सल्लागार नेमण्यात आला. विशेषतः युटिलिटी शिफ्टींग अंतर्गत कर्वे रोडचे काम करताना जे अनुभव आले ते लक्षात घेता ही बाब पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे आली होती आणि त्यामध्ये त्यांनी दुरुस्ती करण्याचे ठरविले. जी संधी उपलब्ध झाली, त्याचा फायदा घेऊन रिव्हाईज इस्टीमेट करण्यात आले आणि त्यानुसार काम करण्यात आले. याबाबत आम्हाला ज्यावेळी पहिली संधी मिळाली तेव्हा केंद्र शासनाकडे रिव्हाईज एस्टीमेट पाठविण्यात आले आणि ते जर गरजेचे नसते तर ते मान्य झाले नसते. याबाबत महालेखपालांनी जे मुद्दे काढले आहेत, याबाबतीत सर्व उत्तरे त्यांच्यासमोर ठेवली आहेत आणि रिपोर्टमध्ये देखील उत्तराचा उहापोह करण्यात आला आहे. याबाबतीत एक सूत्र तयार केलेले आहे.याबाबतीत ए.जी.यांनी उपस्थित केलेले मुद्दे आणि याठिकाणी करण्यात आलेला खुलासा हा सध्याचे महानगरपालिका आयुक्त आणि सचिव, नगरविकास विभाग यांनी दिलेल्या उत्तरामध्ये आहे आणि हे टाळण्यासारखे नव्हते.

उपरोक्त विषयासंदर्भात विभागीय सचिवांनी पुढे असा ही खुलासा केला की, दि.५ जून २००६ रोजी राष्ट्रकुल क्रीडा महासंघाने जाहीर केले की, पुणे येथे राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येणार होती आणि त्याप्रमाणे शासनाने दि.२६ मे २००६ रोजी आदेश निर्गमित केला आहे. याबाबत सांगण्यात आले की, नवी दिल्ली येथील राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धा २०१० चा एक उप कार्यक्रम म्हणून तृतीय राष्ट्रकुल युवा स्पर्धा २००८ सीवायजी मार्फत आयोजित केल्या होत्या. शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे सुरु केलेल्या पायाभूत क्रीडा सुविधा विकास कामांसाठी, तांत्रिक मार्गदर्शनासाठी आयोजन समितीने एक सल्लागार संस्था म्हणून क्रीडा तांत्रिक संचालन समिती स्थापन केली होती. त्याचप्रमाणे राज्य शासनाने सन २००६

मध्ये क्रीडा स्पर्धा तांत्रिक संचालन समिती तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आढावा समिती आणि दररोजच्या कामासंबंधात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती गठित केली होती आणि डीएसवायएस हे सदस्य सचिव होते. त्याचबरोबर पुणे मनपा आयुक्त, पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी पुणे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विभाग व उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पुणे, पोलीस कमिशनर, डायरेक्टर स्पोटर्स् आणि ऑर्गनायझर हे सदस्य असून त्यांना डे टू डे निर्णय घेण्याच्या बाबतीत अधिकार दिले होते. स्पोटर्स् फॅसिलिटी क्रिएट करण्यासाठी आणि स्पर्धा आयोजित करण्यासाठी एक्झीक्युटीव्ह कमिटी स्थापन करण्यात आली होती. या संबंधातील कार्यकारी समितीची मे-जून २००६ मध्ये बैठक झाली. दि.१२ ते १८ ऑक्टाबर २००८ मध्ये स्पर्धा झाल्या. त्यामुळे आपल्याकडे यासाठी २० महिन्यांचा कालावधी होता. त्या काळामध्ये एक्झीक्युटीव्ह कमिटीच्या एकंदर ६७ बैठका झाल्या. आढावा समितीच्या ३ बैठका झाल्या. टेक्नीकल समितीच्या ४ बैठका झाल्या आणि त्यानुसार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला ॲथलेटिक्स, बॅटमिंटन, बॉक्सिंग, नेमबाजी, टेनिस व वेटलिफ्टिंग असे सहा गेम्स् निवडण्यात आले होते. तसेच नवीन फॅसिलिटी उपलब्ध करुन देण्यासाठी १९२ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला मान्यता दिली होती. त्या नंतर आणखी तीन खेळ समाविष्ट करण्यात आल्यामुळे यासाठी लागणारी अंदाजित रक्कम २८५ कोटी पर्यंत गेली आणि ती शासनाने मान्य केली. याशिवाय राज्य शासनाने ३२.९५ कोटी रुपये तात्पुरत्या खर्चासाठी देण्यात आले. अशा प्रकारे एकंदर ४२५.५० कोटी आणि २१.९५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. यामध्ये २१० कोटी केंद्र शासनाने आणि २४८ कोटी रुपये राज्य शासनाने दिले होते आणि त्यापैकी जवळजवळ १०० टक्के खर्च झालेला आहे. तसेच कन्सल्टंटना पेमेंट देण्याचे शिल्लक आहे.परंतु सीएजीचा रिपोर्ट आल्यामुळे सध्या पेमेंट थांबवून ठेवण्यात आले आहे.

समितीने यावर अशी विचारणा केली की, ३२ कोटी रुपये कोणत्या कामासाठी द्यावयाचे होते ? तसेच समितीला ३२ कोटी रुपयांच्या खर्चाच्या संबंधातील बायफरकेशन देण्यात यावे. तसेच हा निधी कोणाला आणि कशासाठी देण्यात आला होता ? यासंदर्भात माहिती देण्याबाबत विभागीय सचिवांना सांगितले असता यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, क्रीडा स्पर्धांचे आयोजन करीत असताना जी काही कामे राहिली होती, त्यासाठी निधीची मागणी

करण्यात आली होती. विभागीय सचिवांनी ३२ कोटीपैकी १५ कोटी रुपये देण्यात आले होते. ऑर्गनायझिंग कमिटीला पार्कींगच्या कामासाठी १ कोटी रुपये, फर्निचर, फिचर्स् ओव्हरलेजसाठी १८ कोटी रुपये देण्यात आले असे सांगितले. तर यासंदर्भात तत्कालीन संचालक क्रीडा यांनी अधिक माहिती देताना असे सांगितले की, त्यावेळी ३२ कोटी रुपये प्राप्त झाले होते ते त्यातील या कमिटीला २५ कोटी ट्रान्सफर केले आहेत. याबाबतीत वेळोवेळी माननीय वित्त मंत्र्यांकडे मागणी करण्यात आली होती. ३२ कोटी रुपयांच्या टेम्पररी खर्चामध्ये तेथे डेकोरेशन, सुशोभिकरण, सी.वाय.जी., खूर्च्या, ज्याला आपण ओव्हरलेज म्हणतो असे गेम्स् यामध्ये समाविष्ट नव्हते असेही सांगितले यावर तत्कालीन विभागीय आयुक्त यांनी त्याठिकाणी मोठ-मोठे बॅनर्स् लावणे, बॉक्सिंगसाठी मार्कींग करणे, तसेच वेगवेगळ्या देशांचे ध्वज लावणे, खुर्च्यांची सोय करणे इ.व्यवस्था करावयाची होती. मात्र ही व्यवस्था कायम स्वरुपाची नव्हती अशी माहिती समितीला दिली. ३२ कोटी रुपयांच्या खर्चाच्या याबाबतीत समितीला डिटेल्स्मध्ये माहिती देण्यात यावी. तसेच हा निधी खर्च करताना कोणती कार्यपद्धती अवलंबिण्यात आली होती. याबाबत समितीला माहिती देण्याचे निदेश समितीने दिले.

यावर तत्कालीन आयुक्तांनी समितीस असे सांगितले की, ३२ कोटी रुपयांपैकी जो निधी ऑर्गनायझींग कमिटीला देण्यात आलेला आहे त्यातील २५.१२ कोटी रुपयांचा खर्च कशासाठी आणि कोणत्या पध्दतीने झालेला आहे याची माहिती कदाचित याठिकाणी उपस्थित असलेले अधिकारी देऊ शकणार नाहीत. कारण सदरहू खर्च ऑर्गनायझर कमिटीने केलेला आहे याचा तपशील डायरेक्टर ऑफ स्पोटर्स् ऑर्गनायझर यांच्याकडून मागविण्यात येईल आणि तो प्राप्त झाल्यानंतर समितीकडे सादर केला जाईल. त्यांनी ज्या-ज्या बाबींवर खर्च केलेला आहे, त्याबाबतीत प्रॉयॉरिटी ठरविली होती. त्याठिकाणी क्रीडाविषयक ज्या बाबी असतात, त्या उपलब्ध करुन देणे आणि नंतर त्या काढून टाकण्याच्या संबंधातील सर्व गोष्टी त्यांनीच ठरविल्या होत्या.त्याबाबतीत एक्झीक्युटीव्ह कमिटी म्हणून काहीही रोल नव्हता.

२५ कोटी रुपये कोणाला देण्यात आले होते. Do you have the details of the expenditure? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर तात्कालिन संचालक क्रीडा यांनी वित्त विभागाच्या सूचनेनुसार २५ कोटी रुपयांचा चेक संचालक, क्रीडा यांना देण्यात आला होता त्यांनी नंतर ती रक्कम आयोजन समितीला दिली असल्याचे सांगितले आयोजन समितीकडून खर्चाची माहिती घेण्यात आली नाही काय ? या प्रश्नावर आयोजन समितीकडून खर्चाची

माहिती घेण्यासाठी संचालकांनी दोन वेळा पत्रे पाठविली असल्याची माहिती तात्कालिन संचालक क्रिडा यांनी दिली. २५ कोटी रुपये कोणत्या बाबींवर खर्च केले आहेत त्याची माहिती समितीला द्यावी तसेच महालेखाकारांनी या रकमेचे ऑडिट कशा प्रकारे केले होते याबाबतही समितीने विचारणा केली असता प्रधान महालेखाकारांनी The said amount was transferred to the Origanising Committee असे सांगितले तद्अनुषंगाने विभागाने या खर्चाची सविस्तर माहिती समितीला द्यावी असेही निदेश दिले. यावर तात्कालिन विभागीय आयुक्तांनी २५ कोटी रुपये संचालक, क्रीडा यांना वितरित करण्यात आले होते. त्यानंतर संचालकांनी आयोजन समितीला ही रक्कम दिली होती असे सांगितले. तसेच सदर रक्कम वापरल्याचे प्रमाणपत्रही त्यावेळी शासनाला देण्यात आले असल्याचे आयुक्त क्रीडा व युवा यांनी समितीस सांगितले. ही रक्कम वापरल्याचे प्रमाणपत्र संचालक, क्रीडा यांनी शासनाला सादर केलेले आहे. आज खर्चाच्या प्रक्रियेची माहिती संचालक, क्रीडा यांच्याकडे नाही. ही माहिती आयोजन समितीकडून मागवावी लागेल. कारण आयोजन समितीने शासनाकडे निधीची मागणी केली होती. त्यामुळे त्यांनी कोणत्या बाबींवर, कशा प्रकारे खर्च करावयाचा आहे व प्रत्यक्षात कसा केला आहे याबाबतची माहिती आयोजन समितीकडून घेऊन समितीला सादर करण्याचे आश्वासन तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी समितीस दिले.

३२ कोटी रुपयांपैकी २५ कोटी रुपयांची सविस्तर माहिती आयोजन समितीकडून घेऊन समितीला सादर करण्यात येईल. तथापि, ३२ कोटी रुपयांची माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ओव्हरलेज फर्निचर व फिक्सचर्स यासाठी १८ कोटी, ब्रँडिंग व डेकोरेशन यासाठी ९.५० कोटी, नेटवर्किंगव टीएसआर यासाठी १ कोटी, टेस्ट व ट्रायल इव्हेंट यासाठी १ कोटी, वेस्ट मॅनेजमेंट सिस्टम यासाठी ५० लाख मेंटेनेंस ऑफ व्हेन्युज यासाठी ५० लाख, हाऊस किपिंग यासाठी १० लाख, वेअर हाऊससाठी ३० लाख, मेडिकल पॉलिक्लिनिक्स यासाठी ५५ लाख, गार्डन ऑफ युथ ॲन्ड फाऊंडेशन यासाठी ५० लाख, पार्किंग एरिया डेव्हलपमेंट यासाठी १ कोटी रुपये अशा प्रकारे ३२.९५ कोटी रुपयांची संक्षिप्त विगतवारी आहे. २५ कोटीची सविस्तर माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असेही सांगितले. २५ कोटी रुपयांचे ऑडिट कसे केले त्याची माहिती ए.जी.नी. समितीला द्यावी असे निदेशही समितीने दिले असता प्रधान महालेखाकार A.G. will check this. Then A.G. will give the details to the Committee. असे सांगितले असता या कामासाठी एकूण ६७ निविदा

काढण्यात आल्या होत्या, सर्व प्रक्रिया पूर्ण करुनच ही कामे केलेली आहेत. त्याचप्रमाणे कार्यकारी समितीच्या ६७ बैठका झाल्या होत्या. त्या बैठकांमध्ये चर्चा केल्यानंतरच ही कामे करण्यात आली आहेत. आयोजन समितीने वेळोवेळी सूचना येत होत्या त्यांच्याकडून वेळोवेळी स्पेसिफिकेशनप्रमाणे व आवश्यकतेनुसार बदल करण्यात आला होता. त्यामुळे प्रोजक्टच्या किंमतीमध्ये वाढ होत गेली. त्यामुळे काही कामांबाबत प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही, काही कामांसाठी प्रक्रिया पूर्ण करता आली असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले त्या अनुषंगाने किती कामांच्या बाबतीत प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नव्हती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, महालेखाकारांच्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, काही कामांच्या बाबतीत टेंडर काढण्यात आले आहे व काही कामांच्या बाबतीत जुन्या टेंडरनुसार काम करण्यात आले आहे. काही ठिकाणी जो खर्च करण्यात आला आहे तो टाळता येण्याजोगा होता.

पार्किंग लॉट कोणत्या ठिकाणी करण्यात आले होते ? तसेच हे काम टेंडरच्या माध्यमातुन करण्यात आले होते काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी पुढील खुलासा केला की, पार्किंग लॉट एकूण ३ ठिकाणी डेव्हलप करण्यात आले होते. व्हीव्हीआयपीसाठी क्रीडा संकुलाचा लागून असलेल्या कम्पाऊंडच्या आतमध्ये एक पार्किंग लॉट तयार केला होता तसेच हे काम आपल्या माध्यमातून झालेले आहे. म्हाळूंगेच्या बाजूला किंवा क्रीडा संकुलाच्या पश्चिम बाजूला पीएमटी, पीसीएमटीच्या बसेससाठी पार्किंग लॉट तयार केला होता. तिसरा लॉट क्रीडा संकुलाच्या दक्षिण बाजूला खाजगी जागा होती. त्या जागेवर कोणतेही बांधकाम झालेले नव्हते. ती जागा विकसित करुन लॉट तयार केला होता व ३ ठिकाणच्या पार्किंग लॉटसाठी १ कोटी रुपये खर्च झाला असल्याचे सांगितले.

या अहवालामध्ये डीएसवायएस यांनी ९९ लाख रुपये बँकेत फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवल्याचे नमूद केलेले आहे. वास्तविक ही रक्कम शासकीय कोषागारामध्ये जमा करणे आवश्यक होते. ही रक्कम २०११ पर्यंत शिल्लक होते. ही रक्कम शासनाच्या तिजोरीमध्ये का जमा करण्यात आली नाही ? अशी विचारणा समितीने केली त्यावर विभागीय सचिवांनी या प्रकल्पासाठी राज्य सरकार व केंद्र सरकारकडून टप्प्याटप्प्याने पैसे आले होते. त्यनंतर ती रक्कम संचालक, क्रीडा यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली होती. या प्रकल्पाच्या कामांवर जसजसा खर्च झाला तसतसे पेमेंट केले जात होते. असा खुलासा केला.

३२ कोटी रुपयांपैकी २५.१२ कोटी रुपये आयोजन समितीला देण्यात आले. उर्वरित रकमेपैकी २ कोटी ४८ लाख रुपये दिनांक ३१ मार्च, २०११ पर्यंत शिल्लक होते. यापैकी, ९९ लाख रुपये डीएसवायएस ने मुदत ठेव स्वरुपात बँकेत ठेवले होते असे ए.जी. आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे. ३२ कोटी रुपये इतका खर्च होण्याची शक्यता नसताना आकस्मिक निधी कशासाठी घेण्यात आला होता ? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सी.एफ. मधून ३२.९५ कोटी रुपये घेतले होते. एक रकमी हे पैसे रिलीज करण्यात आले नव्हते.

२५ कोटी आयोजन समितीकडे वर्ग केले होते व ७.८३ कोटी रुपये संचालक, क्रीडा यांनी स्वतःकडे ठेवले होते असे ए.जीं.च्या आक्षेपामध्ये नमूद केलेले आहे. त्याचे कारण काय ? तसेच ९९ लाख रुपये बँकेत मुदत ठेव स्वरुपात ठेवण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, रिलीज झालेले पैसे खर्च झाले होते, फक्त पेमेंट करण्यात आले नव्हते. ४८५ कोटींपैकी सध्या ४ कोटी २० लाख रुपये शिल्लक आहेत. तसेच, उर्वरित पेमेंट देईपर्यंत सेव्हिंज अकाऊंटमध्ये ठेवण्याऐवजी मुदत ठेवीमध्ये अधिक व्याज मिळत असल्यामुळे त्यात गुंतविले असण्याची शक्यता आहे. सन २००८ या सालात प्रकल्पाचे काम झालेले असताना २०११ पर्यंत पेमेंट का करण्यात आले नाही? याबाबत समितीने विचारण केली असता दिनांक ११.९.२००८ रोजी १५ कोटी रुपये, दिनांक ७.१०.२००८ रोजी १० कोटी रुपये शासनाकडून दिनांक १२.८.२००९ रोजी ७ कोटी ९५ लाख रुपयांचा शेवटचा हप्ता शासनाकडून आलेला आहे. २५ कोटी रुपये आयोजन समितीला दिले होते. उर्वरित ७ कोटी रुपये खर्च होऊन गेलेले आहेत. फक्त पेमेंट करावयाचे आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तसेच या संदर्भात आयुक्त, क्रीडा यांनी असा खुलासा केला की, या प्रोजेक्टच्या सर्व कामांची बिले दिलेली आहे. या रकमेपैकी फक्त ७ कोटी ८५ लाख शिल्लक राहिले होते. त्या रकमेतून वेस्ट मॅनेजमेंट सिस्टिम, हाऊस किपिंग व पार्किंग एरिया डेव्हलपमेंटसाठी खर्च केला आहे. तथापि समितीने पुनः विचारणा केली की, पेमेंट न करण्याचे कारण काय आहे यावर आयुक्त, क्रीडा यांनी असे सांगितले की, फक्त सल्लागारांचे पेमेंट देणे शिल्लक राहिले होते. दरम्यानच्या काळात महालेखाकारांचा रिपोर्ट सादर झाला आहे. श्री.शशी प्रभू यांना क्रीडा क्षेत्रातील या कामाचा अनुभव असल्यामुळे त्यांची सल्लागार म्हणून नियुक्त केली होती. असेही

यावेळी विभागीय सचिवांनी समितीस सांगितले यावर प्रधान महालेखाकारांनी असे विचारले की, You have drawn the amount from contingency fund. Why did you withdraw the amount from the contingency fund ? या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी त्यावेळी विभागाकडे नियमित बजेटमधील तरतूद उपलब्ध नव्हती. त्यामुळे आकस्मिक निधीतून रक्कम घ्यावी लागली होती, असा खुलासा केला.

शासकीय रक्कम मुदत ठेव स्वरुपात ठेवण्यात आली ते योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच सल्लागारांचे पेमेंट करु नये असे कोणी सांगितले होते याबाबत विचारणा केली असता, आयुक्त क्रीडा यांनी सन २०१० या वर्षात ए.जी.अहवाल आल्यामुळे सल्लागारांचे पेमेंट थांबविले होते असे सांगितले. सल्लागारांची रितसर नेमणूक केलेली असताना त्यांचे पेमेंट थांबविण्याच्या सूचना विभागाला कोणी दिल्या होत्या ? माहे, ऑगस्ट -सप्टेंबर २००९ मध्ये निधी प्राप्त झालेला होता. तसेच सन २०१० मध्ये ऑडीट झाले होते.

सन २०१० मध्ये गेम्स झाले. सन २०१० मध्ये ऑडीट झाल्यानंतर देखील ही रक्कम पेड का केली नाही, ती का थांबवण्यात आली ? पैसे देऊ नयेत, असे आदेश आपल्याला देण्यात आले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता ऑडीटमध्ये या संदर्भात मुद्दा आलेला असल्याचे आयुक्त क्रिडा यांनी सांगितले.

ऑडीटमध्ये मुद्दा आला असेल तर त्याबाबत आपण रीतसर उत्तर द्यावयास हवे होते. सन २०१० मध्ये एजींनी ऑब्जेक्शन काढले होते. केलेले काम कायदेशीर असेल तर त्या संबंधी स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. मात्र तसे केले गेले नाही व ही रक्कम न देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णय कोणी घेतला, या संदर्भात खुलासा करावा. तसेच या निधी संदर्भात करार करण्यात आला होता काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता ३.५ कोटी रुपयांच्या संदर्भात करार केला होता. यामध्ये प्री टेंडरींग व पोस्ट टेंडरींग असे दोन भाग होते असा खुलासा आयुक्त क्रिडा यांनी केला.

शासनाकडून आवश्यक असणारा ४०० ते ५०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला होता. तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांनी देखील वेळोवेळी आपापला हिस्सा दिला होता. कन्सल्टींग चार्जेस कॉन्टीन्जन्सी निधीमधून का देण्यात आले ? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर तत्कालीन विभागीय आयुक्तांनी असे सांगितले की, सदर रक्कम आकस्मिक निधीमधून देणे अपेक्षित नाही. सुरुवातीला जो खर्च दाखविण्यात आला, त्या मधून काही

रक्कम देण्याचे राहून गेले असेल. मात्र या निधीचा व कॉन्टींजन्सी निधीचा काहीही संबंध नाही. डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स यांच्याकडून आकस्मिक निधी रुपये ७ कोटी खर्च होणे अपेक्षित होते. हा निधी खर्च झाला असेल व कदाचित बिले द्यावयाची राहिली असतील.

या संदर्भातील महालेखाकारांच्या परिच्छेद वाचला काय ? एवढा मोठा प्रोजेक्ट करताना आपण कन्सल्टन्सी सर्व्हीसेस घेतले तर ते ठीक आहे. मात्र एकूण अंदाजित खर्चाचा आपण योग्य प्रकारे प्लानिंग केलेले नाही,असे यावरुन दिसून येते. या खर्चाचाच एक भाग म्हणजे कन्सल्टन्सी चार्जेस होते. आकस्मिक निधीचा वापर साधारणपणे ज्या वेळी राज्यामध्ये एखादे नैसर्गिक संकट येते. उदाहरणार्थ दुष्काळी परिस्थिती किंवा पूर परिस्थिती निर्माण होते त्यावेळी केला जातो. तसेच कृत्रिम आपत्तीच्या वेळी देखील हा निधी वापरता येतो. ज्या वेळी निधीची तरतूद करण्यासाठी आवश्यक असलेली प्रोसिजर करण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध नसतो त्यावेळी सर्वसाधारणपणे या निधीचा वापर केला जातो. मात्र या ठिकाणी आकस्मिक निधीचा गैरवापर केला गेला आहे. खर्च झाल्यानंतर शिल्लक राहिलेला निधी पुन्हा शासनाकडे वर्ग करण्याची आवश्यकता होती. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी आकस्मिकता निधीच्या ॲडव्हान्समधून पीएमसीचे पेमेंट केलेले नाही. जो अपेक्षित खर्च होता, त्यावर ही रक्कम खर्च करण्यात आलेली असल्याचा खुलासा केला.

समितीने महालेखाकारांकडे अशी विचारणा केली की, ऑडिट में यह मुद्दा आया है कि आकस्मिकता निधी से जो रकम उपलब्ध हुई है उसमें से ९९ लाख रुपये फिक्स डिपॉजिट में रखे गये हैं.

यावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, Contingency fund is for unforseen expenditure which has to be done immediately. They have drawn the amount from the contingency fund. Out of that some amount remained unspent and it should have been surrendered. It is not yet surrendered.

तसेच या संदर्भात वित्त सचिवांनी असे मत मांडले की, ज्या वेळी इमर्जन्सीमध्ये निधी खर्च करणे आवश्यक असते, त्यावेळी आकस्मिक निधीचा वापर केला जातो. हा निधी पूर्णपणे खर्च न झाल्यास तो पुन्हा शासनाकडे वर्ग करण्याची आवश्यकता असते.

साधारणपणे इमर्जन्सीच्या वेळी हा निधी खर्च केला पाहिजे. राज्य शासनाने आयोजन समितीला २५ कोटी रुपये दिले होते. आकस्मिक निधीमधून ७ कोटी रुपये खर्च केले गेले.

२०११ पर्यंत मुदत ठेवीच्या स्वरुपात ९९ लाख रुपये अकाऊंटमध्ये ठेवण्यात आले होते. सदर खर्चाचे इंटर्नल ऑडीट कोणी केले ? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता

एक्झिक्युटीव्ह समितीकडे निधी प्राप्त झालेला होता. हा निधी एकूण ४ ठिकाणी खर्च करण्यात आला. एक्झिक्युटीव्ह समितीमार्फत निधी खर्च केला गेला. बालेवाडी येथील स्पोर्ट्सच्या इन्फ्रास्ट्रक्चरकरिता निधी खर्च केला गेला. तसेच नवीन व्हेन्यू तयार करणे, खेळाचे साहित्य विकत घेणे इ. गोष्टींवर हा निधी खर्च झाला. असल्याचे तत्कालीन विभागीय आयुक्तांनी समितीस सांगितले.

यावर समितीने अशी विचारणा केली, एक्झिक्युटीव्ह समिती मार्फत जो खर्च करण्यात आला, त्यामध्ये काही अडचण नाही. हा खर्च दिल्लीमध्ये केलेला नसून राज्यामध्ये केलेला आहे.

एक्झिक्युटीव्ह समितीने केलेल्या खर्चाच्या संदर्भातील अकाऊंट्स सी.ए. कडून तपासले आहेत. तसेच त्याचे ऑडीट ए.जींनी केलेले आहे. त्याचा रिपोर्ट देखील आपल्या समोर आहे. २५ कोटी रुपयांचा खर्च आयोजन समिती मार्फत करण्यात आलेला आहे, त्याचे ऑडीट एजींनी केलेले असल्याचे तत्कालीन विभागीय आयुक्तांनी सांगितले.

यावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, So far as the amount of Rs. 25 crores is concerned we have got some figures of expenditure. The Hon. Chairman had asked whether the expenditure of Rs. 25 crores have been fully audited on that I had said that I cannot reply without checking.

महालेखाकारांच्या या अभिप्रायानुषंगाने तत्कालीन विभागीय आयुक्तांनी असे सांगितले, आयोजन समितीने पुणे व दिल्लीला केलेल्या खर्चाचे ऑडीट एजी व सीएजी यांनी केलेले आहे. यामध्ये २५ कोटी रुपयांच्या निधीचा समावेश असण्याची शक्यता आहे. तसेच डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स यांनी ७.५ कोटी रुपंयाचा खर्च केलेला आहे. या खर्चाचे ऑडीट झालेले नाही. पुणे व पिंपरी-चिंचवड नगपालिकेकडून जो खर्च झालेला आहे, त्याचे ऑडीट झालेले आहे.

राज्य शासनाने या बाबींसाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. बालेवाडी क्रीडा संकुल येथे झालेल्या स्पर्धेकरिता जो खर्च झाला आहे, त्याचे ऑडीट दिल्लीतील एजींनी केले. हा खर्च राज्यामध्ये झालेला आहे. यामुळे या खर्चाचे ऑडीट राज्यातील एजींनी करावयास पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता A.G. will check it असे महालेखाकारांनी सांगितले

याअनुषंगाने अधिक माहिती देताना तत्कालीन विभागीय आयुक्तांनी असे सांगितले की, ३२ कोटी रुपयांकरिता बजेटमध्ये तरतूद केलेली नव्हती. आयोजन समितीने शेवटच्या वेळी राज्य शासनाकडे निधीची मागणी केली. ही मागणी अधिक रकमेची होती. यामध्ये राज्य शासनाने कपात करुन ३२ कोटी रुपयांपर्यंत मर्यादित केली. बजेटमध्ये तरतूद नसल्यामुळे, हा निधी आकस्मिक निधीमधून केला गेला व सदर निधी डायरेक्टर ऑफ स्पोर्ट्स यांच्याकडे देण्यात आला. या रकमेचा हिशोब देणे आवश्यक होते. तसेच हा निधी खर्च करणे देखील गरजेचे होते. हा निधी खर्च झालेला नसेल तर तो पुन्हा शासनाकडे वर्ग केला पाहिजे.

The amount of Rs. 25 crores was transferred by cheque to the Organising Committee. Have they given you details of expenditure ? अशी समितीने विचारणा केली असता तत्कालीन विभागीय आयुक्तांनी असे सांगितले की, We gave the money to the Organising Committee, Commonwealth Youth Games, Pune. त्यांनी यासाठी वेगळे अकाऊंट तयार केले होते.

पुण्याच्या समितीला चेक दिला होता की दिल्लीच्या समितीला दिलेला होता ? या समितीच्या प्रश्नावर २५ कोटी रुपयांचा चेक पुण्याच्या आयोजन समितीला दिला होता. पुण्यामध्ये वेगळी आयोजन समिती स्थापन केली होती. असा खुलासा तत्कालीन संचालक क्रीडा यांनी केली.

सदर खर्च पुणे आयोजन समितीने केला होता की दिल्ली आयोजन समितीने केलेला होता? ही समिती शासकीय होती काय ? तसेच आयोजन समितीमधील पदाधिकाऱ्यांनी नावे सांगणेबाबत समितीने सांगितले असता तत्कालीन विभागीय आयुक्तांनी आयोजन समिती शासकीय नव्हती. एक्झिक्युटीव्ह कमिटी शासकीय होती असे सांगितले. याच अनुषंगाने पुढे विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, या समितीचे अध्यक्ष श्री.सुरेश कलमाडी होते व सचिव श्री.ललित भानोत होते. आयोजन समिती संपूर्ण देशासाठी होती. पुणे येथे देखील एक अकाऊंट उघडले होते. मात्र त्याच्याशी काही संबंध नाही.आयोजन समिती,पुणे यांच्या नावे चेक देण्यात आला आहे तसेच या संदर्भात आयोजन समितीने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. त्यावर शासनाने निर्णय घेऊन निधी देण्याचे निदेश दिलेले होते असे तत्कालीन विभागीय आयुक्तांनी समितीस सांगितले.

पुण्यामध्ये अकाऊंट उघडल्यास त्याचे ऑडीट व्हावयास नको काय ?राज्य शासनाने २५ कोटी रुपये दिले असून त्याचे ऑडीट झाले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले त्यावर महालेखाकार यांनी इस बात को चेक करना पड़ेगा. असे उत्तर दिले.

राज्य शासनाने आकस्मिक निधीमधून जी रक्कम दिलेली आहे, त्याचे डिटेल्स राज्य शासनाला दिले पाहिजेत असे समितीने सांगितले असता राज्य शासनाला उपयोगिता प्रमाणपत्र दिलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

९९ लाख रुपये मुदत ठेव म्हणून अकाऊंटमध्ये पडून राहिले. हा आकस्मिकता निधीमधील अखर्चित रक्कम राज्य शासनाला परत केलेला नाही याबाबत समितीने विचारणा केली असता आयोजन समितीकडून ३२ कोटी रुपयांची मागणी उशिरा करण्यात आली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

दि.३१/३/२०११ रोजी २.४८ कोटी रपये शिल्लक होते. ९९ लाख रुपये मुदत ठेवीच्या स्वरुपात कशासाठी ठेवले होते ? व २५ कोटी रुपयांचे उपयोगिता प्रमाणपत्र संदर्भातील सर्व कागदपत्रे संबंधित अधिकाऱ्यांनी लोकलेखा समितीला सादर करावीत, असे निदेश समितीने दिले.

यावर ३.७४ कोटी रुपये मार्च अखेरीस शिल्लक होती. त्यापैकी ९९ लाख रुपये फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवण्यात आले होते. उर्वरित रक्कम ही अकाऊंटमध्ये जमा होती. यासंदर्भातील इत्यंभूत तपशीलवार माहिती समितीला नंतर देणार असून यामध्ये खर्च झालेला आहे. पण संबंधितांना पेमेंट अदा केलेले नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला आहे.

विभागाने ९९ लाख रुपये फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवलेले असल्यामुळे त्यांना व्याज मिळालेले असणार तसेच बँकेत पैसे आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय आयुक्तांनी होय. सदर रिपोर्टमध्ये स्तुती सुध्दा करण्यात आलेली आहे. यामध्ये क्रीडा संकुलाचे बांधकाम चांगल्या दर्जाचे केलेले आहे, अशा प्रकारची स्तुती रिपोर्टमध्ये करण्यात आलेली असल्याचे समितीस सांगितले

या अनुषंगाने तत्कालीन संचालक क्रीडा यांनी सदर रिपोर्टमध्ये फोटो सुध्दा दिलेले आहेत. सन २००८ मध्ये कॉमन वेल्थ युथ गेमच्या स्पर्धेला सुरुवात झाली होती. परंतु, ऑगस्ट, २०१० मध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडल्यामुळे काही ठिकाणी लिकेजस्ची परिस्थिती निर्माण झाली होती. समितीने अवगत केले.

यामध्ये ४५० कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सदर खर्च अनेक अत्यावश्यक बाबींवर केलेला होता. उदाहरण द्यावयाचे झाले तर कुलींग अएरकंडिशनवर सुध्दा खर्च केलेला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता समितीने यावर अशी विचारणा केली की सर्व खर्च बालेवाडी, क्रीडा संकुलावर केलेला आहे काय ? या अनुषंगाने तत्कालीन संचालक क्रिडा यांनी यामध्ये तीन हॉल वातानुकूलीत करण्यात आले होते. यामध्ये डिझेल जनरेटर संचावर सुध्दा मोठ्या प्रमाणात खर्च केलेला असल्याचे सांगितले.

विद्युत जनित्र जोडणीसाठी ९९.८९ लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. परंतु कागदोपत्री ३६.१७ लाख रुपये प्रदान केले अशा प्रकारचा ऑडिट परिच्छेद असून. ३६ लाख रुपये विदाऊट बिलींग कसे काय दिले ? समितिने अशी विचारणा केली. विभागीय सचिवांनी यामध्ये एकूण ६२ कामे दिलेली आहेत. मुख्य कंत्राटदाराला ३१८ कोटी रुपयांची कामे देण्यात आली होती तसेच यामध्ये निविदा प्रक्रिया व इतर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संबंधित ठेकेदाराला काम देण्यात आले होते. प्रत्यक्षात ठेकेदाराला ३५० कोटी रुपयांची कामे दिलेली होती असे सांगितले. यामध्ये दोन महानगरपालिकेचा समावेश नव्हता सदरील कामे क्रीडा संकुलाची होती असे विभागीय आयुक्तांनी सांगितले.

क्रीडा संकुलाची एकूण किती कामे झालेली आहेत ? याबाबत समितीने विचारणा केली असता यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची कामे करण्यात आलेली आहेत. नवीन हॉस्टेल उभारणीचे काम देखील करण्यात आलेले आहे. यामध्ये अंतर्गत सजावटीची करण्यात आलेली आहेत. अशी व इतर अनेक आवश्यक ती कामे करण्यासाठी ४२५ कोटी रुपयांचा खर्च झालेला होता. टेंडर प्रक्रियेद्वारे सर्व कामे पूर्ण केलेली होती. या कामांच्या संदर्भात एक्झीक्युटीव्ह कमिटीमध्ये विस्तृतपणे चर्चा झाली होती. यामध्ये निवृत्त मुख्य अभियंत्याचा समावेश होता. त्यांच्या सल्ल्याने आणि पीडब्युडीच्या मॅन्युअलप्रमाणे कामे करण्यात आली होती. ही सर्व कामे जुन्या रेटनेच करण्यात आलेली होती अशी माहिती तत्कालीन विभागीय आयुक्तांनी माहिती दिली.

बालेवाडी, क्रीडा संकुलात ४५० कोटी रुपयांची कामे केलेली आहेत. यामधील सर्व कामे दीड वर्षापर्वी सुरु करण्यात आली होती. सन २००८ मध्ये प्रत्यक्ष खेळाला सुरुवात झाली होती. ३२ कोटी रुपयांची कामे अगोदर का पूर्ण करण्यात आलेली नाहीत ? क्रीडा साहित्य खरेदीसाठी ५० कोटी रुपये खर्च केलेले आहेत. याची इत्यंभूत माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

यावर तत्कालीन संचालक क्रीडा यांनी असा खुलासा केला की, यामध्ये अनेक नवीन कामांवर खर्च करण्यात आलेला होता. शुटींग रेंजवर खर्च करण्याबाबत समितीने सूचना केली होती. यामध्ये ७१ देशांच्या खेळाडुंचा समावेश होणार होता. तसेच अनेक खेळाडुंची राहण्याची व्यवस्था करण्यासाठी दोन अतिरिक्त हॉस्टेलची उभारणी केली होती.

सर्व खेळाडुंना हॉस्टेलमध्ये राहण्यासाठी जागा नसल्यामुळे दोन अतिरिक्त हॉस्टेल बांधण्यात आली याबद्दल समितीला काहीच म्हणावयाचे नाही. मात्र पुण्यात फक्त ४ दिवस खेळांचे आयोजन होणार होते. याकरिता नवीन हॉस्टेलची उभारणी केली. यासंदर्भात समितीला अधिक माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता ७२ देशातील खेळाडुंचा समावेश होणार असल्यामुळे सर्वच खेळाडुंना जागेची अडचण भासणार याकरिता दोन हॉस्टेलची निर्मिती करण्यात आली होती. तसेच बालेवाडी, क्रीडा संकुलात आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या. क्रीडा संकुलातील बहुतांश कामे मे, अखेरीस पूर्ण करण्यात आलेली होती. क्रीडा साहित्यामध्ये ऑब्जेक्शन काढण्यात आले होते. जगलर थ्रोचे काम अमुक कंपनीला देणे, ॲथलॅटीकची कामे अमुक कंपनीला देणे, याकरिता कोटेशनची प्रक्रिया पूर्ण करणे याबाबत ऑर्गनाईझ कमिटीमध्ये चर्चा करण्यात आली होती. यामध्ये कमिटीने काही बाबीला मान्यता दिली आणि काही बाबींला मान्यता दिली नव्हती. या विषयाच्या संदर्भात तत्कालीन प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी या सर्व कामांवर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर त्यांच्या मान्यतेनेच पुढील कामे करण्यात आली होती अशी माहिती तत्कालीन विभागीय आयुक्त यांनी दिली.

नव्याने दोन हॉस्टेल उभारण्यात आलेली आहेत, क्रीडा साहित्यावर खर्च करण्यात आलेला आहे, बालेवाडी, क्रीडा संकुलातील फर्निचरवर देखील खर्च केलेला आहे, या सर्व कामांचे एस्टीमेट किती रुपयांचे होते ? या तीन मुद्यांच्या संदर्भात समितीला तपशीलवार माहिती देण्याबाबत निदेश दिले असता विभागाने ३ कोटी २० लाख रूपये फर्नीचरच्या कामांवर खर्च करण्यात आलेला असून यासंदर्भात तपशीलचार माहिती समितीला नंतर अवगत केली जाईल असे आश्वासन दिले.

क्रीडा साहित्यात मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात खर्च करण्यात आला आहे ही वस्तुस्थिती मान्य करत ऑर्गनायझेशन कमिटीच्या मान्यतेने क्रीडा साहित्याची खरेदी केलेली होती.

त्यावेळी विभागाला रिले बॅटन १० पुरेशी असतील असे वाटले होते. पण कमिटीने १५ रिले बॅटन घेण्याची सूचना केल्यामुळे विभागाला तशा प्रकारची कार्यवाही करावी लागली होती. क्रीडा साहित्याच्या संदर्भात कमिटीच्या सूचनेप्रमाणेच कार्यवाही केलेली असल्याचे तत्कालीन आयुक्तांनी सांगितले.

यावर समितीने मर्यादित खर्चापेक्षा अधिक प्रमाणात क्रीडा साहित्य खरेदी करण्यात आलेली आहेत. अशा प्रकारचा ऑडिट परिच्छेद असून साहित्य खरेदीचे काम कोणाकडे होते ? अशी विचारणा केली असता साहित्य खरेदीचे काम आपल्याकडेच होते. यापूर्वी रिले बॅटनचे उदाहरण दिलेले आहे. तसेच खेळाडुंसाठी नव्याने ग्लोव्हज खरेदी करण्यात आले होते. सर्वच खेळाडुंना ग्लोव्हजची आवश्यकता असल्यामुळे खरेदी करण्यात आले होते, असा खुलासा तत्कालीन विभागीय आयुक्तांनी केला.

जे क्रीडा साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे त्याची सद्यःस्थिती काय आहे याबाबतची माहिती सुध्दा समितीला देण्यात यावी असे समितीस सांगितले असता याबाबतचा तपशील तसेच, जे साहित्य जास्तीचे खरेदी करण्यात आलेले आहे त्याची माहिती देखील समितीला देण्यात येईल असे आश्वासन यावेळी तत्कालीन आयुक्त यांनी दिले.

मध्यंतरी सराव कॅम्प आयोजित केले होते. त्यावेळी काही साहित्य वापरण्यात आलेले आहे. किती साहित्य खरेदी करण्यात आले आणि किती साहित्य वापरण्यात आले याबाबतची माहिती उपलब्ध असल्याचे तत्कालीन संचालक क्रिडा यांनी सांगितले.

गृह विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने अधिक माहितीसाठी समितीने दि. २-५-२०१२ रोजी गृह विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी अपर मुख्य सचिव गृह विभाग यांनी समितीस असे सांगितले की, महालेखाकारांनी त्यांच्या अहवालामध्ये जे आक्षेप नोंदविलेले आहेत ते खरे आहेत. पोलीस आयुक्त, पुणे यांनी दिनांक ०१.१०.२००७ रोजी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे २३.५९ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केलेला असताना सुध्दा अशी परिस्थिती का निर्माण झाली आणि त्याचे काय परिणाम झाले असा प्रश्न आहे. घडलेल्या घटना क्रमानुसार याबाबतची एक टिप्पणी तयार केलेली आहे. समितीने माहिती वेळेवर न दिल्याबद्दल तीव्र नापंसती व्यक्त केली यावर अप्पर मुख्य सचिवांनी टिप्पणी आता तयार केलेली आहे समितीला याबाबतचे स्टेटमेंट आधी दिलेले असल्याचे सांगितले. पुणे येथील पोलीस विभागाकडे किती वाहने आहेत, त्यांच्या काय अडचणी आहेत

याची समितीला कल्पना आहे. वाहन खरेदी करण्यासाठी कोणत्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला, वाहने किती खरेदी करावयाची होती, किती खरेदी केली आणि किती खरेदी करावयाची बाकी होती याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडून पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे ऑक्टोबर, २००७ मध्ये २३ कोटी ५९ लाख रुपयांचे प्रपोजल पाठविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक २७.०५.२००८ रोजी ६.८८ कोटी रुपये, दिनांक १३.०६.२००८ रोजी ७.१६ कोटी रुपये आणि दिनांक ०४.०९.२००८ रोजी १.१९ कोटी रुपये व २.४० कोटी रुपये अशा एकूण १७.६३ कोटी रुपयांच्या साधन सामुग्रीच्या खरेदी खर्चांना मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ९.४० कोटी रुपये किंमतीची खरेदी करण्यात आलेली असून ३.१८ कोटी रुपयांची बचत झालेली आहे. ५ कोटी रुपये किंमतीची खरेदी करु शकलो नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे पोलीस सह आयुक्त पुणे यांनी समितीस सांगितले.

एकूण २३.५९ कोटी रुपयांचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते का, अशी विचारणा समितीने केली असता २३.५९ कोटी रुपयांचे प्रस्ताव सादर केले होते. परंतु १७.६३ कोटी रुपयांच्या साधन सामुग्रीच्या खरेदी खर्चांना मान्यता मिळाली होती असा खुलासा सह आयुक्त यांनी केला. याला मान्यता केव्हा मिळालेली आहे व खरेदी करावयाचे आयटम कोणते होते त्याची यादी देण्याबाबत समितीने सांगितले याअनुषंगाने १७.६३ कोटी रुपयांच्या साधन सामुग्रीच्या खरेदीखर्चाला वेगवेगळ्या तारखेला मान्यता मिळालेली असुन असून त्यामध्ये १५५ आयटम असल्याचे सह आयुक्तंनी सांगितल.

विभागाने समितीला जी लेखी माहिती दिलेली आहे त्या माहिती बरोबर प्रशासकीय मान्यतेबाबतचे काही शासन निर्णय जोडलेले असून कोणत्या वस्तू खरेदी करावयाच्या याबाबतची माहिती त्यामध्ये दिलेली आहे. दिनांक १५ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयामध्ये एकूण ९४ आयटम दाखविण्यात आलेले आहेत. दिनांक २७ मे, २००८ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयामध्ये एकूण ३३ आयटम दाखविण्यात आलेले आहेत. त्यानंतर दिनांक १३ जून, २००८ व ४ सप्टेंबर २००८ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयामध्ये काही आयटम दाखविण्यात आलेले आहेत. शेवटच्या प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर, २००८ रोजी काढण्यात आलेला असून २००८ मध्ये स्पर्धा होणार होत्या.

पुणे पोलिसांनी विभागाकडे प्रस्ताव केव्हा पाठविले? प्रस्ताव आल्यानंतर छाननी करण्यासाठी किंवा प्रोसिजर पूर्ण करण्यासाठी वेळ लागणार आहे याची कल्पना असताना प्रशासकीय मान्यतेचे पहिले पत्र दिनांक १५ फेब्रुवारी, २००८ रोजीचे आहे आणि शेवटचे प्रशासकीय मान्यतेचे पत्र दिनांक ४ सप्टेंबर, २००८ रोजीचे आहे. प्रशासकीय मान्यता देण्यासाठी एवढा विलंब का झालेला आहे ? विभागाला निधी मिळालेला आहे, प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. मग नस्ती उशिरा का गेली. स्पर्धा सुरु होण्यापूर्वी मिळालेल्या संपूर्ण रकमेची खरेदी केली असती तर समजू शकलो असतो. परंतु निधी मिळून सुध्दा तुम्ही ती संपूर्ण रक्कम खर्च करु शकला नाहीत ? याबाबत समितीने विचारणा केली असता पोलीस आयुक्त, पुणे यांनी ऑक्टोबर, २००७ मध्ये पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. शासनाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रस्तावानुसार माहे डिसेंबर, २००७ च्या अधिवेशनात १.५३ कोटी रुपयांची पूरक मागणी मंजूर करुन घेतली होती. त्यानंतर पोलीस महासंचालकांनी असे कळविले होते की, आम्हाला खरेदीसाठी अजून अतिरिक्त निधी लागणार आहे. पोलीस आयुक्त, पुणे यांनी सादर केलेल्या २३.५९ कोटी रुपयांच्या साधन सामुग्रीच्या प्रस्तावावर संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन काही बाबींची संख्या कमी करुन व काही बाबी भाडे तत्वावर घेण्याचे ठरवून १४.०५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आणि त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २००८ रोजी काढण्यात आला होता असे उपसचिव गृह विभाग यांनी समितीस अवगत केले.

दिनांक १५ फेब्रुवारी, २००८ रोजी खरेदी प्रक्रियेचा शासन निर्णय काढला, परंतु त्यानंतर देखील तांत्रिक कार्यपद्धतीला एवढा विलंब का लागला? अशी विचारणा समितीने केली असता दिनांक १५ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयात एकूण ९४ बाबी आहेत. ३१ मार्च च्या आत पूर्ण खरेदीची प्रक्रिया संपविता आली पाहिजे म्हणून हा शासन निर्णय काढण्यात आला होता, परंतु पैसे वितरित झाले नव्हते. त्यावेळी नव्याने बीडीएस कार्यप्रणाली सुरु झाली होती. दिनांक १४ एप्रिल, २००८ रोजी पोलीस आयुक्त पुणे यांनी गृह विभागाला पत्र लिहिले की, पैसे विभागाकडे आलेले नाहीत त्यामुळे न मिळालेले पैसे पुनरुज्जीवित करावते. एप्रिल महिन्यापर्यंत पैसे आलेले नव्हते. दिनांक २७ मे २००८ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. ६.८८ कोटी रुपयांच्या रकमेस प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. सुरुवातीला १२.५३ कोटी रुपयांचा फेब्रुवारीचा शासन निर्णय होता, परंतु ते पैसे पूर्ण लॅप्स झाले. त्यानंतर

दिनांक २७ मे २००८ रोजी शासन निर्णय काढल्यानंतर चार महिन्यांनी खरेदीची प्रक्रिया सुरु झाली. यासाठी चार शासन निर्णय काढण्यात आले आहेत. पुणे पोलीस विभागाच्या ७.६० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरी मिळाली. त्यानंतर ९.४०४ कोटी रुपये जमा केलेले असून १.३ कोटी रुपये प्रलंबित आहेत. केंद्र शासन आणि राज्य शासनाकडून पोलिस विभागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी हा निधी येत असल्याचा खुलासा पोलीस महानिरीक्षक यांनी केला.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, पोलीस विभागाला काही मोठ-मोठ्या इमारती, रस्ते तयार करावयाचे नव्हते तर केवळ काही वस्तूंची खरेदी करावयाची होती. टेबल, खुर्च्या, संगणक आणि काही मंडप अशा बाबी खरेदी करावयाच्या होत्या, परंतु या खरेदी करण्यासाठी देखील दीर्घकाळ विलंब लागलेला आहे, याचे कारणे काय आहेत ?

पुणे विभागातील पोलीस विभागाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, दुचाकी, मोटार सायकली, कॅमेरे अशा वस्तू खरेदी करावयाच्या होत्या, परंतु पोलीस विभागाने ही खरेदी प्रक्रिया वेळेत केली नसल्याबाबत समितीने विचारणा केली तसेच पोलीस महासंचालकांनी वेळेवर पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. दिनांक १५ फेब्रुवारी नंतर नवीन खरेदी करावयाची नाही असा शासन निर्णय होता, खरेदी करावयाची असेल तर त्यासाठी अर्थ विभागाची मंजुरी घ्यावी लागते. आपण अर्थ विभागाची मंजुरी घेतली होती का? अशीही विचारणा केली असता गरज लक्षात घेऊन खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता घेता येते असे वित्त सचिवांनी स्पष्ट केले.

यावर प्रधान महालेखाकार यांनी इसमें टेंडर प्रोसेस देखते हैं. If the procedure had started earlier, it would have been better. असे मत व्यक्त केले. यावर Committee want to go in details of this issue. You give us the follow up chart असे समितीने सांगितले. या अनुषंगाने २५ लाख रुपयांपर्यंतची खरेदी पुणे पोलीस आयुक्तालय करु शकते असे पोलिस सह आयुक्त पुणे यांनी समितीस सांगितले.

वित्त विभागाने गृह विभागास पैसे देऊन पोलीस विभागाकडून पैसे लॅप्स झालेले आहेत. शासनाने पैसे मंजुर करुन देखील त्याचा पाहिजे तसा उपयोग झाला नाही. ही बाब विचारात घेता As a Home Secretary what do you feel about this matter and what action are you going to take? अशी विचारणा समितीने विभागीय सचिवांकडे केली असता

ही बाब गंभीरपणे घेतलेली असुन प्रत्येक दिवसाचा चार्ट उपलब्ध असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

दिनांक २ ऑक्टोबर, २००८ पासून स्पर्धा होणार होती. त्यासाठी काही साहित्य विकत घ्यावे लागणार होते. स्पर्धा होणार आहे याबाबतची माहिती आपल्या अगोदरच कळविण्यात आली असेलच, दिनांक १२/१२/२००७ रोजी पोलीस महासंचालकांचे पत्र आले. स्पर्धेसाठी कोणकोणत्या बाबी लागणार आहेत, याबाबतची आपण तयार केली होती काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर याबाबतची सर्व माहिती होती. प्रत्येकाची जबाबदारी काय काय होती, याबाबतची माहिती समितीस दहा-पंधरा दिवसात देतो. असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासन दिले व त्यावेळेला पोलीस आयुक्त श्री.उमराणीकर होते असेही सांगितले.

मार्च महिन्याच्या आत पैसे खर्च केले नाही तर ते लॅप्स होतात का? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर ठराविक कालमर्यादेत पैसे खर्च केले नाही तर पुन्हा ते पुनरुज्जीवित करता येतात. पुढील वर्षी याबाबतचा प्रस्ताव सादर केला तर हे पैसे पोलीस विभागाला वापरता येतात. असा खुलासा पोलिस महानिरीक्षक यांनी केला.

समितीने अशी विचारणा केली की, पुणे येथील पोलीस विभागाची जेव्हा जेव्हा साक्ष झालेली आहे तेव्हा पैसे अखर्चिक राहिलेले आहेत. यासंदर्भात गृह विभागाची दोन तीन वेळेला बैठका झालेल्या आहेत तरी देखील पैसे खर्च झालेले नाहीत. पैसे खर्च न होण्याचे कारण काय होते?

शासन निर्णय लवकर न निघाल्यामुळे पैसे खर्च झाले नाहीत असे पोलीस महानिरिक्षकांनी समितीस सांगितले.

केंद्र शासनाकडून पोलीस विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जे पैसे येतात, त्यासंदर्भात सुरुवातीला एक बैठक घेतली असून केंद्र शासनाला तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे. दुसरी बैठक दिनांक ७ तारखेला आयोजित केली असुन त्यात ९ बाबी असल्याची माहिती विभागीय सचिव, गृह विभाग यांनी समितीला दिली.

आता विभागात जी बैठक घेतली आहे त्यात खरेदीसंबंधी चर्चा झालेली आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर खरेदीसाठी वरिष्ठ स्तरावर सचिवांची कमिटी तयार केलेली आहे. त्या कमिटीमध्ये सचिव, पोलीस महासंचालक यांचा समावेश असल्याचे सांगत पोलीस विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी खरेदी कक्ष आहे. या खरेदी प्रक्रियेत कामगार विभागाचे सचिव, वित्त

विभागाचे सचिव यांचा समावेश असतो. २५ लाख रुपयांपेक्षा कमी रकमेचे साहित्य खरदी करावयाचे असेल तर ही समिती खरेदी करु शकते. यापेक्षा जास्त रकमेचे साहित्य खरेदी करावयाचे असेल तर अशा खरेदीचे प्रस्ताव राज्य सरकारच्या स्तरावर अतिरिक्त मुख्य सचिव मंजूर करतात. करोडो रुपयांची खरेदी करावयाची असेल तर ती नस्ती माननीय गृह मंत्रीमहोदयांकडे मंजुरीसाठी पाठविली जाते. असा ही खुलासा पोलिस महानिरीक्षकांनी समितीसमोर केला.

केंद्र शासनाकडून राज्यातील पोलीस दलाचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच खेळासाठी जे पैसे येतात, त्या पैशांचा गृह विभाग पुरेपुर उपयोग करीत नाहीत, असे एकंदरीत यावरुन दिसून येत असल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, In para 4.3 we have raised a point "CCTV cameras and LCDs lying idle." We noticed in the audit that after the CYG event, the CMS/Control room was demolished and the cameras were removed by the supplier on payment of dismantling charges of Rs. 12.42 lakhs. The warranty periods of the equipment had also expired on 27th November 2009. The Cameras are now lying idle. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, Instead of keeping the cameras idle they should be put to use.

या अनुषंगाने आयुक्त क्रीडा व युवा यांनी असा खुलासा केला की, १ कोटी १० लाख रुपयांचे कॅमेरे खेळाच्या स्पर्धा तसेच पोलिसांच्या सुरक्षेकरिता घेतले आहेत. जेव्हा जेव्हा काही कार्यक्रम होत असतात त्या वेळेला सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येतात.

यावर समितीने खेळाच्या स्पर्धा संपल्या की, तुम्ही ते काढून घेतात, परंतु त्याऐवजी ते कायमस्वरुपी का बसविण्यात येत नाहीत? तसेच १ कोटी १० लाख रुपयांच्या वस्तु तश्याच पडून आहेत. करोडो रुपयांचे साहित्य स्टोरेजमध्ये पडून आहे. या साहित्यांचा वापर का केला जात नाही? याबाबत विचारणा केली तथापि विभागाकडून त्याबाबत कोणताही खुलासा आला नाही.

प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, The C.P. Pune had approached for transfer of these cameras but it was refused on the ground that they are to be used in commonwealth games, Delhi. But the said cameras are still lying idle.

यावर समितीने If the cameras were meant for the security of the ground then they should not have been removed. जेथे नेहमी स्पर्धा होतात अशा ठिकाणी हे साहित्य कायस्वरुपी बसविण्याची व्यवस्था करावी, अशी समितीची सूचना असल्याचे सांगितले असता ज्या कारणासाठी हे साहित्य खरेदी केले आहे, ते जेथे गरज असेल तेथे कायमस्वरुपी लावण्यात येईल. असे आश्वासन पोलिस सह आयुक्त पुणे यांनी समितीस दिले. जर अशाप्रकारे साहित्य ठेवून दिले तर ते खराब होईल त्याऐवजी त्यांचा वापर करणेच इष्ट ठरेल. असे समितीने मत व्यक्त केले यावर पोलिस सह आयुक्तांनी पुढील खुलासा केला.

सीवायजी च्या सुरक्षा व्यवस्थेसाठी दोन रुग्णवाहिका, पाच श्वान पथक वाहने, दोन शववाहिन्या आणि तीन मिनी बसेस विलंबाने खरेदी करण्यात आल्या होत्या. सीवायजी संपल्यानंतर यांचा उपयोग पुणे पोलीस विभागाच्या सुरक्षिततेसाठी करण्यात येणार असुन ते सर्व साहित्य सीवायजीच्या समाप्तीनंतर मिळाले आहे. त्यातील काही साहित्य पुणे शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वापरणार आहोत असेही समितीला सांगण्यात आले.

या संदर्भात महालेखाकारांचे काही आक्षेप असण्याचे कारण नाही. कारण सदर बाबतीतील सर्व खरेदी झाली आहे. फक्त हे खरेदी केलेले साहित्य सीवाजीच्या समाप्तीनंतर मिळाले आहे. साहित्य खरेदीचा ठेका सीवायजीच्या अगोदर दिला होता. त्यावेळी आरसी पुरवठादाराने सदर साहित्य २ महिन्यांनंतर मिळेल असे सांगितले होते. आम्हाला हे साहित्य सन २००८-०९ मध्ये मिळाले असल्याची बाब पोलिस सह आयुक्त यांनी समितीच्या निदर्शनास आणली.

२० कोटी रुपयांचे फर्निचर खरेदी करावयाचे होते. मास्टर प्लॅनमध्ये साडे तीन कोटी रुपये मागितले आणि नंतर इमर्जन्सी म्हणून २० कोटी रुपयांची खरेदी केली हे योग्य नसल्याचे समितीने मत व्यक्त केले असता यावर आयुक्त क्रीडा व युवा यांनी फर्निचर खरेदी ३ कोटी रुपयांचीच केली आहे. तथापि काही साहित्यांमध्ये समितीने म्हटल्याप्रमाणे झाले आहे असे सांगिले.

आपल्या एक्झिक्युटिव्ह बॉडीने अचानक २० कोटी रुपयांच्या फर्निचरची खरेदी केली ? कारण हा जनतेच्या करातून आलेला शासनाचा पैसा आहे. पैशांचे युटिलायझेशन प्रॉपरली झाले पाहिजे. ज्या कामांकरिता पैसे देण्यात आले आहेत, त्याच कामांकरिता ते खर्च झाले पाहिजेत. महालेखापालांचा आक्षेप सन २०१० मध्ये येतो आणि आपण त्या अगोदरच सन

२००९ मध्ये एफडी ठेवलेली असते, हे बरोबर नाही. आपण आपल्याकडे असलेल्या पैशांची एफडी ठेवता, ते पैसे खर्च करीत नाही, हे योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

यावर करारात लिहिल्याप्रमाणे, ५ टक्के रक्कम राखून ठेवायची असते. तो डिफेक्ट लायबिलिटी पिरिएड होत नसल्याचे आयुक्त क्रीडा व युवा यांनी सांगितले.

विभागाने पुरविलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक ४ मे, २०१२ रोजी प्रधान सचिव यांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी समितीने पुणे महानगरपालिकेने जी काही कामे केली आहेत त्याचे मूळ अंदाजपत्रक किती होते, ते कमी झाले की, त्यामध्ये वाढ झाली? अशी विचारणा केली असता तत्कालीन महानगर पालिका आयुक्त, पुणे यांनी ४६ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च होता, तो आता रिकव्हर होत असल्याचे समितीला सांगितले.

सदरहू अतिरिक्त खर्च केव्हा रिकव्हर करण्यात आला? यावर तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी गेल्या दोन तीन महिन्यात रिकव्हर केला आहे असे समितीस सांगितले लोकलेखा समितीच्या बैठकीत जेव्हा चर्चा झाली होती तेव्हा विशेष अहवाल मागविला होता, अशी विचारणा केली असता तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी पेव्हर ब्लॉक पुन्हा लावण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती मान्य असल्याचे समितीस अवगत केले

महालेखाकार यांच्या कार्यालयामार्फत लेखापरिक्षण झाले नसते तर ४६ लाख रुपये ठेकेदारांकडे तसेच पडून राहिले असते. त्यावेळेला हे काम का करु शकले नाही,याचा खुलासा पुणे महानगरपालिकेने द्यावा. टेंडरशिवाय कोठे काम झाले आहे काय, झाले नसेल तर तसे आपण समितीला लेखी स्वरुपात लिहून द्यावे असे निदेश समितीने दिले असता तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी समितीस असे सांगितले की, टेंडरशिवाय कोठेही काम झालेले नाही, मात्र कामांच्या संदर्भात सर्वसाधारण आरोप घेतले गेले असल्याचे त्यांनी समितीस सांगितले.

पुणे महानगरपालिकेचे काम झाले त्याबद्दल आमचे दुमत नाही. कामाची कार्यपद्धत व्यवस्थित झाली की नाही? काम झाले असेल तर अंदाजपत्रक मध्ये वाढ झाली आहे का, कामाचे एस्टिमेट न वाढविता टेंडरशिवाय कोठे काम झाले आहे का? जमीन संपादन करण्याचे काम एवढया जलद गतीने कसे करण्यात आले? गेल्या दहा वर्षात किती जमिनी संपादन करण्यात आली? कामाच्या प्रक्रियेमध्ये स्थायी समितीची दीरंगाई झाली आहे का? कामाच्या निर्णय प्रक्रियेला उशीर झाला आहे का? ही सर्व वस्तुस्थिती समितीला जाणून घ्यावयाची आहे.

तसेच सुशोभीकरणात कोण कोणती कामे केली गेली, कोणकोणत्या गावात कोणकोणती कामे केली, काही गावात बोर्ड लावण्यात आले होते. ही सर्व कामे जेएनएनयुआरएम च्या निधीतून करण्यात आली नसली तरी महानगरपालिकेच्या बजेटमधून सुशोभिकरणाचे काम करण्यात आले आहे. महानगरपालिकेने त्यावेळेस किती खर्च केला आहे या संदर्भात समितीने विचारणा केली असता रस्ते सुशोभिकरण, गार्डनची कामे इत्यादी कामांसाठी ५० लाख रुपये महानगरपालिकेच्या बजेटमधून खर्च केला असल्याचा खुलासा तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी केला.

पुणे महानगरपालिकेने बांधकामाशिवाय बजेटमधून त्या वेळेला किती पैसे खर्च केले, कोठे केले, याबाबतची सविस्तर टिप्पणी समितीला देण्याबाबत निदेश दिले असता त्यावर सन २००६-२००७ मध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानामधून (JNNURM) ३२० स्क्वे. मीटरचा रस्ता, १ लाख ६० हजार स्क्वे. मीटरचा रस्ता तसेच १ लाख ५० हजार स्क्वे. मीटर जमीन अतिरिक्त संपादन केली होती. ही जमीन मिलिट्रीची असल्यामुळे अधिकृत एनओसी घेऊन रोडचे काम केले आहे. शेवटच्या पाच सहा महिन्यात हे काम पूर्ण झाले असल्याचा खुलासा तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी केला.

त्यावर समितीने अशी विचारणा केली पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत रस्त्याचे काम केले आहे, परंतु मधली लाईन ॲक्वॉयर न झाल्यामुळे काम बंद झाले, अशी परिस्थिती कोठे निर्माण झाली आहे का? यावर स्पष्टीकरण देताना तत्कालीन महानगरपालिका आयुत्कांनी असे सांगितले की, The military land was not in our possession. We moved to the Govt. of India and got the permission. Work permission for construction on military land was given by the Defence authorities. We got the permission in Janaury 2008. The commonwealth Youth games were to be held in october 2008. We just got 8/9 months. In other stretches we got lot of land by private negotiations. We had to do these works within the period of 6 months.

पुणे महानगरपालिकेच्या कामाच्या अहवालात बरिचशी कामे अजूनही चालू आहेत, परंतु काही ठिकाणी जागा उपलब्ध नाही, असा उल्लेख आहे. हे लक्षात घेता याबाबत सध्याची परिस्थिती काय आहे?

काम संपल्याची तारीख आहे, परंतु ही विभागाने समितीला दिलेली माहिती अपडेट केलेली नाही. बऱ्याचशा ठिकाणी काम चालू आहे असे म्हटले आहे. परिच्छेद क्रमांक ३.२.१.मधील ४ (अ) मध्ये विश्रांतवाडी चौक ते गुरुद्वारा बिल्डिंग काम चालू, असा उल्लेख केला आहे तसेच अनुक्रमांक ६ वर विमानतळ रस्ता ते डेक्कन कॉलेज व्हाया हॉटमिक्स प्लान्ट काम चालू, ८५ टक्के पूर्ण असा उल्लेख केला आहे. सन २००८ या काळातील हे काम असून अद्यापही पूर्ण झाले नाही, याचे कारण काय आहे, काय अडचणी आहेत? समितीने विचारलेल्या या प्रश्नावर माहिती नंतर देण्यात येईल असे तांत्रिक नगर अभियंत्यांनी समितीला सांगितले.

भूसंपादनाची सद्य:स्थिती काय आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता तांत्रिक नगर अभियंत्याने सध्या भूसंपादनाचे काम बंद असून ४३४ कोटी रुपयांची कामे मंजूर असून जुन्या नियमाप्रमाणे आम्ही सिस्टीम सुरु करणार आहोत. असे समितीस सांगितले तसेच भूसंपादनाचे काम सुरू झाल्याचेही समितीस सांगितले या अनुषंगाने नगर रोड ते एअरपोर्ट अशी अर्धी जमीन आहे. आरक्षणाची जागा क्लिअर करुन कंपोनंन्ट हायवे खालून जाणार होता, परंतु त्यासाठी अजून काही खाजगी जमीन हवी होती. तो रस्ता पूर्ण केला त्यामुळे बाजूची वाहतूक सुरु झाली असून काम पूर्ण झाले नाही तरी देखील बव्हुतांशी उद्देश सफल झाला आहे,मात्र काही ठिकाणी सफल झाला नाही. असा खुलासा तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी केला.

भूसंपादनासाठी एफएसआय वाढवून देण्याबाबत पीएमसी ॲक्ट आणि एमआरटीपी ॲक्टमध्ये काही तरतुदी आहेत. मागील पाच वर्षात ताब्यात घेतलेल्या भूसंपादनाचे प्रोजेक्ट असल्यामुळे पीएमसी आणि एमआरटीपी ॲक्टनुसार त्यांच्या बाजूची जागा ताब्यात घेऊन, दहा भूसंपादनाचे जागा डीसी रुल्सच्या ॲमिनिटीज बेसिसवर राबविण्याबाबत प्रयत्न करीत आहेत त्यामुळे शहराचा विकास करता येईल. असे तांत्रिक नगर अभियंत्याने समितीच्या निदर्शनास आणले

पर्वती येथील (फायनल प्लॉट ५८१ नंबर) येथील कामाबाबत जागा उपलब्ध नाही, असा उल्लेख केला आहे. जागा उपलब्ध झालीच नाही तर आपण काय करणार आहात? त्या कामासाठी मात्र पैसे ब्लॉक झाले आहेत. याबाबत समितीने विचरणा केली असता पर्वती (फायनल प्लॉट ५८१) येथे जागेचे आरक्षण असून त्यासंदर्भात याचिका दाखल झाली आहे.

महानगरपालिकेच्या बजेटमध्ये तरतूद केलेली आहे त्यामुळे त्या कामासंदर्भात निर्णय घेता येईल. असा खुलासा तांत्रिक नगर अभियंत्याने केला तसेच समितीला सदरहू माहिती अपडेट देण्याचे आश्वासित केले होते मात्र सदर माहिती समितीचा अहवाल तयार होईपर्यंत देखील प्राप्त झाली नाही. तसेच जेथे भूसंपादन झालेले आहे, ती सर्व जमीन ताब्यात आहे आणि ज्याठिकाणी जमीन ताब्यात आलेली नाही तेथील काम राहिलेली आहेत. असा तांत्रिक अभियंता यांनी खुलासा केला जी कामे राहिलेली आहेत ती कधी पूर्ण होतील ? अशी समितीने विचारणा केली असता तांत्रिक नगर अभियंता यांनी असे सांगितले की, सदरहू कामे पूर्ण झालेली नाही असे म्हटले असले तरी प्रत्यक्षात ९९ टक्के कामे पूर्ण झालेली असल्यामुळे तेथील रस्त्यांचा वापर सुरु आहे. फक्त एकच रस्ता असा आहे की, तेथील जमीन केंद्र शासनाच्या ताब्यात असल्याने त्या रस्त्यांचा वापर करता येत नाही. सदरहू कामे किती तारखेपर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते यादृष्टीने कशा प्रकारचा करार केला होता ? याबाबत समितीने विचारणा केली असता. यातील दोन कामे राहिली होती आणि त्यातील एक काम दि.१९-६-२०११ आणि दुसरे काम दि.१८-६-२०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. पण जागेचा ताबा न मिळाल्यामुळे याला ८ ते ९ महिन्याचा विलंब लागलेला आहे. आता ही जागा ताब्यात आली असून तेथील कामे पूर्ण झालेली आहेत. मात्र यासाठी जवळजवळ ८ ते ९ महिन्यांचा विलंब झालेला असल्याचा खुलासा तांत्रिक नगर अभियंता यांनी केला.

याबाबतीत संबंधितांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली आहे काय ? या समितीच्या प्रश्नाला मात्र तसा या ठिकाणी प्रश्न येत नाही. असे उत्तर तांत्रिक नगर अभियंता यांनी दिले तसेच आपण त्यांना वन-साईड देऊ शकत नाही म्हणून कामे अपूर्ण राहिली आहेत. पण त्यांनी उद्या जर असे म्हटले की, माझे पैसे अडकून पडले आहेत तर मग ते एस्कलेशनची मागणी करणार. असे मत तत्कालीन आयुक्त विभागीय आयुक्त यांनी व्यक्त केले. एस्कलेशन देय रहाणार आहे ते उर्वरित पाच टक्के कामाच्या बाबतीत आहे. आता ९० ते ९५ टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. मात्र लेबर, सिमेंट, लोखंड याच्या किंमतीमध्ये डीएसआर प्रमाणे वाढ झालेली असल्याचे तांत्रिक नगर अभियंता यांनी सांगितले.

जर हे काम वेळेवर झाले असते तर कन्सल्टन्सी फी कमी द्यावी लागली असती. कन्सल्टंन्सी ॲग्रीमेंट आहे एस्कलेशन कॉस्टशी काहीही संबंध नसून प्रत्येक रस्त्यासाठी वेगळा

कन्सन्टंट नेमण्यात आला होता. याचे कारण काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता हे पॅकेजवाईज असल्याचे मुख्य अभियंत्याने स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवड किंवा पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एकाच शहरात कामे होती. एकेक रस्ता १० कि.मी.इतका असून ही कामे १० कोटी किंवा २० कोटी रुपयांची असली तरी प्रत्येक रस्त्याच्या कामासाठी वेगवेगळा कन्सल्टंट का नेमण्यात आला ? अशी समितीने विचारणा केली असता कोणतेही काम हाती घेताना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरता बऱ्याचशा महानगरपालिका सल्लागार नेमतात. ही कामे होण्यासाठी काही पॅकेज केली होती आणि त्यासाठी डीबीआर करण्यासाठी विहित प्रक्रिया करुन संबंधितांना नेमण्यात आले होते. या पॅकेजमध्ये ठराविक रस्त्यांची कामे होती आणि त्यासाठी कन्सल्टंट नेमला होता. असा खुलासा तांत्रिक नगर अभियंता यांनी केली. ही बाब विचारात घेता त्यावर समितीने याबाबतीत महानगरपालिकेचे अधिकारी काय करतात ? जर या कामांसाठी कमिशनर कन्सलटंन्ट नेमणार असतील तर मग महानगरपालिकेतील इंजिनिअर, तज्ज्ञ मंडळींचा काय उपयोग आहे ? या कन्सन्टंटनां किती फी देण्यात आली आणि त्या माध्यमातून किती कोटी रुपयांची कामे करण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली असता ४०० कोटी रुपयांची कामे झालेली असून या कामांसाठी कन्सन्टंट नेमण्यात आले होते असा खुलासा तांत्रिक नगर अभियंता यांनी केला.

सल्लागारांना प्रदान या बाबी अंतर्गत समितीने "ऑगस्ट २००६ मध्ये केलेल्या सल्ला करारानुसार, क्रीडा संकुलाच्या सुशोभीकरण व बांधकामाच्या मुख्य कामाच्या अंदाजित किंमतीच्या (१९२.५० कोटी) ३.५ टक्के दराने रुपये ६.७४ कोटी एकूण शुल्क सल्लागारास द्यावयाचे होते. त्यांना ६.७४ कोटी पात्र रकमेच्या ऐवजी एकूण ११.२७ कोटी शुल्क अनियमितपणे देण्यात आल्याचे (ऑक्टोबर २०१० पर्यंत) आढळून आले. सल्ला करारात तरतूद नसलेल्या भाववाढ, साधन खरेदी आणि करारातील किंमती पलिकडील केलेली कामे यामुळे मोठ्या प्रमाणात ४.५३ कोटीचे जास्तीचे सल्ला शुल्क देण्यात आले होते." याबाबत समितीने विचारणा केली असता हा मुद्दा स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचा असल्याचे तांत्रिक नगर अभियंता याने समितीस सांगितले. तसेच पुणे महानगरपालिके मार्फत करण्यात आलेल्या कामांसाठी कन्सल्टटनां किती शुल्क वाढवून देण्यात आले आहे ? अशी ही विचारणा केली असता महालेखाकारांनी अशी माहिती दिली की, The consultant was paid additional fees of Rs.

28.64 lakh upto October 2010 for the extended period even though time overrun had taken place because the consultant had not done proper planning.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका,बालेवाडी स्टेडिअमच्या ठिकाणी सीवायजी च्याबाबतीत जेएनएनयुआरएम अंतर्गत एकूण किती पैसे भरले होते? त्यापैकी किती अदा करण्यात आले आणि वाढीव रक्कम का देण्यात आली? तसेच २.३.१ मध्ये म्हटले आहे की, एकंदर ४ कोटी ५० लाख रुपये वाढवून दिले आहेत. पण प्रत्यक्षात ११.२७ लाख रुपये वाढवून दिलेले आहेत. याबाबतीत समितीला माहिती देण्यात यावी. असे समितीने सांगितले. असता अतिरिक्त पैसे प्रदान केले परंतु संबंधितांना ते मिळालेले नाही असे सांगितले आहे. याबाबतीत रॉयल्टी चार्जेस आणि व्हॅटचे पैसे भरण्यात आले आहेत. कारण एका ठिकाणी २० कोटी रुपयांची कामे झालेली आहेत आणि त्यावर रॉयल्टी भरल्याची पावती दाखविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरहू कामे केलेली आहेत की नाही किंवा बोगस कामे केली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त क्रीडा विभाग यांनी याठिकाणी पावत्या दाखविल्या आहेत. एकंदर किती क्वॉन्टिटी कन्झ्युम केली आणि ती कशा तऱ्हेने केली हे पुढच्या वेळी दाखवावे असे म्हटल्यानंतर सदरहू पावत्या दाखविल्या आहेत. पण त्यांनी क्वॉन्टीटी आणि दर कन्झ्युम केलेला नाही. पावत्या देण्यात आलेल्या असल्याचे समितीस सांगितले.

यावर प्रधान महालेखाकार यांनी इस बारे में विभाग ने अे.जी. ऑफिस को जानकारी नहीं दी है असे समितीच्या निदर्शनास आणले असता. पुढील साक्षीच्या वेळी दाखविण्यात यावे असे सांगितले असून त्याप्रमाणे सदरहू माहिती दाखविण्यात येईल. असे तांत्रिक नगर अभियंता यांनी सांगितले. यावर महालेखाकार यांनी डीजल खरेदी करने के संबंध में एवं उसके यूटीलाईजेशन के बारे में भी विभाग ने डिटेल्स नही दिए हैं. असे समितीस सांगितले. यावर ३६ लाखाच्या डिझेलचे पेमेंट केलेले आहे आणि त्याची पावती दाखविली असल्याचे तांत्रिक नगर अभियंता यांनी सांगितले.

ट्रान्सफॉर्मर के संबंध में जो सर्टिफिकेट है एवं जो डिलीवरी डिटेल्स हैं, आप उनकी जानकारी दीजिए. असे महालेखाकार यांनी विभागास सांगितले असता तांत्रिक नगर अभियंता यांनी असल्याचे समितीस अभियंता केले.याबाबत लॉग बूक दाखविण्यात आले होते. याठिकाणी डीटीएस, रॉयल्टी आणि एम.एस.ई.बी.चे जे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले ते जुने आणि

निकामी होते. त्यातून विद्युत पुरवठा होत नव्हता याचे सर्टीफीकेट एम.एस.ई.बी.कडून घ्यावयास हवे होते. पण ते घेतलेले नाही. दोन ट्रान्सफॉर्मरची गरज असताना ३ बसविण्यात आले होते. मात्र सदरहू ट्रान्सफॉर्मर इन्स्टॉल झाल्याचे सर्टीफीकेट द्यावे लागते, परंतु ते देखील उपलब्ध नाही. मग रेकॉर्डवर बोगस माहिती देण्यात आली आहे काय अशी शंका निर्माण होते. एकदा ठेकेदाराने बिल दिल्यावर त्यामध्ये त्याने रॉयल्टी बरोबरच जे दगड, मुरुम वगैरे आणले होते, त्याचेही बिल आकारले आहे. त्यामुळे त्याने पावत्या जोडल्याशिवाय संबंधितांना बिल देता येणार नाही. त्यामुळे सदरहू काम प्रत्यक्षात झाले आहे की बोगस दाखविण्यात आले आहे हा प्रश्न असल्याचे मत समितीने व्यक्त केले तसेच १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर कॉन्ट्रॅक्टरकडून लिहून घेतले आहे की, आम्ही रॉयल्टी भरली आहे हे योग्य आहे काय ?

वर बीजीन्ससीटीपील्ब मार्फत विद्युत पुरवठा सुधारणा या २.२.३.४ परिच्छेदाअंतर्गत असे म्हटलेले आहे की, DSYS यांनी नमूद केले (जानेवारी २०११) की आयोजन समितीने कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ सूचित केल्यामुळे सुधारणा व दुरुस्त्या केल्या गेल्या. तथापि या निविदाबाह्य बाबी करण्यासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेसंबंधी कोणताही कागदोपत्री पुरावा आम्हाला सादर केला गेला नव्हता. पुढे असे म्हटलेले आहे की, तसेच, कराराप्रमाणे (१३ डिसेंबर २००६) बीजीएससीटीपीएल यांनी जागेवर असलेले साहित्य सुटे करुन स्वतःच्या खर्चाने हलविणे आवश्यक होते. या भंगाराची किंमत म्हणून त्यांनी ११.५५ लाख देऊ केले होते. तथापि विद्युत पुरवठा सुधारणेच्या कामासाठी १४.२८ कोटीच्या केलेल्या दाव्यातून कंत्राटदाराने करारातील अटींनुसार ही ११.५५ लाख भंगाराची किंमत कमी केली नसल्याचे आम्हाला आढळले." म्हणजे जो माल कमी करुन दाखवावयास पाहिजे होता, तसे ते दाखविलेले नाही आणि कागदोपत्री नाही. भंगाराच्या किंमतीची वजावट न करताच सल्लागारांनी देयक प्रमाणित केले. ज्यामुळे त्या प्रमाणात नुकसान झाले. पुढे असे म्हटलेले आहे की,"उत्तरादाखल DSYS यांनी नमूद केले (जानेवारी २०११) की नजरचुकीने कंत्राटदाराकडून भंगाराची किंमत वसूल केली गेली नव्हती." परंतु नजरचुकीने संबंधित कंत्राटदाराकडून ११ लाख रुपये वसूल करण्यात आले नाहीत. परंतु ही बाब नजरचुकीने कशी होऊ शकते ? याबाबत समितीने विचारणा केली असता संबंधितांकडून सर्व्हीस चार्जेस वसूल केले नाहीत ही चूक असून ते कबूल करतो. असे तांत्रिक नगर अभियंता यांनी समितीस

सांगितले तसेच. बीजीएससीटीपीएल यांनी अगोदरचे बिल अदा केलेले आहे असे ही सांगितले. संबंधितांकडून कशा प्रकारे वसूली करणार आहात ?अशी विचारणा समितीने केली असता जे ट्रान्सफॉर्मर आहेत, त्याची विक्री झाल्यानंतर पैसे वसूल करणार असून सध्या हे ट्रान्सफॉर्मर प्रिमायसेसमध्ये आहेत. अजून त्याची विक्री झालेली नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ट्रान्सफॉर्मरची विक्री झाल्यानंतर पैसे वसूल करावयाचे असे कंडीशन मध्ये नमूद केलेले आहे काय ? तुमच्याकडे संबंधितांनी डिपॉझिट भरलेले असेल. आपण ५-१० वर्षाची रक्कम फिक्स ठेवतो. याबाबतीत कोणती कंडीशन घालण्यात आली आहे ? तसेच लिफ्ट सुध्दा कमी प्रमाणात बसविलेल्या आहेत. असे मत समितीने व्यक्त केले, यावर महालेखाकारांनी असे सांगितले की, In this audit para we had stated that "..lower capacity elevator was purchased at a higher price."

याअनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी एजींनी अनेक अडचणीच्या केसेस उपस्थित केलेल्या आहेत. परिच्छेद क्र. २.२.३.१ - स्वामित्व धनाची वसुली न करणे, यामध्ये असे नमूद केले आहे की," २००७-०९ दरम्यान अदा केलेल्या सर्व २३ चालू खाते देयका संदर्भात कामाच्या ठिकाणी दगड, मुरुम, कंकर यांच्या वापरासाठी १७.३५ रु प्रति घन मीटर दराने स्वामित्व धनाची ना वसुली केली व ना डीएसवायएस यांनी कंत्राटदाराने शासनाकडे स्वामित्व धनाचा भरणा केल्याचे चलन सादर केले. या साहित्याच्या वापराची विवरण पत्रे देखील चालू खाते देयकांना जोडली नव्हती. " देयके अदा केली मात्र त्याच्या पावत्या दाखवल्या नाहीत. " देयके सादर करताना त्या सोबत काहीही जोडले नाही. तरी देखील पेमेंट केले गेले आहे. तसेच पुढे असे नमूद केले आहे की, ".बीजीएससीटीपीएल यांना दिलेल्या देयकातून मूल्यवर्धित करापोटी ६.३६ कोटी व आयकरापोटी रु.१३ लाख रकमेची कपात केली नव्हती. " बिलाची रक्कम भरताना टीडीएस व व्हॅटची रक्कम कापून घेतली नाही. खरे तर मूल्य वर्धित कराची रक्कम हे राज्य शासनाकडे जमा झाला पाहिजे. हे सर्वच प्रकरण भयानक आहे. व या या संदर्भात जबाबदारी निश्चित केली पाहिजे.देयक अदा करण्याची जबाबदारी कोणाकडे होती ? या संदर्भात समितीने विचारणा केली असता सदर प्रकरणामध्ये टीडीएस, व्हॅट कापलेला आहे. पुढील बैठकीच्या वेळी या बाबत सर्व माहिती देण्यात येईल माजी संचालक, क्रीडा यांनी सांगितले.

महालेखाकार यांनी समितीस असे सांगितले की, We have written this audit point on the basis of documents that were placed before us. On that basis we had noted that tax has not been deducted before making payments. The issue here is that tax element has to be deducted and it is the duty of the DDO.

बिलाचे पेमेंट केले होते काय ? आधी रिकव्हरी करणे व नंतर रिकव्हरी करणे यामध्ये बराच फरक आहे. एजींचा पॅरा आल्यानंतर आपण रिकव्हरी करणार असाल तर यामुळे शासनाचे नुकसान होईल. याकरिता कोण जबाबदार आहे ? जर एखाद्या कंत्राटदाराला रक्कम द्यावयाची असेल तर तो प्रथम व्याजाची रक्कम कापून घेईल. यामुळे कराची वसुली न होण्यामागे कंत्राटदार जबाबदार आहे की ॲथोरीटी जबाबदार आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता रेकॉर्ड तपासून माहिती समितीला सादर करण्यात येईल असे तत्कालिन क्रीडा संचालकांनी सांगितले.

बीजीएससीटीपीएल कंपनीला दिलेल्या देयकातून व्हॅट पोटी ६.३६ लाख व आयकरापोटी १३ लाख रकमेची कपात केली नव्हती. बिलावर सहया करताना ही रक्कम कापली आहे की नाही, हे तपासणे ही विभागाची जबाबदारी आहे. हे तपासले नाही काय ? याबाबतची माहिती पुढील बैठकीमध्ये सविस्तर देण्यात येईल असे समितीस सांगितले. परंतु सदर प्रकरणामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. मात्र अकाऊंट्समध्ये काय दाखवले आहे, हे माहीत नसल्याची माजी संचालक क्रिडा यांनी समितीस सांगितले. व्हॅट, आयकर इत्यादी रक्कम बिलामधून कोणी वजा केली नाही ? या संदर्भात संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे.

प्रधान महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, In this audit para 2.2.3.1- Non-recovery of royalty charges- we have raised a point that Consumption statements of these materials were not attached and in the absence of these the quantities of these materials consumed and the royalty charges leviable on the same could not be ascertained.

त्यावेळी अकाऊंटंट कोण होते ? असे समितीस विचारले असता श्री.घईस, वर्ग-२ चे अधिकारी अकाऊंटंट पदावर कार्यरत होते.

एखाद्या कंत्राटदाराला पेमेंट देताना व्हॅट, आयकराची रक्कम वजा करुन उर्वरित रकमेचा चेक काढण्याची जबाबदारी अकाऊंटंटची असते. यामुळे मूळ जबाबदारी अकाऊंटंटची आहे व माजी संचालक क्रीडा बिले न तपासता त्यावर सही केली.यामुळे ते देखील जबाबदार आहेत. असे समितीने मत व्यक्त केले. कन्सल्टन्सी नियुक्त केली होती. चेक तयार करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. तसेच हे काम करण्यासाठी वर्ग २ मधील एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. असा खुलासा माजी संचालक, क्रीडा यांनी केला असता यावर समितीने कन्सल्टन्सी नियुक्त केली होती, हे कारण समिती मान्य करु शकत नाही असे अभिप्राय दिले.

त्यावर सह संचालक, क्रीडा, बालेवाडी पुणे यांनी पेमेंट करताना टीडीएस वजा करुन १३ लाख रुपये जमा केले आहेत. तसेच रॉयल्टीची रक्कम भरल्याच्या पावत्या देखील महालेखाकारांना दाखवलेल्या आहेत. रॉयल्टीची रक्कम भरल्या शिवाय बिल पास करता येत नाही, असा नियम आहे. समजा व्हॅट, इनकम टॅक्स, रॉयल्टी चार्जेसची कपात केल्याशिवाय बिल पास करु शकत नाही. असे समितीने स्पष्ट केले तसेच बिल चेक करण्यासाठी कन्सलटन्टची नेमणूक केली होती. मग त्या कन्सलटन्टने कोणते काम केले ? या समितीच्या प्रश्नावर माजी संचालक क्रीडा यांनी असा खुलासा केला की, श्री.शशी प्रभू यांची प्रोजेक्ट कन्सलटन्ट म्हणून नियुक्ती केलेली आहे. जी रनिंग बिल सादर केली जातात ती बिल कन्सल्टंन्ट चेक करतात. त्यानंतर संबंधित अधिकारी बिल चेक करतात आणि त्यानंतर पेमेंट केले जाते.

हे सर्व काम करीत असताना प्रोसिजर फॉलो करण्यात आली होती काय याबाबत समितीला माहिती पुढील बैठकीत देण्याचे माजी संचालक क्रीडा यांनी आश्वासित केले. जो कन्सल्टंन्ट नियुक्त करण्यात आला होता तो आपल्याकडून कामाचा मोबदला घेत असतो. जर त्या कन्सलटन्टने काम व्यवस्थित केले नसेल तर त्याला जबाबदार धरुन योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कन्सल्टन्टची हे सर्व तपासण्याची जबाबदारी असल्याचे समितीचे सांगितले असता ठेकेदाराचे अंतिम देयक सप्टेंबर, २००९ मध्ये देण्यात आलेले आहे. ठेकेदाराने अंतिम देयकासोबत रॉयल्टीच्या सर्व पावत्या जोडलेल्या होत्या. त्यानंतर सप्टेंबर, २००९ मध्ये ठेकेदाराचे देयक देण्यात आलेले आहे. असा खुलासा सह संचालक, क्रिडा यांनी केला.

सन २०१० मध्ये ऑडिट झालेले आहे. मग ऑडिटच्या वेळी पावत्या का दाखविण्यात आल्या नाहीत ? ठेकेदाराचे पेमेंट सप्टेंबर २००९ मध्ये देण्यात आलेले आहे. महालेखाकारांनी जे आक्षेप नोंदविलेले आहेत त्यासंदर्भातच आम्ही प्रश्न विचारलेले आहेत. व्हॅट, इनकम टॅक्स, रॉयल्टी चार्जेसची कपात केली असता आणि ऑडिटच्या वेळी पावत्या दाखविल्या असत्या तर महालेखाकारांनी आक्षेप घेतला नसता. परंतु तुम्ही ऑडिटच्या वेळी ही कागदपत्रे दाखविलेली नाहीत. त्यामुळे महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेला आहे. मूल्यवर्धित कराची रक्कम ६.३६ कोटी रुपये आहे. कोटी-कोटी रुपयांची बिल अदा करताना ती बिल कन्सलटन्ट, अकाऊंटन्ट आणि संबंधित अधिकारी यांच्या नजरेखालून जात असतात. व्हॅट, इनकम टॅक्स, रायल्टी चार्जेसची कपात करुन बिल अदा करावयाचे असते. व्हॅट, इनकम टॅक्स, रायल्टी चार्जेसची कपात न करता आपल्याला बिल अदा करण्याची घाई का झाली अशी समितीने विचारणा केली असता माजी संचालक क्रीडा यांनी पेमेंट करण्यात आलेले आहे एवढेच समितीला सांगितले.

सन २००८ मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा झालेल्या आहेत. मध्यंतरीच्या दोन वर्षाच्या काळात सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन घ्यावयास पाहिजे होती. समितीने स्पेशल ऑडिटची मागणी केली होती. १५ कोटी रुपयांचा खर्च झालेला असून यामध्ये अनियमितता झालेली असल्यामुळे याचे स्पेशल ऑडिट करण्यात यावे, असे समितीने पत्र दिल्यानंतर नोव्हेंबर, २०१० मध्ये याचे स्पेशल ऑडिट झालेले आहे. सर्व पेमेंट अदा केलेले आहे. महालेखाकारांनी हा मुद्दा काढलेला आहे. सन २००८ मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा झाल्या होत्या. दोन वर्षानंतर महालेखाकारांना कागदपत्र देऊ शकत नसाल तर समितीला शंका येण्यास वाव आहे. समितीला पुढील बैठकीच्या वेळी पुढीलप्रमाणे कागदपत्रे समितीला सादर करावी. पावत्यांमध्ये किती ड्यूज होते, त्यांना किती पेमेंट देण्यात आले याबाबतची माहिती समितीला पुढील बैठकीत सविस्तर देण्यात यावी असे समितीस निदेश दिले.

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी समितीने बालेवाडी, पुणे येथील शिव छत्रपती क्रीडा संकुलामध्ये विविध खेळांसाठी केलेल्या बांधकामाची पाहणी केली.

गार्डनसाठी आलेल्या रु.६५ लाख इतक्या खर्चाचा तपशील समितीला द्यावा अशी समितीने सूचना केली. यानंतर समितीने बॅडमिटंन हॉलची पाहणी केली. या वेळी हॉलमधील एका बाजूच्या ॲकॉस्टिक बोर्डच्या खालील भिंतीला, तसेच कॉलमच्या बाजूला तडे गेल्याचे तर

एका ठिकाणी पाण्याची गळती झालेली असल्याचे दिसून आले. भिंतीला गेलेल्या तडयांच्या संदर्भात समितीने विचारणा केली असता "बांधकाम झाल्यावर पहिल्या दोन-तीन दिवसामध्ये तापमान कमी-अधिक झाल्यामुळे प्लॅस्टरला तडे पडलेले आहेत, मात्र स्ट्रक्चरला धोका नाही, सदरहू बांधकाम २००७मध्ये करण्यात आलेले आहे, एकूण आठ ठिकाणी असे क्रॅक डेव्हलप झालेले आहेत, सदर हॉलचे बांधकाम शिर्के कंपनीने केलेले आहे, असे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टण्ट यांनी सांगितले. तसेच छताला लावलेल्या दोन फुटांच्या सीटमध्ये छिद्रे दिसून येत होती. ही छिद्रे का पडली याचे उत्तर समितीला मिळाले नाही.

समितीने जलतरण तलावाची आणि वॉर्मअप पूलाची पाहणी केली. यावेळी उप संचालक, क्रीडा यांनी समितीला अशी माहिती दिली की, "जलतरण तलाव ५०x२५ मीटर असून त्यामध्ये १० लेन्स आहेत. स्पर्धेच्या वेळी ॲटोमॅटिक इलेक्ट्रॉनिक्स टच सिस्टिम बोर्डचा उपयोग केला जातो. वॉर्मअप पूलामध्ये लिकेज होत होते, ते लिकेज शोधून दुरुस्ती करण्यात आली. जलतरण तलावाचा खर्च ११ कोटी रु. आहे. जलतरण तलावामध्ये नेहमी पोहण्यासाठी येणा-या लोकांकडून महिना ५०० रुपये फी घेण्यात येते. उन्हाळयामध्ये १००० ते १२०० लोक पोहण्यासाठी येतात. येथे लाईफ गार्ड आहेत." सदर जलतरण तलावाची पहाणी करताना समितीने एका ठिकाणी वॉर्मअप पुलाचे फ्लोरिंग निघाल्याचे, डायव्हिंग लिफ्ट बंद असल्याचे तसेच डायव्हिंगचा प्लॅटफॉर्म तुटलेला असल्याचे, १३ लाख रुपयाचे १६ प्लॅटफॉर्म पडून आहेत काय व जलतरण तलावाच्या स्टेडियम मधील १६ पैकी १० फोकस बंद असल्याचे निदर्शनास आणून दिले असता याबाबत समितीला माहिती देताना असे सांगण्यात आले की, डायव्हिंगसाठी २००७मध्ये बांधण्यात आलेले स्ट्रक्चर योग्य नव्हते, उडी मारताना अडथळा निर्माण होत होता, म्हणून प्लॅटफॉर्मचे पुढील स्ट्रक्चर तोडण्यात आले. १६ प्लॅटफॉर्म लावलेले आहेत व स्टेडियममधील फोकस संदर्भात विभागाकडून उत्तर प्राप्त झाली नाही. विभागाने दिलेल्या जलतरण तलावाच्या माहिती संदर्भात समितीने सूचना केली की, जलतरण तलावात पोहोण्यासाठी येणा-या व्यक्तींना ११ वर्षाची मेंबरशीप देऊन त्यापासून मिळणा-या उत्पन्नातून जलतरण तलावाची देखभाल दुरुस्ती करावी.

जलतरण तलावाच्या बाजूला असलेल्या साप-शिडी, लगोरी खेळाची समितीने पहाणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, साप-शिडी ज्या ठिकाणी उभारण्यात आली आहे त्या परिसरामध्ये कोणीही जाऊ शकणार नाही कारण त्या ठिकाणी उंच गवत वाढलेले

आहे, तसेच परिसर अस्वच्छ व दुर्लक्षित आहे व तेथे विद्युत जनरेटर ठेवलेले आहे. याबाबत खुलासा करताना समितीला सांगण्यात आले की, या ठिकाणी चिल्ड्रेन पार्क करण्याचा विचार आहे, क्रीडा-स्पर्धांच्या वेळी अचानक वीज पुरवठा खंडित झाला तर क्रिडा-स्पर्धांमध्ये व्यत्यय येऊ नये यासाठी हे जनरेटर्स घेण्यात आले आहेत.

यानंतर समितीने सायनेज बोर्ड पाहिला. हा बोर्ड ज्याने बनविला तो केटरिंग कॉण्ट्रॅक्टर आहे का अशी समितीने विचारणा केली असता सदरहू बोर्ड बनविणारी व्यक्ती ही इव्हेण्ट मॅनेजमेण्ट कॉण्ट्रॅक्टर असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

यानंतर समितीने शूटिंग हॉलची पाहणी केली त्यावेळी तेथील कोच यांनी समितीस माहिती दिली की, भारतामध्ये केवळ याच ठिकाणी अशा प्रकारचे शूटिंग रेंज केलेले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या कुमारी अंजली भागवत या क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत असून त्या खंळाडूंना शूटिंगचे प्रशिक्षण देतात. शुटिंगसाठी लागणाऱ्या रायफलची किंमत १० हजारापासून आहे. सेकंडहॅण्ड रायफलची किंमत ८० ते ९० हजार रुपये तर नवीन रायफलची किंमत दीड लाख रुपयापर्यन्त आहे. ज्यांची रायफल घेण्याची ऐपत नाही असे खेळाडू प्रबोधिनीमध्ये नेमबाजी शिकण्यासाठी आले तर त्यांना रायफल उपलब्ध व्हावे यासाठी कमीत कमी १० रायफल क्रीडा प्रबोधिनीला द्यावेत असा प्रस्ताव शासनाला दिला असल्याचे श्रीमती अंजली भागवत यांनी समितीस सांगितले.

हे शूटिंग रेंज खाजगी संस्थेला चालविण्यासाठी दिलेले असून खाजगी संस्था प्रत्येक खेळाडूकडून फी घेऊन पैसे कमावित जात आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता हे शूटिंग रेंज श्री. गगन नारंग यांच्या "गन फॉर ग्लोरी" या अकादमीला भाडेतत्वावर दिलेले आहे अशी माहिती समितीला देण्यात आली. समितीने जिमची पाहणी केली असता त्यावेळी जीमचे कोच यांनी जिमचा वापर क्रीडा प्रबोधिनीमधील खेळाडू करतात, प्रबोधिनीच्या खेळाडूकडून फी घेतली जात नाही. अन्य व्यक्तीकडून महिना ५०० रु. फी घेतली जाते. जिमचे मासिक उत्पन्न १० ते १५ हजार रुपये आहे.

समितीने जिमनॅस्टिक हॉलची पाहणी केली. यावेळी मुष्टीयुद्ध, टेबल टेनिस व वेट लिफ्टिंग सभागृहात बसविलेल्या बाष्पीभवनाधारित वातशीतकरण यंत्रणेबाबत समितीने विचारणा केली असता असता सदरहू यंत्रणा बसविण्याची शिफारस नियोजन आयोगाने केली होती. परंतु आयोजन समितीने वातानुकूल यंत्रणा असेल तरच स्पर्धा घेता येईल असे सांगून

वातानुकूल यंत्रणेची शिफारस केली आणि त्याप्रमाणे बाष्पीभवनाधारित वातशीतकरण यंत्रणा काढून वातानुकूलन यंत्रणा बसविण्यात आली अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

समितीने बॉक्सिग हॉल, लॉन टेनिस व मेनस्टेडियमची देखील पाहणी केली. ही पाहणी करीत असताना त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे पडून असतील तर ते पोलीस विभागाला देऊन त्यांच्याकडून कॅमे-यांची किंमत घ्यावी अशी सूचना समितीने केली. त्यावर सदरहू सीसीटीव्ही कॅमेरे प्रत्येक स्ट्रक्चरला लावलेले आहेत असे समितीला सांगण्यात आले. समितीने स्टोअर रुमची पाहणी केली. स्टोअर रुममध्ये हर्डल्स, गोळे, थाळया, भाले इत्यादी क्रीडा साहित्य आढळून आले. या पाहणीच्या वेळी भांडार प्रमुख अनुपस्थित असल्यामुळे समितीला क्रीडा साहित्याची माहिती मिळू शकली नाही.

समितीने शिव छत्रपती क्रीडा संकुल,बालेवाडी, येथे विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या १) आकस्मिक निधीतील ३.४७ कोटी रुपयांबद्दलच्या २) व्हॅट, आय.टी.चे पेमेंट तसेच रॉयल्टीबाबतच्या ३) मूलभूत दराच्या पडताळणी शिवाय भाव वाढीचे प्रदान याबाबतच्या. त्याशिवाय इतर काही मुद्दांच्या अनुषंगाने मागितलेल्या माहितीसंदर्भात विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, ३० जूनला २५.१२ कोटी रुपयांबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र समितीला १ ऑगस्टला सादर केलेली आहे. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाच्या अनुषंगाने आयोजन समिती आणि गेम्स टेक्निकल कंडक्ट समिती अशा दोन समित्या करण्यात आल्या होत्या. राज्य स्तरावर शिखर समिती, आढावा समिती आणि कार्यकारी समिती अशा तीन समित्या करण्यात आल्या होत्या. शिखर समितीचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री होते. आढावा समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव होते व कार्यकारी समितीचे अध्यक्ष विभागीय आयुक्त, पुणे हे होते. अत्यंत उत्कृष्ट प्रकारची क्रीडा स्पर्धा आयोजित केली होती. महालेखाकारांनी सुध्दा त्यांच्या अहवालामध्ये बांधकाम चांगले झाल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यावेळी सर्व प्रसार माध्यमातून स्पर्धा यशस्वी झाल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. महत्वाच्या व्यक्तींनी सुध्दा संकुलाची पाहणी केल्यानंतर संकुलाच्या बांधकामाबद्दल आणि इतर गोष्टींबद्दल प्रशंसा केलेली आहे. कार्यकारी समिती विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होती. त्या समितीच्या जवळजवळ ७० बैठका झाल्या. आढावा समिती मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली होती. त्या समितीच्या ३ बैठका झाल्या. बहुतांश निर्णय या दोन्ही समित्यांच्या मान्यतेनंतरच

घेण्यात आलेले आहेत. तरीही महालेखाकारांनी जे आक्षेप घेतलेले आहेत त्या संदर्भात उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी मोठी रक्कम खर्च करुन भव्य संकुल उभारलेले आहे. त्याच्या देखरेखीसाठी निधी आणि मनुष्यबळ या दोन महत्वाच्या बाबी आहे. या दोन्हीची कमतरता असल्यामुळे काही ठिकाणी काही त्रुटी राहणे शक्य आहे, हे नाकारु शकत नाही. सन २००८ मध्ये ज्यावेळी क्रीडा स्पर्धा झाल्या त्यावेळी या ठिकाणी उत्कृष्ट सुविधा होत्या. कालांतराने काही ठिकाणी निधी अभावी किंवा मनुष्यबळाअभावी त्यामध्ये काही कमतरता आली असण्याची शक्यता आहे. परंतु शासनाचे असे प्रामाणिक मत आहे की, सर्वांनी मिळून एक चांगली वास्तू उभारण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि पुणेकरांना तसेच महाराष्ट्रातील लोकांना एक चांगले क्रीडा संकुल उपलब्ध करुन दिलेले आहे.

यावर प्रधान महालेखाकार यांनी पुढील मत मांडले In the Report of the Comptroller and Auditor General of India, Report 6, "Infrastructure Development for Commonwealth Youth Games-2008", Audit Para-2.5 is regarding "Monitoring and Oversight." In this we have stated that "a governance and oversight structure was put in place for monitoring and oversight of various activities relating to CYG through various committees like the Apex Committee, the Review Committee and the Executive Committee." We had asked for minutes of the meetings held by the Apex Committee but we did not get the minutes. So, we cannot say whether meeting was conducted or not. The Review Committee met only three times since its constitution and did not arrest the spate of irregularities committed by the Executive Committee. The Executive Committee met regularly and held 68 meetings between June 2006 and June 2009. It has been observed that the Executive Committee failed to address the issues adequately. The Executive Committee approved floating of an NIT for the main work of Rs. 195 crore without technical sanction. The Chief Engineer, PWD, Pune Region, was a member of the Executive Committee and he had power to accord technical sanctions to all works executed by the Government departments in excess of Rs. 1.25 crores. The Chief Engineer regularly attended the meetings of Executive Committee but he did not point out the necessity and importance of according

technical approvals to the estimates. The Executive Committee formed committees for bid evaluation of the main work of new construction/refurbishment and the BOT project but the quorum of attendance at these meetings was not specified. It has been noticed that meetings of bid evaluation Committees were attended by only two out of five/six members. Their recommendations were accepted by the Executive Committee, ignoring non-attendance of the majority of members. The Executive Committee was empowered to call for tenders as per Government rules. However, on the recommendations of the Organising Committee, the Executive Committee went in for purchases from single suppliers without tendering. This was discussed in the meetings of the Executive Committee but the Executive Committee did not bring the facts to the notice of the Government. When the State Government referred the matter regarding single tender/brand purchases to the Govt. of India, the Govt. of India directed that GFRs should be followed in this regard scrupulously. The Executive Committee ignored these directions. The Executive Committee did not ensure adherence to its decision to restrict consultancy fees in case of increase over estimated cost. The Executive Committee approved consultancy fees for procurement of equipment and price escalation in violation of the conditions in the agreement with the consultant. The Executive Committee was headed by the Divisional Commissioner, Pune. These are our comments on the "Monitoring and oversight" and have been pointed out in Para 2.5

महालेखाकारांनी दिलेले उपरोक्त अभिप्राय हे त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन दिलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता बैठकीला उपस्थित असतानाही मोठ्या प्रमाणावर सिंगल टेंडरींग झाले. बॉक्सींग, टेबलटेनिसच्या ठिकाणी बाष्पीभवनाचे ८४ लाख रुपयांचे मशीन बसविले. ते बसविताना नियोजन आयोगाने, तांत्रिक तज्ज्ञांनी सांगितले की, त्या ठिकाणी हे मशीन बसवावे. एवढी मोठी स्पर्धा असताना आणि जर काम लवकर करावयाचे असताना दोन चार लाख रुपये इकडे तिकडे खर्च झाले तर समजू शकतो. परंतु ते ८४ लाख रुपयांचे मशीन वाया गेले. तसेच ते मशीन काढून त्या ठिकाणी ए.सी. यंत्रणा बसविली आहे, या बाबीस कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता तत्कालिन विभागीय

आयुक्त यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीला निविदा मागविणे, नूतनीकरण करणे, नवीन काम करणे या बाबतचे सर्व अधिकार देण्यात आले होते. त्यावेळी सुरुवातीच्या काळामध्ये श्री. प्रभाकर करंदीकर विभागीय आयुक्त होते. या समितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता सदस्य होते. ही सर्व कामे कार्यकारी समितीमध्ये ठरविण्यात आली. त्यामुळे वेगळी तांत्रिक मंजुरी घेण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. या कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नियुक्ती केली होती. त्यांनी त्या ठिकाणी ज्या सुविधा निर्माण करावयाच्या आहेत त्याचे कॉस्टींग तसेच टेंडर तयार करुन दिले. त्याला कार्यकारी समितीने मान्यता देऊन सर्व माहिती शासनाला दिली की, या ठिकाणी अशा प्रकारच्या सुविधा निर्माण होणार आहेत आणि त्यासाठी एवढा निधी लागणार आहे. त्या आधारावर शासनाने त्याला मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे वेगळी मंजुरी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही तसेच याबाबतीत दुसरा मुद्दा असा की, जे कन्सल्टंट नेमले होते त्यांनी ज्या तीन निविदा आल्या होत्या त्यातील ज्यांची निविदा कमी होती त्यांच्याशी वाटाघाटी करुन असे कळविले होते की, या कामामध्ये अंदाजे ४५० कोटी रुपयांचा खर्च आहे. या कामांपैकी निविदा न मागविता केलेली कामे म्हणजे फक्त क्रीडा साहित्याची खरेदी आहे आणि त्याची रक्कम मर्यादित आहे.

आयोजन समिती आणि गेम्स टेक्निकल कंडक्ट समितीने सांगितले की, आंतरराष्ट्रीय गेम्स असोसिएशनने सांगितले की, टेबल टेनिससाठी हेच इक्विमेंट पाहिजे. तेवढेच साहित्य अशा पध्दतीने घेतलेले आहे. या व्यतिरिक्त इतर ज्या बाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या त्याबाबत तत्कालीन प्रधान सचिवांनी बालेवाडी येथे बैठक घेतली. त्यामध्ये त्यांच्याशी या मुद्यांची सविस्तर चर्चा केली. नियोजन समितीने सांगितले की, ही इक्विपमेंट पुरविली नाहीत तर अडचण निर्माण होऊ शकते आणि आम्ही अमूक कंपनीचे साहित्य मागितले आणि तुम्ही दुसऱ्याच कंपनीचे साहित्य घेतले त्यामुळे ही स्पर्धा घेणार नाही. असे काही प्रश्न उद्‌भवतील म्हणून त्यावेळी हे साहित्य अशा पध्दतीने घेण्यात आले. ज्या ज्या ठिकाणी शक्य होते त्या ठिकाणी मल्टीपल कंपन्यांकडून कोटेशन मागविले असे अनेक वेळा प्रश्न निर्माण झाले होते. आयोजन समितीबरोबर वादही झाले. काही बाबी केंद्र शासनापर्यंत घेऊन जाव्या लागल्या. वेळेची मर्यादा असल्याने दीड ते पावणेदोन वर्षाच्या कालावधीत या सर्व सुविधा निर्माण करुन स्पर्धा भरवावयाची होती. सर्व कामे वेळेत करणे आवश्यक होते. हे सर्व करीत असताना

शासनाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन एखाद्या गोष्टीमध्ये झाले नसेल. वर सांगितल्याप्रमाणे काही साहित्य खरेदी करावे लागले, अशा काही गोष्टी झाल्या असण्याची शक्यता आहे. या ठिकाणी झालेले काम समितीने पाहिलेले आहे. जो पैसा खर्च केलेला आहे त्याप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहिले आहे आणि ते आजही वापरामध्ये आहे. हे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन पाच वर्षे झालेली आहेत. गेल्या पाच वर्षामध्ये या ठिकाणी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती स्पर्धा भरविण्यात आल्या त्याची यादी समितीला सादर करण्याचे आश्वासन समितीस दिले.

राज्य शासनाने २५ कोटी रुपये आकस्मिकता निधीतून दिले त्याची विगतवारी करण्याबाबत समितीने सांगितले असता आकस्मिकता निधीतून ३२ कोटी ९५ लाख रुपये तीन हप्त्यांमध्ये मिळाले होते. दोन हप्ते स्पर्धेच्या अगोदर आणि एक हप्ता नंतर मिळाला. यापैकी २५ कोटी १२ लाख रुपये आयोजन समितीला दिले होते. त्यामध्ये टेम्परारी ओव्हरलेज, ब्रँडीन्ग ऑफ व्हेन्यूज, नेटवर्कीन्ग, टेस्ट इव्हेंट इत्यादी बाबींसाठी ही रक्कम दिली होती, अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. ही रक्कम याच ठिकाणी खर्च करण्यासाठी दिली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी ही रक्कम याच ठिकाणी खर्च करण्यासाठी दिली होती असे सांगितले. आयोजन समितीला जे २५ कोटी रुपये दिले त्यातील खर्चाच्या बाबतीत समितीला शंका आहे. त्या निधीतून दिल्लीतील कार्यालयाच्या आधुनिकीकरणावर किती खर्च करण्यात आला आहे तसेच २५ कोटी रुपयांपैकी २० कोटी ६० लाख रुपये एवढा खर्च फर्निचर आणि फिक्स्चरवर झालेला आहे.

फर्निचरसाठी जे २० कोटी ६० लाख रुपये खर्च झाले ते बालेवाडीमध्ये खर्च झाले आहेत काय ? या बाबतीत समितीने पाठपुरावा केल्यानंतर दिल्लीवरुन रेकॉर्ड मागविला असता सदर खर्च दिल्ली येथील कार्यालयावर २० कोटी रुपये खर्च झालेला असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता जो निधी क्रीडा संचालकांकडून आयोजन समितीकडे देण्यात आला त्या निधीचा हिशेब प्राप्त नसल्याने तो देऊ शकत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

या संदर्भात लेखापरिक्षण करण्याबाबत दिल्ली येथील महालेखाकारांना समितीने पत्र लिहिले असता त्यांनी असे सांगितले की, हे पैसे सेंट्रल पूलमध्ये गेले. It was expected that the money which was given to you should have been spend here. मग हा जो खर्च

दिल्लीमध्ये झालेला आहे त्याची विगतवारी बरोबर आहे का ? आकस्मिकता निधी हा इमर्जन्सी फंड असतो. दुष्काळ असेल, नैसर्गिक आपत्ती असेल अशा वेळी पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी ही तरतूद असते. बालेवाडीची स्पर्धा सुरु होण्याच्या आठ पंधरा दिवस अगोदर पैसे कमी पडले आणि स्पर्धा तर व्हावयास पाहिजे होत्या म्हणून पैसे मागितले असते तर ते समजू शकतो. आपल्याला तो अधिकार आहे. पण आकस्मिकता निधीतून दिलेल्या निधीच्या वापराबाबत शासनाचे काही नियम आहेत. समितीने खर्च विचारला त्याची माहिती दिली नाही. या बाबतीत काय ॲक्शन घेऊ शकतो याबाबत महालेखाकारांनी माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता यावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, Regarding Rs. 20 crore which was transferred to the Organising Committee, the audit was done. As there is distribution of work between different offices of A.G., the audit was done by another A.G. Office.

केंद्रातील आयोजन समितीला २० कोटी रुपये कसे दिले ? आकस्मिकता निधीतील काही रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवलेली आहे. आकस्मिकता निधीतून रक्कम कशासाठी मागितली होती ? शासनाकडे २५ कोटी रुपये मागितले. या निधीच्या खर्चाच्या बाबतीत काही निकष आहेत. हा निधी जर खर्च झाला नाही तर उरलेला निधी शासनाला परत केला पाहिजे असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता तत्कालिन संचालक, क्रीडा, पूणे यांनी समितीला सांगितले की, शासनाकडे ३२ कोटी रुपयांची मागणी केली होती. काही तातपूरत्या स्वरुपातल्या गोष्टी करावयाच्या गेल्या यासाठी आधी ४५ कोटी रुपयांची मागणी केली होती नंतर ती मागणी ३२ कोटी रुपयांपर्यंत मर्यादित केली. तो खर्च या ठिकाणी करावयाचा होता आणि त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र द्यावयाचे असे बैठकीमध्ये ठरले. पण जसे आदेश आले त्याप्रमाणे निधी हस्तांतर केलेला आहे. चेक कोणाच्या सहीने दिल्लीला पाठविण्यात आला ? कारण ज्यांनी मागणी केली त्यांनी त्याबाबतचा प्लॅन सादर केला असेलच समितीने विचारणा केली असता त्यांना चेकने पैसे दिले. त्यांनी खर्चाचे व्हावचर द्यावे असे ठरले आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

जे लेखापरिक्षण झाले त्यामध्ये ३२ कोटी रुपयांचा उल्लेख कोठेही नाही. त्यामुळे याबाबत दिल्लीला पत्र लिहून स्पेशल ऑडीट करुन घ्यावे लागले. केंद्रातील आयोजन समितीमध्ये कोणकोण होते ? त्याबाबतही समितीने विचारणा केली असता केंद्रातील आयोजन

समितीचे अध्यक्ष श्री. सुरेश कलमाडी होते आणि सदस्य सचिव श्री. ललित भानोत होते. त्या समितीच्या ९ बैठका झाल्या. आयोजन समितीवर महाराष्ट्र शासनातर्फे कोणीही प्रतिनिधी नव्हते, असा खुलासा तत्कालिन विभागीय आयुक्तांनी केला.

यावर समितीने अशी विचारणा केली की, हे पैसे आयोजन समितीच्या सदस्यांकडून वसूल करणार का? आयोजन समितीने जसे आपल्या राज्याकडून २५ कोटी रुपये घेतले तशी इतर राज्यांनी त्यांना रक्कम दिलेली आहे का ? आकस्मिकता निधीतील रक्कम आकस्मिक खर्चासाठी दिली जाते. ज्यावेळी नियमित अर्थसंकल्प सादर करतो त्यावेळी आकस्मिकता निधी पुन्हा शासनाकडे वळता करावयास पाहिजे. केंद्रातील आयोजन समितीकडे निधी वळता केला. आकस्मिकता निधी माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने दिला जातो. या संदर्भात अशी पद्धत आहे की, आगामी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांद्वारे ते पैसे घेऊन तो खर्च नियमित केला जातो. किरकोळ खर्चासाठी ही रक्कम असते. आकस्मिकता निधीतील रक्कम केंद्र शासनाच्या अखत्यारितील कार्यालयासाठी गेली असेल तर ती गंभीर चूक आहे. कारण ही रक्कम खर्च करण्यामध्ये अनियमितता झालेली आहे. ही बाब महाराष्ट्र वित्तीय नियमावलीचा भंग करणारी असुन भविष्यामध्ये अशी चूक होता कामा नये असेही मत समितीने व्यक्त केले. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे २५ ऑगस्ट, २००८ ला बैठक झाली होती त्याप्रमाणे आयोजन समितीने पैशाची मागणी केली. ऑक्टोबर महिन्यामध्ये क्रीडा स्पर्धा होणार होती. विभागाकडे बजेट नसल्यामुळे आकस्मिकता निधीतून रक्कम घेऊन नंतर ती ॲडजस्ट करणे ही खात्याची अंतर्गत बाब आहे. आयोजन समितीला खर्चाचा हिशेब देण्यास सांगितले होते. लोकलेखा समितीच्या मागील बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विभागाने ४ जून, २०१२ ला पत्र पाठवून खूलासा करण्यासा सांगितले होते. परंतु त्यांनी अजूनही खुलासा सादर केलेला नाही. आकस्मिकता निधीतून जो निधी घेतला तो निधी नंतर बजेटमधून ॲडजस्ट झाला परंतु हिशेब आलेला नाही. त्यामुळे हिशेब आलेला नसल्यामुळे त्यावर जास्त भाष्य करु शकत नाही असे ही विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांच्याकडून हिशेब आल्याशिवाय त्या निधीचा योग्य विनियोग झाला की नाही हे कसे समजणार ? या निधीचा अनियमितपणे वापर करण्यात आला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र आलेले आहे त्यावरुन निधीचा योग्य विनियोग झाल्याचे गृहीत धरण्यात येतो.

उपयोगिता प्रमाणपत्र दाखविले म्हणजे नियमितपणे खर्च झाला असे होत नाही. त्यावरुन कोणत्या बाबीवर, कधी आणि किती खर्च झाला हे कळत नाही. यामध्ये अनियमितता झालेली दिसते. त्यांना दोन वेळ कळवूनही त्यांनी हिशेब कळविलेला नाही. ही रक्कम वसूल करण्यात यावी अशी सूचना समितीने केली.

स्वारगेट येथे मॅरथॉन भवन बांधले त्यावर ७० लाख रुपये खर्च झाले. सेनापती बापट रोडला राष्ट्रकुल स्पर्धा कार्यालय झाले. त्यावर काही लाख रुपये खर्च झाले असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी विभागाकडे त्याबाबत नोंद आहे. दिल्लीतून जे प्रमाणपत्र आलेले आहे त्यामध्ये तशी नोंद दिसत नसल्याचे सांगितले.

मुळात हे पैसे राज्य शासनाकडे स्पर्धेसाठी आले होते. हे पैसे बालेवाडीमध्ये खर्च करण्यासाठीच दिले होते. ते पैसे बाहेर खर्च केले. दिल्लीतील कार्यालयासाठी किंवा मॅरथॉन भवनासाठी किंवा इतर ठिकाणी ते पैसे खर्च केले. ही बाब कोणत्या कायद्याला धरुन आहे ? तसेच हे पैसे दिल्लीच्या कार्यालयासाठी कसे काय खर्च करण्यात आले ? याबाबत विचारणा केली असता या स्पर्धेच्या संदर्भात दिल्लीतील जी समिती आहे त्यांनी हे गेम्स देऊ केले, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्या ठिकाणी स्पर्धा आयोजित करावयाची आहे त्या ठिकाणी खर्च करण्यासाठी दिलेले पैसे दिल्लीच्या कार्यालयासाठी खर्च करणे कायद्याला धरुन आहे का ? त्यासाठी राज्य शासनाची परवानगी होती का ? याबाबत विभागाकडून काहीच खूलासा करण्यात आला नाही.

क्रीडा सुविधा उभारणीसाठी ४२५ कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला. त्यापैकी केंद्र शासनाने २१० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आणि राज्य शासनाने २१५ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. ही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा असल्यामुळे दिल्लीला कार्यालय असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे दिल्लीतील कार्यालयावर खर्च झाला असेल. यामध्ये राज्य शासनाप्रमाणेच केंद्र शासनाचाही वाटा आहे. राज्य शासनाकडून काय करणे अपेक्षित होते तसेच केंद्र शासनाकडून काय करणे अपेक्षित होते याबाबतची माहिती विशद करताना तत्कालिन विभागीय आयुक्तांनी सांगितले की, जो निधी आयोजन समितीला देण्यात आला होता त्यामध्ये त्यांनी ओव्हरलेज, फर्निचर अँड फिक्चर्स यासाठी १८ लाख रुपये, ब्रॅन्डींग ऑफ व्हेन्यूज यासाठी ९ कोटी ५० लाख रुपये, नेटवर्कीन्गसाठी १ कोटी रुपये आणि टेस्ट इव्हेंटसाठी १ कोटी रुपये या प्रमाणे २९ कोटी ५० लाख रुपयांची मागणी केली होती. ज्या

हेडखाली निधी मंजूर करण्यात आला त्यामध्ये या चार बाबींवर खर्च करावयाचा होता. याचा अर्थ असा आहे की, या चार बाबींसाठी शासनाने आयोजन समितीला निधी उपलब्ध करुन दिला. या चार बाबींवरच खर्च झाला की, अन्य कोणत्या बाबींवर खर्च झाला हे सांगणे अशक्य आहे. कारण फक्त त्यांच्या चार्टर्ड अकाऊंटन्टचे एक सर्टिफिकेट आहे. त्यावरुन ओव्हरलेज, फर्निचर अँड फिक्चर्स यावर १८ कोटीच्या अगेंस्ट २० कोटी रुपये, ब्रॅन्डींग अँड डेकोरेशन ऑफ व्हेन्यूजवर ५ कोटी ८५ लाख रुपये, नेटवर्कीन्गसाठी ६३ लाख रुपये खर्च झालेला दिसतो. एवढाच तपशील विभागाकडे आहे.

क्रीडा स्पर्धासाठी प्राप्त झालेल्या रकमेपैकी खर्च होऊन जे दोन-तीन कोटी रुपये शिल्लक राहिले ते कोठे आहेत ? ती रक्कम फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवलेली आहे. ते पैसे शासनाला परत करावयास पाहिजे होते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ३ कोटी ५२ लाख रुपये एवढी रक्कम शिल्लक होती. ऑक्टोबरमध्ये गेम्स संपल्यानंतर ही रक्कम जमा करावयास पाहिजे होती पण ती जमा झालेली नाही. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी १ जून, २०१२ रोजी ती रक्कम जमा केलेली आहे. म्हणजेच समितीसमोर दि.८ व ९ मे, २०१२ रोजीची साक्ष झाल्यानंतर सदर रक्कम जमा केलेली आहे हे खरे आहे काय ? तसेच राष्ट्रकूल स्पर्धेसाठी आयोजन समिती होती त्याप्रमाणे काही उपसमित्या झाल्या. त्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिलेल्या होत्या परंतु कोणत्याही समित्यांच्या बैठका झालेल्या नाहीत असे रेकॉर्डवर आलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता याबाबत खुलासा करतान तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी आयोजन समितीच्या किती बैठका झाल्या हे सांगणे कठीण आहे. कारण ती माहिती उपलब्ध नाही. परंतु कार्यकारी समितीच्या किती बैठका झाल्या, माननीय मुख्यमंत्री यांच्या स्तरावर किती बैठका झाल्या याची माहिती महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये आलेली आहे. म्हणजेच आयोजन समिती आणि कार्यकारी समिती या दोन समित्या झालेल्या कामाला, खर्चाला आणि नियोजनाला जबाबदार आहेत असे मत समितीला खेदाने व्यक्त करावे लागले कारण आयोजन समितीने एकूण रकमेपैकी २१ कोटी रुपये आणि कार्यकारी समितीने ४०० कोटी रुपये खर्च केलेले आहेत. आयोजन समितीने केलेल्या २१ कोटी रुपये खर्चाचा तपशील प्राप्त झालेला नाही. निधी खर्च करीत असताना अनियमितता झालेली आहे. मग या अनियमिततेला आयोजन समिती की कार्यकारी समिती जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता जो निधी खर्च

झालेला आहे तो शासनाच्या नियमानुसार खर्च झालेला आहे. शासनाच्या सर्व नियमांचे पालन करुन सर्व सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत, असा खुलासा तत्कालिन विभागीय प्रतिनिधींनी केला.

त्यावर समितीने दिल्ली येथील कार्यालासाठी २५ कोटी रु. दिल्यानंतर दिल्ली कार्यालयाशी लेखी पत्रव्यवहार झालेला आहे काय ? किंवा दिल्ली येथील कार्यालयाने निधी मागितला आणि आपण तो दिला हे तरी रेकॉर्डवर आले काय? अशी विचारणा समितीने केली असता दिल्ली येथील कार्यालयाशी पत्र व्यवहार झाला नसून कॉमनवेल्थ यूथ ऑर्गनायझेशन कमिटी पुण्यात स्थित होती. त्या कमिटीने एक्झिक्युटिव्ह कमिटीकडे "आम्हाला निधी पाहिजे" अशी मागणी केली. त्यासंबंधीचे पत्र शासनाला सादर करण्यात आले, शासनाने या निधीला मंजुरी दिली आणि हे २५ कोटी रु. एक्झिक्युटिव्ह कमिटीने खर्च न करता परस्पर आयोजन समितीला द्यावेत असे तत्कालिन विभागीय आयुक्तांनी सांगितले.

त्यावेळी पुण्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृहमंत्र्यांकडे बैठक घेऊन पुण्याच्या कायदा आणि सुव्यस्थेसाठी दिलेला निधी खर्च करण्यासाठी सांगितले होते. कायदा व सुव्यवस्थेसाठी एकूण किती निधी देण्यात आला होता व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला, सीसीटीव्ही, गन्स, जीप्स इत्यादीवर किती रक्कम खर्च करण्यात आली ? या बाबत समितीने विभागाकडे विचारणा केली असता पोलिस आयुक्त, पुणे शहर यांनी सांगितले की, एकूण १७.६३ कोटी रु. दिलेले होते. त्यापैकी ९.४० कोटी रुपये खर्च करण्यात आले, ३.१८ कोटी रुपये बचत खाती जमा करण्यात आले आणि ५.५ कोटी रुपये परत करण्यात आले. निधी आणि मंजुरी या दोन्ही गोष्टी उशिरा प्राप्त झाल्या.

मंजूर निधीमधून ५.५ कोटी रुपये परत का देण्यात आले ? अशी विचारणा केली असता हा निधी वित्त विभागाकडून गृह विभागाला देण्यात आला. हा निधी आयोजन समिती अथवा कार्यकारी समिती मार्फत देण्यात आलेला नाही. बंदोबस्तासाठी वॉचटॉवर उभारणे, पोलीस बूथ करणे इत्यादीसाठीचा खर्च कार्यकारी समितीने पोलिसांच्या सांगण्यावरुन केलेला असल्याची माहिती तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी समितीस दिली.

समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, कायदा व सुव्यवस्थेसाठी दिलेल्या निधीमध्ये पुणे शहर पोलीस विभागासाठी दिलेल्या निधीचा समावेश होता. कायदा व सुव्यवस्थेसाठी एकूण किती निधी देण्यात आला, त्यातील किती निधी कोणकोणत्या बाबींवर

खर्च करण्यात आला आणि किती निधी परत करण्यात आला याची सविस्तर टिपणी समितीला देण्याबाबत आदेशित केले.

आयोजन समिती आणि कार्यकारी समिती केव्हा गठीत करण्यात आली, समितीमधील सदस्यांची नावे काय आहेत ? याबाबत विचारणा केली असता तत्कालिन विभागीय आयुक्तांनी पुढील माहिती समितीस दिली की, १६ जून २००६ला कार्यकारी समिती गठीत करण्यात आली. (१)विभागीय आयुक्त पुणे, अध्यक्ष (२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, सदस्य (३) आयुक्त, पिंपरी-चिचवड महानगरपालिका, सदस्य, (४) जिल्हाधिकारी, पुणे, सदस्य (५) मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, पुणे, सदस्य (६) उपमुख्य वास्तूविशारद, पुणे, सदस्य आणि (७) संचालक क्रीडा व युवक सेवा, सदस्य याप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती. कार्यकारी समितीच्या कार्यकक्षा शासन निर्णयामध्ये दिलेल्या होत्या. सर्व सुविधांचे नूतनीकरण करणे, नवीन बांधकामाच्या प्रस्तावांना मान्यता देणे इत्यादी सर्व कामे करण्यासाठी निविदा मागविणे, त्या उघडणे व मान्य करणे, बांधकामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, वास्तूविशारदची नेमणूक करणे, खर्च करण्यास परवानगी देणे, आढावा समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, इत्यादी कामे करण्याची जबाबदारी कार्यकारी समितीवर होती असे ही समितीला सांगण्यात आले. त्यावर समितीने झालेल्या खर्चाला कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा केली असता त्या त्या परिस्थितीमध्ये कामे करणे आवश्यक होते. कामे करताना १९९७-९८मधील सर्व निकषांचे पालन केलेले आहे. कामाची तातडी पाहता एकाच ठेकेदाराला काम देण्याचे प्रकार झालेले आहेत. अे.जी.नी काढलेल्या सर्व आक्षेपांचे सविस्तर विश्लेषण केलेले असून त्यामधून जी वस्तुस्थिती पुढे आलेली आहे ती समितीने स्वीकारावी अशी विनंती तत्कालिन विभागीय आयुक्तांनी समितीस केली व रु.२९.५० कोटी ही रक्कम चेकने किंवा वेगळे खाते उघडून आयोजन समितीला दिलेली आहे काय ? ही रक्कम ज्या बँकेत भरण्यात आली त्या बँकेतून हे पैसे कसे कसे आणि केव्हा काढण्यात आले याची माहिती बँकेकडून मागवून घ्यावी तसेच हे पैसे कोठे कोठे खर्च झालेले आहेत याचा तपशील मिळणे गरजेचे आहे असे निदेश समितीने दिले. २५ कोटी रुपये दिल्ली येथील कार्यालयामधील फर्निचरसाठी खर्च केलेले आहेत. या २५ कोटी रुपयाचे काय झाले हे महाराष्ट्रातील एकाही अधिका-याला माहीत नाही. कार्यकारी समितीने दिल्लीला पत्र पाठवून रु. २५ कोटीच्या खर्चाची माहिती मागितली होती. पण ती माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे या रकमेचा संपूर्ण तपशिल

मिळण्याकरीता फौजदारी गुन्हा दाखल करावयाचा की पुन्हा लेखापरिक्षण करावे याचा निर्णय समिती घेईल असे अभिप्राय समितीने दिले.

समितीने पुढे असे निदर्शनास आणले की, काही ठिकाणी अकारण खर्च केलेला दिसतो. सापशिडी, लगोरी हे खेळ कोणत्या देशात खेळले जातात ? सापसीडीची तेथे फक्त चौकटच आहे. युवा उद्यानाच्या ठिकाणी कोणतेही उद्यान नाही. लगोरीसाठी व युवा उद्यानासाठी किती तरतूद केली होती व किती खर्च झाला ? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी त्या ठिकाणी लँड स्केपिंगवर खर्च केलेला आहे. त्या जागेचे सौंदर्यीकरण व्हावे तसेच त्या ठिकाणी येणाऱ्या खेळाडूंना भारतीय खेळांची माहिती व्हावी म्हणून ते काम केलेले आहे. या संदर्भात बैठकीमध्ये चर्चा झाली त्यानुसार निर्णय घेतलेला आहे. हे सर्व त्यावेळी माहे ऑक्टोबरमध्ये उभारले गेले होते, परंतु समितीने जेव्हा क्रीडा संकूलाची पहाणी केली तेव्हा तेथे फक्त सापसीडीची चौकटच आहे असे निदर्शनास आले.

लगोरी व सापसीडीसाठी ५७ लाख रुपये खर्च केले आहेत तसेच कारंजावर ६५ लाख रुपये खर्च केले आहे. महालेखाकारांच्या अहावालामध्ये सांस्कृतिक विभागाच्या सल्ल्याशिवाय DSYS ने ७५ लाख रुपये किंमतीचे शिल्प व स्मारकाचे काम केल्याचा उल्लेख आहे. सदर भोवरा सापशिडी, लगोरी, योगा शिल्प, युवा उद्यान इत्यादी ५ बाबीकरीता टेंडर न मागविता काम केले आहे. याबाबत खुलासा करतान तत्कालिन क्रीडा आयुक्त यांनी सांगितले की, हा सर्व लँड स्केपिंगचा हा सौंदर्याकरणाचा एक भाग आहे. त्यामध्ये लगोरी सापसीडीचा एकूण खर्च ५७ लाख रुपये झालेला आहे. तो खर्च कमिटीने मंजूर केलेला आहे. देशाची व महाराष्ट्राची संस्कृती चित्रीत करणारी शिल्पे व स्मारक यामध्ये देशी खेळांच्या प्रतिकृती तयार केलेल्या आहेत. भोवरा, सापसीडी, लगोरी, योगा शिल्प, युवा उद्यान या पाच बाबींसाठी ७५ लाख खर्च झालेला आहे. हा एकूण जो खर्च झालेला आहे त्या सर्व बाबी लँड स्केपिंगचा भाग आहे.

यासंदर्भात महालेखाकारांनी जो आक्षेप घेतलेला आहे त्यामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, बाजारभावाचा अभ्यास न करता व स्पर्धात्मक दर न मिळविता पाच बाबींकरिता म्हणजे भोवरा, सापशिडी, योगा शिल्प, युवा उद्यान व लगोरी यांच्या मे. इंडेजसाठी काम करणाऱ्या मे. स्पेस डिझायनर, पुणे यांनी दिलेल्या दरास DSYS ने मान्यता दिली. टेंडर न काढता ही पाच कामे दिली गेली. त्यामुळे एकूण ७५ लाख रुपये जो खर्च झाला त्यामध्ये

कोणत्या कामावर किती खर्च झाला ? अशी विचारणा समितीने केली. यावर तत्कालिन क्रीडा आयुक्त असा खुलासा केला की, भोवरा यावर २० लाख ९० हजार रुपये, युवा उद्यान करिता १७ लाख रुपये, योगा उद्यानसाठी ९ लाख ५० हजार रुपये, सापशिडीकरिता १८ लाख ९० हजार रुपये, युवा फाऊंटनसाठी ५९ लाख रुपये खर्च झालेला आहे.

कामे कशी करावयाची यासाठी प्रोजेक्ट कन्सल्टंट नेमला होता. त्यांनी एस्टिमेट २०० कोटीचे केले आणि खर्च ४०० कोटी रुपये झाला. प्रोजेक्ट कन्सल्टंट नेमल्यामुळे टेक्निकल कन्सल्टंट नेमण्याची गरज नाही. यामध्ये विभागाला अंधारात ठेऊन काम केलेले दिसते. दुसरी बाब अशी की, टेंडर न काढता कामे केली गेली आहेत. सापशिडीवर १८ लाख, कारंजावर ६५ लाख रुपये खर्च केलेले आहेत. हा खर्च अनावश्यक आणि कोणाला तरी फेवर करण्यासाठी केला गेला आहे. आयोजन समिती किंवा कार्यकारी समितीने हा खर्च केलेला आहे. सापसीडी जेथे आहे त्या ठिकाणी एक चौकट उभी करुन दोन साप आणि एक शिडी दाखविलेली आहे. ते एक दोन लाख रुपयांचे काम असताना त्यापेक्षा वीसपट खर्च केलेला आहे. यामध्ये कोणत्या अधिकाऱ्यांने अनियमितता केली, कोणत्या अधिकाऱ्यांनी दडपण आणले? याची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच क्रीडा संकूलातील बरीचशी कंत्राटे नातेवाईकांना दिलेली आहेत. कॅगने म्हटले आहे. दिल्लीच्या कॅगच्या रिपोर्टमध्ये ते आले आहे. याबाबतीत ज्यांनी चुकीचे निर्णय घेतले त्यांच्या खाजगी मालमत्तेतून वसुली करावी लागेल अशी सूचना समितीने केली.

बाष्पीभवनाचे ८४ लाख रुपयांचे मशीन आणले ते वाया गेले. त्या ठिकाणी ए.सी. यंत्रणा बसवली. सदर ए.सी. यंत्रणा नियोजन समितीने सांगितले म्हणून बसविण्यात आली. परंतु याबाबतीत शासनाचे जे निकष आहेत ते मोडता येत नाहीत. तांत्रिक माणसाला न विचारता प्लानिंग कमिटीने सांगितले. या बाबीचा गांभीर्याने विचार नियोजन समितीला करावा लागणार आहे. काही लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा लागेल, पैसे वसूल करावेत तसेच जे अधिकारी सेवानिवृत्त झाले असतील त्यांच्या मालमत्तेतून वसुली केले तर यापुढे कोणी असे अनियमितता करण्यास धजावणार नाही असे ही मत समितीने व्यक्त केले. विभागीय प्रतिनिधींचे दुसऱ्यावर टोलविण्याचे काम चालू आहे अशी सूचना समितीने केली. तसेच समितीला विभागाकडून ज्या उत्तराची व माहितीची अपेक्षा आहे. ती विभागाकडून देण्यात येत नाही. लॉन टेनिसच्या बाबतीत अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, या कामाच्या बाबतीत

दक्ष होतो पण महालेखाकारांच्या रिपोर्टवरुन असे दिसते की अधिकारी दक्ष नव्हते तसेच टेंडर न काढता काम केलेले आहे. महालेखाकारांच्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, निविदा सूचनेस प्रतिसादाच्या अभावाच्या कारणाचे कार्यकारी समितीने समर्थन केले असले तरी निविदा शर्तीतील असे वारंवार व महत्वाचे बदल हे निविदा प्रकियेस छेद देणारे व संदिग्धतेचे निदर्शक असून निविदाकारांना अडथळा उत्पन्न करणारे आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये असे नाईलाजास्तव म्हणणे समितीला क्रमप्राप्त वाटते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, हॉटेलला किती जागा दिली ? या बाबतीत माहिती देताना तत्कालिन क्रीडा अधिकारी यांनी सांगितले की, माहे ऑक्टोबर, २००६ पासून या बाबतीत कार्यवाही सुरु झाली होती. त्या हॉटेलसाठी ६.१ एकर जागा ६० वर्षासाठी दिलेली आहे. त्या ठिकाणी ४०० रुम्स बांधावयाच्या होत्या त्या बांधून पूर्ण केलेल्या आहेत. लीज रेंटप्रमाणे त्यांनी वर्षाला २ कोटी ५९ लाख रुपये भाडे द्यावयाचे होते. यामध्ये टेंडर प्रक्रिया केली होती, मग लीज रेंटमध्ये किती वर्षाने वाढ होईल ? अशी विचारणा समितीने केली असता लीज रेंट दर तीन वर्षाने ५ टक्के वाढणार आहे. या संदर्भात टेंडर काढले होते तसेच वेबसाईटवर सुध्दा टाकले होते. यामध्ये झोन चेंज करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. शासनाने झोन बदलून दिला होता असे विभागाकडून सांगण्यात आले परंतु त्यामुळे लोकांना न्यायालयात जावे लागले कारण क्रीडांगण असल्यामुळे या ठिकाणी हॉटेल करता येत नाही म्हणून शासनाने निकष बदलले असे समितीने निदर्शनास आणले असता याबाबतचा खुलासा करताना तत्कालिन क्रीडा संचालक यांनी सांगितले की, एकूण जी ३२ एकर जमीन आहे त्यापैकी ६ एकर जमीन दिली होती. ४०० खोल्यांचे बांधकाम करावयाचे होते. सप्टेंबर-ऑक्टोबर २००६ ला तत्कालीन विभागीय आयुक्त श्री. करंदीकर यांनी त्यावेळी प्रस्ताव तयार केला होता. तत्कालीन समितीने जो निर्णय घेतला त्याप्रमाणे याप्रकरणी कार्यवाही झाली आहे.

त्या ६ एकर जमिनीमध्ये एकच हॉटेल बांधले आहे की दोन हॉटेल्स बांधलेले आहेत ? तसेच हॉटेलच्या वापरात किती जागा आहे आणि हॉटेलच्या आजूबाजूला जे बांधकाम केलेले आहे त्याला महानगरपालिकेने मंजुरी दिलेली आहे का ? जागेचा जो नकाशा होता त्यामध्ये फेरबदल झालेला आहे. बेकायदेशीर बांधकाम झालेले आहे. तसेच ६ एकर जमिनीपैकी किती जमिन वापरात आहे, अशी विचारणा समितीने केली तत्कालिन क्रीडा संचालक व आयुक्त, पुणे यांनी सांगितले की, युनिटी इन्फ्रास्ट्रक्चरला काम दिले होते. ४०० खोल्यांपैकी काही

खोल्या थ्री स्टार आणि काही खोल्या फाईव्ह स्टार असे दोन भाग असल्याचे सांगितले. बिल्डिंगसाठी ६ एकर आणि पार्किंगसाठी साडेतीन एकर जागा असल्याचे सांगितले. मूळ प्रस्तावात ५ एकर जागा प्रस्तावित करण्यात आली होती, नंतर ती वाढवून ६ एकर करण्यात आली. पार्किंगसाठी २ एकर ऐवजी ३.५ एकर जागा देण्यात आलेली नाही. सर्व्हिस रोडमुळे प्रत्यक्षात जागा २ एकरपेक्षा कमी असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

आता हॉटेलच्या ताब्यामध्ये एकूण किती जागा आहे ?शासनाने ५ एकर ऐवजी ६ एकर जागा दिली. १ एकर जागा शासनाने वाढवून दिलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता हायवेला ७५ मीटर जागा सोडून बांधकाम केलेले आहे. तसेच मूळ टेंडरमध्ये ५ एकर जागा प्रपोझ केली होती. तत्कालीन कमिटीने वाटाघाटीने ५ एकरचे ६ एकर केलेले असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

टेंडर वेबसाईटवर टाकल्यानंतर नकाशामध्ये जागा कशी काय वाढू शकते ? महानगरपालिकेच्या नियमानुसार प्लॅन मंजूर झालेला आहे काय ? आजूबाजूला जे बांधकाम झालेले आहे ते महानगरपालिकेची मंजुरी घेऊन झालेले आहे काय ? तसेच तेथिल जागेच्या भाड्याचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले की, कोणतेही बांधकाम बेकायदेशीर नाही अशी शक्यता आहे. परंतु तरीही खात्री करुनच माहिती द्यावी लागेल, व तत्कालिन विभागीय अयुक्त यांनी सांगितले की, टेंडर काढले जाते त्यावेळी त्याला काही पर्याय लागू होतात. काही वेळा प्रिबीड मिटींग घेणे अनिवार्य असते. टेंडरच्या कंडिशनही बदलता येतात. हे बदल पुन्हा वेबसाईटवर किंवा ऑनलाईन कळविले जातात आणि त्या वेळेपासून पुढे निविदा भरण्यासाठी कालावधी दिला जातो. ही शासनमान्य पध्दत आहे.

या प्रकरणी विभागाने सांगितलेल्या माहिती प्रमाणेच ह्या सर्व गोष्टींची पूर्तता झालेली आहे काय ? अशी विचारणा केली असता तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी सांगितले की, प्रिबीड मिटींगमध्ये जे बदल झाले ते निविदाधारकांसाठी वेबसाईटवर टाकलेले होते. प्रिबीडची पध्दत फॉलो केलेली असल्याचे समितीस सांगितले. समितीने प्रिबीड मिटींगमध्ये किती लोक उपस्थित होते ? यावर विभागीय प्रतिनिधींनी १७ लोक उपस्थित होते. प्रत्येक ठेकेदाराला सर्व बदल कळविण्यात येतात. १७ लोकांना माहिती दिली होती. ज्या प्रमाणे बदल होतात त्याप्रमाणे टेंडर भरणे अपेक्षित असते असेही त्यांनी समितीला सांगितले.

ही सर्व जागा राज्य शासनाची आहे. क्रीडास्पर्धांसाठी तात्पुरत्या समित्या गठीत केलेल्या होत्या. या समित्यांना जागा लिजवर देण्याचे अधिकार दिलेले नव्हते. ५ एकर जागा वाढवून ती ६ एकर करण्याचे आणि २ एकर पार्किंगची जागा वाढवून ती साडेतीन एकर करण्याचे अधिकार या समित्यांना दिलेले नव्हते. क्रीडास्पर्धासाठी नेमलेल्या तात्पुरत्या समितीने हॉटेलसाठी ६० वर्षाच्या लिजने जागा देण्याचा निर्णय कसा काय घेतला ? राज्य शासनाच्या मालकीच्या जागेचा निर्णय ही समिती कशी काय घेऊ शकते ? दुसरे असे की, या समितीने घेतलेल्या निर्णयास शासनाने कशी मान्यता दिली ? ही जागा लिजने देण्याच्या बाबतीत नगरविकास विभागाची परवानगी घेतली होती काय ? या समितीच्या प्रश्नांना विभागाने कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे याबाबतची स्पष्ट माहिती समितीला मिळू शकली नाही.

समितीने यावर शासनाच्या, महानगरपालिकेच्या जागा ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता लिजने देता येणार नाहीत असा निर्णय हायकोर्टाने कोणत्या साली दिलेला आहे ? याची विचारणा केली असता शासनाच्या जागा शासनाने निर्धारित केलेल्या आहेत. या जागा डिस्पोझल रुल्सखाली वितरित केल्या पाहिजेत. जागा लिजने देण्याच्या बाबतीत ३० वर्षाची मर्यादा कोणत्या कारणामुळे घातली गेली याची कल्पना नसून डिस्पोझल रुल्स प्रमाणे जमीन वितरित केली पाहिजे हे सर्वसाधारण तत्व असल्याचे सांगितले.

क्रीडा संकूला संदर्भातील ही चर्चा बालेवाडीतील हॉटेलपुरती मर्यादित रहात नाही. कारण महानगरपालिका, राज्य शासन यांच्या जमिनी ९९ वर्षाच्या लिजवर देण्यासंबंधीचे प्रकरण कोर्टात गेले होते. त्या प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनी ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता लिजवर देऊ नयेत असा निर्णय कोर्टाने दिला आहे ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेची नियमावली ही हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे झाली होती. हायकोर्टाने २००७ मध्ये जमिनी लिजवर देण्याच्याबाबत निर्णय घेतला आहे व प्रत्येक संस्थेचे आपापले विक्रीचे नियम (रुल्स) आहेत. त्या नियमाप्रमाणे त्या त्या संस्थेने आपली मालमत्ता डिस्पोझ केली पाहिजे. पुणे महानगरपालिकेचे स्वतःचे नियम आहेत. लिज किती वर्षाची द्यावी, ॲलॉटमेण्ट कशी करावी यासंबंधी नियम आहेत. महसूल खात्याचे जमिन विक्रीचे नियम आहेत. त्या नियमाप्रमाणे जी काही प्रक्रिया असेल ती अनुसरली

पाहिजे. समितीने यावर सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या जागा किती वर्षाच्या लिजवर दिल्या जातात ? अशी विचारणा केली असता शैक्षणिक प्रयोजनासाठी शैक्षणिक संस्थेला १५ वर्षाच्या किंवा जास्तीत जास्त ३० वर्षाच्या लिजवर जमीन दिली जाते. पूर्वी ९९ वर्षाच्या लिजने जमिनी दिलेल्या असल्याची माहिती जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिली.

५ एकरची जागा वाढवून ती ६ एकर करणे, ती ६० वर्षाच्या लिजवर देणे हे निर्णय कोणी घेतले ? अशी समितीने विचारणा केली असता तत्कालीन समितीने हे निर्णय घेतले. कार्यकारी समितीने निर्णय घेतले, प्रस्ताव शासनाकडे पाठविला, शासनाच्या आढावा समितीमध्ये चर्चा झाली, चर्चेचे मिनिटस् उपलब्ध आहेत. त्या समितीमध्ये वित्त सचिव होते. त्यांना निविदा भरणा-या माणसाने देकार दिला होता, या सर्व बाबींना मंत्री मंडळाची मान्यता होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता यास मंत्रिमंडळाची मान्यता नव्हती असे विभागाकडून सांगण्यात आले.

ही फार मोठी प्रॉपर्टी होती. अशी बाब मंत्रिमंडळाच्या उप समितीकडे जात असते. त्यांना ८ एकर जागा दिली. त्यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता घेतली नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. पार्कीन्गसाठी ३ एकर जागा दिलेली आहे. ॲग्रीमेंट करताना ६ एकर जागा दिली त्यावेळी पार्कीन्गचा विषय नव्हता. हॉटेलबरोबर जो करारनामा झालेला आहे त्याची प्रत तसेच या जागेबद्दल झालेला एकूण पत्रव्यवहार, त्याची टेंडर प्रक्रिया, त्यासंदर्भात झालेले बिडींग तसेच त्यांना दिलेल्या सवलती याची एक नस्ती तयार करुन पंधरा दिवसात समितीला सादर करावी, असे निदेश समितीने विभागास दिले.

जे होस्टेल कम हॉटेल बांधलेले आहे त्या ठिकाणी आतापर्यंत कोणकोणत्या टीम्सची राहण्याची व्यवस्था केलेली आहे ? त्या हॉटेलमध्ये शासनाकडे किती खोल्या आरक्षित आहेत ? याबाबत विचारणा केली असता तत्कालिन क्रीडा संचालक यांनी सांगितले की, वर्षाला ३०० रुम आहेत. जेव्हा आंतरराष्ट्रीय स्पर्धा असते तेव्हा दोन बेडची एक खोली १ हजार रुपयांना मिळणार असून जेवढ्या स्पर्धा असतील तेवढ्या वेळा मिळणार आहे.

बालेवाडीला ज्या स्पर्धा होतात त्याकरिता होस्टेलच्या ५ इमारती बांधलेल्या आहेत. त्या ठिकाणी मध्यमवर्गीय खेळाडू राहतात. आता २३ राज्यातील खेळाडू आलेले असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता ज्यावेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धा असतात त्या वेळचा दर १ हजार रुपये

आहे. बाहेर हॉटेलचे दर खूप जास्त असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समिती समोर केला.

सन २००८ पासून हॉटेल सुरु झाले. त्यानंतर ३०० नाईट्स आरक्षणाचा उपयोग किती वेळा आणि कोणत्या कारणासाठी केलेला आहे. हॉटेलला मूळ किती जागा दिली, कोणकोणती बांधकामे झालेली आहेत, त्या कामांना महानगरपालिकेने मंजुरी दिलेली आहे का, कोणती कामे बेकायदेशीर आहेत या बाबतची माहिती समितीस देण्यात यावी असे आदेश समितीने संबंधितांना साक्षीच्या वेळी दिले.

विभागीय प्रतिनिधींनी निविदा प्रक्रियेचे समर्थन केले आहे परंतु महालेखाकारांनी एकूण निविदा प्रक्रिया कलंक लावणारी आहे असे म्हटले आहे. नेमके कोणत्या बाबतीत कलंक लावणारी प्रक्रिया झालेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता प्रधान महालेखाकार यांनी असे मत मांडले की, In Para 2.2.4.5 we have said, "In our opinion, opening of a single financial bid essentially means that the principle of competitive pricing is compromised." टेंडर प्रोसेस नियम के अनुसार नहीं हुआ है. ओपन टेंडरिंग होना चाहिए था, इसमें स्पर्धा होनी चाहिये थी. इसमें ऐसी बातें हुई हैं इसलिए ऐसा उल्लेख किया गया है. जो एन्युअल प्रीमियम देना चाहिये था वह भी नहीं दिया गया है. यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी बहुतांश सर्व ओपन निविदा प्रक्रिया शासनाच्या नियमानुसार झालेली असल्याचे सांगितले. यावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, The Finance department has said that there has been loss in this. शासन यह बात मान्य कर रहा है कि कॉन्ट्रॅक्ट ठीक प्रकार से नहीं दिये जाने की वजह से शासन को लॉस हुआ है.

तत्कालिन क्रीडा संचालक यांनी महालेखाकारांनी आर्थिक नुकसान झाल्याचा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे याबाबत माहिती देताना असे सांगितले की, ही मोकळी जागा होती. जमिनीचे मूल्यांकन करताना प्रती चौरस मीटर ७ हजार ४०० रुपये प्रमाणे करणे आवश्यक होते. प्रती चौरस मीटर ७ हजार ४०० रुपये प्रमाणे मूल्यांकन करण्याचे ठरविल्यास तो दर ५ हजार १८० रुपये येतो. असे असताना त्या जागेचे मूल्यांकन १० हजार रुपये प्रती चौरस मीटर या दराप्रमाणे काढलेले आहे. शासनाने सांगितले की, ही निवासी जागा आहे तथापि रेकॉर्डप्रमाणे ही निवासी जागा नसून मोकळी जागा आहे. लीजहोल्ड लँडची किंमत कमी

असते. त्यावेळी मूल्यांकन करताना जवळजवळ दुप्पट मूल्यांकन केलेले आहे त्यामुळे यामध्ये तोटा झालेला नाही.

जर ही निवासी जागा नाही तर निवासी जागा नसताना त्या जागेवर हॉटेल कसे काय बांधले ? या बाबतीत कोर्ट केस झाली. शासनाने या जागेचे झोनिंग बदलले आणि निवासी जागा केली असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता त्यानंतर कमर्शियल ॲक्टीव्हीटी म्हणून ही जागा रुपांतरीत केली आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

तत्कालीन मुख्य सचिव श्री. जॉनी जोसेफ यांनी या बाबतीत जे नोटींग केलेले आहे त्यावर तत्कालीन क्रीडा राज्यमंत्री यांनी जे रिमार्क दिलेले आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, (१) "प्रस्तुत प्रकल्प शासनाचे मान्यता / पूर्वपरवानगी शिवाय कार्यान्वित केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तरी देखील या बाबीवर शासन स्तरावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गांभीर्याने न घेता अप्रत्यक्ष समर्थन देऊन प्रस्ताव नियमित करण्याचा प्रकार केलेला दिसून येतो. (२) विभागीय आयुक्त व क्रीडा संचालक यांनी त्यांचे कार्यकक्षेबाहेर जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झाले आहे हे स्पष्ट होते. (३) वित्त विभागाने नमूद केलेले अपेक्षित मूल्य सदर जागेचे स्थलमहात्म्य विचारात घेता अतिशय योग्य आहे. वित्त विभागाचे अभिप्रायानुसार प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. ती तात्काळ करण्यात यावी. (४) राष्ट्रकुल स्पर्धांची तातडी, राहिलेला अपुरा कालावधी पाहता संबंधितांवर शासनाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन प्रस्ताव मान्य करण्याशिवाय पर्याय दिसून येत नाही." यावर ७ फेब्रुवारी, २००८ अशी तारीख लिहिलेली आहे. हे लक्षात घेता या बाबतीत कोणावर जबाबदारी निश्चित केली ? दरवर्षीचे जे भाडे द्यावयाचे आहे त्याची थकबाकी किती आहे आणि त्या कंपनीचे नाव काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता तत्कालिन क्रीडा संचालक यांनी सांगितले की, त्यावेळी युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना हॉटेल मंजूर केले होते व त्याचे श्री. किशोर अवस्थी मालक होते. त्यावेळी आयुक्त श्री. प्रभाकर करंदीकर हे होते आणि संचालक श्री. सी.के.अनील होते.

ज्यांना टेंडर दिले तीच कंपनी हे हॉटेल चालविते की त्यांनी सबलीज केले आहे ? असल्यास करारात तसे म्हटले आहे का ? तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता आयुक्त, क्रीडा, पुणे यांनी सांगितले की, या बाबतीत करार पाहून माहिती देता येईल. वार्षिक भाडे २ कोटी ५९ लाख रुपये आहे. त्यांनी चालू वर्षी

१ कोटी ३० लाख रुपये भरलेले आहेत. मागील थकबाकी नाही. चालू वर्षाच्या १ कोटी २९ लाख रुपयांबाबत त्यांना नोटीस दिलेली आहे. माहे २०१२-२०१३ ची थकबाकी १ कोटी २९ लाख रुपये आहे. सदर थकबाकीची त्यांनी दरमहा रक्कम द्यावयाचे आहेत की क्वार्टरली द्यावयाचे आहेत, अशी समितीने विचारणा केली असता याबाबत माहिती देताना विभागाने सांगितले की, दरमहा की तिमाही पैसे द्यावयाचे याबाबतीत स्पष्ट नमूद केलेला नाही.

थकबाकीची रक्कम कधी द्यायची याचा उल्लेख नाही म्हणजेच रक्कम कधीही दिली तरी चालते का ? दरमहा किंवा दर तीन महिन्यांनी रक्कम द्यावी अशी अट नसेल तर एका वर्षाची २ कोटी ५९ लाख रुपये एवढी रक्कम वर्षभर स्वत:कडे ठेऊन ३१ मार्चला चेक देऊ शकतात. सन २०१२-२०१३ या वर्षाची थकबाकी १ कोटी २९ लाख रुपये आहे. सन २००९-२०१० तसेच सन २०१०-२०११ मधील भाडे शिल्लक आहे काय ? या समितीच्या प्रश्नाला जानेवारी, २०११ पर्यंतचे सर्व भाडे भरलेले आहे. तेव्हाची थकबाकी नसल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

महालेखाकारांच्या अहवालामध्ये देय दि. १ नोव्हेंबर, २००९ यापुढे दि. १९ जानेवारी २०११ रोजी केवळ ५० लाख रुपये भरले असा उल्लेख आहे तसेच दि. १ नोव्हेंबर, २०१० यापुढे पैसे भरले नाहीत असा उल्लेख आहे. याचा अर्थ २००९ मधील जे पैसे राहिले होते त्याबद्दल एक पैशाचेही व्याज आकारलेले नाही ही बाब विचारात घेता यांचे लेखापरिक्षण कोण करतात ? याबाबतची माहिती मात्र समितीस मिळू शकली नाही. हॉटेलसमोर जो मोठा हॉल बांधलेला आहे तो कोणाच्या मालकीचा आहे ? कारण त्या ठिकाणी लग्नसमारंभ होतात. त्यातून जे उत्पन्न मिळते त्यातील काही रक्कम शासनाला मिळते का ? त्या ठिकाणी कमर्शियल ॲक्टिव्हिटीज करतात. त्याचा उल्लेख जागेच्या करारनाम्यामध्ये आहे का ? त्यांनी परवानगी घेऊन ते काम केले आहे का ? हॉटेलच्या समोर अर्धगोलाकार पध्दतीचा मोठा हॉल बांधलेला आहे. त्यांना दिलेल्या एफएसआयमध्ये तो हॉल बसतो का ? त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाडे घेतात त्यातील काही रक्कम शासनाकडे जमा होते का ? याबाबत समितीने विचारणा केली असता याबाबत एकच करारनामा केला आहे व कमर्शियल वापरासाठी अलाऊ केले आहे की नाही हे करार पाहून सांगता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच त्या हॉलचे बांधकाम कधी झाले, त्यासाठी महानगरपालिकेने मान्यता दिली आहे का ? १० हजार लोक बसू शकतील एवढा हॉल कोणाच्या कारकिर्दीमध्ये झाला, त्याला रीतसर

शासनाची परवानगी घेतली होती का ? महानगरपालिकेकडून नकाशा मान्य केला होता का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडून यासंदर्भात उत्तर प्राप्त झाले नाही.

हॉटेलने येथील क्रीडा नगरीची किती जागा ताब्यात घेतलेली आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले असे सांगितले की, शासनाच्या मोजणीप्रमाणे थोडी जास्त जागा घेतली असावी असे दिसते. हॉटेलला ६.१ एकर जागा दिलेली आहे. पार्कीन्गची जागा धरुन साडेनऊ एकर जागा येते. या बाबतीत हॉटेल मॅनेजमेंटचे अधिकारी मोजणी करुन उत्तर देणार आहेत, असा ही खुलासा सचिवांनी केला.

विभागीय प्रतिनिधींनी उपरोक्त दिलेल्या उत्तरासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, ज्यावेळी जागेची मोजणी शासनाकडून होते. संयुक्त मोजणी असल्यामुळे लोकांना हजर राहण्यास सांगितले जाते. मूळ नकाशा बघून मोजणी होते. परंतम हॉटेल मॅनेजमेंटने केलेल्या मोजणीवर विभागाने अवलंबून राहू नये कारण त्यांनी जर सांगितले की, त्यांच्याकडे ८ एकर जागा आहे तर ते विभाग मान्य करणार काय? जागेची मोजणी करणे हा राज्य शासनाचा अधिकार आहे. कारण ही जागा शासनाच्या मालकीची आहे. त्या ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे आणि हे सर्व संगनमताने केलेले आहे. सदर अतिक्रमण हे महानगरपालिकेची परवानगी न घेता केलेले आहे. या अतिक्रमणाकडे महानगरपालिकेने हेतूत: दुर्लक्ष केलेले दिसते. यामध्ये तर ब्रीच ऑफ कॉण्ट्रॅक्ट झालेला असेल तर लायसन्स रद्द करावे लागेल असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

हॉटेल मॅनेजमेण्ट कोणाची आहे ? हे हॉटेल फाईव्ह स्टार आहे की वनस्टार आहे कारण व्हॅल्यूएशन वनस्टार हॉटेल म्हणून झालेले आहे. हॉटेलमधील खोल्या या प्रत्यक्ष फाईव्ह स्टार हॉटेलचे रुम्स आहेत काय ? अशी ही विचारणा समितीने केली असता पी.डब्ल्यू. हायवे स्टार प्रा.लि. या कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर आहे, त्यांना याबाबत विचारणा करावी असे आयुक्त क्रीडा पुणे यांनी सांगितले.

या हॉटेलसंबंधी पहिल्या दिवसापासून ते आतापर्यंतची सर्व माहिती तसेच सदर कामात जी अनियमितता झाली आहे त्याची माहिती व शासनाच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणास कोण जबाबदार आहे ? अतिक्रमण १५ दिवसात हटविण्यात येईल काय ? याबाबतची माहिती समितीला १५ दिवसात देण्यात यावी असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

ऑर्चिड आणि विट्स हॉटेलची जागा कोणाची आहे ? व ७/१२ प्रमाणे जागा कोणाची आहे याबाबत विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी ही शासनाची जागा असून ती ६० वर्षाच्या लिजवर देण्यात आलेली आहे. संचालक, क्रीडा खात्याच्या मालकीची जागा असल्याचे समितीस सांगितले.

विभागाने पुरविलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विटस् हॉटेलच्या समोर बांधण्यात आलेल्या अर्धगोलाकार कन्व्हेन्शन सेंटरची पाहणी केली. ही पाहणी करीत असताना हॉलचे एका कार्यक्रमाचे भाडे ५ लाख रुपये घेतले जाते असे समितीने सांगितले. ऑर्चिड आणि विटस् हॉटेलचे प्रतिनिधी श्री. कामत यांनी ॲग्रीमेण्टमध्ये एक हॉटेल होते असे सांगितले. येथील जागेचा नकाशा, जागेची झालेली मोजणी, ॲग्रीमेंट, लिजरेण्ट याची सर्व माहिती समितीला उपलब्ध करुन द्यावी अशी समितीने सूचना केली.

हॉटेल ऑर्चिड आणि विटस् ही फाईव्ह स्टार आणि थ्री स्टार हॉटेल्स असून कागदोपत्री ती वन स्टार हॉटेल अशी दाखविण्यात आलेली आहेत असे करण्याची कारणे काय आहेत कारण फाईव्ह स्टार हॉटेलचा शासनाला मिळणारा कर आणि वन स्टार हॉटेलचा मिळणारा कर यामध्ये खूप फरक आहे. हॉटेलचे प्रकरण खूप गुंतागुंतीचे असून हॉटेलचे मालक आणि संबंधित खात्यांचे सचिव यांना एकत्र बोलावून सब कमिटीला माहिती घ्यावी लागेल असे मत समितीने व्यक्त केले. हॉटेलच्या बांधकामास महानगरपालिकेकडून परवानगी घेण्यात आलेली आहे अशी माहिती यावेळी समितीला देण्यात आली.

क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागीय आयुक्तांची समिती नेमली. या क्रीडा स्पर्धेसाठी केंद्र व राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिला. संयोजन समितीने सर्व निर्णय घेतले. क्रीडा संकुलामध्ये येणा-या खेळाडूंची, अन्य लोकांची राहाण्याची आणि खाण्या-पिण्याची व्यवस्था करण्यासाठी आयोजन समिती निर्माण करण्यात आलेली होती. हॉटेलच्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाची परवानगी घेण्यात आलेली नाही. कोणतीही जागा ३० वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या लिजवर देऊ नये असा शासनाचा दिनांक ९ ऑक्टोबर १९९९चा शासन निर्णय असताना देखील या हॉटेलसाठी ६० वर्षाच्या लिजने जागा देण्यात आलेली आहे असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून शासन निर्णयाच्या विरोधात जाणून असा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत काहीही माहिती समितीस देण्यात आली नाही.

या कन्व्हेन्शन सेंटरचे भाडे किती, आता पर्यंत हे सेंटर किती वेळा भाड्याने देण्यात आले, हे कन्व्हेन्शन सेंटर मुळात पुणे महानगरपालिकेची प्रॉपर्टी असताना येथे कमर्शियल ॲक्टिव्हिटीज सुरु करण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेतलली होती का अशी विचारणा समितीने केली असता मूळ ॲग्रीमेण्टमध्ये जागेचा वापर बाबीसाठी असावा असा कमर्शियल उल्लेख केलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

खेळाडूंच्या राहाण्याची सोय व्हावी यासाठी होस्टेल-कम-हॉटेल बांधण्याची मूळ संकल्पना होती. परंतु खेळाडूंसाठी चाळीसारखे बांधकाम करुन ठेवलेले आहे त्या ठिकाणी बाहेरुन येणारे खेळाडू राहतात असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून या हॉटेल मधील १०० खोल्यांचा होस्टेल म्हणून वापर करुन खेळाडूंसाठी त्या १०० ते ५०० रुपये भाड्याने द्यावयास पाहिजेत अशी समितीने सूचना केली.

क्रीडा संकुलाच्या मेण्टनन्ससाठी शासनाकडून १ कोटी ४० लाख रु. मिळतात. क्रीडा संकुलाचा भव्य परिसर लक्षात घेता ही रक्कम अपुरी असून ती ५ कोटी करण्यात यावी अशी समिती तर्फे शासनास शिफारस करण्यात येईल असे समितीने सांगितले. क्रीडा संकुलाचे उत्पन्न वाढण्यासाठी क्रीडा संकुल पाहाण्यासाठी येणा-या लोकांकडून काही शुल्क आकारावे जेणेकरुन त्यातून स्टाफचा खर्च तरी निघू शकेल अशी ही सूचना समितीने केली.

हॉटेलसाठी देण्यात आलेल्या ६ एकर आणि अडीच एकर जागेव्यतिरिक्त क्रीडा संकुलाच्या बाहेरील जागेवर हॉटेल कंपनीने अतिक्रमण केलेले आहे, हे खरे आहे काय ? असे समितीने विचारले असता या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी जागेची संयुक्त मोजणी व्हायची आहे असे समितीने सांगितले.

यानंतर समितीने ऑर्चिड हॉटेलची पाहणी केली. यावेळी हॉटेल मॅनेजर श्री. डिसोजा तसेच डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. अस्लम उपस्थित होते. समितीने ऑर्चिड हॉटेलमध्ये दिनांक ८.१.२०१२ रोजी ज्यांनी ज्यांनी वास्तव्य केले त्यांचे बिल दाखविण्यास सांगितले. समितीने विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना ऑर्चिड हॉटेल पुणे प्रा. लि.चे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. अस्लम यांनी समितीला सांगितले की, ऑर्चिड हे फोर स्टार हॉटेल आहे, हॉटेलमध्ये एकूण १२० रुम्स आहेत, हॉटेलमध्ये सूट-रुम नाही. रुमचे भाडे ३००० रुपये आहे. सिझनमध्ये भाडे ३५०० रुपयांपर्यंत जाते. ऑक्युपन्सी २० ते २२ टक्के आहे, हॉटेलमध्ये १ रेस्टॉरेंट आहे, जिम आहे. या ठिकाणी हेल्थ क्लबची सुविधा नाही. ५०० माणसे बसू शकतील

एवढा ६४०० चौ.फूटाचा मिटींग हॉल आहे व प्रिफंक्शन एरिया ३ हजार चौ.फूट आहे. ऑपरेटीव्ह रुम्स १२० आहेत. तर ऑर्चिड इमारतीमध्ये २०८ डबल रुम्स आहेत, ग्राऊंड फ्लोअरला २४९६ चौ.फूट, १४७२ चौ.फूट आणि २४९६ चौ.फुटाचे तीन हॉल आहेत, या कंपनीमध्ये एकूण ३५६ स्टाफ असून त्यापैकी ८६ ट्रेनिज आहेत. विटस् हॉटेलमधील ऑक्युपन्सी ३८ टक्के आहे, हॉल ऑक्युपन्सी ४० टक्के आहे. ओपन गार्डन लॉन २२ हजार चौ.फूट आहे, तेथे कोणतेही कार्यक्रम घेतले जात नाहीत. शासनाला वर्षाला ज्या ३०० रुम्स नाईट दिल्या जातात त्या ऑर्चिड हॉटेलमध्ये का दिल्या जात नाहीत अशी विचारणा केली असता क्रीडा संचालक यांनी सांगितले की, ऑर्चिड आणि विटस् या दोन्ही हॉटेलमध्ये ३०० रुम्स नाईट देऊ शकतात. समितीने या हॉटेलमधील एका रुममध्ये जाऊन पाहणी केली असता सर्व रुम्स सारख्याच साईजच्या असल्याचे समितीला सांगण्यात आले.

समितीने विचारलेल्या विविध प्रश्नांच्या संदर्भात माहिती देताना श्री. अस्लम यांनी सांगितले की, ऑर्चिड आणि विटस् या दोन्ही हॉटेल्सची मॅनेजमेण्ट आणि स्टाफ एकच आहे. ऑर्चिड आणि विटस् या दोन वेगवेगळया इमारती असून दोन्ही इमारतीमध्ये एक बेसमेण्ट आहे. दोन्ही इमारतींमध्ये वेगळे रेस्टॉरण्ट आणि रिसेप्शन काऊंटर आहे, विटस् इमारतीमध्ये २०८ तर ऑर्चिड इमारतीमध्ये २०२ अशा एकूण ४१० रुम्स आहेत, सूट रुम्स नाहीत. ऑर्चिड हे फोर स्टार तर विटस् हे थ्रीस्टार हॉटेल आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर हे सिझनचे महिने असतात. प्रिण्टेड दर ५५०० रुपये दाखविलेला आहे. वर्षभराचा ॲव्हरेज रुम रेव्हेन्यू १८०० रुपये आहे. हॉटेल २००८ साली सुरु झाले. ऑर्चिड हॉटेलची ७ मजली इमारत असून या इमारतीमध्ये २२० रुम्स आहेत. सध्या त्यापैकी ३ मजले आणि ९० रुम्स ऑपरेशनमध्ये आहेत. उर्वरित रुम्स सुरुवातीपासूनच प्रोजेक्ट कंडिशनमध्ये आहेत. विटस् हॉटेलची ७ मजली इमारत असून या इमारतीमधील ६ मजले ऑपरेशनमध्ये आहेत. विटस्मध्ये एकूण २०८ रुम्स असून सहा मजले आणि १०८ रुम्स ऑपरेशनमध्ये आहेत.

यानंतर समितीने ऑर्चिड हॉटेलमधील रेस्टॉरण्टची पाहणी केली. १०० व्यक्ती बसू शकतील इतकी रेस्टॉरण्टची क्षमता आहे असे यावेळी समितीला सांगण्यात आले. या रेस्टॉरण्टजवळील २ लिफ्टस् अजून इन्स्टॉल न केल्यामुळे बंद असल्याचेही सांगण्यात आले.

यानंतर समितीने ऑर्चिड हॉटेलमधील सहाव्या मजल्याची तसेच रुम क्रमांक १६२८ ची पाहणी केली. सहावा मजल्याचे फ्लोरिंग झालेले असले तरी मजला अनफिनिश्ड असल्याचे

तसेच रुम देखील सुसज्ज दिसून आली नाही. यानंतर समितीने रुम क्रमांक १६२३ ची पाहणी केली. सदर रुम वापरता येईल इतकी सुसज्ज ठेवण्यात आलेली होती. सर्व टॉयलेटरी प्रोडक्टस्सहीत बाथरुम वेल-मेण्टेण्ड असल्याचे दिसून आले.

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी समितीने क्रीडा संकुलातील गार्डनसाठी प्राप्त झालेल्या ६५ लाख रुपये खर्चाचा तपशील समितीला द्यावा, असे समितीने मागील बैठकीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले होते. तसेच, बॅडमिंटन हॉलच्या छताला छिद्रे पडलेली असल्याचे समितीला भेटीच्या वेळी आढळून आले होते.

आकस्मिकता निधीतून २५ कोटी १२ लाख रुपये आयोजन समितीला देण्यात आले होते. त्यांनी ही रक्कम खर्च केलेली आहे. त्यांनी खर्चाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या प्रमाणपत्र सादर केले म्हणजे विषय संपत नाही. आयोजन समितीकडून हिशेब आलेला नसल्यामुळे विभाग त्यावर जास्त भाष्य करु शकत नाही, असे उत्तर मागील बैठकीच्या वेळी विभागाकडून देण्यात आले होते.

आकस्मिकता निधीतून जो निधी घेतला तो निधी नंतर बजेटमधून ॲडजेस्ट झाला. ज्या रकमा खर्च करण्यात आलेल्या आहेत, त्यांचा हिशोब देण्यात आलेला नसल्यामुळे महानगरपालिकेचे अधिकारी ही सर्व परिस्थिती गृहित धरुन उत्तर देत आहेत, उप प्रश्नाला उत्तर मिळत नाहीत हे योग्य नसल्याची खंत समितीने व्यक्त केली. संबंधित अधिकारी जाणुनबजून उत्तर देण्याचे टाळत आहेत. त्यामुळे या प्रकरणी नाईलाजास्तव संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा किंवा काय अशी शिफारस समितीला शासनाकडे करावी लागेल असेही मत समितीने व्यक्त केले.

अनेक कामांची निविदा काढण्यात आली नाही. क्रीडा स्पर्धाची गरज लक्षात घेऊन ही कामे करण्यात आले असे मागील बैठकीत सांगण्यात आले होते. ही कामे लवकर करावयाची असल्यामुळे ती कामे विभागून द्यावयास पाहिजे होती. एक काम दहा लोकांना दिले असते तर ती कामे लवकर होऊ शकली असती असे समितीला वाटते.

शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे या विषयाबाबत तीन ते चार वेळा चर्चा झाली असून संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर उत्तर समितीला मिळत नाही. त्यामुळे लोकलेखा

समिती यासंदर्भातील अहवाल या अधिवेशनात विधिमंडळास सादर करणार आहे. या विषयाच्या अनुषंगाने दहा बैठका झाल्या तरी अधिकाऱ्यांकडून उत्तर मिळत नाही. महालेखाकार कार्यालयाने लेखापरिक्षण करण्यास सांगितले आहे. पंरतु कोणतीच कार्यवाही वेळेत पूर्ण होत नाही याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली.

यावर प्रधान महालेखाकार यांनी We had demanded for vouchers of concerned amount. But they have not produce it before us. The Finance Department's GR for the year 1983 and the provisions of the State Budget Manual regarding expenditure from contigency fund have not been followed. If the provisions of these had been followed the details of expenditure and related papers and documents like vouchers would then have been available with the Director of Sports and Youth Services and would then had been produced to us for audit. असे समितीच्या निदर्शनास आणले.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ या अहवालातील पायाभूत नागरी सुविधा यामध्ये नमूद केले आहे की, नियोजन आयोगाने जवाहर नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाद्वारे क्रीडा स्पर्धांशी संबंधित पायाभूत नागरी सुविधा प्रकल्पांसाठी लागणाऱ्या निधीला ऑक्टोबर, २००६ मध्ये मंजुरी दिली असताना कार्यादेश देण्यास १५ महिन्यांचा कालावधी लागला याबाबतची कारणे काय आहेत ? यासंदर्भात मागिल बैठकीत जे उत्तर दिले, त्या उत्तराने समितीचे समाधान झालेले नाही. क्रीडा स्पर्धाची कामे लवकरात लवकर करावयाची असताना कार्यादेश देण्यास १५ महिन्यांचा कालावधी का लागावा याचे समाधानकारक उत्तर समितीला मिळू शकलेले नाही आहे ? त्यामुळे समितीला निश्चित निष्कर्षाप्रत येता आलेले नाही.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाद्वारे (JNNURM) कामे करण्यात येत असताना काही ठिकाणी रस्त्यावरील फूटपाथ व डक तयार करावयाचे होते. परंतु रस्ता तयार करण्यात आल्यावर परत तो खोदून फूटपाथ व डक तयार करण्यात आले आहेत. ही कामे अगोदर करावयाची आहे हे कार्यकारी अभियंता यांच्या लक्षात आले नव्हते काय ? परत रस्ता खोदण्यात आल्यामुळे त्या कामावरील खर्चात वाढ झाली आहे. नियोजनाच्या अभावामुळे हा पैसा वाया गेलेला आहे. अंदाजे पाच कोटी रुपयांची कामे करावयाची होती त्यामध्ये फूटपाथ, डक, पाण्याची लाईन, गटार, एमएसईबीची लाईन हे कामे

करण्यात येणार होती. परंतु परत रस्ता खोदण्यात आल्यामुळे या पाच कोटी रुपयांच्या कामासाठी ६ ते ७ कोटी रुपयांचा खर्च आलेला आहे. यासाठी महानगरपालिका आयुक्त जबाबदार नाहीत काय ? असा खर्च वाढविण्यासाठी कोण अधिकारी जबाबदार आहे ? अशी समितीने विभागाकडे विचारणा केली असता आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले की, त्यावेळेस युटीलीटीज्ची मॅपींग झाली नव्हती. रस्ता तयार केल्यानंतर फूटपाथ व डक टाकावयाचे आहे हे नंतर लक्षात आल्यामुळे रस्ता खोदून ते टाकण्यात आले आहेत. या कामासाठी फक्त ३४ लाख रुपयांचा जास्तीचा खर्च आलेला आहे. तो खर्च कंत्राटदाराने केलेला आहे. शासनाचा खर्च वाया गेलेला नसून कंत्राटदाराचे ३४ लाख रुपये वाया गेले आहेत असे समितीला सांगितले.

पुणे महानगरपालिकेने सन २००७-२००८ या वर्षाच्या महानगरपालिकेच्या दर पत्रकाच्या आधारे सर्व घटकांचा समोवश असलेला सुधारित आराखडा अतिरिक्त अर्थसहाय्यासाठी केंद्र शासनाकडे डिसेंबर, २००७ मध्ये सादर केला असताना केंद्र शासनाची मंजुरी मिळण्यास ८ महिन्यांचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ? या प्रश्नाचे उत्तर देताना आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी असा खुलासा केला की, जानेवारी नंतर ऑगस्ट महिन्यात या कामांना मंजुरी मिळाली आहे. हा विलंब केंद्र शासनाकडून झालेला आहे. यासंदर्भातील पार्श्वभूमी अशी आहे की, पहिल्यांदा रिव्हाईज डी.पी.आर करण्यात आला, त्यांची छाननी करुन शासनाने तो जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत (JNNURM) निधीसाठी नागरी परिवहन सेवेकडे मंजूरीसाठी पाठविला. त्यानंतर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्यासंदर्भात बैठक झाली होती. त्या बैठकीत सीएसएमसीला मंजुरी देण्यात आली होती. विभागाकडून विलंब झालेला नाही. ऑक्टोबर ते जानेवारी एवढाच विलंब झालेला आहे. एमएमआरडीए मार्फत शासनाची मंजूरी घेऊन तो प्रस्ताव सीएसएमसीकडे पाठविण्यात आला होता. प्लॅन रिव्हाईज करण्यासाठी फक्त चार महिन्याचा विलंब झालेला आहे असे समितीला सांगितले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) आणि पुणे महानगरपालिका (पीएमसी) यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल व सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल अनुक्रमे डिसेंबर, २००७ आणि ऑगस्ट, २००८ मध्ये मंजुर करण्याची कारणे काय आहेत ? जेएनएनयूआरएम अंतर्गत केंद्र शासनाकडून ८ महिन्यांचा विलंब झालेला आहे. त्याच प्रमाणे राज्य सरकारकडून किती

महिन्याचा विलंब झालेला आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागाकडून असे सांगण्यात आले की, राज्य सरकारने ही कामे ऑक्टोबर, २००८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले होते. परंतु दरम्यानच्या काळात डीएसआर मध्ये बदल झाल्यामुळे प्लॅन रिव्हाईज करावा लागला. प्रकल्प अहवाल सुधारित करण्यासाठी केंद्र शासनाकडे विलंब झाला. सुरुवातीला २७६ कोटी रुपयांचे कामे होती, ॲडीशनल आयटम ॲड झाले तसेच डीएसआरमध्ये वाढ झाल्यामुळे ४३४ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

महानगरपालिकेने जी कामे गृहित धरली होती त्या कामांसाठी पाच ते सहा महिन्यांचा विलंब झालेला आहे. पाच ते सहा महिन्यात डीएसआर वाढला आहे काय ? या कामाचे रिव्हाईज अंदाजपत्रक करतांना ४० ते ५० टक्के दर वाढवून ही कामे केली आहेत. जेएनएनयूआरएमकडून मंजुरी आल्यानंतर डीएसआर मध्ये ४० ते ५० टक्के वाढ झाली आहे काय ? दरवर्षी डीएसआर मध्ये २,४,५ टक्के वाढ होते. महागाईप्रमाणे सदर रेट वाढत असतात. समजा एका कामासाठी एक लाख रुपये लागत असतील तर डीएसआर वाढल्यामुळे त्या कामाला जर दीड लाख रुपये लागले तर सरळ सरळ डीएसआर मध्ये ५० टक्के वाढ इ ाली असे गृहित धरावे लागेल. त्यामुळे डीएसआर मध्ये ४० टक्के वाढ झाली किंवा कसे ? कारण डीएसआरमध्ये १५ टक्केपेक्षा जास्त वाढ होत नाही. एक लाखाचे काम एक लाख १५ हजार रुपयांवर गेले तर ते समिती समजू शकते. पंरतु पाच ते सहा महिन्यात एक लाखाचे काम दीड लाखावर जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी असा खुलासा केला की, यामध्ये १८ कामांचा समावेश होता. १८ कामांवर ४२९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. त्यापैकी २८ कोटी रुपये एस्कलेशन झाल्यामुळे अतिरिक्त खर्च झालेले आहेत. हा खर्च १० टक्क्याच्या आत आहे. सन २००६-०७ चा डीएसआर न वापरता सन २००७-०८ चा डीएसआर वापरण्यात आलेला आहे. २८ कोटी रुपये एस्कलेशन अमाऊंट आहे. कन्सल्टन्सी चार्जेस १० कोटी रुपये असून इतर कम्पोनंट ४५ कोटी रुपये आहे. महापालिकेमध्ये स्थायी समितीची परवानगी घेऊन कन्सल्टंटची शॉर्ट लिस्ट तयार केली जाते. ही कामे शॉर्ट लिस्टेड कन्सल्टंटस्ना देण्यात आली होती. यावर समितीने कन्सल्टंटची नेमणूक करताना टेंडर मागविले जाते. अशा प्रकारच्या कामांसाठी शार्ट लिस्टेड कन्सल्टंट नियुक्त केला जात नाही असे सांगितले असता विभागीय प्रतिनीधींनी शॉर्ट लिस्टेड कन्सल्टंटस्कडून "Expression of Interest" मागवितो. ज्या कन्सल्टंटस्चे लोएस्ट रेट

असतात त्यांना आपण वार्षिक कामांच्या लिस्टमधून रोटेशन प्रमाणे कामे देतो असे समितीस सांगितले. समितीने यावर महानगरपालिकेचे किती कन्सल्टंटस् आहेत ? अशी विचारणा केली असता महानगरपालिकेने १४-१५ कन्सल्टंटस्चे एम्पॅनलमेंट केलेले आहे. वृत्तपत्रात जाहिरात देतो आणि लोएस्ट दरानुसार महानगरपालिकेच्या कन्सल्टंटस्ना कामे देतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

महानगरपालिकेने अंदाजपत्रक तयार करुन केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. एकूण किती रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते असे समितीने विचारले असता सुरुवातीला ४७६ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते. सुधारित अंदाजपत्रक सादर केल्यानंतर ४३४ कोटी रुपये मंजूर झाले होते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. हा दरामधील फरक नसून मंजुरीच्या किमतीमधील फरक आहे. डीएसआर नुसार टेंडर काढल्यानंतर ते डीएसआरच्या ३०-४० टक्के जास्त दराने दिले गेलेले आहे असे मत समितीने नोंदविले असता केंद्र शासनाकडून ४३४ कोटी रुपये मंजूर झाले होते. परंतु फायनल टेंडर अमाऊंट ४२९ कोटी रुपये असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

एखाद्या कामाचे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर ते केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर केले जाते. परंतु केंद्र शासनाने ते रिव्हाईज करण्यास सांगितले. रिव्हाईज अंदाजपत्रक सादर केल्यानंतर केंद्र शासनाने ४३४ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. विभागाने ते टेंडर अगोदर काढले होते. प्रत्येक वर्षी डीएसआरमध्ये किती टक्के वाढ होते अशी विचारणा समितीने केली त्यावर प्रत्येक वर्षी डीएसआरमध्ये साधारणत: ८ ते १० टक्क्याने वाढ होते. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

त्यावर समितीने एकूण ४३४ कोटी रुपये मंजूर झाल्यानंतर कामाचा कॉन्टम वाढला. परंतु एस्कलेशन १० टक्क्यापेक्षा जास्त होते अशी विचारणा केली असता २८ कोटी रुपये एस्कलेशन अमाऊंट असून ती १० टक्क्याच्या आत असल्याचे विभागीय प्रतिनिधी यांनी समितीस सांगितले.

डीएसआर नुसार टेंडर काढल्यानंतर महानगरपालिकेच्या प्रचलित पद्धतीनुसार १०-२० टक्के कमी दराने टेंडर दिले जाते. १०-२० टक्के कमी दराने टेंडर पास व्हावयास पाहिजे होते. परंतु ते डीएसआरच्या २०-२५ टक्के जास्त दराने पास करण्यात आलेले आहे असे

समितीने मत व्यक्त केले असता त्यावर विभागीय प्रतिनिधींनी ४३४ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट ४२९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. टर्मिनलची ५ कामे पूर्ण झालेली नाहीत असे समितीस सांगितले त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जी ५ कामे पूर्ण झालेली नाहीत त्या कामांवर किती रक्कम खर्च करायची होती आणि ती रक्कम त्या कामांवर का खर्च होऊ शकली नाही अशी विचारणा समितीने केली असता यावर आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी असे सांगितले रामवाडी जकात नाका ते विमानतळ या रस्त्याच्या कामाचे १२ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते आणि ११.७९ कोटी रुपये टेंडर रक्कम होती. संचेती हॉस्पिटल ते युनिव्हर्सिटी चौक या रस्त्याच्या कामाचे ३४ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक होते आणि ३८ कोटी रुपये टेंडर रक्कम होती. हॉटेल ग्रीन पार्क ते बालेवाडी या कामाचे ५५.६९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक हाते आणि ६२.९८ कोटी रुपये टेंडर रक्कम होती. काही ठिकाणी जास्त दराने तर काही ठिकाणी कमी दराने कामे दिलेली आहेत. ४३४ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट ४२९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

जी कामे हाती घेण्यात आली होती त्यातील काही कामे लँड ॲक्विझीशनमुळे काही कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. त्याबाबतीत एसएलए हे एमएमआरडीएला रिपोर्ट करतात. एमएमआरडीएचे अधिकारी महिन्यातून जागेला भेट देतात. त्या प्रमाणे ते एनओसी, ओसी रिअेंबर्समेंटसाठी पाठवितात असे आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका समितीस सांगितले.

हॉटेल ग्रीन पार्क ते बालेवाडी रस्त्याचे ५५ कोटी रुपयांचे काम ६२ कोटी रुपयांना देण्यात आले होते. हे काम ६२ कोटी रुपयांमध्ये पूर्ण झालेले आहे काय अशी विचारणा केली असता याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी यामध्ये एस्कलेशन अमाऊंट ४ कोटी रुपये आहे आणि १.९ कोटी रुपये कन्सल्टन्सी चार्जेसचे आहेत. ६२.९८ कोटी रुपयांच्या कामापैकी ६१.९ कोटी रुपयांचे काम झालेले आहे आणि १ कोटी रुपये शिल्लक राहिलेले आहेत अशी माहिती समितीस दिली.

बाणेर रस्ता किंवा पाषाण रस्त्याच्या कामाचे ज्या प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते त्या प्रमाणे कामे झालेले नाही. ज्या ठिकाणी काँक्रीटीकरणाचे रस्ते करायचे होते तेथे डांबरीकरणाचे रस्ते करण्यात आलेले आहेत, तसेच बाणेर रस्त्याचे ७५ टक्के काम डांबरीकरणाचे आणि २५ टक्के काम काँक्रीटीकरणाचे झालेले आहे अशी विचारणा समितीने केली असता यावर विभागीय प्रतिनिधींनी कमी जास्त सेव्हींग करण्याचे अधिकार कार्यप्रमुखाला

असतात. यासाठी इंटरनल आणि थर्ड पार्टी आडीट आहे. एमएमआरडीए खात्री केल्याशिवाय केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवित नाही. बाणेर रस्त्याचे संपूर्ण काम काँक्रीटीकरणाचे झालेले असून फक्त चौकात डांबरीकरण करण्यात आलेले आहे. बाणेर रस्त्याचे ८० टक्क्यापेक्षा जास्त काम काँक्रीटीकरणाचे झालेले आहे.

कन्सल्टंटच्या नेमणुकीसाठी १० कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. त्यावेळी जी कामे घेण्यात आली होती त्या कामांसाठी किती कन्सल्टंटस् नियुक्त करण्यात आले होते ? यासंदर्भात विचारणा केली असता कन्सल्टंटच्या नेमणूकीसाठी १० कोटी रुपये नसून एकूण कन्सल्टंट चार्जस १० कोटी रुपये असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

यावर प्रधान महालेखाकार यांनी The delay happend because of non-planning of works and Consultants. In these work there was a delay because of Consultant. There is also a price variation in consultancy Charges. Therefore the escalation in consultancy charges is also irregular असे समितीस सांगितले.

यावर विभागीय प्रतिनिधींनी एस्कलेशन उसको मिलना नही चाहिए असे मत व्यक्त केले.

कन्सल्टंटना सर्व माहिती असते. त्यांनी ज्या गाईडलाईन्स दिल्या होत्या त्यानुसार वेळेत काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते. परंतु काही कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत. त्यासाठी संबंधित यंत्रणा जबाबदार आहे. त्याच प्रमाण त्यासाठी कन्सल्टंट सुध्दा जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून दंड आकारावयास पाहिजे होता असे मत समितीने व्यक्त केले असता यावर आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले की, याबाबतची माहिती उपलब्ध नाही. यासाठी कन्सल्टंट यांना कसे काय जबाबदार धरणार. युटीलिटीजच्या संदर्भात महानगरपालिकेचे अधिकारी माहिती देऊ शकतात. परंतु याबाबतची माहिती महानगरपालिकेकडे आता उपलब्ध नसल्याचे देखील त्यांनी सांगितले त्यावर कन्सल्टंटची नेमणूक महानगरपालिकेने केलेली आहे. त्यामुळे त्यांना कसे काय जबाबदार धरणार, असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगणे योग्य नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता यावर युटिलिटीजचे प्लॅनिंग महानगरपालिकेकडे नव्हते. काही ठिकाणी लँड ॲक्विझीशनचे इश्यू आहेत. त्यामुळे विलंब झालेला आहे. तसेच संरक्षण विभागाची जमिन मिळाली नाही त्यामुळे कामे अपूर्ण राहिली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यावेळी कामे प्रस्तावित करण्यात आली त्यावेळी अशा प्रकारची अडचण येऊ शकते. संरक्षण विभागाची किंवा खाजगी जागा लवकर मिळत नाही, हे माहिती असताना सुध्दा विभागास कामे प्रस्तावित करणे हे चुकीचे नाही काय असे मत समितीने व्यक्त केले असता त्याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या ताब्यात जागा असते आणि मगच काम घेण्यात येतात असे नाही. १८ कामे ९ महिन्यात पूर्ण केलेली आहेत. गेम्स सुरु होण्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. बस डेपो आणि रेल्वे स्टेशनला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे लवकर पूर्ण केलेली असल्याचे समितीस सांगितले.

"ठेकेदाराची कार्यसिद्धक्षमता वाढविण्याकरिता कार्यसिद्धी अग्रीम रक्कम ५ टक्के वरुन १० ते १५ टक्के देण्याचा निर्णय घेण्यात आला. "कार्यसिद्धी अग्रीम रकमेची १०० टक्के वसुली द.सा.द.शे. १० टक्के व्याज दराने ठेकेदाराच्या चालू देयकामधून करणेत आली." असे स्पष्टिकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे. याचा अर्थ काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले की, महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, ५ टक्के ऐवजी १० ते १५ टक्के अग्रीम रक्कम दिलेली आहे. ठेकेदारास ५ टक्के अग्रीम रक्कम देणे अपेक्षित होते. परंतु १० टक्के अग्रीम रक्कम दिलेली आहे. ६ कामांसाठी १० टक्के अग्रीम रक्कम दिलेली आहे. आपण त्यांच्याकडून व्याजाची रक्कम वसूल केलेली आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत राष्ट्रकुल स्पर्धांकरिता उपयुक्त असलेली अर्ध्यापेक्षा जास्त कामे पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली ? व ज्या अधिकाऱ्यांनी संबंधित एजन्सीला ही कामे दिली होती त्या ऐजन्सीने वेळेत कामे केली नाहीत तर त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे. अशी विचारणा समितीने विभागाकडे केली असता राष्ट्रकुल युवा स्पर्धांकरिता उपयुक्त असलेल्या कामांमध्ये विमानतळ ते बालेवाडी व रेल्वे स्टेशन ते बालेवाडी क्रीडा संकुल यांना जोडणाऱ्या मार्गावरील कामे स्पर्धेपूर्वी पूर्ण करण्यात आली आहेत. ही कामे करतांना ज्या अडचणी आल्या त्यातून मार्ग काढून कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २००६ मध्ये कामाचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी दोन्ही महानगरपालिकांचे आयुक्त उपस्थित होते अशी माहिती विभागाने दिली.

बाणेर, रामवाडी जकात नाका ते विमानतळ तसेच संचेती हॉस्पीटल ते युनिव्हर्सिटी चौक या रस्त्यांची कामे बोगस झाली आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता रामवाडी जकात नाका ते विमानतळ या रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. या रस्त्याचा वापर सुरु करण्यात आला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

बालेवाडीच्या रस्त्यावर अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. या रस्त्याचे १०० टक्के काम झालेले नाही. रस्त्याला साईड पट्टी मारणे आवश्यक आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले व हॉटेल ग्रीन पार्क ते बालेवाडी या दरम्यानच्या रस्त्याची किती टक्के जागा महानगरपालिककेच्या ताब्यात आलेली नाही अशी विचारणा केली असता दोन ठिकाणच्या जागा महानगरपालिकेला मिळालेल्या नाहीत. त्या जागा गावठाण एरियाच्या आहेत, तेथील लोक त्या जागा देण्यास तयार नसल्याचे विभागाने सांगितले. तथापि, तेथील लोक जागा देण्यास आता तयार आहेत. महानगरपालिकेकडून त्या लोकांना जागेच्या बदल्यात टीडीआर मिळालेला नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनशस आणून दिले.

समितीने बाणेर रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तेथील घरांचा सर्व्हे केला आहे. बाणेर रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बसेस, टॅक्सी उभ्या राहत आहेत. तेथील रस्ता पूर्ण अडविला जात असून वाहतुकीस मोठी अडचण निर्माण होते. त्यामुळे तेथील रस्त्यांचे लवकरात लवकर रुंदीकरण करणे आवश्यक असल्याचे सांगितले असता रस्त्यावर वाहने उभी न करु देण्याची जबाबदारी वाहतूक विभागाची आहे. सन २००८ व २००९ मध्ये तेथील रस्त्याची कामे पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती विभागाने समितीस दिली.

कंत्राटदाराने जेवढे काम केले तेवढ्याच कामाचे देयक डीएसआर प्रमाणे देण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

समितीने कोथरुड येथील बस स्थानक व तेथील रस्त्याचे काम अंत्यत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. तेथील रस्त्यासाठी १५ लाख रुपयांचा खर्च करुनही शून्य टक्के रस्ता झालेला आहे. कोथरुडचे बसस्थानक करावयाचे असून त्या बसस्थानकाचे काम विकसित करण्यात आले नाही. त्या डेपोचे काम पूर्ण करण्यात आले नाही अशी विचारणा केली असता जी कामे पूर्ण झाली आहेत त्यांची यादी आहे, कोथरुड डेपो वाहनतळ विकसित करण्यात आला आहे. नियोजित आराखड्याप्रमाणे काम करण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीने सांगितले.

बालेवाडी येथील कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदाराच्या माध्यमातून केलेली आहेत. ही सर्व कामे अद्ययावत आहेत काय ? वाहनतळाचे काम करतांना डीएसआरमध्ये वाढ झाली होती काय ?

असे समितीने विभागास विचारले असता १२ पैकी ७ वाहनतळ विकसित करण्यात आले आहेत. पाच वाहनतळ विकसित झाली नाहीत. जी सात वाहनतळे विकसित झाली त्यामध्ये कोथरुड डेपो वाहनतळाचा समावेश आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

कोथरुड डेपो वाहनतळाचे काम करताना तेथे १०० वाहने उभी रहावीत या पध्दतीने ते विकसित करावयाचे होते. येथील काम जवळपास २५ टक्के झाले असावे. कामे अपूर्ण असून देयके पूर्ण देण्यात आली आहेत. यासंदर्भातील सर्व लेखी माहिती समितीला दोन तासात सादर करण्यात यावी. बाणेर रोडचे काम अपूर्ण आहे. हे काम करतांना एक कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी ही सर्व कामे वेगवेगळी करण्यात आली असून दिनांक २३ मे २००८ पर्यत पूर्ण करावयाची होती अशी माहिती समितीस दिली. तसेच ७० लाख रुपयांमध्ये सिमेंट रस्ता करावयाचा होता. या कामाच्या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे आश्वासन दिले.

संबंधित ठेकेदार राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, २००८ पूर्वी रस्त्याच्या कडेने विविध प्रकारच्या युटिलिटी लाईन्स टाकून त्यावर फुटपाथ करण्याचे काम पूर्ण करण्यास अपयशी ठरण्याची कारणे काय आहेत ? कामांची यादी देऊन ठेकेदाराने कामे पूर्ण केली तर रु३४.३५ लाख वसूल करण्याचे कारण काय आहे ? पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी बाह्य कामांचा पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. पीएमसीने पुर्वगणनपत्रकामधील आयटमच्या २५ टक्के परिणाम वाढीपर्यंत होणाऱ्या कामाचे देयक निविदा अटी व शर्तीनुसार व निविदा दराने देणे ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यानुसार अनुज्ञेय असल्याने निविदा व्यतिरिक्त बाबींची देयके निविदा दराने देणे उचित नव्हते. त्यामुळे मनपाच्या धोरणानुसार निविदा व्यतिरिक्त बाबींची रक्कम सबंधित ठेकेदारास अदा करण्यात आली आहे, ही रक्कम अदा करण्याची कारणे काय याबाबत समितीने विचारणा केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, हा प्रश्न अबोव्ह टेंडरचा आहे, २५ टक्के वाढीपर्यंत संबंधित ठेकेदारास काम देण्यात आले असून मनपाच्या धोरणानुसार निविदा व्यतिरिक्त बाबींची रक्कम ठेकेदारास देण्यात आली आहे. निविदेमधील दर हा एस्टीमेट केलेल्या दरापेक्षा जास्त आहे.

अशा वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शेड्युल्ड रेट प्रमाणे कंत्राटदारांना पेमेंट अदा करतो.

समितीने यावर टेंडरमधील रेट नुसार आणि अटी व शर्तीनुसार कामे व्हावयास पाहिजे होती. अतिरिक्त रक्कम देण्याची आवश्यकता नव्हती असे मत व्यक्त केले असता त्याबाबत खुलासा करताना एखाद्या कामासाठी टेंडर मध्ये १०० क्युबिक मीटर प्रमाणे दर दिला असता तर त्या कामाच्या संदर्भातील निविदा १२७ क्युबिक मीटर पर्यत आपणाला ते मान्य करता येते. प्रत्यक्षात १२५ क्युबिक मीटरपर्यत अबोव्ह निविदा मान्य करता येतात. परंतु १२७ रुपयांची निविदा आली तर अतिरिक्त निधी महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात येतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

निविदेत १०० क्युबिक मीटर नमूद केले असून १२५ क्युबिक मीटरची निविदा आली तर २५ टक्के जास्त पेमेंट देण्यास अडचण नाही. पंरतु सदर निविदा १२७ क्युबिक मीटर पर्यंतची आली तर पेमेंट करण्याचा प्रश्न निर्माण होतो. असे पेमेंट करण्याची तरतूद नियमात आहे. प्रत्यक्षात काम करीत असतांना दोन क्युबिक मीटरने वाढ झाली तर दोन क्युबिक मीटरच्या कामाचा पेमेंटचा हा प्रश्न आहे. अशा अपवादात्मक परिस्थीत पेमेंट कसे करावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळेस आपण आतापर्यत ॲडॉप्ट केलेली प्रॅक्टीसप्रमाणे आपण त्यांना शेड्युल्ड दराने पेमेंट करतो. हा अतिरिक्त पैसा महानगरपलिकेने अदा करावयाचा असतो. अशाप्रकारे जर अबोव्ह किंमतीचे टेंडर असेल तर आपण त्यांना शेड्युल्ड दराने ॲडीशनल पेमेंट करतो. या केसमध्ये देखील आपण त्यांना शेड्युल दरानेच पेमेंट केलेले आहे. कंत्राटदाराच्या मागणीला आपण प्रतिसाद दिलेला नाही. मागणी प्रमाणे कामे करण्यात आली आहेत असेही सचिवांनी समितीला सांगितले.

निविदेमध्ये जास्तीत जास्त १० टक्के वाढ गृहित धरण्यात येते व ती मान्य करण्यात येते, २५ टक्के वाढ होणे योग्य नसल्याबाबत समितीने सांगितले असता टेंडर मधील एखादा आयटम डीएसआर प्रमाणे वाढला असेल तर तो २५ टक्केच्या वर जाऊ शकतो. त्यामुळे डीएसआर प्रमाणे कार्यवाही केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरण दिले.

वर्क ऑर्डर काढल्यानंतर अंदाजपत्रकामध्ये वाढ केली जाते. हा प्रकार येथे सुध्दा दिसून येतो. एकूण किती कामे घेण्यात आली होती, किती ठेकेदारांना कामे दिली होती आणि त्यामध्ये किती रक्कम जास्त गेलेली आहे ? ४७६ कोटी रुपयांचे टेंडर असताना ४३४ कोटी

रुपयांची कामे केलेली आहेत. निविदा रकमेच्या आत कामे केलेली आहेत. कोणतेही काम वाढीव दराने दिलेले नाही, असे आयुक्तांचे म्हणणे आहे. उत्खननाचे काम असेल तर त्यामध्ये फेरफार होऊ शकतो. परंतु इतर कामांमध्ये ९९ टक्के फेरफार होत नाही अशी विचारणा समितीने केली असता उत्खननाच्या संदर्भात १० क्युबिक मिटर गृहीत धरले असेल तर १२.५ क्युबिक मिटर पर्यंत वाढीव दर देता येतो. उर्वरित २.५ क्युबिक मीटरसाठी आपण डीएसआर प्रमाणे दर देतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

ठेकेदार पैसे कमविण्यासाठी काम करतात. परंतु लूपहोल्स असल्यामुळे ठेकेदाराला मदत होते.

सन २००८ मधील कामे सन २०१०-११ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत. या कामांचे पेमेंट सन २०१२ मधील डीएसआर प्रमाणे करण्यात आलेले आहे काय ?

सन २००८ मध्ये डीएसआर काय होता आणि आता डीएसआर काय आहे अशी विचारणा समितीने केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी डीएसआरमध्ये प्रत्येक वर्षी साधारणत: ८ ते १० टक्क्याने वाढ होते. सन २००८ ते २०१२ या कालावधीत डीएसआरमध्ये साधारणत: २५ टक्क्याने वाढ झालेली असल्याचे सांगितले.

विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या उत्तराने समितीने समाधान न झाल्याने समितीने डीएसआर संदर्भात माहिती घेऊन ती समितीला सादर करण्याबाबत विभागाला सांगितले. बाणेर रस्त्याच्या संदर्भातील माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी मागवून घ्यावी. पुणे महानगरपालिकेची दोन कामे आहेत. बालेवाडी येथील हॉटेलसाठी महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. तेथील पार्किंगची जागा, हॉटेलच्या शेजारी बांधण्यात आलेला कन्व्हेन्शन हॉल, त्यांच्याकडे टॅक्सची किती थकबाकी आहे, हॉटेलमधील सर्व खोल्या वापरात आहेत काय, एका हॉटेलचे दोन हॉटेल कसे काय झाले, दोन हॉटेलने किती जागा व्यापलेली आहे, आता त्यांच्या ताब्यात एकूण किती जागा आहे, इतकी वर्षे झाली तरी बालेवाडी क्रीडा संकुलाच्या जागेला वॉल कम्पाऊंड का बांधण्यात आले नाही, तसेच, हॉटेलच्या शेजारी लॉन आहे. तेथील लॉनवर मंडप टाकून कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यासाठी महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे काय, त्यासाठी त्यांनी शासनाकडून एनओसी घेतलेली आहे काय, लॉनचे एका दिवसाचे भाडे किती आहे संदर्भात समितीला माहिती द्यावी. लॉनवर किती कार्यक्रम झाले, किती वेळा लॉन भाड्याने देण्यात आलेले आहे या संदर्भात

समितीला माहिती द्यावी. तसेच, तेथे बेकायदेशीर बांधकाम देखील झालेले आहे. महानगरपालिका त्यांच्याकडून किती टॅक्सची आकारणी करते, टॅक्स आकारणीच्या संदर्भातील प्रकरण कोर्टात गेलेले आहे काय या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला माहिती द्यावी असे आदेशित केले.

यावर विभागीय प्रतिनिधींनी तेथील बांधकामाच्या संदर्भात असे सांगितले की, महानगरपालिकेने त्यांना दोन नोटीस दिलेल्या आहेत. परंतु अद्याप खुलासा प्राप्त झालेला नाही. याबाबत शासनाला तसेच लिज धारकांना सुध्दा माहिती विचारण्यातही येईल. महानगरपालिकेने त्यांना दोन नोटीस दिल्या होत्या. बी.डब्ल्यू. हायवे स्ट्रार प्रायव्हेट लिमिटेड, बालेवाडी असे त्या हॉटेलचे नाव आहे तसेच जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते बी.डब्ल्यू. हायवे स्ट्रार प्रायव्हेट लिमिटेड, बालेवाडी यांच्या बरोबर झालेले आहे. ले-आऊट प्रमाणे बांधकाम झालेले आहे किंवा नाही या संदर्भात क्रीडा संचालकांकडून माहिती घेतलेली आहे. त्यानुसार त्यांनी दिनांक १६.०८.२०१२ रोजी बी.डब्ल्यू. हायवे स्ट्रार प्रायव्हेट लिमिटेड, बालेवाडी यांच्याकडे बांधकामाच्या संदर्भात विचारणा केली होती त्यानुसानर त्यांनी दिनांक २८.०१.२०१३ रोजी माहिती सादर केलेली आहे. महानगरपालिकेने त्यांना ३१/१/२०१३ रोजी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५३ (१) नुसार नोटीस दिलेली आहे. त्यांनी जो खुलासा सादर केलेला आहे त्याची प्रत समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन समितीला दिले.

समितीने यावर अशी विचारणा केली की, त्यांना ५३ (१) ची नोटीस देऊन कोणत्या बाबींची विचारणा करण्यात आलेली आहे ?याबाबत माहिती देताना सांगण्यात आले की, त्यांना ५३ (१) ची नोटीस दिलेली आहे. त्यांनी प्लॅन प्रमाणे बांधकाम केलेले नाही, "बी" विंगचे बांधकाम मान्य नकाशानुसार नसून जागेचा विना परवाना वापर सुरु केलेला आहे, पार्किंगची जागा मान्य नकाशानुसार नाही असे आम्ही त्यांना सांगितलेले आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर कलम २६० (२) अंतर्गत डिमॉलिशनची कारवाई करण्यात येते. कायद्यानुसार जे रेग्युलराईज करता येते ते कलम ५२ अन्वये रेग्युलराईज किंवा कम्पाऊंडींग करतो, अन्यथा कारवाई केली जाते. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात पुढील कार्यवाही केली जाईल असे आश्वासन सचिवांनी समितीला दिले.

यावर खुलासा सादर करण्यासाठी किती दिवसाची मुदत देण्यात आलेली आहे ? अशी विचारणा केली असता ५३ (१) ची नोटीस दिल्यानंतर खुलासा सादर करण्यासाठी एक

महिन्याची मुदत दिली आहे असे विभागाकडून सांगितले तसेच १ लाख २० हजार स्क्वेअर मीटरचा ले-आऊट मंजूर केलेला आहे. नकाशामध्ये इमारतीचे 'ए' आणि 'बी' बिंग दाखविण्यात आलेले आहेत. आपण 'ए' विंगसाठी परवानगी दिलेली आहे, जागेवर वरीलप्रमाणे 'बी' विंगसाठी परवानगी दिलेली नाही. तेथील 'बी' विंगचा वापर अनधिकृत असल्याची माहिती समितीस दिली.

हॉटेलची इमारत ही १० मजल्यांची बांधलेली आहे 'बी' विंगमधील शेड ले-आऊटमध्ये दाखविण्यात आले आले काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर त्यांनी तेथे शेड उभारलेले आहे. आपण मान्यता दिल्याप्रमाणे त्यांनी 'बी' विंगचे बांधकाम केलेले नसल्याचे विभागाने सांगितले.

समितीने 'बी' विंगसाठी परवानगी मागितली त्यावेळी विभागाकडून ॲग्रीमेंट बघितले असेल. त्यासाठी शासनाची सुध्दा परवानगी घ्यावयास पाहिजे अशी विचारणा केली यावर तेथे 'बी' इमारत दाखविलेली आहे. एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५८ अंतर्गत शासनाने 'ए' आणि 'बी' विंगच्या ले-आऊट आणि कन्स्ट्रक्शनसाठी मंजुरी दिलेली आहे. 'ए' विंगसाठी शासनाने मंजुरी दिलेली आहे. त्या प्रमाणे 'ए' विंगसाठी ऑक्युपेशन सर्टिफिकेट आणि कम्प्लीशन सर्टिफिकेट दिलेले आहे. 'ए' व 'बी' विंगचा ले-आऊट शासनाच्या मान्यतेनुसार झालेला आहे. परंतु तेथे प्रत्यक्षात जे बांधकाम करण्यात आलेले आहे ते प्लॅन प्रमाणे करण्यात आलेले नाही. ले-आऊट प्रमाणे बांधकाम करण्यात आलेले नाही. आपण त्यांना कलम २६० (१) आणि ५३ (१) ची नोटीस दिलेली आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

समितीने 'बी' विंगच्या बांधकामाचा एरिया किती आहे ? अशी विचारणा केली असता त्यांनी ले-आऊट प्रमाणे बांधकाम केलेले नाही. त्यांना दोन एफएसआय अनुज्ञेय आहे. परंतु त्यांनी एकच एफएसआय वापरलेला आहे. त्यांना 'बी' विंगच्या बांधकामासाठी २,३९६ स्क्वेअर मीटर म्हणजे जवळपास २४ हजार स्क्वेअर फुट बांधकाम करण्याची परवानगी दिलेली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच याबाबत दि.१६ जुलै २००७ रोजी करारनामा झालेला आहे. त्यावेळी श्री.लक्ष्मीकांत देशमुख संचालक, क्रिडा म्हणून कार्यरत होते. बी.डब्ल्यू. हायवे स्टार प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे ॲथोराईज सिग्नेटरी म्हणून

श्री.व्ही.एस.कामत होते. या दोन्ही व्यक्तींच्या सहीने हा करार झालेला असल्याचे समितीस सांगितले.

उपरोक्त माहिती संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, शासनाची पूर्व परवानगी श्री.देशमुख तत्कालिन क्रीडा संचालक यांनी घेतली होती काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, करारनाम्यात असा उल्लेख आहे की, बी.डब्ल्यू स्टार यांनी शासनाची परवानगी आणावी यावर ही मूळ जागा महसूल विभागाची आहे. ही गायरान जागा होती. करारनामा करताना महसूल विभागाची परवानगी ेण्याची गरज नव्हती काय ? असे समितीने निदर्शनास आणून दिले व अशी विचारणा समितीने केली असता ७/१२ च्या उताऱ्यात या जागेचा उल्लेख महाराष्ट्र शासन क्रीडा असा करण्यात आला आहे.

हॉटेलचे बांधकाम करीत असताना नगर विकास विभागाचा त्यामध्ये कोणता रोल होता. संचालक क्रीडा यांनी परवानगी दिली. परंतु हे डायरेक्टर टेक्निकल आहेत काय? महानगरपालिकेच्या नगर विकास विभागाकाकडे नकाशे नाहीत. डायरेक्टर क्रीडा यांच्याकडे अधिकार असल्यामुळे त्यांनी सही केलेली आहे, त्यावेळी त्यांनी वरिष्ठ पातळीवरुन परवानगी घ्यावयास पाहिजे होती. त्यांनी कोणकोणत्या विभागांची परवानगी घेतली त्याची माहिती समितीला देताना आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी समितीस सांगितले की, एमआरटीपी ॲक्ट नुसार शासनाला परवानगी आहे. दिनांक १५-१०-२००७ रोजी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५८(३) नुसार क्रीडा विभागाच्या सर्व्हे क्रमांक २६ मध्ये १ लाख २३ हजार स्क्वेअर मीटर ले-आऊट "ए" आणि "बी" विंगसाठी आणि त्यापैकी २४,६८५ हजार स्क्वेअर मीटर वाढीव जागा प्लॅनमध्ये कमर्शियल वापरण्यास इतर नियमांच्या अधीन राहून परवानगी देण्यात येईल असे नमूद केले होते. तद्नंतर ही बाब दुरुस्त करण्यात आली होती आणि दि.९-११-२००७ रोजी विकास नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे, असा शासनातर्फे बदल करण्यात आला होता. शासनाने दुरुस्तीसाठी परवानगी दिलेली आहे. येथे फक्त महानगरपालिकेकडून ऑक्युपेशन सर्टीफिकेटस् देण्याचा प्रश्न आहे.

महानगरपालिकेने बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे काय ? त्यावर सही कोणाची आहे. या समितीच्या प्रश्नावर शासनाकडून ज्यावेळी बांधकाम थांबविण्यात आले त्यावेळी क्रीडा संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यानंतर नियम ५८ खाली बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर महानगरपालिकेने ऑक्युपेशन

सर्टीफिकेटस् दिले आहे. सदर हॉटेलला ऑगस्ट २००८ मध्ये ऑक्युपेशन सर्टीफिकेटस् देण्यात आले असल्याची माहिती विभागाने दिली.

नियोजित प्लॅनप्रमाणे हॉटेलचे बांधकाम करण्यात आले आहे काय ? 'ए' विंग इमारतीत किता खोल्या आहेत. त्यांचे बांधकाम नकाशाप्रमाणे झाले आहे काय ? निकष पाळले नसतांना महानगरपालिकेने सदर इमारतीला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला कसा काय दिलेला आहे. अशी समितीने विचारणा केली त्यावर हॉटेलच्या 'ए' विंगचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यानंतर "बी" विंगसाठी कारणे दाखवा नोटीस काढण्यात आली होती. एरियाप्रमाणे रुम्स् चे बांधकाम बरोबर असुन ४१० खोल्यांचा प्लॅन होता त्यानुसार ४१० खोल्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

४१० खोल्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् दिले आहे. परंतु त्यातील १५० ते २०० खोल्या बंद आहेत. ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देतांना खोल्यांची पाहणी करण्यात आली होती काय ? सदर खोल्या समितीने पाहिल्या आहेत, त्या खोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात धुळ आहे. चार मजल्यांच्यावर इमारत असेल तर त्यासाठी लिफ्टची आवश्यकता असते. या इमारतीत दहा मजले असून आवश्यक तेवढ्या लिफ्ट तेथे उपलब्ध नाहीत. त्यातील काही लिफ्ट बंद आहेत. याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे ? सदर इमारतीला आवश्यक तेवढ्या लिफ्ट नसतांना या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट्स कसे काय देण्यात आले आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी ज्या सोयी सुविधा नाहीत, त्याबाबत नोटीस देण्यात आली आहे तसेच राष्ट्रकुल युवा स्पर्धा सन २००८ मध्ये असल्यामुळे सन २००८ मध्ये ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देण्यात आले असल्याचे समितीस सांगितले.

त्यावर समितीने या इमारतीत उद्वाहन नाही, अग्निशामक यंत्रणेची व्यवस्था नाही, आवश्यक तेवढे शौचालये नाहीत, इतर अनेक सोई सुविधा नाहीत. इमारत बांधतांना या बाबी बंधनकारक करण्यात आलेल्या आहेत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता या संदर्भात शासनाकडे पाठपूरावा करण्यात येत आहे असे सांगण्यात आले.

राज्य शासनाकडून सर्व माहिती घेतल्याशिवाय परवानगी मिळणार नाही. Without completing the work of Lifts, how can you give them Occupation Certificate? उद्या कोणी कोर्टात गेले तर मोठा प्रश्न निर्माण होईल. इमारत अपूर्णावस्थेत आहे. फायर, ड्रेनेज, इलेक्ट्रीसिटी या सर्व सोई सुविधा नसतांना ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देण्यात आले आहे.

त्यावेळी वेळी मुख्य अभियंता कोण होते ? अशी विचारणा समितीने केली यावर विभागीय प्रतिनिधींनी उपरोक्त प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असून वरिष्ठ अधिकाऱ्याकडून खालच्या अधिकाऱ्यांकडे पॉवर डेलिगेट केलेल्या असतात अशी माहिती समितीला दिली.

'ए' विंग इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले तरी इमारत बांधकाम करतांना अनेक अनियमितता करण्यात आलेल्या आहेत. नोटीसचे उल्लंघन केले आहे याबाबत समितीने विचारणा केली असता 'ए' व "बी" विंग इमारतीचे बांधकाम निकषाप्रमाणे झालेले नाही, त्यामुळे त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे अशी माहिती समितीस दिली.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी रेस्टॉरंट चालविण्याची परवानगी होती काय? यासंदर्भात अनेक अनियमितता होत असल्याची माहिती मिळत असल्याबाबत समितीने सचिवांकडे त्याबाबत विचारणा केली असता त्यावर कार्यकारी अभियंता कनिष्ठ/शाखा व उपअभियंता हे आवश्यकतेप्रमाणे जागा पाहणी करित असतात त्याप्रमाणे "ए" इमारतीची पाहणी केली असता अंतर्गत बदल केलेले आढळले आहेत. व तसा अहवाल त्यांनी कार्यकारी अभियंता यांना सादर केला आहे त्याची प्रत उपलब्ध असल्याचे समितीस विभागाने सांगितले.

खेळाडूसाठी फक्त एकच रुम आरक्षित ठेवण्यात आली आहे. वास्तविक पहाता खेळाडूंसाठी १० ते १५ रुम्स ठेवावयास पाहिजे होत्या. रेस्टॉरंट चालू करण्याची परवानगी महानगरपालिकेने दिली होती काय ? तसेच इमारतीच्या एकूणच अनधिकृत बांधकामासाठी कोण-कोणते अधिकारी जबाबदार आहेत याबाबतची सत्य माहिती देण्यास समितीने विभागास सांगितले असता

यावर विभागीय प्रतिनिधींनी अनधिकृत कामाबाबत आपण त्यांना कलम २६० (१) व ५३ नुसार नोटीस देण्यात आली आहे. नकाशे पाहून कार्यवाही करण्यात आली आहे. १९ बाय १६ चौरस मीटर म्हणजे जवळपास ७००० स्क्वेअर फूट परिसरात रेस्टॉरंट चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. पार्किंगची जागा नकाशात दर्शविण्यात आली आहे. महानगरपालिकेने ऑक्युपेशन सर्टिफिकेटस दिले आहे. त्यानंतर पार्किंगच्या जागेत बदल करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधितांना यासंदर्भात एक महिन्याची नोटीस देण्यात आली होती अशीही माहिती समितीस दिली.

समितीने डी.सी. रुल्स प्रमाणे या संपुर्ण प्रकरणाबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय? या विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना समितीला सांगण्यात आले की, सुरुवातीला निकषाप्रमाणे ७५० कार पार्किंगची जागा अनिवार्य करण्यात आली होती. त्यामध्ये बदल करुन पार्किंगची जागा बदलण्यात आली आहे. 'बी' विंग इमारतीच्या बेसमेंटमध्ये बेसमेंट कार पार्किंग, मॅकेनिकल कार पार्किंग असे या भागात ७५० कार पार्किंग करण्यासाठी जागा होती. त्यानुसार महानगरपालिकेने सदर इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, Though they are asking you for the Completion Certificate, unless and until they complete the construction of building how do you give them the Completion Certificate? Even if you had issued the Completion Certificate to them because of the priority of the games, you have to check it whether the construction is carried out as per the norms यावर विभागीय प्रतिनिधींनी त्यांनी निकषा प्रमाणे बांधकाम केले पाहिजे असे सांगितले.

महानगरपालिकेने त्यांना कम्प्लीशन प्रमाणपत्र दिलेले असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी चार वर्षात याची पाहणी करुन शासनाला माहिती द्यावयास पाहिजे होती असे मत समितीने व्यक्त केले. असता त्यांना ऑगस्ट, २०१२ मध्ये पत्र दिलेले असुन कलम २६० (१) ची नोटीस दिलेली आहे. त्यांनी नकाशाप्रमाणे बांधकाम केलेले नसल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जागेचा नकाशा मंजूर केला त्यावेळी पार्किंगसाठी किती जागा दाखविली होती आणि करारनाम्यानुसार त्यांना किती जागा दिलेली आहे? त्यांना दिलेल्या जागेच्या व्यतिरिक्त ते शासनाच्या जागेचा वापर करीत आहेत. जेथे "बी" विंगची इमारत बांधण्यात आलेली आहे त्यातील निम्मी जागा शासनाच्या ताब्यात आहे. तेथे रनिंग ट्रॅक बांधलेला आहे. त्या रनिंग ट्रॅकच्या जागेवर अनधिकृतपणे कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम करण्यात आलेले आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी तेथे नवीन इमारत झालेली असुन तेथून ४००-५०० मीटरचा रनिंग ट्रॅक जातो त्या जागेवर कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम केलेले आहे. नकाशामध्ये ती जागा मोकळी दाखविलेली असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांची जीप जाण्यासाठी भिंतीला लागून ३.५ किलो मीटर अंतराचा

रस्ता मिळावा या हेतूने डोम विकसित करण्यात आला होता. डोमच्या उत्तरेकडील रस्ता विकसित करायचा राहिला असल्याची माहिती समितीस दिली. तसेच पेट्रोलिंग आणि ट्रॅकसाठी जो रस्ता तयार करायचा होता त्या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्याचे
विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीने 'ए' विंगच्या शेजारी लॉन आहे. त्या लॉनचा वापर लग्न, रिसेप्शन्स इत्यादी कार्यक्रमांसाठी केला जातो. समितीने बालेवाडी येथील क्रीडा संकुलाची पाहणी केलेली आहे. जेथे कन्व्हेन्शन हॉल आहे तेथून रनिंग ट्रॅक गेलेला आहे. याचा नकाशा आहे काय ? जी मोकळी जागा दाखविलेली आहे तेथे असल्याचे विभागास सांगितले असता तेथे बांधकाम झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर दिनांक ८.२.२०१० आणि दिनांक २४.२.२०१० रोजी त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. महानगरपालिकेची परवानगी घेतल्याशिवाय तेथे कोणतेही बांधकाम करु नये, असे त्यांना सांगितलेले असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

संपूर्ण जागेचे आपण स्वतः जागेचे मालक आहोत असे समजून त्यांनी तेथे कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम केलेले आहे. तेथे अनधिकृत बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर देखील संबंधित अधिकाऱ्यांनी विभागाला किंवा महानगरपालिकेला कळविलेले नाही. या मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची असल्याचे मत समितीने व्यक्त करुन यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, ज्यांनी बेकायदेशीर बांधकाम केले त्यांना पत्र दिलेले आहे. परंतु तेथे बेकायदेशीर बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना तसे कळविले आहे काय ? You are not the watchmen of the property, you are the owner of the property. But, you are behaving like a watchmen of the property. हे गंभीर आहे. ही शासनाची जागा आहे. As the Head of the Department it is your responsibility and you are avoiding it. अधिकाऱ्यांना सिरिअसनेस नाही संबंधित अधिकाऱ्यांनी अभ्यास करुन साक्षीसाठी उपस्थित राहावयास पाहिजे होते. अधिकाऱ्यांनी तेथील जागेची पाहणी करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होते. समितीने बालेवाडी क्रीडा संकुलाची पाहणी केल्यानंतर सह संचालक,जिल्हा क्रीडा अधिकारी आणि उप संचालक या अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याकडून माहिती घेतलेली आहे काय ? या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केलेली आहे ?

समितीच्या या प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी संबंधित ठेकेदारास नोटीस दिली असल्याचे सांगितले. समितीला त्या नोटीसची प्रत द्यावी. आपण त्यांना नोटीस केव्हा दिलेली आहे, त्यांना नोटीस मिळालेली आहे काय, नोटीस पाठविल्याचा इनवर्ड, आऊटवर्ड नंबर आहे काय ? याबाबत समितीने विभागाकडे विचारणा केली असता दिनांक ३०.०१.२०१३ रोजी त्यांना पहिली नोटीस देण्यात आली होती अशी माहिती समितीस दिली.

नकाशावर इमारत बांधकामाच्या व्यतिरिक्त पार्किंगची प्रोव्हिजन किती दाखविलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली त्यावर त्यांनी 'ए' विंग आणि 'बी' विंगची मिळून अनुक्रमे ९९४ अधिक ७६० अशा एकूण १७५४ गाड्याचे पार्किंग 'बी' विंगमध्ये व मेकॅनिकल पार्किंगमध्ये करावयास पाहिजे होते. 'ए' विंगमध्ये स्कुटर आणि सायकलचे पार्किंग आणि 'बी' विंगमध्ये व मेकॅनिकल पार्किंग असे एकुण १७५४ कारचे पार्किंग नकाशामध्ये दाखविलेले आहे असे विभागाने समितीस सांगितले.

त्यांनी आता सर्व पार्किंग 'ए' विंगमध्ये असल्याचे दाखविलेले असल्याबाबत समितीने विचारणा केली असता 'ए' विंगमध्ये १०८७ स्कुटर आणि १८६६ सायकलचे पार्किंग दाखविलेले आहे. हे साईड मार्जिनचे पार्किंग आहे. त्यांनी 'बी' विंगसह १७५४ कारचे पार्किंग बांधावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी 'बी' विंगमध्ये व मेकॅनिकल कार पार्किंग बांधलेले नसल्याचा खुलासा विभागाने केला.

हॉटेलचे बांधकाम करताना त्यांनी १२०० ते १४०० गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था करावयास पाहिजे होती. परंतु त्यांनी पार्किंगची व्यवस्था केलेली नाही. त्याचप्रमाणे त्यांनी पार्किंगची व्यवस्था केलेली आहे किंवा नाही, हे संबंधित अधिकाऱ्यांनी बघितलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने विभागीय प्रतिनिधींकडे केली असता त्यावर विभागीय प्रतिनिधींनी त्यांना ऑगस्ट, २०१२ मध्ये पहिली नोटीस दिली होती. आम्ही ही बाब क्रीडा संचालक आणि शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असल्याचे सांगितले त्यावर समितीने या संदर्भात कोणतीही कारवाई करु नये, असे शासनाकडून पत्र आलेले आहे काय ? अशी विचारणा केली असता या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, नाही. या जागेसंबंधी **कॅल्क्युलेशन** केले तर ही बाब **रेग्युलराईजेबल** आहे. त्यांच्याकडून नकाशा आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. 'बी' विंगचे बांधकाम सन २०१० मध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे होते. परंतु 'बी' विंगचे बांधकाम सन २०११ मध्ये पूर्ण केले असावे.

यासंदर्भात एनओसी दिल्याची फाईल समितीला दाखविण्यात आली.

समितीने प्लॅन प्रमाणे बांधकाम केलेले नसताना देखील संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या संदर्भात महानगरपालिकेची काहीच जबाबदारी नाही काय ? अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी 'ए' विंग इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेटस देण्यात आले आहे. यासंदर्भात ऑगस्ट, २०१२ मध्ये नोटीस देण्यात आली होती. असा खुलासा केला.

यावर समितीने आपण चार वर्षानंतर नोटीस दिली आहे. नोटीस देण्यास चार वर्षे वाट का पाहण्यात आली आहे. राष्ट्रकुल युवा स्पर्धा होणार होत्या म्हणून ऑक्युपेशन सर्टिफिकेटस घाईघाईने देण्यात आले असे सांगण्यात आले आहे. इमारत अपूर्ण असताना ऑक्युपेशन सर्टिफिकेटस द्यावे असे नियमात आहे काय ? ऑक्युपेशन सर्टिफिकेटस दिल्यानंतर काही दुर्घटना झाली असती तर त्याची जबाबदारी कोणी घेतली असती. उर्वरित कामे तीन किंवा सहा महिन्यात करावीत अशी अट टाकून ऑक्युपेशन सर्टिफिकेटस देण्यात आले होते काय ? अशी विचारणा विभागाकडे केली. यावर विभागीय प्रतिनिधींनी १५ दिवसात नकाशे रिव्हाईज करुन घेण्यात यावे अशी अट ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देतांना घालण्यात आली होती असे सचिवांनी सांगितले.

१५ दिवसांत नकाशे रिव्हाईज करुन न घेण्यात आल्यामुळे संबंधितांवर कारवाई का करण्यात आली नाही अशी विचारणा समितीने विचारणा केली असता सदर इमारतीस सप्टेंबर, २००८ मध्ये ऑक्युपेशन सर्टिफिकेटस देण्यात आले होते. त्यांच्याकडून अंडरटेकिंग घेणे आवश्यक होते. सदर इमारतीचे काम २०११ मध्ये पूर्ण झाले असावे असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

त्यावेळी सदर हॉटेलचे बांधकाम महानगरपालिकेने का थांबविले नाही. अनधिकृत बांधकाम होत असताना महानगरपालिकेने कारवाई का केली नाही याची माहिती देण्यात यावी. तसेच 'बी' विंग मध्ये पार्किंगसाठी जागा करण्यात आली आहे. या इमारतीचे क्षेत्र वाढविण्यात आले आहे. तेथे कार्यक्रम करण्यात येत जवळपास ५ लाख रुपये आकारण्यात येतात. बालेवाडी क्रीडा संकुलाच्या दीड एकर जमिनीवर हॉटेल मालकाने अतिक्रमण केले आहे. सदर जागेची मोजणी करुन घेण्यात यावी. जागेच्या नकाशाप्रमाणे किती जागा जास्त घेण्यात आली आहे, त्याची माहिती समितीला देताना सांगण्यात आले की, करारनाम्यानुसार ९ एकर २४ गुंठे

जागा आहे. त्यापैकी ६.१० एकर जागेवर हॉटेलचे बांधकाम करावयाचे असून त्यासाठी कमर्शिअल परवानगी देण्यात आली आहे. ३.५० एकर जागा पार्किंगसाठी होती म्हणजेच ६ एकर जागेवर इमारतीचे बांधकाम करताना पार्किंगसाठी जागा प्रोव्हाईड करणे आवश्यक होते. करारनाम्यात पार्किंगच्या तीन एकर जागेचा समावेश करण्यात आला आहे काय ? "अ" विंग व "बी" विंग सोडून ही तीन एकर जागा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता प्रति वर्षी एक रुपया स्क्वेअर फूट प्रमाणे पार्किंगच्या जागेचा टॅक्स आकारण्यात येत आहे. तसेच ६ एकर जागा हॉटेलच्या बांधकामासाठी असून ३.५० एकर जागा पार्किंगसाठी दर्शविण्यात आली आहे. 'ए' विंगच्या बाजुला मध्ये मेकॅनिकल पार्किंग दाखविण्यात आले असल्याचा खुलासा समिती समोर विभागाने केला.

समितीने बालेवाडी क्रीडा संकुलाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यात येऊन अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात महानगरपालिकेने नोटीस देण्यास विलंब का केला ? त्याचप्रमाणे लॉनवर मंडप टाकून तात्पुरते मंगल कार्यालय उभारण्यात आले आहे. त्यासाठी ५ लाख रुपये भाड्याची आकरणी करण्यात येते. अनधिकृतरित्या कामे झाली असतील तर सदर हॉटेल बंद करावे. ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी ? असे मत व्यक्त केले तसेच २४,६८५ स्क्वेअर फूटासाठी २ कोटी ५९ लाख रुपये भाडे आकारण्यात आले आहे. १०४९ रुपये प्रति स्क्वेअर मीटरला आकारणी करण्यात आली होती. १० रुपये प्रति स्क्वेअर फूट प्रति वर्षासाठी आकारण्यात येणार आहेत. ही जागा लीजवर देण्यात आली असून ६० वर्षासाठी लीज करण्यात आली आहे. ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लीज देता येत नसतांना ६० वर्षासाठी लीज का देण्यात आली आहे. सुप्रीम कोर्टाच्या जजमेंटप्रमाणे ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लीज देता येत नाही. सदर जागा रेडी रेकनरच्या दरानुसार ३० ते ४० पैसे स्क्वेअर फूट पर डे प्रमाणे देण्यात येत आहे. याबाबत शासनाचे नियम काय आहेत. शासनाची जागा लिजवर देत असताना कोणते निकष आहेत अशी विचारणा समितीने केली.

या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी ६ एकर जागेवर बांधकाम करण्यात आले असून तीन ते साडेतीन एकर जागा त्यांच्या ताब्यात आहे. ६ एकर जागेवर जे बांधकाम झाले तेथे "बी" विंगच्या जागेवरील शेडला साईड मार्जिन असल्याचे दिसत नाही असे सांगितले. यावर शासनाने करार केला तेव्हा कन्स्ट्रेशनल ॲग्रीमेट करण्यात आले नव्हते काय ? शासनाने

जागेची मोजणी केलेली नाही काय ? अशी समितीने विचारणा केली असता सदर जागेची मोजणी करण्यात आलेली असून "बी" विंगच्या जागेवरील शेडला 'ए' विंग इमारतीत साईड मार्जिन दाखविण्यात आली नाही. 'बी' विंगच्या जागेवरील शेडला मार्जिनचे व्हायलेशन झाले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

मुख्य सचिवांच्या कार्यालयाकडील दिनांक ११.०१.२००८ रोजीच्या टिपणीत माननीय मंत्री महोदयांनी असे नमूद केलेले आहे की, "विभागीय आयुक्त व क्रीडा संचालक यांनी त्यांचे कार्यकक्षेबाहेर जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झाले आहे हे स्पष्ट होते. वित्त विभागाने नमूद केलेले अपेक्षित मूल्य सदर जागेचे स्थलमहात्म्य विचारात घेता अतिशय योग्य आहे. वित्त विभागाचे अभिप्रायानुसार प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. ती तत्काळ करण्यात यावी. राष्ट्रकुल स्पर्धांची तातडी, राहिलेला अपुरा कालावधी पाहता संबंधितांवर शासनाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन प्रस्ताव मान्य करण्याशिवाय पर्याय दिसून येत नाही." या टिसणीला माननीय मुख्यमंत्री महोदयांची स्वाक्षरी असुन हे सर्व कसे बेकायदेशीर आहे या संदर्भात मुख्य सचिवांनी दिनांक ११ जानेवारी, २००८ रोजीच्या टिप्पणीत नमूद केलेले आहे. अधिकार कक्षेच्या बाहेर जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झालेले असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी, असे टिप्पणीत नमूद केलेले आहे. ही सन २००८ मधील टिप्पणी आहे. आता ६ वर्षे झालेली आहेत. आपण मागील ६ वर्षात या संदर्भात कोणती कारवाई केली ते समितीला सांगावे. त्यावेळी कोणते अधिकारी कार्यरत होते त्यांची नावे समितीला द्यावी. माननीय मुख्यमंत्री, माननीय क्रीडा मंत्री यांची या टिप्पणीवर स्वाक्षरी आहे. हे सर्व घोटाळे त्यावेळी त्यांच्या लक्षात आलेले आहेत. त्यांच्याकडे थकित असलेल्या टॅक्स संदर्भात समितीला माहिती द्यावी असे समितीने विभागास सांगितले. यावर हॉटेलचे संपूर्ण असेसमेंट केलेले आहे. तेथे प्रदर्शनाचा हॉल आहे. ते अनधिकृत बांधकाम असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधी समितीस दिली.

समितीला असेही सांगण्यात आले की, हॉटेलचे संपूर्ण असेमेंट केलेले आहे. माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये त्यांना बिल पाठविले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच त्यांना ३ कोटी रुपयांचे पहिले बिल पाठविण्यात आले होते. आता पर्यंत त्यांच्याकडे ६ कोटी ३५ लाख रुपये थकित आहेत. त्यांनी अनधिकृत बांधकाम केलेले आहे म्हणून २ पट दंड आणि आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाहीत म्हणून १ पट दंड अशी एकूण ३ पट दंडाची

कारवाई त्यांच्यावर करण्यात आलेली आहे. त्यांना डिमांड नोटीस पाठविलेली आहे. त्यांचे काही लोक महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना भेटले होते. त्यांनी वेळ मागितला होता. त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते. त्यांनी ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत. म्हणून त्यांना कलम २६७ (अ) अन्वये ३ पट दंड लावण्यात आलेला आहे. त्यांनी या संदर्भात हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केलेले आहे. या प्रकरणाची सुनावणी होईपर्यंत कोणतीही कोहेसिव्ह ॲक्शन घेऊ नये, असे मा.न्यायालयाचे तोंडी आदेश असल्याची माहिती समितीस दिली.

मा.न्यायालयाने काय सांगितलेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता हॉटेल सील करणे, ताब्यात घेणे अशा प्रकारची कारवाई करु नये, असे सांगितले असून या प्रकरणाची पुढील १५ तारखेला सुनावणी होणार आहे. १५ तारखेला निर्णय झाल्यानंतर निश्चितपणे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे पुणे महनगरपालिकेच्या प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले.

संबंधित थकबाकीदाराने विशिष्ट रक्कम भरल्याशिवाय सदर थकबाकीदाराला न्यायालयात जाता येते किंवा नाही याबाबत समितीला खुलासा करण्यात यावा असे समितीने सांगितले असता त्याबाबत खुलासा करताना सांगण्यात आले की, थकीबाकीदार जर स्मॉल कॉज कोर्ट किंवा डिस्ट्रीक्ट कोर्टात गेले तर त्यांना विशिष्ट रक्कम भरावी लागते. परंतु सदरहू थकबाकीदाराने हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केल्यामुळे तशी ऑर्डर महानगरपालिकेस नाही. १५ तारखेला निर्णय झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेकडून निश्चितपणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा.हायकोर्टाच्या ज्युरिसडिक्शनमध्ये त्यांना ओव्हर रायडिंग पॉवर असतात. रिट पिटीशन हे कॉन्स्टीट्युशन प्रमाणे असल्यामुळे त्याला ओव्हर रायडिंग पॉवर्स आहेत. असे पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समितीला सांगितले.

हायकोर्टात ते रिट पिटीशन दाखल झालेले आहे काय ? या प्रकरणात आपण कोणत्या वकिलाची नियुक्ती केलेली आहे ? वकील सुनावणीच्या दिवशी कोर्टात उपस्थित राहतात काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नांना विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, हायकोर्टात रिट पिटीशन दाखल झाले असून ॲड.अभिजीत कुलकर्णी हे वकील आहेत व ते सुनावणीच्या दिवशी कोर्टात उपस्थित राहत असून कोर्टाने त्यांच्याकडून अंडरटेकींग घेतलेले आहे. सिंहगड

इन्स्टिट्यूटच्या केसमध्ये संपूर्ण रकमेची वसुली झालेली आहे. आपण त्या संस्थेला सिल सुध्दा केले होते. त्यावेळी कोर्टाने सांगितले होते की, थकीत रकमेचा भरणा करावा आणि त्यानंतर कोर्टासमोर यावे. अशा प्रकारे आपण कोर्टामध्ये आपली बाजू भक्कमपणे मांडण्याचा प्रयत्न करीत असतो असेही समितीला त्यांनी सांगितले.

माहे सप्टेंबर, २००८ मध्ये कम्प्लीशन सर्टिफिकेट दिल्यानंतर त्यांना २००९ मध्ये बिल का पाठविण्यात आले नाही ? या संदर्भात कोणती कार्यवाही केली आणि कोणती कार्यवाही करणार आहात याबाबत समितीला माहिती द्यावी. टॅक्सची नोटीस वर्षभरानंतर का पाठविण्यात आली ? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर माहे सप्टेंबर, २००८ मध्ये ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाले किंवा नाही याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल. असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

त्यावेळी कोणते अधिकारी कार्यरत होते ? बांधकाम विभागाने कर संकलन विभागाला का कळविले नाही ? त्यावेळी बिल्डींग इन्स्पेक्टर आणि कर संकलन अधिकारी कोण होते ? आरोग्य विभागाने हॉटेलला परवानगी दिलेली आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर आरोग्य विभागाने हॉटेलला परवानगी दिली असेल. तेथील कचरा उचलला जातो याचा अर्थ परवानगी दिली गेली असेल. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

यानंतर समितीने हॉटेलच्या बाजूला असलेल्या लॉनची पाहणी केली असता लॉनच्या जागेवर मंडप उभारण्यात आलेला होता. लॉनवर एका बाजूला खुर्च्या ठेवलेल्या होत्या. लॉनवर लग्न, स्वागत समारंभ आयोजित केले जातात. लॉनच्या जागेचा मंगल कार्यालय म्हणून वापर केला जातो, असे समितीच्या निदर्शनास आले. नकाशामध्ये लॉनची जागा ओपन स्पेस म्हणून दाखविलेली असून या जागेसाठी ४ रुपये ५० पैसे प्रती स्क्वेअर फूट कमर्शियल दराने टॅक्स आकारण्यात येतो. सदर रकमेचा भरणा वेळेत केला नाही तर दोन पट दंड आकारण्यात येतो, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

सन २००८ पासून २०१३ पर्यंत सदर लॉनची जागा किती वेळा भाड्याने देण्यात आली, लॉनच्या जागेचे एका दिवसाचे भाडे किती आकारण्यात येते, याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी, असे समितीने संबंधितांना सांगितले.

यानंतर समितीने विटझ् हॉटेलच्या बेसमेंटची पाहणी केली असता समितीला तेथे रेस्टॉरंट असल्याचे आढळून आले. या संदर्भात समितीने पुणे महानगरपालिकेच्या संबंधित

अधिकाऱ्यांना विचारणा केली असता या ठिकाणी नकाशामध्ये स्टाफ डायनिंग रुम दाखविण्यात आलेली आहे, असे सांगितले. परंतु तेथे लाईटींग केलेली होती, टेबल खुर्च्या ठेवलेल्या होत्या, स्पीकर लावलेले होते. सदर जागेचा उपयोग स्टाफ रुमसाठी न करता त्या ठिकाणी एक रेस्टॉरंट व रेग्युलर बार चालत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

यानंतर समितीने हॉटेलची पाहणी करीत असताना हॉटेलमध्ये एक मोठा बॅन्क्वेट हॉल असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात विचारणा केली असता येथे पार्टी, स्वागत समारंभ इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात, असे समितीला यांनी सांगितले.

सदर हॉटेलचे मालक कोण आहेत अशी समितीने विचारणा केली असता हॉटेलमध्ये पूर्वी श्री.अवर्सेकर आणि श्री.विठ्ठल कामत यांचे शेअर्स होते. परंतु आता संपूर्ण शेअर्स श्री.विठ्ठल कामत यांनी घेतलेले आहेत. आता सदरहू हॉटेल श्री.विठ्ठल कामत यांच्या ताब्यात आहे, असे विभागीय प्रतिनीधींनी समितीला सांगितले. हॉटेलचे शेअर्स विकत घेतांना शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय, असे समितीने विचारले असता कंपनी ॲक्ट प्रमाणे शेअर्स श्री.विठ्ठल कामत यांच्या नावे ट्रान्सफर करण्यात आलेले आहेत, हॉटेलमध्ये पूर्वी दोन पार्टनर होते. परंतु आता एकाच व्यक्तीच्या नावे सर्व शेअर्स ट्रान्सफर करण्यात आलेले आहेत. शासनाची परवानगी न घेता अशा प्रकारे शेअर्स ट्रान्सफर करता येतात काय, याबाबत महालेखाकारांनी समितीला मार्गदर्शन करावे असे समितीने सांगितले असता ॲग्रीमेंट तपासून बघावे लागेल असे महालेखाकारांनी सांगितले.

मूळ संकल्पना हॉस्टेल कम हॉटेल बांधण्याची होती. परंतु नंतर मूळ संकल्पनेत बदल करण्यात आलेला आहे काय, असे समितीने विचारले असता यूझ ऑफ परपज बदललेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

सदर हॉटेलमध्ये एकूण किती लिफ्ट आहेत असे समितीने विचारले असता विटझ् हॉटेलमध्ये १० लिफ्ट आणि ऑर्चिड हॉटेलमध्ये ११ लिफ्ट अशा एकूण २१ लिफ्ट मंजूर आहेत. आता ४ मोठ्या व २ छोट्या लिफ्ट बंद असून इतर सर्व लिफ्ट सुरु आहेत, असे विभागीय प्रतिनिधींकडून समितीला सांगण्यात आले.

यानंतर समितीने कॉफी शॉपची तसेच ओपन गार्डन रेस्टॉरंटची पाहणी केली असता सदरहू जागेवर भराव टाकून रेस्टॉरंटची उंची हॉटेलच्या इमारतीच्या ग्राऊंड फ्लोअर पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. रेस्टॉरंटच्या वरच्या बाजूला तात्पुरते शेड उभारण्यात आलेले

असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. ओपन गार्डन रेस्टॉरंट असेल तर ते ओपन असले पाहिजे, असे समितीने मत व्यक्त केले.

यानंतर समितीने 'बी' विंगची पाहणी केली असता तेथे कन्व्हेन्शन हॉल बांधण्यात आलेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना विचारले असता नकाशामध्ये 'बी' विंग इमारतीसाठी आरसीसी स्ट्रक्चरच्या बांधकामाची परवानगी घेण्यात आली होती. परंतु त्यांनी येथे कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम केलेले आहे. 'बी' विंग इमारतीच्या बसेमेंटमध्ये ७५० कार पार्किंग दाखविलेले आहे. परंतु येथे कार पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यांनी दुसऱ्या ठिकाणी कार पार्किंग असल्याचे दाखविलेले आहे. 'बी' विंगचे बांधकाम नकाशा प्रमाणे करण्यात आलेले नाही. त्यांनी 'बी' विंग इमारतीच्या जागेवर अनधिकृतपणे कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम केलेले आहे. या जागेवर फक्त २४ हजार स्क्वेअर फूटाचे बांधकाम करण्यास परवानगी दिलेली असताना या जागेवर ५४ हजार स्क्वेअर फूटाच्या कन्व्हेन्शन हॉलचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच, रनिंग ट्रॅकच्या जागेवर त्यांनी अनधिकृतपणे कन्व्हेशन हॉलचे बांधकाम केलेले आहे, असे संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले. सदर जागेची मोजणी करुन घेण्यात यावी, असे समितीने सांगितले. ज्यावेळी हे बांधकाम सुरु होते त्यावेळी कार्यरत असलेल्या संबंधित प्रमुख अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे, असे समितीने आयुक्त, क्रीडा यांना सांगितले.

सदर हॉटेलसाठी पुणे महानगरपालिकेने पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता हॉटेलसाठी पुणे महानगरपालिकेने ४ इंच पाईप लाईनद्वारे पाण्याचे कनेक्शन दिलेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दि.१३ फेब्रुवारी रोजी विभागीय सचिवांनी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने बालेवाडी क्रीडा संकुलातील हॉटेल विभागातील अनियमिततेच्या संदर्भात तसेच हॉटेलसाठी आरोग्य विभाग, ट्रफिक पोलीस यांनी एनओसी दिलेली आहे काय ? तेथे पार्किंगची आवश्यकता आहे. तेथे लँड स्केपिंग खूप आहे. पार्किंगसाठी प्रथम प्रॉयॉरिटी मिळण्याबाबत तसेच पोलीस आणि ट्रॅफिक विभागाने परवाना दिलेला आहे काय, हॉटेलच्या संदर्भात ट्रॅफिक विभागाचे निकष काय आहेत याबाबत संबंधित विभागाला विचारणा केली असता पोलीस उपायुक्तांनी असे सांगितले की, त्यांनी बी.डब्ल्यू. हायवे स्टार प्रायव्हेट लिमिटेड या नावाने आपल्याकडे अर्ज केला होता.

तेथील हॉटेलमध्ये ४१५ खोल्या असून १ परमिट रुम, ३ रेस्टॉरंट आणि काही कमर्शियल एरिया आहे. लॉजसाठी ५ खोल्या असतील तर ५ कार, ६ मोटरसायकल आणि ४ सायकलचे पार्किंग असले पाहिजे. रेस्टॉरंटसाठी २ कार, ८ मोटरसायकल आणि ४ सायकलचे पार्किंग असले पाहिजे. कमर्शियल वापराच्या १०० स्क्वेअर मिटरसाठी ४ कार, १२ मोटरसायकल आणि ४ सायकलचे पार्किंग असले पाहिजे. पार्किंग रिपोर्टप्रमाणे तेथे लॉजिंगसाठी ६,५१५ स्क्वेअर मिटर, रेंस्टॉरंटसाठी १,६६५ चौरस मीटर आणि कमर्शियल एरियासाठी २,४१८ चौरस मीटर अशी एकूण १०५९८ चौरस मिटर जागा आहे. या जागेप्रमाणे तेथे पार्किंगची व्यवस्था असावयास पाहिजे. सदरहू पार्किंगची व्यवस्था तेथे असल्याचे त्यांनी दाखविलेले आहे, असा ट्रॅफिक विभागाचा अहवाल आहे. त्यांनी इमारतीच्या पूर्व बाजूस ३,३७३.५० चौरस मीटर, पश्चिम बाजूस ३,९०५ चौरस मीटर, दक्षिण बाजूस १,३६७.५० चौरस मीटर आणि उत्तर बाजूस १,९५२.५० चौरस मीटर असे एकूण १०,५९८.५० चौरस मीटर क्षेत्रफळ नकाशावर दाखविले आहे. जो नकाशा दिलेला आहे तो रेकॉर्डवर आहे. त्यांना सन २०१० मध्ये लायसेन्स दिलेले आहे.

एखाद्या कमर्शियल इमारतीसाठी कम्प्लीशन सर्टिफिकेट देताना तेथे किती पार्किंग आवश्यक आहे याबाबतचे नियम आहेत. तेथे १०५९८ स्क्वेअर फुटाचे पार्किंग असले पाहिजे. तेथे कार पार्किंगची व्यवस्था असली पाहिजे. त्यांनी तेथे सायकलचे पार्किंग दाखविलेले आहे. त्या हॉटेलमध्ये सायकल घेऊन कोण जाणार आहे ? तसेच निकषांचे त्यांनी पालन केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता पोलीस उपायुक्त यांनी निकषांचे पालन केलेले आहे, असे नकाशावरुन दिसून येते. विभागाचे अधिकारी तेथे पाहणी करण्यासाठी गेले होते. नॉर्म्स प्रमाणे पार्किंग आहे असे त्यांनी दाखविलेले असल्याचा खुलासा केला.

यावर समितीने उपायुक्त पोलीस यांच्या निदर्शनास आणून दिले की, ज्या अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे, ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. समितीने बालेवाडी क्रीडा संकुलाची पाहणी केलेली असुन तेथे पार्किंग नसल्याचे समितीला आढळून आलेले आहे. तसेच हॉटेलच्या बाजूला असलेल्या लॉनवर त्यांनी मंडप टाकलेला आहे. तेथे खुर्च्या सुध्दा ठेवलेल्या होत्या. त्या लॉनवर लग्न, रिसेप्शन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. तेथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली नाही. इमारतीच्या समोर आणि मागील बाजूस साईड मार्जिन असते. तसेच, हॉटेलमध्ये ५ रेस्टॉरंट व २ कॉफी

शॉप्स आहेत. त्यांनी पार्किंगसाठी शासनाकडून ३.५ एकर जागा घेतलेली आहे. त्यांनी तेथे ५४ हजार स्क्वेअर मीटरचा डोम उभारलेला आहे. त्यांनी तेथे कन्व्हेन्शन हॉल उभा केलेला आहे. हॉटेलच्या पूर्व बाजूला लॉन आहे. तेथे लग्न, स्वागत समारंभ आयोजित केले जातात. तसेच, हॉटेलच्या आतमध्ये एक मोठा हॉल आहे. लॉन आणि कन्व्हेन्शन हॉलचे एका दिवसाचे भाडे ५ लाख रुपये घेतले जाते. अशा प्रकारे तेथे ३ मंगल कार्यालये चालतात. हॉटेलमध्ये ४१० खोल्या आहेत. त्या प्रमाणे त्यांनी पार्किंगची व्यवस्था करावयास पाहिजे होती. नकाशात जी मोकळी जागा दाखविलेली आहे तेथे त्यांनी लँड स्केपिंग केलेले आहे. As regards the Police Permission is concerned, the parking should be the first priority. यावर पोलीस उपायुक्तांनी असा खुलासा केला की, त्यांनी विभागाकडे नकाशा सादर केलेला आहे. या संदर्भात पोलीस उपायुक्त, स्थानिक विभाग यांना कळविण्यात येईल अशी माहिती समितीला दिली.

समितीने ज्यावेळी पाहणी केली त्यावेळी समितीला अमूक ठिकाणी पार्किंग आहे असे नकाशावरुन दाखविण्यात आले होते. परंतु जेथे पार्किंग दाखविलेले आहे तेथे लॉन असून त्या लॉनवर लग्न, स्वागत समारंभ आयोजित केले जातात. आपण तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि कारवाई करुन समितीला कळवावे. ४०० खोल्या असतील तर त्यासाठी किती असे निदेश समितीने विभागाला दिले.

यावर सध्याच्या वापराप्रमाणे तेथे ७६० कार पार्किंग आवश्यक आहे. नकाशावर ७६० कार पार्किंग दोन प्रकारे दाखविलेले आहे. "बी" विंगच्या बेसमेंटमध्ये आणि हॉटेलच्या मागच्या बाजूला मेकॅनिकल पार्किंग लॉट असुन दोन ठिकाणी पार्किंग मान्य केलेले आहे. ट्रॅफिक विभागाने पार्किंग व्यवस्थेची कशा प्रकारे पाहणी केलेली आहे हे ट्रॅफिक विभागाचे अधिकारी सांगू शकतील असे अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी समितीस सांगितले. यावर समितीने But you are the final authority to give the permission. पोलीस विभागामार्फत जी परवानगी दिली जाते त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी असली पाहिजे, असे समितीने सांगितले असता पोलीस उपायुक्तांनी पुणे महागनरपालिकेच्या डीसी रुल्स् प्रमाणे जे निकष आहेत त्या प्रमाणे पार्किंग दिले जाते असे समितीस अवगत केले यावर समितीने विभागास असे सांगितले की, ८ दिवसात तपासणी करुन घ्यावी. तसेच महानगरपालिकेचे अधिकारी आणि ट्रॅफिक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याबाबत अतिरिक्त मुख्य

अभियंत्यांनी असा खुलासा केला की, साधारणपणे आर्किटेक्टच्या माध्यमातून परवानगी मागविण्यात येते. महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. महानगरपालिकेचे आर्किटेक्ट आहेत. त्यांनी डायरेक्टर ऑफ स्पोर्टस्च्या माध्यमातून परवानगी मागितलेली आहे. "बी" विंगच्या बेसमेंटमध्ये पार्किंग मंजूर केलेले आहे.

यावर समितीने विभागास असे सांगितले की, महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय ट्रॅफिक पोलिसांना काही करता येणार नाही. प्लॅनमध्ये जेथे पार्किंग दाखविलेले आहे त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते किंवा नाही एवढीच एनओसी ट्रॅफिक पोलिसांनी द्यावयाची आहे. महानगरपालिकेच्या डीसी रुल्स प्रमाणे परवानगी द्यावी लागते. महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे पार्किंग आहे किंवा नाही हे बघणे आवश्यक आहे. पार्किंगच्या जागेचा गैरवापर केला जात असुन हॉटेलच्या बाजूला जी लॉन आहे त्या जागेचा सुध्दा गैरवापर होत आहे. हॉटेलच्या बेसमेंटमध्ये रेस्टॉरंट सुरु आहे. क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर सुध्दा तेथे कमर्शियल ॲक्टिव्हीटीज् सुरु आहेत. हॉटेल मालक पैसे कमवित असुन त्यांनी नियम धाब्यावर बसवून कामे केलेली आहेत, हे सर्व तपासून घेतले पाहिजे. तसेच ऑर्चिड हॉटेलसाठी महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याची परवानगी घेण्यात आली आहे काय ? पोलीस विभागाने ट्राफिक संदर्भातील परवानगी दिलेली आहे काय ? अशी ही विचारणा केली. असता यावर पोलीस उपायुक्तांनी पोलीस विभागाने सदर हॉटेलला ट्राफिक संदर्भातील परवानगी सन २०१० मध्ये दिलेली असल्याचे सांगितले.

पोलीस विभागाने परवानगी दिली असली तरी महानगरपालिकेकडून ड्रेनेज, वॉटर, पार्किंग, पर्यावरण, अन्न व औषध प्रशासन, अग्निशमन विभाग या सर्व विभागांच्या एनओसीची गरज असते. सदर हॉटेलला पोलीस विभागाकडून वाहनतळाच्या संदर्भातील परवाना मिळाला असला तरी महानगरपालिकेकडून इतर परवानग्या घेण्याची आवश्यकता आहे, त्या शिवाय हॉटेल सुरु करता येत नाही. या सर्व बाबींची पाहणी करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता पोलीस उपायुक्तांनी पोलीस विभागाने वाहतुकीच्या संदर्भातील एनओसी दिलेली असल्याचे सांगितले व पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने सदर हॉटेलसाठी सन २००८-२००९ मध्ये लॉजिंगचा परवाना ४१६ खोल्यांसाठी दिलेला आहे. सदर परवान्याचे नुतनीकरण सन २००९-२०१० नंतर करण्यात आले नसल्याची माहिती सहायक आरोग्य प्रमुख यांनी समितीस दिली.

आरोग्य विभागाच्या परवान्याचे नुतनीकरण का करण्यात आले नाही. परवान्याचे नुतनीकरण न करता गेल्या तीन वर्षापासून सदर हॉटेल सुरु असल्याबाबत समितीने खेद व्यक्त केला असता सहायक आरोग्य प्रमुखांनी असे सांगितले की, परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी सदर हॉटेलला दंड व थकबाकीच्या रकमेसह दिनांक १३/०२/२०१३ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

वास्तविक पाहता महापालिकेच्या त्या विभागातील आरोग्य निरीक्षकांनी पाहणी करुन परवाना नुतनीकरण करण्याची कार्यवाही वेळेत सुरु करावयास पाहिजे होती. सदर निरीक्षकांनी हलगर्जीपणा केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्याला निलंबित करण्यात यावे. तसेच आरोग्य अधिकाऱ्यांनी हॉटेलला नोटीस दिल्याचे सांगून प्रत्यक्ष नोटीस समितीला त्यांनी वाचून दाखविली.

आरोग्य कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
जावक क्रमांक एच.ओ./७४०८,
दिनांक १३/०२/२०१३

नोटीस

प्रति,

व्यवस्थापक,
बी.डब्ल्यू,हायव्हे स्टार हॉटेल लिमिटेड,
स.न.२६,१ब./१क.-बालेवाडी,
शीव छत्रपती क्रीडा नगरी, संकुल, पुणे.

विषय : लॉजिंग परवाना नुतनीकरणाबाबत.

संदर्भ : लॉजिंग परवाना क्रमांक एल.सी.बी.पी.२००९-०००८७.

उपरोक्त संदर्भान्वये तुम्हास बी. डब्ल्यू. हायव्हे स्टार हॉटेल लिमिटेड (४स्टार) स.न.२६,१ब./१क.-बालेवाडी, शीव छत्रपती क्रीडा नगरी, संकुल, पुणे सदर जागेवर लॉजिंग दर्जा 'अ' बाबत लॉजिंग परवाना देण्यात आलेला होता. सदर परवाना हा २०८ खोल्या व ४१६ कॉटस् माहे ऑक्टोबर २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीकरिता देण्यात आलेला होता. सदर कालावधीच्या परवान्या नंतर आपण आज दिनांक १३/२/२०१३ रोजी अखेरपर्यंत सदर परवान्याचे नुतनीकरण केले नसल्याचे आमचे रेकॉर्डवरुन निदर्शनास आलेले आहे. तसेच त्याबाबत दिनांक ३१/०३/२०१३ रोजी अखेरपर्यंतची रक्कम रुपये २५,०९,२१८/- (अक्षरी पंचवीस लाख नऊ हजार दोनशे अठरा फक्त) अशी दंडासह थकबाकी आहे.

उपरोक्त देय रक्कम दिनांक २०/२/२०१३ पर्यंत पुणे महानगरपालिकच्या कोषागरात भरुन सदर चलनाची पावती आरोग्य खात्याकडे जमा करावी. असे न केल्यास आपल्या विरुध्द कायदेशीर कारवाई करुन सदरचा परवाना रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

सही
आरोग्य प्रमुख
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीसाठी :- मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका.

त्यांनी पुढे असेही सांगितले की, सदर हॉटेलचा परवाना सन २००९ पर्यंत होता. दंडासह २५ लाख रुपयांची मागणी नोटीसद्वारे करण्यात आली असुन संबंधित अधिकाऱ्यांनी आतापर्यंत सदर हॉटेलला नोटीस का दिलेली नाही, अशी विचारणा समितीने केली असता सहायक आरोग्य प्रमुखांनी या नंतरची नोटीस आयुक्तांच्या सहीने देण्यात येणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबतची माहिती समितीस दिली.

वास्तविक पाहता महालेखापालांनी या संदर्भात दिलेल्या अभिप्रायाच्या संदर्भात लोकलेखा समिती पुणे येथे पाहणी करण्यासाठी आल्यानंतर संबंधित अधिकारी कारवाई करण्याच्या गोष्टी करीत आहेत. गेल्या तीन वर्षापासून सदर हॉटेलचा लॉजिंग परवाना संपुष्टात आला असून त्याचे नुतनीकरण करण्यात आले नाही. परवाना नुतनीकरण करण्याबाबत सर्व अधिकारी दुर्लक्ष करीत असताना आयुक्तांनी देखील याबाबीकडे लक्ष दिले नसल्याबाबत खेद व्यक्त केला व नाही हे बरोबर नसून सन २००८-२००९ मध्ये जे अधिकारी असतील त्यांची महिती समितीला देण्यात यावी. तसेच संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले असता अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले.

हॉटेल परवान्याचे नुतनीकरण वेळेत केले नाही तर संबंधित हॉटेलला नोटीस देऊन दंडासह रक्कम वसूल केली असली तरी सद्य:स्थितीत सदर हॉटेल विना परवाना चालू असल्यामुळे ती ताबडतोब बंद करण्यात यावी. त्यानंतर हॉटेल परवान्याच्या नुतनीकरणाची कार्यवाही ज्या अधिकाऱ्यांनी केली नाही ते अधिकारी यासाठी जबाबदार आहेत त्यांच्यावर आयुक्तांनी कारवाई केली पाहिजे तसेच हॉटेलच्या परवान्याचे नुतनीकरण न करता पोलीस विभागाने वाहनतळाची परवानगी दिलेली आहे. याकरिता महानगरपालिकेशी समन्वय साधण्यात येत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता पोलीस उपायुक्तांनी पोलीस परवान्याचे नुतनीकरण २०११ मध्ये करण्यात आले असून सदर परवाना सन २०१४ पर्यंत आहे. पोलीस परवान्याचे नुतनीकरण तीन वर्षासाठी करण्यात आले असुन आता एका आठवड्यात सद्य:परिस्थितीची पाहणी करुन सदर परवाना रद्द करण्याची नोटीस देण्यात येईल, असा खुलासा समिती समोर केला असला तरी प्रत्यक्षात त्यानुसार कार्यवाही होईल किंवा नाही याबाबत समिती साशंक आहे कारण सदर हॉटेलला आरोग्य विभागाची परवानगी नसताना पोलीस विभागाने पार्किंगची परवानगी सन २०१४ पर्यंत दिलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही

परवानगी दिली त्यांच्यावर देखील कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता पोलीस उपायुक्त यांनी यासंदर्भात माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल, असे आश्वासित केले. समितीने यावर अशी विचारणा केली की, आरोग्य विभागाने २५ लाख रुपये थकबाकी काढलेली आहे. थकबाकी व दंडाची रक्कम आकारण्याचे निकष काय आहेत? यावर सहायक आरोग्य प्रमुख यांनी नियमानुसार दंडासह २५ लाख रुपयांची आकारणी करण्यात आलेली असल्याचे सांगितले.

आतापर्यंत तीन लाख रुपयांचा दंड भरुन घेतला असून अद्याप ३० लाख रुपयांचा दंड शिल्लक आहे. कमर्शिअल दर लावून दंडाची आकारणी करणे आवश्यक आहे. शासनाच्या निकषानुसार कारवाई करणे आवश्यक असल्याचे समितीने सांगितले.

सहायक आरोग्य प्रमुखांनी सन २००८-२००९ मध्ये सदर हॉटेलला आरोग्य विभागाने परवानगी दिलेली आहे. २०८ खोल्या व ४१६ कॉटस् चे नुतनीकरण करण्यासाठी दंड व थकबाकी मिळून २५ लाख रुपये आकारण्यात आले आहेत. सदर हॉटेलच्या परवान्याचे नुतनीकरण करण्यात आले नसल्यामुळे ती अनधिकृतरित्या सुरु असल्याचे समितीस सांगितले. सदर हॉटेल आता अनधिकृतरित्या सुरु असल्यामुळे काय कारवाई करण्यात आली आहे. हे जरी खरे असले तरी हॉटेल व्यवस्थापकांवर २५ लाख रुपयांचा दंड आकारुन त्यांना काहीही फरक पडत नसुन आरोग्य विभागाची परवानगी नसताना हॉटेलमधील कचरा उचलण्यासाठी महानगरपालिकेची गाडी तेथे येते. सदर हॉटेलसाठी फायर, इलेक्ट्रीसिटी, अन्न व औषधी प्रशासन विभागाची परवानगी नाही. तरी देखील वाहतूक पोलिसांनी २०१४ पर्यंत परवानगी दिलेली आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी असे सांगितले की, सन २००८ मध्ये अग्निशमन विभागाची एनओसी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर एनओसी घेण्यात आलेली नाही. दरवर्षी अग्निशमन विभागाची एनओसी घेणे बंधनकारक आहे.

सन २०१०-२०११ व २०१२ या वर्षाच्या एनओसीबाबत अग्निशमन विभागाने कोणती कार्यवाही केली आहे. एकदा अग्निशमन विभागाने परवानगी दिल्यानंतर दरवर्षी एनओसी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, ड्रेनेज, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच पार्किंगसाठी पोलीस विभागाची परवानगी लागते. त्याचप्रमाणे पर्यावरण विभागाची परवानगी लागते. या सर्व परवानग्या मिळाल्याशिवाय हॉटेल सुरु करता येत नाही. आता प्रत्यक्षात फक्त

पोलीस विभागाने पार्किंगच्या संदर्भात सन २०१४ पर्यंत परवानगी दिली असून इतर कोणत्याही विभागाची परवानगी हॉटेलकडे उपलब्ध नसल्यामुळे सदर हॉटेल आता अनधिकृतरित्या सुरु असुन सदर हॉटेल बंद करावी लागणार आहे. त्या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्यात यावी. तसेच अग्निशमन, पोलीस व इतर विभागांचा सविस्तर लेखी अहवाल घेऊन दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन मुंबई येथे साक्षीच्या बैठकीला उपस्थित रहावे, असे समितीने विभागास सांगितले व या १५ दिवसांच्या कालावधीत संबंधितांना नोटीस देऊन त्यांच्यावर केलेल्या कारवाईच्या अहवालासह बैठकीला उपस्थित रहावे. वाहतूक पोलिसांची एनओसी अत्यंत महत्वाची आहे. मुळात कोणताही प्लॅन मंजुर नसतांना पोलिसांनी पाहणी न करता पार्किंगची एनओसी दिलेली आहे. या सर्व अहवालांसह समितीच्या बैठकीला मुंबईला उपस्थित राहण्यास सांगितले व कागदावर प्लॅन पाहून पोलीस विभागाने पार्किंगची एनओसी दिलेली आहे. प्रत्यक्षात जागेवर जाऊन पाहणी करणे आवश्यक होते असेही मत समितीने व्यक्त केले. यावर पोलीस उपायुक्तांनी पोलीस विभागाकडून पार्किंगची एनओसी देतांना प्रत्यक्षात किती पार्किंग स्पेस आहे व एनओसी देतांना किती पार्किंगसाठी एनओसी दिलेली आहे हे तपासून पाहण्यात येऊन एनओसी देतांना नियमांचे उल्लंघन झाले असेल तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन समितीस दिले. यावर समितीने मुळात मंजूर प्लॅन पाहून पार्किंगची एनओसी द्यावयास पाहिजे. मंजूर प्लॅनची माहिती महानगरपालिकेकडून घ्यावयास पाहिजे. पार्किंगसाठी जागा नसतांना पोलीस विभागाने पार्किंगसाठी परवानगी दिलेली आहे. अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे. यासंदर्भातील अहवाल विभागाअंतर्गत समितीला देण्यात यावा, असे विभागाला सांगितले असता पोलीस उपायुक्तांनी अहवाल देण्यास संमती दर्शविली.

सदर हॉटेलची पाहणी करण्यासाठी समिती गेली असता अन्न परवाना आता महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडून दिला जात नाही अशी माहिती सांगण्यात आली होती. सदर कार्यवाही दिल्ली येथून केली जाते असे सांगितले होते. मात्र सन २००८ मध्ये परवानगी देण्यात आली होती व सदर परवान्याचे नुतनीकरण करण्यात आले नाही असे सांगितले असुन ही अत्यंत गंभीर बाब आहे. समितीला असत्य माहिती दिली जात असून सन २००६ मध्ये ४१० खोल्यांचा आराखडा मंजुर होता. त्यावेळी महानगरपालिकेकडून ताबा प्रमाणपत्र् देण्यात आले आहे. असे असताना आरोग्य खात्याकडून फक्त २०८ खोल्यांना लॉजिंग परवाना का दिलेला

आहे. तसेच सदर हॉटेलातील २१० खोल्या वापरण्यात येत नाहीत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता सहायक आरोग्य प्रमुख यांनी बांधकाम विभागाने जो नकाशा दिलेला असतो त्याप्रमाणे परवानगी देतो. नकाशामध्ये २०८ खोल्या आणि ४१६ बेडसाठी परवानगी देण्यात आली होती. त्या नकाशाची प्रत रेकॉर्डला असल्याचे सांगितले यावर अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी समितीस असे सांगितले की, हा प्लॅन एकदाच मान्य केलेला आहे. ४१० खोल्यांचा आराखडा मान्य असून त्यासाठी ताबा प्रमाणपत्र दिलेले आहे. आरोग्य विभागाचा आणि त्यांचा काय पत्रव्यवहार आहे हे तपासून घ्यावे लागेल असे आश्वासन समितीला देण्यात आले.

महानगरपालिकेच्या प्लॅन नुसार ४१० खोल्या मंजूर असताना २०८ खोल्यांना परवानगी कशी काय देऊ शकता ? तसेच कागदपत्र तपासून घ्यावीत आणि समितीला अहवाल सादर करावा. आरोग्य विभाग, फायर विभाग, टॅक्स आकारणी, ट्रॅफिक पोलिसांची एनओसी, पोलिसांचा परवाना, पर्यावरण विषयक परवानगी आणि अन्न व औषधी प्रशासन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र याबाबतची माहिती तसेच हॉटेलच्या पाण्याच्या कनेक्शनच्या विषयासंदर्भात समितीला माहिती देण्याबाबत विभागाला आदेशित केले.

महानगरपालिकेने हॉटेलसाठी पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे. त्यांच्याकडे आतापर्यंत पाण्याच्या बिलाची ४२ लाख ९८ हजार रुपयांची थकबाकी असल्याची माहिती यावेळी अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी समितीस दिली. एवढी थकबाकी असल्याबाबत समितीने विचारणा केली असता त्यांनी काही पैसे भरलेले असुन मागच्या वेळी १ लाख ८१ हजार रुपये भरले होते. सद्य:स्थितीत त्यांच्याकडे ३९ लाख ७८ हजार रुपयांची थकबाकी असल्याची माहिती अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी दिली.

समितीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने हॉटेलला पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे काय ? अशी विचारणा केली असता शहर अभियंता यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने हॉटेलला पाण्याचे कनेक्शन दिलेले नाही. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने डायरेक्टर ऑफ स्पोर्टस् यांना पाण्याचे कनेक्शन दिलेले असल्याचा खुलासा केला.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने डायरेक्टर ऑफ स्पोर्टस् यांना जे पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे त्या कनेक्शनमधून ते हॉटेलसाठी पाणी घेतात काय, याबाबत आयुक्त, क्रीडा यांनी त्यांना जे पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे त्याची थकबाकी किती आहे याबाबतची

माहिती घ्यावी आणि समितीला ८ दिवसात माहिती सादर करावी. समितीने विचारलेल्या या प्रश्नावर शहर अभियंता यांनी ८ दिवसात समितीला माहिती सादर करतो असे सांगितले. तथापि, पुणे महानगरपालिकेने त्यांना दिनांक ०१.१०.२००८ रोजी नळ जोडणी दिलेली आहे. ती ४ इंचाची पाण्याची पाईप लाईन आहे. त्यांच्याकडे ३९ लाख ७८ हजार रुपये थकबाकी असल्याची माहिती अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी समितीस दिली.

उक्त दोन्ही हॉटेलमध्ये किती टी.व्ही. आहेत, त्यांनी सेट टॉप बॉक्स बसविलेले आहेत काय आणि त्यांच्याकडून कराची रक्कम वसूल केलेली आहे काय याबाबतची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील प्रमाणे सादर केली :

हॉटेल विट्समध्ये १२० खोल्या असुन हॉटेल ऑर्चिड मध्ये ८८ खोल्या आहेत अशा एकूण २०८ खोल्यामध्ये केबल जोड (टिव्ही) दिलेल्या आहेत हॉटेल विट्सचे केबल जोडण्यांचा माहे मार्च, २०१२ पर्यंतचा करमणुक कर भरलेला आहे परंतु ऑर्चिड हॉटेल यांनी केबलचा करमणुक कर भरलेला नाही तरी सदरच्या हॉटेलकडे खालील प्रमाणे करमणुक कराची थकबाकी आहे.

१)	**हॉटेल ऑर्चिड :-**	ऑगस्ट २०१० ते मार्च २०१३ (३२ महिन्यांचा करमणुक कर)	१२६७२०/-
		१८% प्रमाणे होणारी व्याजाची आकारणी	१८४१/-
		२४ % प्रमाणे होणारी व्याजाची आकारणी	७३६५६/-
			२०२२१७/-
२)	**हॉटेल विट्स :-**	एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ (१२ महिन्यांचा करमणुक कर)	६४८००/-
		१८% प्रमाणे होणारी व्याजाची आकारणी	८९१/-
		२४% प्रमाणे होणारी व्याजाची आकारणी	५९४०/-
			७१६३१/-

प्रस्तुतचे हॉटेल ऑर्चिड यांचेकडून करमणुक कराची रक्कम रुपये १२६७२० व व्याजाची रक्कम रुपये ७५४९७/- हॉटेल ऑर्चिड कडून वसुल करावयाची रक्कम रुपये २०२२१७/- (दोन लाख दोन हजार दोनशे सतरा रुपये) व हॉटेल विट्स यांचे कडून करमणुक कराची रक्कम रुपये ६४८००/- व त्यावरील व्याजाची रक्कम रुपये ६८३१/- हॉटेल

विट्सकडून केबलची थकबाकी व त्यावरील व्याजाची आकारणी केली असता होणारा देय करमणुक कर ७१६३१/- (एकाहत्तर हजार सहाशे एकतीस रुपये) इतका होत आहे. सदरील हॉटेल मध्ये केबलची ॲनॉलॉग सिस्टीम असून सेट टॉप बॉक्स बसविणेत आलेले नाहीत.

सदर हॉटेलची करमणुक कर निरीक्षक यांनी दिनांक ३०/१०/१२ रोजी तपासणी करून तेथील डेप्युटी मॅनेजर श्री अस्लम सय्यद यांचा जबाब नोंदविणेत आला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी मद्य व सीडीवरील म्युझिक चालू असलेचे दिसून आले आहे. सदरील हॉटेल ऑक्टोबर २०१० पासून चालू असून श्री.विरल कामत यांचे मालकीचे असून ते स्वत: चालवतात. सदर हॉटेलमध्ये खाद्य व सर्व प्रकारचे मद्य व सीडीवरील संगीत बाबत करमणुक कर विभागाकडे कोणताही कर भरलेला नाही अथवा परवानगी घेतलेली नाही असा जबाब दि.३०/१०/१२ रोजी श्री.अस्लम सय्यद यांनी दिलेला आहे. तपासणीचे वेळी सदर हॉटेल मधील वस्तुस्थितीचा पंचनामा करणेत आलेला आहे. त्यानुसार हॉटेल मध्ये खाद्यपदार्थ, सर्वप्रकारची मद्य व सीडीवरील संगीताची व्यवस्था असलेचे दिसून आले आहे. तसेच सदरचे हॉटेलमध्ये एप्रिल २०११ पासून मद्य व सीडीवरील संगीत चालू असल्याचे श्री अस्लम सय्यद यांनी जबाबात नमूद केले आहे.

हॉटेल विट्स (ऑर्किड) यांनी मुंबई करमणुक शुल्क अधिनियम १९२३ च्या नियमांचे उल्लंघन केले बाबत संबंधीतास नोटीस देणेत आली होती. सदर हॉटेल मार्फत कोणताही खुलासा केलेला नाही परंतु डेप्युटी मॅनेजर श्री.अस्लम सय्यद यांनी एमटीडीसी यांचेकडील पत्र क्र.MTDC/२०११/INCENTIVE/TP-२००६/EC-३१/१९२७ दि.१९ एप्रिल २०१२ रोजीचे पत्र दिलेले आहे. दि.३०/१०/२०१२ रोजीचे जबाबामध्ये श्री.अस्लम सय्यद यांनी सदर हॉटेलला एमटीडीसीने करमणुक कर माफ केलेला असलेचे नमूद केले आहे.

सदर हॉटेलमध्ये एप्रिल २०११ पासून सीडीवरील म्युझिक चालु असून २२ महिन्यांचा ५००००/- रुपये प्रमाणे करमणुक कर ११००००००/- व दंडाची रक्कम २२००००००/- व विना परवाना संगीत सुरू केल्याबाबत २०००/- असा एकूण देय करमणुक कर ३३,०२,०००/- (तेहतीस लाख दोन हजार) रुपये इतका होत असुन आदेश देण्याचे काम सुरू आहे. समितीने जेथे अनियमितता झालेली आहे त्याबाबतचा अहवाल तसेच कोणती कारवाई करणार आहात यासह संपूर्ण माहिती समितीला सादर करावी असे आदेश विभागाला दिले.

समितीने एम.एस.ई.बी. च्या मुख्य अभियंत्यांना अशी विचारणा केली की, हॉटेलचे एन्ट्रन्स हायवेच्या निकषा प्रमाणे आहेत काय ? यावर त्यांनी तपासणी करुन समितीला माहिती देतो असे आश्वासन त्यांनी समितीस दिले.

महानगरपालिकेने जो आराखडा मंजूर केलेला आहे तो क्रीडा विभागाच्या नावाने मंजूर झालेला आहे. तेथे ५४ हजार स्क्वेअर फुटाचे अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यांनी २ एकर जागा बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेली आहे त्यासंदर्भात आपण कोणती कारवाई करणार आहात ? याबाबत समितीने विचारणा केली असता आयुक्त, क्रीडा यांनी असे सांगितले की, त्यांनी एक एकर जागेवर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. "बी" विंगचे ॲग्रीमेंट झालेले आहे. त्यांना नोटीस देणार आहोत ? We will ask them for demolition of B-Wing. Accordingly, we will also ask Pune Municipal Corporation to make demolition. यावर समितीने अशी विचारणा केली की, २४ हजार स्क्वेअर फुटाचे बांधकाम करावयाचे होते. परंतु त्यांनी ५४ हजार स्क्वेअर फुटाचे बांधकाम केलेले असुन हायवेच्या बाजूकडील ८ हजार स्क्वेअर फुट जागा आणि दुसऱ्या बाजूची ३५ हजार स्क्वेअर फुट जागा त्यांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेली आहे. ८७ ते ८८ गुंठे जागा बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेली आहे, त्यासंदर्भात क्रीडा विभाग कोणती कारवाई करणार आहे ? यावर क्रीडा आयुक्तांनी असा खुलासा केली की, त्यांनी क्रीडा विभागाच्या जागेत हस्तक्षेप केलेला असेल तर ती जागा त्यांच्याकडून काढून घ्यावी लागेल.

कन्व्हेन्शन हॉलमध्ये कार्यक्रम असेल तर पार्किंगसाठी क्रीडा विभागाच्या जागेचा वापर केला जातो काय ? अशी समितीने विचारणा केली असता ज्यावेळी कार्यक्रम असतो त्यावेळी ते क्रीडा विभागाच्या जागेचा वापर करतात असा खुलासा उपसंचालक क्रीडा यांनी केला.

त्यांनी तेथे जे बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे त्या बांधकामाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना मिळाली नाही. ती जागा क्रीडा विभागाची आहे. हॉटेलवाल्यांना जागेची बॉर्डर माहिती आहे. हॉटेलवाले मागील ४-५ वर्षापासून कार्यक्रमासाठी तेथील २.५ ते ३ एकर जागेचा बेकायदेशीरपणे वापर करीत आहेत. त्या जागेचे भाडे वसूल करण्यासाठी शासनाच्या वतीने त्यांना नोटीस देणार आहात काय ? तसेच ती जागा क्रीडा विभागाची आहे. तेथे कम्पाऊंड वॉल का बांधत नाही ? हॉटेलवाले विभागाकडे काहीही विचारणा करीत नाहीत. क्रीडा विभागाच्या जागेचा दूरुपयोग होत आहे. मग क्रीडा विभागातर्फे तेथे कम्पाऊंड वॉल का बांधत

नाही ? अशी विचारणा समितीने विभागाकडे केली. हॉटेलच्या साईड मार्जिनला जागा उपलब्ध नसुन कम्पाऊंड वॉल नाही. असे असताना महानगरपालिकेने ताबा प्रमाणपत्र दिले आहे. बांधकामाच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले असल्याचे ही समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. यावर अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी बांधकामाची परवानगी देतांना साईड मार्जिन प्लॅनमध्ये दर्शविण्यात आलेले आहे. त्यानंतर त्यांनी सेटबॅक किती वाढवावा हा त्यांचा प्रश्न असल्याचे नमूद केले.

उक्त दोन्ही हॉटेलच्या व्यवस्थापकाकडून आतापर्यंत जी जागा वापरण्यात आली आहे, त्या जागेचे भाडे कोणत्या दराने आकारण्यात आले आहे. महानगरपालिका ज्या प्रमाणे पे ॲन्ड पार्कचे दर लावते त्या दरानुसार हॉटेल व्यवस्थापकास पार्किंगचे दर लावले पाहिजेत. वर्षाला एक रुपया स्क्वेअर फूट दर आकारण्यात येत असल्यामुळे दिवसाला एक पैसा देखील होत नाही. त्यामुळे महानगरपालिका जे पे ॲन्ड पार्कसाठी दर आकारते ते दर लावण्यात यावेत. हॉटेल व्यवस्थापकांनी नियमाचे उल्लंघन केले आहे. हे आता महानगरपालिकेच्या लक्षात आले असुन त्यानुसार मूळ मालकांवर कारवाई करावयास पाहिजे. हॉटेल व्यवस्थापकांनी ज्या बाबी अनधिकृत व बेकायदेशीर केल्या आहेत त्याचा विचार करुन नियमानुसार कारवाई करावयास पाहिजे असे समितीने सुचविले असता याबाबत आयुक्त, क्रीडा यांनी असा खुलासा केला की, हा जमिनीचा विषय आहे, ज्या गोष्टी अनधिकृत झाल्याचे निदर्शनास येत आहे, त्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. जागा खाली करण्याची कार्यवाही करण्यात आली असुन अनधिकृत कामे बंद करण्यात येतील. याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. Within the period of Notice, either they have to demolish the unauthorised construction otherwise Pune Municipal Corporation will take action according to their rules. We will also take further action according to our Agreement.

हॉटेल मालकांनी शासनाच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे ते अतिक्रमण थांबविले पाहिजे. नियमबाह्य करण्यात आलेले बांधकाम पाडण्यासाठी पोलीस संरक्षण घेऊन कार्यवाही करण्यात यावी. हॉटेल व्यवस्थापक कोर्टात जातील म्हणून शासनाने कोणतीही कार्यवाही थांबवू नये असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, मोजणी झालेली असल्यामुळे सदर जमीन ताब्यात घेण्याबाबत नोटीस देण्यात येईल. यावर समितीने त्यांनी मंजूर प्लॅन प्रमाणे काम केलेले नसल्यामुळे त्यांना नोटीस देण्याची आवश्यकता

नसल्याचे मत व्यक्त केले. यावर करारनामा पाहून कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर समितीने असे निदर्शनास आणले की, ॲग्रीमेंट प्रमाणे हॉटेल मालकांनी इमारतीचे बांधकाम करावयास पाहिजे.नोटीस न देता बांधकाम पाडले तर शासनावर आरोप होतील म्हणून आपण नोटीस देण्याची प्रक्रिया करीत आहोत, याबाबत अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी पीएमसी ॲक्टनुसार नोटीस द्यावी लागते, त्यानंतर पुढील कार्यवाही करावी लागते असे मत स्पष्ट केले.

इमारतीचा प्लॅन संचालक क्रीडा यांच्या नावे असल्याबाबत विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी नियमानुसार संचालक, क्रीडा यांच्या नावाने नोटीस देण्यात आलेली असल्याचे सांगितले.

You issue the notice to the Hotel authorities as early as possible. समितीने या विषयाबाबत बैठक घेतली होती. त्यावेळी नियमांचे उल्लंघन केल्यामुळे ज्या त्रुटी निदर्शनास आल्या त्या अधिकाऱ्यांनी मान्य केल्या होत्या. यामध्ये महानगरपालिका, पोलीस विभाग किंवा इतर सर्व विभागांच्या ज्या त्रुटी होत्या त्या सर्व त्रुटींची पूर्तता करण्यासाठी आठ दिवसाचा कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्यासंदर्भातील सविस्तर माहिती समितीला सादर करावयास पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी नैसर्गिक न्याय तत्वानुसार कार्यवाही करण्यात येईल. नोटीस देण्याची आवश्यकता असेल तर नोटीस देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. आवश्यकता भासल्यास कोर्टात कॅव्हेट दाखल करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले. समितीने हॉटेल व्यवस्थापकास नोटीस देण्याची आवश्यकता नसल्याचे त्यामुळे नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात येऊ नये असे सुचविले असता विभागीय सचिवांनी नोटीस द्यावी किंवा नाही याबाबत तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. नोटीस न देता कार्यवाही करण्यात यावी असे मत समितीने असून अधिकारी वर्गाने शासनाच्या बाजूने सकारात्मक दृष्ट्या विचार करावा. नोटीस पाठविण्याचा आग्रह विभागीय अधिकारी का धरीत आहात ? अशी विचारणा समितीने केली असता नैसर्गिक न्याय तत्वानुसार कार्यवाही झाली तर शासनावर आरोप होणार नाहीत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. या प्रकरणाची तपासणी करुन नोटीस देण्याची गरज असेल तर नोटीस देण्यात येईल, कोर्टात कॅव्हेट दाखल करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या ठिकाणी आता असा प्रश्न निर्माण झाला आहे की, सरकारने नोटीस देऊन कार्यवाही करावी किंवा नोटीस न देता कार्यवाही करावी. कारण तेथील अनधिकृत बांधकाम थांबविले पाहिजे. त्याचप्रमाणे वेळच्या वेळी अनधिकृत बांधकाम का थांबविले नाही यासाठी कोण अधिकारी जबाबदार आहे, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी ज्या अधिकाऱ्यांनी चूक केली त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे समितीस सांगितले. नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधितांना ७ दिवसांची नोटीस देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच महानगरपालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली तर ती पाडण्यासाठी त्यांना कायदेशीर नोटीस देण्याची आवश्यकता नाही या सुप्रीम कोर्टाच्या जजमेंटची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी समितीला दिले.

शासनाच्या धोरणाप्रमाणे एखाद्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यापूर्वी त्या व्यक्तीला नॅचरल जस्टीस प्रमाणे नोटीस देणे आवश्यक आहे. हॉटेलला नोटीस देण्याची आवश्यकता नसेल तर नोटीस दिली जाणार नाही आणि नोटीस देणे आवश्यक असेल तर ती दिली जाईल. ते कोर्टात सक्षम होणार नाहीत, याची काळजी घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच त्या जागेला कम्पाऊंड वॉल करुन घेणार असून ज्या अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकामाकडे दुर्लक्ष केलेले आहे त्यांना ७ दिवसाच्या आत नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात येईल असेही समितीस सांगितले. आता जेवढी अनधिकृत बांधकामे निदर्शनास आलेली आहेत त्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत, त्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आणि त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नसेल तर ती का करण्यात आली नाही ? अशी समितीने विचारणा केली असता जे अधिकारी जबाबदार आहेत त्या अधिकाऱ्यांना नॅचरल जस्टीस प्रमाणे नोटीस दिली जाईल व त्यांचेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The CAG submit their Report to the Legislature and after that it comes before the Public Accounts Committee of the Legislature. Therefore, it is the responsibility of Committee Member to go through the Audit paras and investigate, ask for the action taken on audit paras by the concerned Department.

If the appropriate action is not taken by the department then ask for the reason, why the action was not taken? and from whom the action was not taken? समितीला एवढ्या खोलात जाऊन माहिती घेण्याची काय आवश्यकता आहे ? परंतु याची सखोल चौकशी व्हावयास पाहिजे. संबंधित अधिकारी सुध्दा यासाठी जबाबदार आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात कारवाई केली नाही, हे समोर आलेले आहे. विभागीय सचिवांनी असे सांगितले की, संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करतो. त्यावेळी कार्यरत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात आली नाही, याचे उत्तर विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय सचिवांनी समितीला द्यावे लागेल असे समितीने सांगितले. तसेच शासकीय जागेवर अतिक्रमण झाले असेल तर संबंधितांना नोटीस देण्याची आवश्यकता आहे काय ? अशी ही विचारणा समितीने केली असता अतिरिक्त मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झाले असेल तर बीपीएमसी ॲक्ट प्रमाणे आम्ही संबंधितांना नोटीस देत नाही. संबंधितावर कारवाई करतो.

ज्या अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही त्यांच्यावर कारवाई करावी आणि विभाग कोणती कारवाई करणार आहात हे ८ दिवसात समितीला कळवावे असे समितीने निदेश दिले त्याअनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले की, A.G. want to make a point on the expenditure incurred from the Contingency fund received from the State Government. As per the Finance Department's G. R. of the year 1983 and the provisions of State Budget Manual regarding expenditure from Contingency fund have not been followed. The State Government clearly instructed that if there is an expenditure incurred from the contingency fund by any controlling officer, in this case the Director of Sports and Youth Services have the responsibility of submitting the prescribed monthly progressive expenditure incurred out of advances drawn from contigency fund through their Administrative Department to the Finance Department. The Director of Sports and Youth Services and the School Education and Sports Department had not followed the provisions of State Budget Manual and the GR. If the provisions of the Budget Manual and the GR had been followed the related papers and documents like vouchers would

then have been available with the controlling officer. Further, the Utilization Certificate by the Chartered Accountant forwarded by the Organizing Committee to the Director of Sports and Youth Services on 16 August, 2010 clearly states that "In this connection Utilization Certificate from Chartered Accountant has already been forwarded to your office vide out letter dated 11th August,2010 for total amount of Rs.26.56 crore. Expenditure incurred in connection with Commonwealth Youth Games at 'Balewadi Sports Complex' against Rs.25.12 crore grant received from Government of Maharashtra. But administrative department have not given the details of expenditure of contigency fund as per the State Budget Manual and GR. They have not followed the Government Rules for expenditure from contigency fund.

The Utilization Certificate also shows the expenditure of Rs. 40 lakh which was paid for and on behalf of Pune Municipal Corporation. There is also an absence of details of expenditure of Rs. 40 lakh. The forwarding letter of Utilization Certificate only states that " For Overlays, furniture and fixtures, For Branding & decoration of venues (including amount of Rs. 4,050,000 paid for and on behalf of Pune Mahanagar Palika)". The Pune Municipal Corporation should have the details of expenditure incurred from the funds given by them. They must have the records for this expenditure.

याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, I think that the reply on this objection is expected from the Pune Municipal Corporation. यावर महालेखापालांनी अभिप्राय देताना असे नमूद केले की, what about the expenditure of Rs. 25.12 Crs.? The Departement had not followed the Finance Department's G.R. of the year 1983. They have not followed the provisions of the State Budget Manual regarding expenditure incurred from the Contingency Fund. They have not given the details of expenditure. You must have the details of expenditure. The Pune Municipal Corporation should also have the details of expenditure of Rs. 40 lakh.

महालेखापालांच्या या आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी If I understand your point correctly, what you are saying that, the Organising Committee had not given the

details of expenditure for Rs. 26 Cr. एक्सपेंडिचरचे डिटेल्स मागविण्यासंदर्भात मागील बैठकीत चर्चा झाली होती त्यांना दोन वेळा पत्र पाठविलेले आहे. But the Pune Municipal Corporation might be having the details of expenditure for Rs. 40 lakh. अशी माहिती महालेखापालांना दिली.

What about the details of expenditure of Rs. 25.12 Cr? You had given the funds to the Organising Committee. But they had not given you the details of expenditure. The fund is given by the State Government. Therefore, they are answerable for it. They must give the details of expenditure to the Committee. They must give the vouchers, documents which they have in connection with the expenditure of Rs. 25.12 Cr to the Committee or your Department. अशी विचारणा समितीने केली असता प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, It is clearly mentioned in Finance Department's G.R. of year 1983 about the expenditure from Contingency Fund. As already stated the Department had not followed the provision of the State Budget Manual as a request of which the DSYS and Department did not have any details of expenditure out of the contigency fund advanced and the related expenditure vouchers incurred by the organising committee.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा सुरु होण्यापूर्वी २० कोटी रुपये आयोजन समितीला देण्यात आले होते. सदर रकमेचा हिशोब एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा असे ऑगस्ट, २००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. डिसेंबर, २००८ व जानेवारी, २००९ मध्ये राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा संपल्यानंतर तिसऱ्या हप्त्याची रक्कम देण्यात आली होती. तिसऱ्या हप्त्याची रक्कम ७ कोटी ९५ लाख रुपये इतकी होती. स्पर्धा संपल्यानंतर दिनांक १२.८.२००९ रोजी उर्वरीत रुपये ५.१२ कोटी रुपये अदा केलेले असल्याचा तत्कालिन संचालक, क्रिडा यांनी खुलासा केला. त्यावेळी संचालक कोण होते. Any person who was on that post is officially responsible for audit and expenditure of Contingency Fund. राज्य सरकारने कॉन्टेजन्सी फंडातून पैसा दिलेला असल्याने या रकमेचा हिशोब देणे आवश्यक आहे. या रकमेचा हिशोब ज्यांनी दिला नसेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर संबंधितांनी हिशोब दिलेला नसल्याचे विभागीय

सचिवांनी सांगितले. यावर ३२ कोटी ९५ लाख रुपये कॉन्टेन्जन्सी फंडातून काढण्यात आले असून दिल्ली येथील कार्यालयासाठी त्यातील २५ कोटी १२ लाख रुपये देण्यात आले आहे. यातील २० कोटी ७ लाख रुपये फर्निचरवर खर्च करण्यात आले आहे. ५ कोटी ८५ लाख रुपयांचा खर्च डेकोरेशनवर दर्शविण्यात आला आहे. या कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्यात आले आहे. हा खर्च बालेवाडी पुणे येथे झालेला नसून दिल्ली येथील कार्यालयासाठी झालेला असल्याची माहिती आयुक्त क्रीडा यांनी समितीस दिली. जो निधी खर्च केला त्यासंदर्भातील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून यासंदर्भातील माहिती वित्त विभागाकडून घेण्यात येऊन त्यांच्याकडून या खर्च केलेल्या निधीचे तपशिल मागितले जातील. त्यानंतर राज्य सरकारकडून कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

सदर प्रश्न २५ कोटी रुपयांचा असुन महालेखाकारांनी यावर आक्षेप घेतलेला आहे. गेल्या चार वर्षापासून महालेखाकार कार्यालयाकडून पत्राद्वारे वारंवार ३२ कोटी रुपयांच्या हिशोबाची मागणी करण्यात येत असून अद्यापही हिशोब देण्यात आलेला नाही. दिल्ली येथील महालेखाकार कार्यालयाने केंद्र शासनाने दिलेल्या निधीच्या संदर्भातील हिशोब सादर केले आहेत. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निधीच्या खर्चाचा हिशोब दिले जात नाही. २० कोटी फर्निचरवर खर्च करण्यात आला असून ५ कोटी रुपये इंटेरिअरवर खर्च करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या किंवा ग्रामपंचायतीमध्ये खर्च झाला असेल तर तो एक वेळ समिती समजू शकली असती. यासंदर्भातील हिशोब वित्त विभागाने देणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच सी.एफ.ची रक्कम बजेटद्वारे दिली जात नाही. निकषाप्रमाणे हिशोब देणे आवश्यक आहे. जो निधी मिळाला तो कोठे खर्च केला त्याचा हिशोब दिलाच पाहिजे असे ही विभागास सांगितले. याअनुषंगाने वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, सी.एफ.मधून ज्या कामासाठी निधी काढण्यात आला तो त्याच कामासाठी खर्च केला पाहिजे. यावर तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी असे मत व्यक्त केले की, रेकॉर्डवरुन अशी माहिती निदर्शनास येत आहे की, हा निधी फर्निचर, फिक्सचरस्, ब्रँडिंग आणि डेकोरेशन, इन्फ्रास्ट्रक्चर यावर खर्च करण्यात आला आहे. समितीने बँक खाते कोणाच्या नावे उघडण्यात आले होते याबाबत विचारणा केली तसेच यासंदर्भातील प्रपोजल कोणी दिले होते. आयोजक समितीने दिल्ली येथे जाऊन पाहणी केली होती काय ? याबाबतही विचारणा केली असता

तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी आयोजक समितीमध्ये टेक्निकल सदस्य होते अशी माहिती दिली.

आयोजक समितीमध्ये जे टेक्निकल सदस्य होते त्यांनी शिफारस केल्यानुसार प्रस्ताव मागवून निधी देण्यात आला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सी.एफ.मधून पैसा काढून देण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. आयोजक समितीकडून प्रस्ताव मागवून निधी देणे आवश्यक होते तशी कार्यवाही करण्यात आली आहे काय ? याबाबत विचारणा केली असता आयोजक समितीने पत्र पाठवून निधीची मागणी केली होती. त्यावेळी २५ कोटी ३० लाख रुपये सी.एफ.मधून काढून देण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता. संचालक व आयोजक समितीच्या नावाने चेक देण्यात आला होता त्यामुळे त्यांच्याकडे हिशोब मागण्यात येत आहे. सदर रकमेचा हिशोब अद्यापही दिलेला नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले. यावर आयोजक समितीच्या नावाने धनादेश दिला त्यावेळी त्यांच्याकडून लेखी पत्राद्वारे मागणी करण्यात आली होती काय ? २५ कोटी रुपयांचा हिशोब कोठेच लागत नाही. महालेखाकार यांनी याबाबत वारंवार पत्र पाठवून संबंधित अधिकारी हिशोब देण्यास तयार नाहीत. त्यामुळे लोकलेखा समिती आता असा निर्णय घेत आहे की, आयोजक समितीने २५ कोटी रुपयांचा हिशोब न दिल्यामुळे या रकमेचा गैरव्यवहार, अपहार झालेला आहे असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. राज्य सरकारकडून राष्ट्रकुल युवा स्पर्धेसाठी ४५० कोटी रुपये दिले होते. ३५ कोटी रुपयांपैकी २२ कोटी रुपये फर्निचरवर खर्च करण्यात आले आहेत. या कामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत, केलेल्या कामाचे व खर्चाचे युटिलायझेशन प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे लोकलेखा समितीला उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यामुळे या आयोजन समितीच्या अध्यक्षांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे समितीचे स्पष्ट मत झाले असल्याचे सांगितले व शासकीय समिती असताना सरकारी अधिकारी या समितीत नव्हते काय ? अशी ही विचारणा समितीने केली असता तत्कालिन क्रीडा संचालक यांनी असे सांगितले की, दिल्ली येथे ज्या क्रीडा स्पर्धा झाल्या त्यासाठी संयुक्त समिती होती. परंतु त्या समितीत महाराष्ट्र शासनाचे अधिकारी नव्हते.

हा घोटाळा उघडकीस आला त्यावेळी शासनाकडून काय उत्तर देण्यात आले आहे, या समितीने विचारलेल्या प्रश्नावर प्रधान महालेखाकार यांनी असे सांगितले की, A.G. have not

quoted here the explanation got from the Government. या घोटाळ्यामध्ये डायरेक्टर, सचिव, संबंधित अधिकारी/कर्मचारी, वित्त विभाग असे सर्वच जबाबदार आहेत. २५ कोटी रुपयांचा चेक कोणत्या बँकेचा देण्यात आला होता. तसेच बँकेचा चेक वटला आहे काय ? यावर खुलासा करताना तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचा चेक देण्यात आला होता. सेंट्रलाईज क्लिअरन्स असल्यामुळे सदर धनादेश कोणत्या बँकेकडे गेला याची माहिती मिळत नसल्याचे समितीस सांगितले.

चेक कोणत्या बँकेत वटला याची माहिती मिळायला हवी तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. The Committee is the custodian of the Government property and money. या विषयाबाबत शासनास समिती शिफारस करणार आहे. जे अधिकारी यामध्ये दोषी आहेत त्यांच्यावर जबाबदारी टाकावी लागणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे हिशोब मागूनही समितीला हिशोब सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची शिफारस समितीकडून शासनाला करण्यात येईल. वित्त विभागाचे प्रधान सचिव, तसेच त्यावेळी जे अधिकारी होते त्यांच्यावर स्वत:हून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावयास पाहिजे. शासनाने निधी दिलेला असून त्याचा पाठपुरावा संबंधित अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. महालेखाकार कार्यालय वेळोवेळी फालोअप करीत असून त्यांना माहिती पुरविली जात नाही. In this case, you have also to take legal opinion as a Department. याबाबत समिती शासनाकडे योग्य ती शिफारस करणार आहे. जी माहिती मागविण्यात आली ती समितीला लेखी स्वरुपात सादर करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. तसेच एकूण तीन समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. दिल्ली येथील जी समिती होती त्या समितीमध्ये एकाही शासकीय अधिकाऱ्याचा समावेश नाही. शासनाने ३२ कोटी रुपये दिलेले आहेत. परंतु त्या रकमेचा हिशेब मिळत नाही. एक-दोन लाख रुपयांचा अपहार झाला तर त्याची चौकशी केली जाते. परंतु ३२ कोटी रुपयांच्या संदर्भात हिशेब मिळत नाही. त्यांनी पत्र दिलेले आहे की, हे उपयोगिता प्रमाणपत्र आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी या संदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नसून महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला नाही. कार्यकारी समितीच्या कार्यकक्षा शासन निर्णयामध्ये दिलेल्या होत्या. सर्व सुविधांचे नूतनीकरण करणे,

नवीन बांधकामांच्या प्रस्तावांना मान्यता देणे इत्यादी सर्व कामे करण्यासाठी निविदा मागविणे, त्या उघडणे व मान्य करणे, बांधकामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे, वास्तुविशारदची नेमणूक करणे, खर्च करण्यास परवानगी देणे, आढावा समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी कार्यकारी समितीवर होती." कार्यकारी समितीने जर व्यवस्थित काम केले असते तर हे सर्व मुद्दे उपस्थित झाले नसते. कार्यकारी समितीने योग्य प्रकारे काम केलेले नाही, हे यावरुन सिद्ध झालेले आहे. टेंडरच्या बाबतीत, काम करुन घेण्याच्या बाबतीत किंवा दिलेल्या पैशाचा हिशोब घेणे या बाबींकडे कार्यकारी समितीने लक्ष दिलेले नाही. मग कार्यकारी समितीला का जबाबदार धरण्यात येऊ नये ? अशी विचारणा समितीने यावेळी केली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला जी उत्तरे दिलेली आहेत त्यामुळे समितीचे समाधान झालेले नसुन कार्यकारी समितीमध्ये विभागीय आयुक्त, आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य अभियंता इत्यादी अधिकाऱ्यांचा समावेश असून समितीने असे मत व्यक्त केले की, कार्यकारी समितीच्या सदस्यांना पत्र पाठवू की, यामध्ये अनियमिता झालेली असून लोकलेखा समिती समोर साक्षीसाठी यावे किंवा म्हणणे लेखी स्वरुपात समितीला सादर करावे. या संदर्भात पुढील कार्यवाही करण्याबाबत समिती शासनास शिफारस करेल त्यांना १५ दिवसांची मुदत देण्यात येईल असे सांगितले. सन २००८ नंतर ज्यांनी व्यवहार केलेले आहेत ते सर्व अधिकारी यासाठी जबाबदार राहतील असे ही समितीने स्पष्ट केले.

समितीच्या पुणे, येथील बैठकीत अप्पर मुख्य सचिव यांनी असे सांगितले होते की, "त्यांनी अजूनही खुलासा सादर केलेला नाही. आकस्मिकता निधीतून जो निधी घेतला तो निधी नंतर बजेटमधून ॲडजेस्ट झाला. परंतु त्यांच्याकडून हिशेब आलेला नाही. त्यांच्याकडून हिशेब आलेला नसल्यामुळे त्यावर जास्त भाष्य करु शकत नाही." त्यांनी पुढे असे म्हटलेले आहे की, "विभागाकडे त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र आलेले आहे त्यावरुन आम्ही योग्य विनियोग झाल्याचे गृहीत धरतो." तथापि या गोष्टी उचित नसल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणारी समिती ही राष्ट्रीय पातळीवरील मोठी समिती आहे. त्यांना डिटेल माहिती विचारली होती. परंतु त्यांनी विभागाला डिटेल माहिती दिली नाही. त्यांनी डिटेल माहिती का दिली नाही, यावर भाष्य करु शकत नाही. तसेच त्यांच्याकडे दोन वेळा विचारणा केली होती, त्यांना लेखी सुध्दा कळविले

होते. यावर समितीने असे सांगितले की, या सर्व गोष्टींचे रेकॉर्ड ठेवावे. कारण उद्या ते रेकॉर्ड कोर्टात लागू शकते. राष्ट्रीय पातळीवरील समितीचे सदस्य कायद्यापेक्षा मोठे नाहीत कायद्यासमोर सर्व लोक सारखेच आहेत. शासनाने जो निधी दिला होता त्याचे तपशील त्यांनी सादर केलेले नसून शासनाने पैसे दिल्यानंतर त्या पैशांचा हिशेब मिळालेला नाही. ते जर पैशांचा हिशेब देत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, त्यांनी जी माहिती दिली ती समीतीला सांगितली आहे. तसेच जी कारवाई करता येत असेल ती केली जाईल असेही सांगितले.

शासनाने करोडो रुपये दिलेले असून ३२ कोटी रुपयांचा विषय आहे. तर विभागाकडून त्यांचेवर कोणती कारवाई करणार आहे, ते १५ दिवसात समितीला कळवावे. विभागाने तिन्ही समित्यांना पत्र पाठवावे आणि त्याची प्रत समितीला सादर करावी. तसेच, त्यांच्याकडून खुलासा मागवून घ्यावा आणि तो समितीला सादर करावा. त्यानंतर समिती त्यांना साक्षीसाठी बोलावेल असे निदेश दिले.

ज्यावेळी ॲग्रीमेंट झाले त्यावेळी श्री.अवर्सेकर आणि श्री.कामत असे दोन पार्टनर होते. परंतु आता दोन्ही पार्टनर्सनी त्यांचे शेअर्स विकलेले आहेत. ज्यांच्या बरोबर मूळ ॲग्रीमेंट करण्यात आले होते ते आता समोर नाहीत. आता वेगळ्याच व्यक्तीकडे हॉटेलची मालकी आहे. हे सर्व शासनाच्या परवानगीने झालेले आहे काय ? समितीला या संदर्भात महालेखाकारांचे सुध्दा मार्गदर्शन पाहिजे आहे. समितीला अशी माहिती द्यावी की, ज्या कंपनीने शासनाबरोबर व्यवहार केला त्या कंपनीने शासनाला विचारात न घेता परस्पर व्यवहार केला तर ते चालू शकते काय ? विभागाकडून या संदर्भात कोणती कारवाई करणार आहात ? नियमाप्रमाणे ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी जागा लिजवर दिली जात नाही. जो करारनामा झालेला आहे तो ६० वर्षासाठी झालेला आहे. लिजचा कालावधी आपण दुप्पट करुन दिलेला आहे. ६० वर्षासाठी जागा लिजवर देण्याचा करारनामा करण्यात आलेला आहे, त्यासाठी शासनाची मान्यता घेतलेली आहे काय ? समितीने निवासी जिल्हाधिकाऱ्यांना साक्षीसाठी बोलाविले आहे. त्या जागेची मोजणी, जागेचे व्हॅल्युएशन, ६० वर्षाकरिता जागा लिजवर कशी दिली, त्या जागेचे भाडे किती होते याबाबतची माहिती समितीला ८ दिवसात सादर करावी. त्यांना ९.५ एकर जागा देण्यात आलेली आहे. या जागेचे प्रती स्क्वेअर फूट, प्रती माह, प्रती दिन दराचे कॅल्क्युलेशन करुन समितीला माहिती द्यावी. तसेच, पार्किंगची ३.५

एकर जागा १ रुपया नाममात्र दराने त्यांना भाड्याने देण्यात आलेली आहे. त्या जागेचे सुध्दा व्हॅल्युएशन करावे. शासनाच्या नियमात हे बसते काय, याबाबतची माहिती समितीला ८ दिवसात सादर करावी, असे निदेश दिले.

यावर तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी असा खुलासा केला की, दिनांक २५ सप्टेंबर, २००६ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्या बैठकीत हॉटेलचा विषय चर्चेसाठी घेण्यात आला होता. ती उच्चाधिकार समिती होती. बीओटी तत्वावर बांधकाम करण्याबाबतचा तो विषय होता. तसेच, ३० वर्षाची लिज ६० वर्षे करण्याबाबतचा निर्णय दिनांक ४ डिसेंबर, २००६ रोजी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकारी समितीने घेतलेला आहे. श्री.सी.के.अनिल नावाचे अधिकारी येथे कार्यरत होते. आता ते बिहार येथे आहेत. कार्यकारी समितीमध्ये (१) विभागीय आयुक्त, पुणे (२) आयुक्त, पुणे महानगरपालिका (३) आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (४) जिल्हाधिकारी, पुणे (५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे (६) उप मुख्य वास्तूविशारद, पुणे यांचा समावेश होता. ३० वर्षाऐवजी ६० वर्षाच्या लिजवर जागा देण्याचा निर्णय दिनांक ४ डिसेंबर, २००६ रोजी घेण्यात आलेला आहे. पार्किंगसाठी १ रुपया नाममात्र दराने जागा उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय झालेला आहे. हा निर्णय कार्यकारी समितीने घेतलेला आहे. याच अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढे असे सांगितले की, दिनांक ८ व ९ जानेवारी, २०१३ रोजी लोकलेखा समितीची पुणे येथे बैठक झाली होती. माननीय मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली तीन समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. या समित्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन काम केलेले आहे किंवा कसे, असा मुद्दा मागील बैठकीच्या वेळी उपस्थित करण्यात आला होता. दिनांक २४ जुलै, २०१० रोजी दिल्ली येथे माननीय मुख्यमंत्री आणि प्लॅनिंग कमिशनचे डेप्युटी चेअरमन यांची बैठक झाली होती. त्या बैठकीत असे ठरले होते की, निवास व्यवस्था बीओटी तत्वावर करण्याचा प्रयत्न करण्यात यावा, जेणेकरुन शासनास भूर्दंड बसणार नाही. विभागीय आयुक्त समितीने ८ ऑगस्ट, २००६ रोजी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यावेळी बीओटी तत्वावर सदर हॉटेल बांधण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. विभागीय आयुक्तांनी पत्र दिल्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या आढावा समितीची बैठक २५ सप्टेंबर, २००६ रोजी झाली. त्या बैठकीत या विषयाचर चर्चा झाली. त्यावेळी बीओटी तत्वावर नियोजित

वसतिगृहाचे बांधकाम करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता. १५ ते २० दिवस झाल्यानंतर मुख्य सचिवांच्या समितीने हा विषय विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या अखत्यारित येत असल्यामुळे त्यांनी निर्णय घ्यावा असे सांगितले होते. बीओटी तत्वावर वसतिगृहाचे बांधकाम करावे असे विभागीय आयुक्त समितीने ठरविले व आढावा समितीची त्यास मान्यता घेण्यात आली. त्यानंतर या विषयाबाबत एक दोन बैठका झाल्या होत्या.

त्यावर समितीने हा निर्णय विभागीय आयुक्त स्तरावर झाला आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, दिनांक ७ नोव्हेंबर २००६ रोजी बैठक होऊन सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यावेळी मान्यता देण्याचे अधिकार कोणाला आहे. एक खबरदारी म्हणून असे करण्यात आले असावे असे वाटते. सदरहू प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी किंवा कसे याबाबत ३० डिसेंबर, २००६ रोजी विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीची बैठक झाली. त्यानंतर ८ फेब्रुवारी, २००७ रोजी विभागीय आयुक्तांनी बांधकाम करण्यासाठी वर्क ऑर्डर दिली. ७ ऑगस्ट, २००७ रोजी मुख्य सचिवांकडे बैठक झाली त्या बैठकीत अटी व शर्ती ठरविण्यात आल्या होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. त्यावेळी त्या समितीमध्ये प्रधान सचिव वित्त होते. त्यावेळी कार्यकारी समितीच्या प्रमुखांनी एनपीव्ही किती आहे हे पाहणे आवश्यक होते. दुसरे असे की, कार्यकारी समितीने जमिनीचे मूल्यांकन कमी धरले आहे. जमिनीची किंमत ४८ कोटी रुपये धरावयास पाहिजे होते, असा आक्षेप वित्त विभागाने नोंदविला होता. यावर मुख्य सचिवांनी दोन आदेश दिले होते, त्यामध्ये कार्यकारी समितीने पुन्हा जमिनीची तपासणी करुन अहवाल सादर करावा. त्यानंतर वित्त विभागाने त्यात वाटाघाटी कराव्यात असे आदेश दिले होते. वाटाघाटी करुन विभागीय आयुक्तांनी अंतिम निर्णय घेतला होता. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली फक्त आढावा समिती होती. विभागीय आयुक्तांनी प्रत्यक्षात निर्णय घेऊन कार्यवाही करावयाची आहे. त्यामुळे असे दिसून येते की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने विभागीय आयुक्त समितीला पूर्ण अधिकार दिलेले होते. I have to get details on this point. But, probably they had not gone over their jurisdiction. जमिनीच्या लीज ची मर्यादा ३० वर्षावरुन ६० वर्ष करण्यात यावी यासंदर्भातील प्रस्ताव

विभागीय आयुक्तांनी पाठविला होता. मुख्य सचिवांनी त्याला मान्यता दिलेली आहे असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

यावर समितीने फाईलवर काय नोटींग करण्यात आले आहे ते पाहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तदनुषंगाने फाईलवर काय आक्षेप घेण्यात आले ते समितीस पहावयास मिळतील. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या कक्षेबाहेरील निर्णय घेतले आहेत काय हे पहावे लागेल, घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झाले हे स्पष्ट दिसून येत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी यावेळी केला.

मुख्य सचिवांनी जी टिपणी सादर केली आहे, त्याबाबत जे आक्षेप घेण्यात आले आहेत, त्यावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सही केलेली आहे. या कामासाठी मान्यता घेण्यात आली आहे असे समितीने विचारले असता २५ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या बैठकीत मुख्य सचिवांनी विभागीय आयुक्तांना अधिकार दिले आहेत. त्यानंतर ७ फेब्रुवारी, २००८ रोजी जी बैठक झाली त्यावेळी ही सर्व कामे झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले.

दुसरी बैठक झाली त्यावेळी एनपीव्ही ४८ कोटी रुपये दर्शविण्यात आला आहे. त्यानंतर प्रस्ताव पाठवून मान्यता घेण्यात आली होती. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी सविस्तर प्रस्ताव सादर करुन जमिनीची किंमत त्यात दर्शविली होती. त्या त्या वेळी ही माहिती देण्यात आली होती. सदर जागा निवासी असल्याचे आयजीआर पुणे यांनी कळविले होते. या जागेची ओपन किंमत किती आहे. याचा विचार करुन रेकॉर्डवर वित्त सचिवांनी निवासी जागेची किंमत धरली होती. ओपन जागेचे मूल्यांकन रुपये ५५०० प्रति स्क्वेअर फुट गृहित धरले होते. त्यानंतर ते जवळपास दुप्पट म्हणजेच रुपये १०००० प्रति स्क्वेअर फूट गृहित धरण्यात आले होते. त्यावेळी बैठकीत तशा सूचना देण्यात आल्या होत्या. त्यावेळी सदर समितीने सविस्तर रिपोर्ट पाठविला आहे. त्यानंतर मान्यता मिळाली किंवा नाही याची माहिती कळविण्यात आली नसल्याचे तत्कालिन संचालक क्रीडा यांनी समितीस सांगितले.

तसेच कार्यकारी समितीने मुख्य सचिवांनी दिलेल्या आदेशानुसार काम केल्याचे दिसून येत असल्याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले असता ज्यांच्या कार्यकक्षेत जी जबाबदारी येते ती त्यांनी योग्य पध्दतीने पार पाडली आहे काय ? जे कागदपत्र आहेत त्यावरुन स्पष्ट दिसून येते की, कार्यकारी समितीने त्यांची जबाबदारी योग्यरितीने पार पाडली नाही. दिनांक ११

जानेवारी, २००८ ची मुख्य सचिवांच्या कार्यालयाच्या टिपणीत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शेरा मारलेला आहे. टिपणीच्या पहिल्या पानावर असे नमूद केले आहे की," वित्त विभागाने या जागेच्या प्रिमियमपोटी मिळणाऱ्या प्रिमियमची Net Present Value (NPV) रुपये ४० कोटी होईल असे गृहित धरुन दरसाल प्रिमियम दर ठरवावा अशी भूमिका घेतली आहे. वित्त विभागाच्या मते शासनास रुपये ४० कोटी NPV मिळण्यासाठी पुढील ६० वर्षात रु.४.०१५ कोटी दरसाल एवढा प्रिमियम मिळणे आवश्यक आहे, तर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुरुवातीला शासनास प्राप्त होणारा NPV रु.१८.०९ कोटी रुपये इतका ठरवून ६० वर्षाचा विचार करता दरसाल रु.१.५६ कोटी एवढे प्रिमियम ठरविले होते, ते कमी वाटत असल्याने माझेकडील सभेत ठरल्यानुसार विकासकांशी पुन्हा वाटाघाटी करण्यात आल्या. आता विकासकाने शासनास मिळणारा NPV रु. २५.८७ कोटी एवढा गृहित धरुन त्यानुसार दरसाल प्रिमियम रु. २.५९ कोटी देण्याचे मान्य केले आहे. ही बाब स्वीकारावी अशी शिफारस विभागीय आयुक्तांच्या अहवालावरुन प्रधान सचिव (क्रीडा) यांनी केली असल्याचे समितीने निदर्शनास आणले. प्रधान सचिव (वित्त) व विभागीय आयुक्त यांनी केलेल्या शिफारशींवर प्रधान सचिव (क्रीडा) यांनी दिलेल्या प्रस्तावाचा विचार करता प्रधान सचिव (क्रीडा) यांचा प्रस्ताव मान्य करणे उचित होईल." असे असले तरी रेडी रेकनरच्या दराचा विचार करुन कार्यवाही करणे आवश्यक होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिलेली असली तरी ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकलेली आहे त्यांनी ती योग्यरित्या पार पाडलेली नाही. कार्यकारी समितीने अनेक चूका केल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे असे समितीने मत व्यक्त केले.

लीज ची मर्यादा ३० वरुन ६० वर्षे करणे बंधनकारक होते काय ? कोणत्या नियमानुसार लीजची मर्यादा वाढविण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची शिफारस करण्यात यावी. लीज च्या संदर्भात हायकोर्टाने जजमेंट दिलेले आहे, त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्तांनी लीज वाढीच्या संदर्भात मूळ प्रस्ताव सादर केलेला आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यांना मान्यता दिलेली आहे. लीजची मर्यादा ६० वर्षाची करावी असा प्रस्ताव आयुक्तांनी सादर केलेला आहे.

मुख्य सचिवांनी विभागीय आयुक्तांना अधिकार दिले होते. विभागीय आयुक्तांनी मुख्य सचिवांच्या अधिकारांचा वापर केला आहे. विभागीय आयुक्त हे संपूर्ण विभागाचे प्रमुख

असतात. मुख्य सचिवांना अनेक कामे असल्यामुळे त्यांनी या कामांच्या संदर्भातील अधिकार विभागीय आयुक्तांना दिले होते. मुख्य सचिव वारंवार बैठका घेऊ शकत नाहीत म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले होते. असे असताना विभागीय आयुक्तांनी नियमानुसार ३० वर्षासाठी लीज देणे आवश्यक असताना त्यांनी ६० वर्षासाठी लीज दिलेली आहे. त्यामुळे या कामासाठी तत्कालीन विभागीय आयुक्त दोषी असल्याचे दिसून येते. ३० वर्षाची लीज ६० वर्षे करावयाची असेल तर त्यासाठी निकष काय आहेत. लीज संदर्भात सन १९९९ चा शासन निर्णय आहे. नियमानुसार काय करावयास पाहिजे होते त्याची माहिती समितीला देण्यात यावी असेही निदेश समितीने दिले.

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीला अधिकार दिले होते. विभागीय आयुक्तांनी ३० वर्षाची लीज घाईघाईने ६० वर्षे करण्याचे काय कारण आहे. तसे अधिकार विभागीय आयुक्तांना मुख्य सचिवांनी दिले होते काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर सरासरी ३० वर्षासाठी लीज दिली जाते. ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लीज का देण्यात आली हे पहावे लागेल असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले. तसेच या प्रकरणात शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता शासनाच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीस केला. ३० वर्षासाठी जागा लिजवर देण्याबाबतचा शासन निर्णय असताना ६० वर्षासाठी जागा लिजवर देण्याचा करार करता येत नाही अशी माहिती यावेळी विभागीय सचिवांनी समितीस दिली.

मूळ ॲग्रीमेंटमध्ये हॉस्टेल असा उल्लेख आहे की हॉटेल असा उल्लेख आहे ? या संदर्भात समितीने विचारणा केली असता आयुक्त, क्रीडा यांनी असे सांगितले की, ॲग्रीमेंट मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "The Employer is keen to implement a project envisaging construction, operation and maintenance of 400 rooms hotel and other suitable commercial, retail and residential complexes..."

मूळ करारनाम्यामध्ये हॉस्टेलसाठी परवानगी दिलेली आहे की हॉटेलसाठी परवानगी दिलेली आहे ? तसेच ज्यावेळी निविदा काढण्यात आली त्यावेळी हॉस्टेल म्हणून जाहिरात देण्यात आली होती की हॉटेल म्हणून जाहिरात देण्यात आली होती ? अशी विचारणा

समितीने केली यावर हॉटेल म्हणून निविदा काढण्यात आली होती. It was proposed to build Hostel-cum-Hotel by BW Highway Star Private Ltd. on BOT basis. निविदेच्या जाहिरातीमध्ये हॉस्टेल आणि हॉटेल असे दोन्ही म्हटलेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हॉटेलमध्ये ४०० खोल्या आहेत. त्या हॉटेलमध्ये शासनासाठी ३०० दिवस फक्त एकच खोली आरक्षित ठेवण्यात आलेली आहे, हा निर्णय विभागीय आयुक्तांच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे काय ? मूळ मालकाला अर्ध्या खोल्या आणि हॉटेल मालकाला अर्ध्या खोल्या द्यावयास पाहिजे होत्या. शासनासाठी ३०० दिवस फक्त एकच खोली आरक्षित ठेवण्यात आलेली आहे, हे समितीला मान्य नाही. हे मूळ प्रपोजल विभागीय आयुक्तांकडे आले होते काय ? ४०० खोल्यांपैकी शासनासाठी ४-५ खोल्यांची मागणी का करण्यात आली नाही ? स्पर्धा आयोजित करणारे, कोच, कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी आलेले प्रमुख पाहुणे यांना राहण्यासाठी त्या हॉटेलमध्ये खोल्या आरक्षित ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्या हॉटेलमध्ये खोली घ्यायची असेल तर एका दिवसासाठी ४ हजार रुपये भाडे द्यावे लागते, हे योग्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

शासनाने ज्या कंपनीबरोबर करार केलेला आहे त्या कंपनीचे संचालक बदलल्यानंतर तो करार सुरु राहतो काय ? करार करताना पार्टनर कोण होते, आता कोणते पार्टनर आहेत आणि ते नियमात बसते काय ? तसेच त्यांच्या बरोबर जो करार केलेला आहे त्यामध्ये काय म्हटलेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, क्रीडा यांनी करार पुढील प्रमाणे असल्याचे नमूद केले.

"The Governor of Maharashtra in his executive capacity for the Government of Maharashtra, represented by Mr. Laxmikant Vasantrao Deshmukh, aged 53 years, Director of Sports and Youth Services, Maharashtra State, Pune hereinafter referred to as the "Employer" (which expression shall include its successors and assigns).

AND

BW HIGHWAY STAR PRIVATE LIMITED, a company incorporated under the Companies Act, 1956, having its registered office at K.K. Towers, Parel Tank

Road, G.D. Ambekar Marg, Parel, Mumbai - 400 012. hereinafter referred to as the "Concessionaire" ..... (which expression shall include its permitted successors and assigns)." असे ॲग्रीमेंटमध्ये नमूद केलेले आहे. "Consortium" डेफिनेशन्समध्ये असे नमूद केलेले आहे की, "Consortium" means the consortium consisting of (i) Unity Infraprojects Limited (ii) BSEL Infrastructure Realty Limited and (iii) Kamat Hotels (India) Limited formed/acting pursuant to the Joint Venture Agreement dated 31st January, 2007 entered into by them, for the purpose of execution for the Project and in the event of being successful to implement the Project through a special purpose vehicle to be formed and incorporated by them in India." दिनांक ३१ जानेवारी, २००७ रोजी श्री.वरदकांत श्रीनिवास कामत यांना पॉवर ऑफ ॲटर्नी दिली होती. Therefore, he had signed on and behalf of BW Highway Star Private Limited. दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी बी.डब्ल्यू.हायवे स्ट्रार प्रायव्हेट लिमिटेड हे नाव बदलले आहे. नवीन नाव ऑर्चिड हॉटेल पुणे प्रायव्हेट लिमिटेड असे आहे.

Whether they had change the name of the hotel with the consent of State Government ? समितीने केलेल्या या प्रश्नावर आयुक्त, क्रीडा यांनी त्यांनी हॉटेलचे नाव बदलले आहे. They had informed about it to our office. परंतु, मूळ ॲग्रीमेंटवर याचा काय परिणाम होतो हे तपासून घेतो. We will seek legal opinion on this point. असे समितीस सांगितले.

शासनाने कंपनी बरोबर ॲग्रीमेंट केले होते. आज हॉटेल चालविणाऱ्या कंपनीने ॲग्रीमेंटमध्ये काही बदल केला असेल तर ते लिगल आहे काय आणि बदल केल्यानंतर ते ॲग्रीमेंट सुरु राहू शकते काय याबाबत लिगल ओपिनियन घ्यावे आणि समितीला नोट सादर करावी. तसेच, या जागेचे भाडे ठरविताना कोणत्या बाबींचा आधार घेण्यात आलेला आहे. तसेच जागेचा दर ठरविताना गायरान जमीन आणि कनर्व्हशन नंतर रेसिडेंशियल असे त्यांनी केलेले असल्याचे नमूद केले असता या समितीच्या मुद्दयावर तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी हा प्रकल्प जून, २००६ मध्ये सुरु झाला होता. टेंडर प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. डिसेंबर, २००६ मध्ये जागेची लिज ३० वर्षाऐवजी ६० वर्षे करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता असे समितीस सांगितले.

त्यावेळी विभागीय आयुक्त कोण होते ? अशी विचारणा समितीने केली असता पूर्वी श्री.करंदीकर, श्री.करीर आणि श्री.चंद्रकांत दळवी हे विभागीय आयुक्त होते आणि श्री.प्रभाकर देशमुख जिल्हाधिकारी होते. जागेचे मूल्यांकन आणि वार्षिक रेंट किती घ्यायचे यासाठी निवासी जागेचे दर आकारणे योग्य होणार नाही. कारण ही मोकळी जागा आहे. म्हणून आम्ही मोकळ्या जागेची दुप्पट किंमत धरली होती. परंतु वित्त विभागाच्या सचिवांचे असे मत होते की, ही जागा निवासी वापराची जागा म्हणून गृहीत धरली पाहिजे. त्यानंतर आयुक्त कार्यालयात बैठक झाली होती त्या जागेची पाहणी केली होती. आयजीआर पुणे यांच्या मार्फत तपासणी करुन पुन्हा समितीस कळवावे असे सांगण्यात आले होते. पुन्हा जागेची पाहणी केली आणि शासनाला पत्र पाठविले अशी माहिती समितीस तत्कालिन संचालक, क्रीडा यांनी दिली.

शासन जमीन देताना इमारत बांधून जमीन भाड्याने देत नाही. ज्यांना जागा द्यायची आहे ते जागेचा वापर निवासी वापरासाठी करणार आहेत की वाणिज्यिक वापरासाठी करणार आहेत, हे बघून जागेचा रेट ठरविला जातो. या जागेचा वापर ते वाणिज्यिक वापरासाठी करणार आहेत असा उल्लेख कोठेही करण्यात आलेला नाही. एखाद्या संस्थेला जागा देताना कोणत्या दराने जागा द्यावी, याबाबतचे नियम असल्याचे समितीने सांगितले. महालेखाकार कार्यालयाने जे आक्षेप नोंदविले आहेत, त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक स्पटीकरण केलेले नाही.

लोकलेखा समितीच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयाबाबत सखोल अभ्यास केलेला आहे. समिती सदस्यांनी दहा वेळा प्रश्न विचारले तरी त्याचे उत्तर अधिकारी देत नाहीत. ३० वर्षावरून ६० वर्षे लीजची मर्यादा कशी काय करण्यात आली याचे उत्तर दिले नाही. ३२ कोटी रुपयांचा हिशोब देण्यास कोणीच तयार नाही. समितीने संबंधित अधिकाऱ्यांकडे सर्व प्रकारचे हिशोब व कागदपत्रांची मागणी केलेली आहे. ते उपलब्ध करुन देण्यात येत नाही. दुसरे असे की, एखादी चूक झाली असेल तर ती चूक झाली असे मान्य केले पाहिजे. नियमबाह्य जमीन दिली असेल तर तिचे समर्थन करता येणार नाही या सर्व बाबींवर समिती विचार करणार आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे देणे अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडील दिनांक ११ जानेवारी, २००८ च्या टिपणीत २.५९ कोटी रुपये प्रतिवर्षी प्रिमियम देण्याचे मान्य केले आहे. ही रक्कम शासनाकडे तत्काळ जमा करणे आवश्यक आहे. सदर टिपणीवर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सही केलेली असून देखील या संदर्भातील

पुढील कार्यवाही का करण्यात आलेली नाही. याबाबत समितीने विभागाकडे विचारणा केली असता विभागीय सचिवांनी गेल्या चार वर्षात का कारवाई केली नाही याची तपासणी करावी लागणार असल्याचे समितीस सांगितले.

अपर मुख्य सचिव जी कारवाई करणार आहात त्या पत्राची प्रत समितीला सादर करण्यात यावी असे ही निदेश समितीने दिले.

केलेल्या कारवाईची प्रत व इतर माहिती समितीला सादर करण्यात येईल. त्यासंदर्भात अद्याप निर्णय झाल्याचे दिसून येत नाही. संचालक, क्रीडा विभाग यांच्याकडून प्रस्ताव तयार करुन १५ ते २० दिवसांत तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागाकडे ५ एप्रिल, २००८ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. दिनांक १० एप्रिल, २००८ नंतर यासंदर्भात कोणतीच कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. गेल्या चार वर्षात कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, आता संबंधितांना नोटीसा देऊन पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

मुख्य सचिवांनी दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात आलेले नाही, त्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित असून अशा प्रकारची कारवाई करतांना इतर सर्वांचा त्यात समावेश केला पाहिजे असे अभिप्राय समितीने व्यक्त केले. त्यावर याबाबत कोण अधिकारी जबाबदार आहेत. संबंधित फाईल विभागात चार वर्षे का पडून होती, यासाठी कक्ष अधिकारी, अवर सचिव, किंवा सचिव अशा कोणत्या अधिकाऱ्यांनी सदर फाईल का हाताळली नाही, यासंदर्भातील निर्णय का घेण्यात आले नाहीत. याची तपासणी करण्यात येईल व जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे सामान्य प्रशासन विभागामार्फत कारवाई करण्यात येईल. ही सर्व तपासणी ८ ते १० दिवसात करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

३० वर्षाची लीज ६० वर्षे का केली, मुख्य सचिवांनी काय आदेश दिले होते. शासन निर्णयानुसार काय योग्य आहे याचा तपास करुन कार्यवाही करण्यात यावी असे निदेश विभागास समितीने दिले. यावर विभागीय सचिवांनी त्यावेळेचे अधिकारी म्हणजेच विभागीय आयुक्त यांच्या संदर्भातील अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या समितीसमोर बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

सन २००६ ते २००८ या कालावधीत जी कार्यकारी समिती होती त्या अधिकाऱ्यांना साक्षीच्या बैठकीला बोलविण्यात यावे. सन २००९ मध्ये वैद्य होते, त्यांना देखील बोलविण्यात यावे असे समितीने मत व्यक्त केले. तसेच ३२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असल्याने आयोजन समितीच्या सर्व सदस्यांना बोलविण्यात यावे. बॅंक ऑफ महाराष्ट्र या बँकेकडून चेक वटविण्याच्या संदर्भातील स्टेटमेट मागवून घेण्यात यावे. विभागीय आयुक्तांनी घेतलेल्या सर्व निर्णयांना शासनाची कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली आहे काय ? विभागीय आयुक्त समितीने कोणते निर्णय घेतले, कोणाला पैसा दिला याची माहिती समितीला दिली पाहिजे असे समितीने विभागाला सांगितले. यावर माहे फेब्रुवारी, २००७ व ऑगस्ट २००७ ची कागदपत्रे आहेत. त्या बैठकांचा अहवाल चर्चेला आलेला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले.

विभागाने पुरविलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दि.२७ फेब्रुवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने राज्याच्या आकस्मिकता निधीतून ३२ कोटी रुपये दिलेले आहेत त्याचा अद्याप हिशेब लागत नाही. आयोजन समितीने पैसे मागितले आहेत हे दोन्ही विषय महत्वाचे आहेत. या संदर्भात म्हणणे मांडावयास समितीने सांगितले असता तत्कालिन क्रीडा सचिव यांनी असा खुलासा केला की, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सचिव पदी दिनांक २० एप्रिल, २००६ ते ९ जून २००७ पर्यंत कार्यरत होतो. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २००६ मध्ये जी कार्यकारी समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीने काही निर्णय घेतले होते. त्या समितीच्या दोन-तीन बैठका झाल्या होत्या त्यांनी असे ठरविले होते की, बीओटी तत्वावर काम करुन घ्यावे व तसे पत्र क्रीडा विभागाकडे आल्यानंतर जानेवारी महिन्यात क्रीडा विभागाने त्यांच्याकडून खुलासा मागविला. त्यांच्याकडून कागदपत्रे आणि अधिकची माहिती मागविण्यात आली. ती माहिती येण्यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात तत्कालीन क्रीडा संचालकांनी एका कंपनीला वर्कऑर्डर दिली आणि त्यासाठी शासनाची मान्यता मागितली. त्या ऑर्डरची कॉपी आल्यानंतर त्यामध्ये काही त्रुटी काढण्यात आल्या. उदाहरणार्थ वर्कऑर्डर दिली त्यासाठी शासनाची मान्यता घेतलेली आहे काय, त्याचे उत्तर त्यांनी मार्च महिन्याच्या शेवटी पाठविले. ही संचिका २० फेब्रुवारी, २००७ रोजी शासन पातळीवर आली त्यावेळी काही गोष्टींचा ऊहापोह केला होता. त्यात असे म्हटले होते की, कार्यकारी समितीने १/३ क्षेत्र पार्किंगसाठी द्यायचे आहे, असा निर्णय घेतलेला आहे. शासकीय जमीन द्यायची असेल तर महसूल विभागाची परवानगी घेतल्याशिवाय ती देता येत नाही, असा

प्रघात आहे. यासाठी महसूल विभागाची परवानगी घेतलेली नाही आणि आणखी एक-दोन मुद्दे त्यांनी काढले होते. त्या संदर्भात असे नोटिंग आहे की, प्रथम दर्शनी अनियमितता झाल्याचे दिसते म्हणून त्वरित काम थांबवावे आणि त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेता येईल. क्रीडा विभागाच्या शासन निर्णय प्रमाणे १/३ जमीन देता येते. त्यापूर्वी क्रीडा विभागाने तेथे एक क्लब हाऊस बांधायचे ठरविले होते. त्यासाठी निविदा काढण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्याला स्थगिती दिली. क्रीडा संकुलाच्या जमिनीचा वापर मनोरंजनासाठी करता येत नाही. त्यामुळे काम थांबविले. या सर्व गोष्टी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात आणि ते नियमित झाल्यानंतर काम सुरु करावे, अशा प्रकारचे टिप्पण करुन सदर फाईल क्रीडा विभागाचे सचिव, मुख्य सचिव आणि माननीय मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आली होती.

मुख्य सचिवांनी ९ मे रोजी बैठक बोलाविली होती. मुख्य सचिवांनी सांगितले की, काम थांबविण्याची गरज नाही. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने या संदर्भात माहिती मागविली होती. या संदर्भात विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव मागविण्यात यावा आणि तो प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठवायचा होता. मे महिन्यात तो प्रस्ताव आल्यानंतर क्रीडा विभागाने तो महसूल विभागाकडे पाठविला. महसूल विभागाने तो प्रस्ताव जून, २००६-०७ मध्ये पुन्हा क्रीडा विभागाकडे पाठविला. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने क्रीडा विभागाच्या शासन निर्णय चा संदर्भ दिला होता. क्रीडा संकुल उभारण्यासाठी १/३ जमीन वाणिज्यिक प्रयोजनासाठी देता येते, अशा प्रकारचा शासन निर्णय आहे. महसूल विभागाने हे ग्राह्य धरले होते.

त्यावेळी श्रीमती नीला सत्यनारायण महसूल विभागाच्या सचिव होत्या. त्यांनी असे सांगितले की, हे योग्य आहे. तो प्रस्ताव दि. ८ जून रोजी आला व तो प्रस्ताव क्रीडा सचिव, मुख्य सचिव आणि माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे पाठवायचा होता. त्यानंतर ९-१० तारखेला माझी बदली झाली. २० एप्रिल, २००६ ते ९ जून, २००७ असा माझा कार्यकाळ होता. माझ्या कार्यकाळात निर्णय झालेले नाहीत. त्यानंतर निर्णय झालेले आहेत. माझ्या कार्यकाळात जे घडले ते मी समितीला सांगितलेले आहे. यावर समितीने क्रीडा संकुलातील ३३ टक्के भाग वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापरता येऊ शकतो याबाबतचा शासन निर्णय आहे काय ? अशी विचारणा केली असता तत्कालिन क्रीडा सचिव यांनी असे सांगितले की, या संदर्भात शासन

निर्णय आहे. सन २००१ चे महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण आहे ही मार्गदर्शक तत्वे आहेत. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "(२) एकूण क्षेत्राच्या १/३ पर्यंत क्षेत्र वाणिज्यिक प्रयोजनासाठी (म्हणजेच किफायतशीर प्रयोजनासाठी) वापरण्यास संबंधित क्रीडा संकुल समिती सक्षम राहील. अशा प्रकारे वाणिज्यिक प्रयोजनाचा वापर मुंबई महानगरपालिका (अन्य महानगरपालिका) स्थानिक महानगरपालिका/ नगरपालिका/ नियोजन प्राधिकारी (Planning Authority) अथवा विशेष नियोजन प्राधिकारी (Special Planning Authority) विकास नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देण्यात येईल. (३) वाणिज्यिक प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या गाळ्यांचे हस्तांतरण करताना सदर गाळ्यांची अनामत रक्कम (Deposit) भोगाधिकार मूल्य (Occupancy price) योग्य ठरविण्याचे अधिकार संबंधित क्रीडा संकुल समितीला असतील. (४) सदर वाणिज्यिक प्रयोजनासाठी म्हणजेच अधिक किफायतशीर प्रयोजनार्थ वापरण्याकरिता परवाना फी अथवा मासिक परवाना फी ठरविण्याचे अधिकार क्रीडा संकुल समितीला असतील. (तालुका क्रीडा संकुल समितीने उपरोक्त दोन्ही बाबींकरिता जिल्हाधिकारी यांची मान्यता घ्यावी.) (५) सदर संकुलाची निर्मिती करताना या जमिनीचा वापर वित्तीय सहाय्यासह बांधा व हस्तांतरीत करा/ बांधा, वापरा व हस्तांतरीत करा/ बांधा व हस्तांतरीत करा या तत्वावर बांधण्यास विहीत अटी व शर्तीनुसार मंजुरी देण्यास विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. (तालुका क्रीडा संकुल समितीचा प्रस्ताव मान्य करण्यास जिल्हाधिकारी यांना सक्षम अधिकारी म्हणून जाहीर करण्यात येत आहे.) (६) वाणिज्यिक वापरातून प्राप्त होणारी सर्व रक्कम संबंधित क्रीडा संकुलाच्या विकासाकरिता ठेवण्याची परवानगी राहील व अनर्जित रकमेचा काही भाग शासनास देण्याची अट लागू राहणार नाही. (७) या जमिनीचा वापर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा अथवा अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तांतरीत करा अथवा बांधा व परत करा या तत्वावर बांधण्याकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे, मात्र मिडास अधिनियमाच्या तरतुदींच्या अधिन राहून मान्यता देण्यात यावी." हे महत्वाचे आहे.

या अनुषंगाने हे धोरण राज्यातील सर्व क्रीडांगणांसाठी लागू आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता या परिपत्रकाच्या आधारे हे नियमित करण्यात आलेले आहे म्हणून हे समितीला सादर केलेले आहे. क्रीडा संकुल आणि क्रीडा नगरी यामध्ये फरक आहे, असे मत असल्याचे तत्कालिन क्रीडा सचिव यांनी नमूद केले. यावर आता जे वाचून दाखविले

त्याची प्रत समितीला द्यावी. तत्कालिन क्रीडा सचिवांच्या कार्यकाळात जे काही घडले त्याबाबतच्या सर्व झेरॉक्स प्रती समितीला सादर कराव्यात असे ही सांगितले.

यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी समितीस असे अवगत केले की, आता समितीसमोर जे काही मुद्दे मांडण्यात आले त्याबाबतचे परिपत्रक नाही. मंत्रिमंडळाने राज्याचे क्रीडा धोरण मान्य केलेले आहे आणि त्या अनुषंगाने काढण्यात आलेला तो शासन निर्णय आहे. महानगरपालिका क्रीडांगणाचा विकास करते. महानगरपालिकेच्या नियमात त्यासाठी १० टक्के तर काही महागनरपालिका १० अधिक ५ असे १५ टक्के इतर कामासाठी वापर अनुज्ञेय करतात. त्यामध्ये ते इनडोअर हाऊस, क्लब हाऊस अशा अर्थाने संबोधण्यात येते. तो महानगरपालिकेच्या बांधकाम नियमावलीतील भाग आहे. वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये त्यांच्या नियमावलीनुसार आजही कामकाज चालते. राज्य शासनाने क्रीडा धोरण मंजूर झाल्यानंतर सर्व तालुक्यात, सर्व जिल्ह्यात आणि सर्व विभागीय स्तरावर क्रीडा संकुल असावे आणि त्यामध्ये अत्याधुनिक सुविधा असाव्यात आणि त्याच्या देखभालीचा खर्च प्रत्येक वर्षी शासनावर पडू नये म्हणून त्यावेळी शासनाने महसूल व वित्त विभागाच्या सहमतीने हा शासन निर्णय निर्गमित केला होता. ३० टक्के वाणिज्यिक वापर हा क्रीडा संकुलासाठी अनुज्ञेय करण्यात आला तर महानगरपालिकांच्या क्षेत्रात असलेल्या क्रीडांगणासाठी महानगरपालिकेच्या नियमावलीप्रमाणे तो वाणिज्यिक वापर अनुज्ञेय राहील.

राज्यात अशी किती संकुले उभारली आहेत तसेच नागपूर येथे क्रीडा संकुल आहे. परंतु त्या ठिकाणी वाणिज्यिक वापर करण्यात आलेला नाही याबाबत समितीने विचारणा केली असता धुळे, अहमदनगर, नागपूर, सातारा या ठिकाणी क्रीडा संकुले उभारली असून सातारा, अहमदनगर, धुळे येथे वाणिज्यिक वापर करण्यात आलेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शासनाने निर्णय घेण्यापूर्वी जी वर्क ऑर्डर काढण्यात आली ती कोणाच्या आदेशानुसार काढण्यात आली आणि ती कायदेशीर होती काय ? बेकायदेशीर असेल तर विभागाने कोणती कारवाई केलेली आहे ? तसेच, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली होती. त्यानंतर मुख्य सचिवांनी ९ मे रोजी बैठक घेऊन सांगितले की, स्थगिती उठविण्यात यावी आणि काम सुरु करावे. मा. मुख्यमंत्र्यांनी याला स्टे दिला होता आणि तो मुख्य सचिव उठवू शकतात काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता दि.८ फेब्रुवारी रोजी श्री.देशमुख हे क्रीडा

सचिव होते आणि त्यांनी याबाबत आदेश दिले आहेत. दिनांक ८ फेब्रुवारी रोजी वर्क ऑर्डर दिल्यावर फाईल तयार करण्याच्या कामाला सुरुवात केली. मात्र वर्क ऑर्डर देताना शासनाची परवानगी घेतली नव्हती. अशा वेळी काम करणे कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे हा प्रश्न होता. याला दि. २० एप्रिल ते दि. ९ जून पर्यंत स्टे दिला आणि तो लिगल आहे की ईल्लीगल आहे हे तपासण्यासाठी संबंधितांचा सल्ला घ्यावा. त्यानंतर प्रथम दर्शनी यामध्ये अनियमितता झाली आहे असे वाटले म्हणून सदरहू कामाला ताबडतोब स्टे दिला. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी क्लब हाऊसच्या कामाला स्टे दिला होता आणि मी ज्या कामासाठी स्टे दिला होता तो मुख्य सचिवांनी उठविला असा खुलासा तत्कालिन क्रीडा सचिव यांनी केला. यावर समितीने अशी विचारणा केली की, जर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अनुमतीने स्टे दिला होता. त्यानंतर मुख्य सचिवांबरोबर जी बैठक झाली त्यावेळी तो स्टे उठविला. ज्या कामाला माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला होता, तो स्टे मुख्य सचिव कसा उठवू शकतात हा प्रश्न आहे.

यावर तत्कालिन क्रीडा सचिव यांनी अशी माहिती दिली की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ज्या क्लब हाऊसच्या कामासाठी स्टे दिला होता, त्या कामाची सुरुवात २००४-२००५ मध्ये केली होती. तसेच सदरहू फाईल मा. मुख्यमंत्र्यांना सादर केली होती.

क्लब हाऊस ही कमर्शिअल ॲक्टीव्हीटी असून त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला होता. त्यानंतर जेव्हा मुख्य सचिवांकडे बैठक झाली, तेव्हा स्टे उठविण्यात आला, हे योग्य आहे काय? नियम आणि कार्यपद्धती प्रमाणे हे योग्य आहे काय, अशी विचारणा समितीने केली यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी क्लब हाऊससाठी स्थगिती दिला. कारण क्रीडा नगरीच्या विकासासाठी क्लब हाऊस हा सर्वोत्तम मार्ग नाही आणि या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे सदरहू काम थांबविले आणि त्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या स्थगिती चा आधार घेतला असल्याचे तत्कालिन क्रीडा सचिव यांनी खुलासा केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली स्थगिती मुख्य सचिव कशी उठवू शकतात, त्यांना याबाबतीत कोणता अधिकार देण्यात आला आहे? अशी विचारणा समितीने केली त्यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी पुढील प्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणली. बालेवाडी येथे क्लब हाऊस निर्माण करावा अशा प्रकारचा स्वतंत्र प्रस्ताव करण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. त्यावर पुणे शहरामध्ये वादविवाद झाले. या प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी याला स्थगिती दिली की, तेथे क्लब हाऊस करणे

योग्य होणार नाही. कारण यामुळे वाद होतील. २००६ मध्ये योजना आयोगाचे माननीय उपाध्यक्ष आणि माननीय मुख्यमंत्री यांची बैठक झाली. त्यावेळी तेथे बी.ओ.टी.तत्वावर हॉस्टेलचे बांधकाम करावे असे प्लॅनिंग विभागाचे डेप्युटी कमिशनर यांना सांगितले. सदरहू चर्चा माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये झाली असून त्यासंबंधातील पत्र रेकॉर्डवर आहे. २५ जुलै २००६ मध्ये केंद्र शासनाकडून जे पत्र आलेले आहे, त्यामध्ये या विषयातील संपूर्ण चर्चेचा उल्लेख केलेला आहे.त्याठिकाणी हॉस्टेलचे बांधकाम करुन ते वसतीगृह म्हणून वापरावयाचे होते म्हणून पी.पी.पी.बेसिसवर चर्चा केली, तेव्हा माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. तेव्हा एक्झीक्युटीव्ह कमिटीने तत्कालीन आयुक्त, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री आणि माननीय केंद्रीय मंत्री महोदयांसमोर प्रेझेन्टेशन केले होते आणि हॉस्टेलचे बांधकाम पी.पी.पी.बेसिसवर होईल असे ठरविण्यात आले.त्यानंतर दि.२५ सप्टेंबर, २००६ मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. त्यानंतर आढावा समितीने स्पष्टपणे सांगितले की, याबाबत एक्झीक्युटीव्ह कमिटीने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावयाचा आहे.याबाबतीत जी माहिती दिली ती आमच्या नोटमध्ये आली आहे. शासनाला अंधारात ठेऊन किंवा शासनाला न सांगता एक्झीक्युटीव्ह कमिटीने कोणतेही काम केलेले नाही. ज्या कामांना वित्त विभागाची, महसूल विभागाची मान्यता होती त्या आधारावर सदरहू काम करण्याचा निर्णय घेतला आहे. याची माहिती तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिली आहे. त्याचे मिनिटस् देखील आहेत आणि त्याचे प्रेझेन्टेशनही आहे.

होस्टेल आणि हॉटेल यामध्ये काय फरक आहे? हॉस्टेल मधील रुम्स व हॉटेलमध्ील रुम्स ची संख्या किती होती? आज तेथे हॉस्टेल नसुन हॉस्टेलचे हॉटेल कधी झाले अशी विचारणा समितीने केली असता २५ सप्टेंबर २००६ मध्ये बैठक झाली होती. त्यावेळी वसतीगृह असा उल्लेख असल्याचा खुलासा तत्कालिन क्रीडा सचिव यांनी केला.

माननीय मुख्यमंत्र्यांचा आदेश मुख्य सचिवांनी ओव्हर रुल केला. विभागाने माहिती दिल्यानंतर दि. २५ जुलै २००६ मध्ये केंद्र शासनाकडून पत्र आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक झाली. पण दि. ९ मे रोजी बैठक होण्यापूर्वीच मुख्य सचिवांनी स्टे उठविला होता याबाबत समितीने विचारणा केली असता तत्कालिन क्रीडा सचिव यांनी असा खुलासा केला की, याबाबतीत ६ एप्रिलला बैठक झाली आणि २० एप्रिल रोजी नोटींग झाले. त्यावेळी क्लब हाऊसबाबत तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी जी स्थगिती दिली होता, ती उठविली नव्हती.

त्यामुळे असे नोटींग केले की, सदरहू काम थांबविण्यात यावे व दि.२० एप्रिल २००७ मध्ये वर्क-ऑर्डर देण्यात आली. क्लब हाऊस आणि इतर ॲक्टीव्हीटीज वर स्थगिती कायम असताना वर्क ऑर्डर देण्यात आली.

कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज बाबत सांगावयाचे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी जी स्थगिती दिली होती, ती मुख्य सचिवांनी उठविली. याठिकाणी कार्यकारी समितीने काहीही बेकायदेशीर केलेले नसल्याचे तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी सांगितले परंतु मुख्य सचिवांनी स्थगिती उठविली ही बाब गंभीर असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच २००६ मध्ये होस्टेल साठी परवानगी देण्याचे माननीय उपाध्यक्ष यांनी घेतलेल्या योजना आयोगाच्या बैठकीमध्ये ठरले होते. त्याला माननीय मुख्यमंत्र्यांची सहमती होती परंतु हा विषय २००७ मधील आहे. याबाबतीत वर्क ऑर्डर दिली आणि तत्कालिन क्रीडा सचिवांनी मुख्य सचिवांकडे फाईल सादर केली. मुख्य सचिवांनी जी मान्यता दिली होती, त्याला अधिकृतपणे माननीय मुख्यमंत्र्यांची मान्यता घेण्यात आली होती काय? अशी ही विचारणा समितीने केली. हॉस्टेलचे हॉटेल कसे झाले? तेथे एकंदर ४०० खोल्या प्रस्तावित होत्या. त्या ठिकाणी १०० ते २०० खोल्यांचे हॉस्टेल असेल किंवा १०० ते २०० खोल्यांचे हॉटेल असेल. अशा प्रकारे तेथे दोन वेगवेगळे भाग करण्यात आले. मात्र त्याठिकाणी "हॉस्टेल" हा शब्द लिहावयास हवा होता. आता त्याठिकाणी मोठे क्रिडा संकूल झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय दर्जाचेही लोक येतील. अशा वेळी त्यांना रहाण्यासाठी हॉस्टेल असावयास पाहिजे. परंतु ते बांधण्यासाठी तेवढे पैसे नाहीत म्हणून काही भागामध्ये हॉस्टेल आणि काही भागामध्ये हॉटेल होऊ शकेल. एकंदर ३९९ खोल्या हॉटेलसाठी दिल्यानंतर एकच खोली हॉस्टेलसाठी देण्यात आली आहे. त्यामुळे तेथे हॉस्टेलचे हॉटेल कधी झाले आणि ते कोणी केले याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना माहिती होती काय? अशी विचारणा समितीने केली त्यावर तत्कालिन क्रीडा सचिव यांनी असे सांगितले की, सदरहू निर्णय दि.१५ जून २००७ नंतर झालेला आहे. याबाबतीत विभागीय सचिवांना पूर्ण माहिती असल्याने ते याबाबत सांगू शकतील. यावर निवेदनाच्या संबंधातील कागदपत्रे समितीला दोन-तीन दिवसाच्या आत सादर करावीत असे निदेश समितीने दिले.

दिनांक २५ जुलै २००६ मध्ये नियोजन मंडळाची बैठक झाली. त्यावेळी नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या चर्चेमध्ये जे ठरले, त्याप्रमाणे हॉस्टेल बांधा आणि वापरा या तत्वावर बांधण्याचा निर्णय झाला होता काय? तेथे बी.ओ.टी.तत्वावर हॉटेल

बांधावे असा निर्णय झाला होता की अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या ? याबाबत विचारणा समितीने केली यावर दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी समितीपुढे साक्ष झाली त्यावेळी सविस्तर निवेदन केलेले आहे. समितीने अशी सूचना केली होती की, तत्कालीन क्रीडा सचिव, तत्कालीन विभागीय आयुक्त, तत्कालीन क्रीडा संचालक यांनाही साक्षीसाठी बोलावण्यात यावे त्यानुसार संबंधित अधिकारी साक्षीसाठी उपस्थित झालेले आहेत. तत्कालीन क्रीडा सचिव यांनी आताच समितीसमोर निवेदन केलेले असुन त्यांच्या कार्यकाळात काय निर्णय घेतले गेले हे त्यांनी सांगितले आहे. तत्कालीन क्रीडा सचिव म्हणून श्री.आनंद कुळकर्णी, श्रीमती शर्वरी गोखले व श्री.संजयकुमार यांनी काम केलेले आहे. तसेच विभागीय आयुक्त, पुणे म्हणून सर्वश्री पी.डी.करंदीकर, रमेश देवकर, दिलीप बंड व डॉ.नितीन करीर यांनी काम केलेले आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष आणि राज्याचे मुख्यमंत्री यांची दिल्ली येथे जी बैठक झाली त्या बैठकीत बीओटी तत्वावर हॉस्टेल बांधण्याचा निर्णय घेतला होता का? समितीने विचारलेल्या या प्रश्नाला दिनांक २५ जुलै, २००६ रोजी दिल्ली येथे बैठक झाली त्या बैठकीत असा निर्णय झाला की, "The Hon'ble Chief Minister met Deputy Chairman of Planning Commission on the 24th July 2006 to seek special funds for the Common Wealth Youth Games to be held in Pune. The Deputy Chairman, Planning Commission mentioned that the proposal has been received and is under examination. However, during disscussion he suggested that the lodging arrangements should be made through private initiative or through bulk booking in hotels as sports persons would reside for only 10-15 days. If a sports village is made it could be used commercially subsequently. He also suggested that the road from the airport to the sports complex at Balevadi may be implemented on the BOOT model.

It was decided that the concerned officers of the State Government would meet officers of the Planning Commission in the next 2-3 days to expedite the examination by the Planning Commission so that an early decision could be taken. It is requested that the matter may be pursued with the Planning Commission." ही घटना दि.२४ जुलै, २००६ रोजीची आहे. त्या आधारे निवासी आयुक्त, महाराष्ट्र शासन, नवी

दिल्ली यांनी सचिव, क्रीडा विभाग यांना पत्र पाठविले. त्या पत्रानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक ४ ऑगस्ट, २००६ रोजी राज्य शासनाला प्रस्ताव पाठविला की आम्हाला रितसर परवानगी द्यावी, असा खुलासा विभागीय सचिवांनी समिती समोर केला.

मागील पत्रात सबसिक्वेन्टली हॉटेल आणि हॉस्टेल असा काही उल्लेख होता का? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, "However, during disscussion he suggested that the lodging arrangements should be made through private initiative or through bulk booking in hotels as sports persons would reside for only 10-15 days. If a sports village is made it could be used commercially subsequently. He also suggested that the road from the airport to the sports complex at Balevadi may be implemented on the BOOT model." त्यानंतर विभागीय आयुक्त यांनी ४ ऑगस्ट, २००६ रोजी शासनाला प्रस्ताव पाठविला की, बीओटी तत्वावर मान्यता द्यावी. त्यानंतर दिनांक २५ सप्टेंबर, २००६ रोजी आढावा समितीची बैठक झाली. त्या बैठकीत असा निर्णय झाला की, सर्व अधिकार कार्यकारी समितीला आहेत. त्या संदर्भातील टिप्पणीत 'बांधा, वापरा, हस्तांतरित करा' या तत्वावर नियोजित वसतिगृहाचे बांधकाम हा विषय विभागीय आयुक्तांना दैनंदिन कामकाज समितीच्या कार्यकक्षेत येते त्यामुळे आढावा समितीने फक्त या विषयीची माहिती घेतली. या प्रस्तावावर कार्यवाही करताना छत्रपती शिवाजी क्रीडा संकूल येथील उपलब्ध सुविधांचा समावेश करण्यात यावा व नियोजित वसतिगृहाची मालकी शासनाची असावी, असे समितीने निर्देश दिले. तसेच आता तेथे नियोजित वसतिगृह असल्याची माहिती समितीस दिली. तसेच अधिक माहिती करिता पुढील खुलासा केला. दिनांक २५.९.२००६ रोजी कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला. समितीने तीन महत्वपूर्ण बैठका दिनांक २६.१२.२००६, ३०.१२.२००६ व २ जानेवारी, २००७ रोजी घेतल्या, त्या बैठकांचे इतिवृत्त कार्यकारी समितीने दिनांक ३१ जानेवारी, २००७ रोजी शासनाला पाठविले. या तीन बैठकांचे मिनिट्स आणि बांधकामाचा प्रस्ताव व युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर यांना काम देण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानंतर दिनांक ८ फेब्रुवारी, २००७ रोजी त्यांनी वर्कऑर्डर दिली. शासनाने अद्याप मान्यता दिलेली नव्हती मात्र कार्यकारी समितीने मान्यता दिली. कारण त्यांच्याकडे अधिकार होते, असे त्यांनी ग्राह्य धरले.

शासनामध्ये दिनांक ३० एप्रिल, २००७ रोजी नस्ती सुरु झाली ज्या नस्तीचा उल्लेख तत्कालिन क्रीडा सचिव यांनी केला. यासंबंधी दिनांक ९ मे, २००७ रोजी मुख्य सचिवांकडे बैठक झाली. त्या बैठकीमध्ये त्यांनी असा निर्णय दिला की, पुन्हा विभागीय आयुक्त आणि क्रीडा संचालक यांच्याकडून सविस्तर प्रस्ताव मागवावा. त्यानुसार दिनांक १० मे, २००७ रोजी तत्कालीन विभागीय आयुक्त यांनी सविस्तर प्रस्ताव शासनाला पाठविला त्या आधारे क्रीडा विभागाने प्रस्ताव तपासून तो दिनांक २१ मे, २००७ रोजी महसूल व वन विभागाला पाठविला. महसूल व वन विभागाने त्या प्रस्तावाला मान्यता दिली नंतर हा प्रस्ताव मुख्य सचिव यांच्यामार्फत माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात आला.

माननीय मुख्य सचिवांनी स्पष्टपणे टिप्पणीमध्ये नमूद केले की, "एकूण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांची तातडी, त्यासाठी एप्रिल, २००८ पूर्वी हे वसतिगृह पूर्ण होण्याची आवश्यकता विचारात घेऊन विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने सुरु केलेल्या प्रकल्पाला सहमती देणे उचित होईल." त्यानंतर मंत्री (क्रीडा) यांनी सही करुन मान्यता दिली. ती नस्ती माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे गेली. मुख्यमंत्री सचिवालयाने त्या नस्तीवर लिहून पाठविले की, वित्त विभागामार्फत नस्ती पाठवावी. असे लिहिल्यानंतर वित्त विभागाकडे नस्ती पाठविण्यात आल्यानंतर वित्त विभागाने नस्तीमध्ये निगेटिव्ह रिमार्क्स दिले.

त्यानंतर मुख्य सचिवांकडे दिनांक ७ ऑगस्ट, २००७ रोजी आढावा समितीची दुसरी बैठक झाली. त्या बैठकीत वित्त विभागाचा जो काही मुद्दा होता त्यावर सविस्तर चर्चा झाली. वित्त विभागाचे जे मुद्दे होते ते प्रधान सचिव, वित्त यांनी बालेवाडी, पुणे येथे बीओटी तत्वावर आधारित हॉस्टेल-कम-हॉटेल बांधकामाबाबत कार्यकारी समितीने जे प्रिमिअम ठरविले आहे त्याबाबत खालील दोन आक्षेप नोंदविलेले होते.

(१) कार्यकारी समितीने प्रिमिअमची रक्कम ठरविताना एन.पी.व्ही.पाहणे आवश्यक होते.

(२) कार्यकारी समितीने जमिनीचे मूल्यांकन कमी दराने केले आहे, ते वास्तविक रु.४०.०० कोटी गृहित धरुन प्रिमिअमची रक्कम ठरविणे आवश्यक होते.

याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली, त्यावेळी विभागीय आयुक्त, पुणे यांनी कार्यकारी समितीमार्फत असे प्रतिपादन केले की, कार्यकारी समितीने प्रिमिअम ठरविताना एन.पी.व्ही.चा विचार केला नव्हता, ही बाब खरी आहे. सवलतदाराने नमूद केलेल्या प्रिमिअमवर २० टक्के सरळ वाढ करुन व क्रीडा विभागासाठी वाढती रक्कम अधिक योग्य

असल्याने, त्या पध्दतीने प्रिमिअमची रक्कम अंतिमतः मान्य करण्यात आली होती. तथापि, जमिनीचे मूल्यांकन ठरविताना शीघ्र सिध्द गणकाचे दर अर्थात रेडी रेकनरचे दर लक्षात घेऊन त्यापेक्षा सुमारे तीनपट अधिक रक्कम गृहित धरुन मूल्यांकन केले आहे. त्यामुळे माननीय प्रधान सचिव, वित्त यांनी सुचविलेल्या जमिनीचे मूल्यांकन मान्य होऊ शकत नाही. माननीय मुख्य सचिवांनी बैठकीचा समारोप करताना खालीलप्रमाणे दोन आदेश दिले.

(१) कार्यकारी समितीने पुन्हा एकदा जमिनीचे मूल्यांकन तपासून घ्यावे व अहवाल सादर करावा.

(२) सवलतदार-वजा-कंत्राटदाराशी प्रिमिअमबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात.

अशा प्रकारे दिनांक ७ ऑगस्ट, २००७ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. यानंतर विभागीय आयुक्तांनी पुन्हा शासनाकडे प्रस्ताव पाठविला. दिनांक ४ सप्टेंबर, २००८ नंतर क्रीडा विभागाने वित्त विभागाकडे नस्ती पाठविली. वित्त विभागाने त्यावर अभिप्राय दिले की, 'क्रीडा विभागाने प्रस्ताव तपासून माननीय मुख्यमंत्र्यांकडे थेट सादर करावा.' क्रीडा विभागाच्या प्रस्तावावरील नस्ती जेव्हा मुख्य सचिवांकडे गेली, त्यांनी सविस्तरपणे त्यावर आपले अभिप्राय नोंदविले. त्याचा शेवट असा आहे की, 'वरील परिस्थितीत व राष्ट्रकुल युवा स्पर्धा जवळ येत असल्याने विभागीय आयुक्तांच्या समितीने वाटाघाटीअंती कारणमिमांसा देवून शिफारस केलेल्या व प्रधान सचिव, क्रीडा यांनी सुचविलेला रु.२.५९ कोटी प्रतिवर्षी प्रिमिअमचा दर स्वीकारण्याचा विचार करावा.

मुख्य सचिवांच्या नोटिंगनंतर माननीय राज्यमंत्री (क्रीडा) यांनी फाईलवर सही केली. मात्र मंत्री (क्रीडा) यांच्याकडे मंजुरीसाठी फाईल गेली तेव्हा त्यांनी त्यावर पुढीलप्रमाणे आक्षेप नोंदविले :-

(१) प्रस्तुत प्रकल्प शासनाचे मान्यता/पूर्व परवानगीशिवाय कार्यान्वित केल्याचे सकृत्दर्शनी दिसून येते. तरी देखील या बाबीवर शासन स्तरावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गांभीर्याने न घेता अप्रत्यक्ष समर्थन देऊन प्रस्ताव नियमित करण्याचा प्रकार दिसून येतो.

(२) विभागीय आयुक्त व क्रीडा संचालक यांनी त्यांचे कार्यकक्षेबाहेर जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झाले आहे हे स्पष्ट होते.

(३) वित्त विभागाने नमूद केलेले अपेक्षित मूल्य सदर जागेचे स्थलमहात्म्य विचारात घेता अतिशय योग्य आहे. वित्त विभागाचे अभिप्रायानुसार प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. ती तत्काळ करण्यात यावी.

(४) राष्ट्रकुल स्पर्धांची तातडी, राहिलेला अपुरा कालावधी पाहता संबंधितांवर शासनाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन प्रस्ताव मान्य करण्याशिवाय पर्याय दिसून येत नाही.

या अभिप्रायानंतर माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी सही केली. ही नस्ती ९ फेब्रुवारी, २००८ रोजी क्रीडा विभागाला प्राप्त झाली. अशा प्रकारे दिल्ली येथील बैठक झाल्यानंतर या प्रस्तावाचा प्रवास सुरु झाला व ९ फेब्रुवारी, २००८ रोजी सांगता झाली.

वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असे माननीय मंत्री व माननीय मुख्यमंत्री यांनी सुचविले होते याप्रमाणे पुढील कारवाई झाली आहे का? त्या कारवाईचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. ही नस्ती कोणाकडे प्रलंबित होती? याबाबत समितीने विचारणा केली असता यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ही फाईल दिनांक ९ फेब्रुवारी, २००८ रोजी क्रीडा विभागाला प्राप्त झाली. त्यानंतर विभागाने दिनांक २९ मार्च, २००८ रोजी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या संदर्भात फाईल सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविली होती. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी ती फाईल क्रीडा विभागाकडे परत पाठविली. फाईल परत पाठविताना असे नमूद केले की, कारवाईबाबत क्रीडा विभागाने सविस्तर प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात यावा. त्यानंतर चार वर्षे या नस्तीवर काहीही निर्णय झालेला नाही.

यासंबंधित जबाबदार अधिकारी कोण होते? त्या काळात सामान्य प्रशासन विभाग आणि क्रीडा विभागांचे सचिव कोण होते? याबाबत माहिती समितीने विचारली विभागीय सचिवांनी समितीस असे अवगत केले की, क्रीडा विभागाच्या सचिव श्रीमती शर्वरी गोखले होत्या. त्यांनी दिनांक ५ एप्रिल, २००८ रोजी ही नस्ती सामान्य प्रशासन विभागाला पाठविली आणि त्या विभागाने दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी क्रीडा विभागाकडे फाईल परत पाठविली. फाईल परत पाठविताना असे नमूद केले की, "भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्याने परिपूर्ण प्रस्ताव या विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव विभागाकडे पाठविण्याची विनंती क्रीडा विभागाला करण्यात यावी."

त्यानंतर विभागाने सर्व संबंधितांना नोटीस दिली. समितीने कोणाकोणाला नोटीस दिली याबाबत विचारणा केली असता क्रीडा विभागातील सहसचिव श्रीमती उकिर्डे, थोरवे, अवर सचिव सर्वश्री जोंधळे, आर.सी.पाटील, सहाय्यक श्रीमती पाटील, सहाय्यक श्रीमती भोकळे, लिपिक-टंकलेखक श्रीमती भोसले यांना नोटीस देण्यात आली. याशिवाय इतर जे अधिकारी आहेत, ज्यामध्ये आयुक्त, क्रीडा संचालक, सचिव यांच्याविरुध्दचा प्रस्ताव तयार करुन पाठवित आहोत. त्यावेळेला क्रीडा विभागात जे सचिव होते त्यांचा प्रत्यक्ष किती सहभाग आहे हे पहावे लागेल. श्री.संजयकुमार हे तत्कालीन क्रीडा सचिव होते. त्या काळात श्री.पी.डी.करंदीकर, डॉ.नितीन करीर, श्री.बंड हे विभागीय आयुक्त होते. श्री.सी.के.अनिल, श्री.लक्ष्मीकांत देशमुख हे क्रीडा संचालक होते. डॉ.डी.के.शंकरन, श्री.जॉनी जोसेफ हे मुख्य सचिव होते. काय काय लॅप्सेस होते हे तपासून दहा दिवसात सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हा अवॉर्ड युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला देण्यात आला then how can Unity Infrastructure hand over to Vits and Orchid Hotel ? ही कंपनी पिक्चरमध्ये कशी आली ? How award was given to the Unity Infrastructure ? कोणी इमारत डेव्हलप केली ? ऑर्चिड हॉटेल्स कंपनीने स्वत: विकसित केली की युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने विकसित करुन ऑर्चिड हॉटेल्स कंपनीला दिली अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त क्रीडा यांनी असे सांगितले की, The Concession Agreement was entered into between Mr. Laxmikant Deshmukh, Director of Sports and Youth Services and BW Highway Star Private Limited, a company incorporated under the Companies Act, 1956. The Promoters of BW Highway Star Private Limited are Unity Realty and Developers Limited, BSEL Infrastructure Realty Limited and Kamat Hotels (India) Limited, a public limited company incorporated in accordance with the Companies Act, 1956. यामध्ये कन्सोर्शियमची एक व्याख्या आहे. "Consortium" means the consortium consisting of (i) Unity Infraprojects Limited (ii) BSEL Infrastructure Realty Limited and (iii) Kamat Hotels (India) Limited formed/acting pursuant to the Joint Venture Agreement dated 31st January 2007 entered into by them, for the purpose of execution for the Project and in the event of being

successful to implement the Project through a special purpose vehicle to be formed and incorporated by them in India.

विभागीय सचिवांनी उपरोक्त दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, उप सचिव, सहायक, क्लार्क यांना नोटीस दिलेली आहे. कार्यकारी समितीने जो निर्णय घेतला होता त्या निर्णयावर माननीय मुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांनी आक्षेप घेतलेला आहे. मग कनिष्ठ अधिकाऱ्यांना नोटीस देण्याचे काय कारण आहे ? यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे निदर्शनास आणले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आदेश असताना ही नस्ती का सादर करण्यात आली नाही, यासाठी त्या अधिकाऱ्यांना नोटीस दिलेली आहे. There was no Note put up at all when the file came back. कार्यकारी समिती किंवा आढावा समितीच्या सदस्यांवर ॲपोर्शन करुन त्यांनी त्यांची जबाबदारी नीट पार पाडली किंवा नाही हे तपासून सामान्य प्रशासन विभागाला कार्यवाही करण्यास सांगितले जाईल. दिनांक १६ जून, २००६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये कार्यकारी समितीची कार्यकक्षा स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे.

यावर राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या दैनंदिन कामकाजाचा निर्णय घेण्यासाठी तसेच या निमित्ताने करावयाच्या सोईसुविधांचे नियोजन करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सुरुवातीला शासन निर्णय काढून समितीच्या कार्यकक्षा ठरवून दिलेल्या आहेत. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, २००८ चे संपूर्ण प्रशासकीय व तांत्रिक नियोजन करणे. स्पर्धेच्या अनुषंगाने करावयाच्या नूतनीकरणाच्या/नवीन बांधकामाच्या प्रस्तावांना मान्यता देणे. स्पर्धेच्या अनुषंगाने नवीन बांधकामे करण्याकरिता शासन नियमानुसार निविदा मागविण्यास, मागविलेल्या निविदा उघडण्यास व निविदा अंतिमत: मान्य करुन बांधकामास परवानगी देणे. बांधकामासाठी शासन नियमानुसार वास्तुविशारद/ कंत्राटदाराची नियुक्ती करणे." त्यानंतर सुधारणा करुन कार्यकक्षा ठरवून दिलेल्या आहेत. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "स्पर्धेच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या सर्व सुविधांचे नूतनीकरण करणे, रिफर्निशमेंट करणे, त्यामध्ये भर घालणे, बदल करणे, दुरुस्ती करणे आणि नवीन बांधकामे इत्यादींच्या प्रस्तावांना मान्यता देणे. त्याच बरोबर नवीन बांधकामाकरिता शासन नियमानुसार निविदा मागविणे मागविलेल्या निविदा उघडणे व निविदा अंतिम मान्य करुन बांधकामास

प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देणे. बांधकामासाठी शासन नियमानुसार वास्तुविशारद/कंत्राटदाराची नियुक्ती करणे. स्पर्धेसाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून आवश्यक त्या मान्य बाबींवर खर्च करण्यास परवानगी देणे. या स्पर्धेसाठी राज्य स्तरावर गठीत करावयाच्या आढावा समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे. तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्याकरिता अर्हता ठरविणे, निवड करणे व नियुक्ती करणे" हे सर्व अधिकार कार्यकारी समितीला दिलेले आहेत. आढावा समितीने हे कार्यकारी समितीच्या कार्यकक्षेत येते असे म्हटलेले आहे असा खुलासा विभागीय आयुक्त, पुणे यांनी समितीसमोर केला.

माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये वर्कऑर्डर देण्यात आली होती. त्यानंतर त्यासाठी शासनाची मान्यता सुध्दा मागितली होती. फेब्रुवारी, २००८ मध्ये मान्यता मिळालेली आहे. मग दरम्यानच्या काळात बांधकाम बंद होते की सुरु होते ? तसेच सन २००८ पासून फाईलची मुव्हमेंट बंद आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून एप्रिल, २००८ मध्ये फाईल परत आली होती. प्रथम सचिवांकडे फाईल जाते आणि त्यानंतर कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे फाईल जाते. सचिवांकडे प्रथम फाईल येते म्हणून यासाठी सचिव जबाबदार आहेत. मग तुम्ही सचिवांना का जबाबदार धरत नाही ? याबाबत समितीने विचारणा केली असता यावर कक्ष अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असल्याचे दिसते. कदाचित ही फाईल थेट कक्ष अधिकारी यांच्याकडे गेल्याचे दिसते.यासाठी सचिव जबाबदार आहेत, हे नाकारत नसुन नियम आणि कार्यपद्धती प्रमाणे कक्ष अधिकारी हे फाईलचे कस्टोडियन असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने तुम्ही कनिष्ठ अधिकाऱ्यांना नोटीस दिलेली असुन दिनांक १९ एप्रिल, २००८ रोजी फाईल विभागाकडे परत आलेली असल्याचे नमूद करत ती नस्ती कक्ष अधिकारी यांनी त्यांच्याकडे ठेवली होती काय ? याबाबत विचारणा केली असता विभागीय सचिवांनी कनिष्ठ अधिकाऱ्यांना नस्ती सादर का केली नाही यासाठी नोटीस दिली असुन सामान्य प्रशासन विभागाकडून कक्ष अधिकारी, क्रीडा यांच्याकडे फाईल आली होती त्यानंतर ही पुट-अप झाली नसुन ती कक्ष अधिकारी यांच्याकडे राहिली असल्याचे फाईलचे अवलोकन केले असता दिसून येते असा खुलासा केला.

यासंदर्भात तत्कालिन क्रीडा सचिव यांनी असा खुलासा केला की, प्रधान सचिवांनी दिनांक १०.४.२००८ रोजी फाईलवर डी.ओ./एस ॲण्ड एस-१ असे मार्क केलेले आहे.

त्यानंतर डेस्क ऑफिसर यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी फाईल सहायक यांना मार्क केलेली आहे. येथे फाईलची मुव्हमेंट थांबली. डेस्क ऑफिसर यांनी अधिवेशनानंतर बोलावे, असे नमूद करुन फाईल सहायक यांना मार्क केलेली आहे. दिनांक १५ एप्रिल, २००८ रोजी सचिवांनी फाईल बघितलेली नाही. फाईलवर अधिवेशनानंतर बोलावे असे नमूद केलेले आहे. परंतु त्यानंतर बोलणे झालेले दिसत नाही. कक्ष अधिकारी, अवर सचिव, उप सचिव, सचिव असा फाईलचा प्रवास व्हावयास पाहिजे होता. राज्याच्या मुख्य सचिवांकडे बैठक झाली होती. म्हणजे राज्याच्या मुख्य सचिवांना याची पूर्ण कल्पना होती. ती फाईल माननीय मुख्यमंत्री महोदयांना मार्क केलेली असताना देखील ती फाईल माननीय मुख्यमंत्री महोदयांना न दाखविता परस्पर निर्णय का घेतले गेले ? यासाठी कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता फाईलवरुन असे दिसून येते की, दिनांक ३० एप्रिल, २००७ रोजी फाईल तयार करण्यात आली होती. त्या फाईलचे मार्किंग माननीय मुख्यमंत्री यांच्या पर्यंत आहे. मुख्य सचिवांनी दिनांक ९.५.२००७ रोजी बैठक बोलवावी, असे त्या फाईलवर नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे बैठक झालेली आहे. दिनांक २७ जून, २००७ रोजी पुन्हा माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे फाईल मार्क करण्यात आली. माननीय मुख्यमंत्री यांच्या सचिवांनी वित्त विभागाचे अभिप्राय घ्यावे, असे फाईलवर नमूद केले होते.तथापि माननीय मुख्यमंत्री यांच्या सचिवांनी लिहिले की, Is it in the best financial interest of the Government?, हे वित्त विभागाने तपासवे. त्यावर वित्त विभागाने आक्षेप नोंदविलेला असल्याची माहिती समितीस दिली तसेच "The Department may take opinion of the Finance Department that whether the proposal is in the best financial interest of the State and whether due procedure has been followed in tendering and processing." असे मुख्यमंत्र्यांच्या सचिवांनी फाईलवर लिहिलेले आहे. Then the file goes to the Finance Department. वित्त विभागाकडून पुन्हा मुख्य सचिवांकडे फाईल गेली. मुख्य सचिवांनी दि.७ ऑगस्ट रोजी त्या विषयावर बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे संपूर्ण प्रस्ताव पुन्हा तपासून वाटाघाटी करुन क्रीडा विभागाने प्रस्ताव सादर केला. क्रीडा विभागाचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे गेला. त्यावर क्रीडा मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांची स्वाक्षरी आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना सुरुवातीला दि.७ एप्रिल रोजी प्रस्ताव मार्क करण्यात आला होता असेही विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले.

माननीय मुख्यमंत्री कार्यालयाकडून जे नोटिंग आले त्यामध्ये स्थगिती दिल्याचे नमूद केले होते. ती स्थगिती उठविण्यात आली आहे, असा कोठेही उल्लेख नसुन मूळ फाईलवर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिल्याचे नमूद आहे. परंतु स्थगिती उठविल्याचे नमूद नाही याबाबत समितीने विचारणा केली असता स्थगिती संदर्भात जी टिपणी आहे त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "प्रसंगतः नमूद करण्यात येते की, बालेवाडी क्रीडा संकुलात स्पोर्टस् कम रिक्रीएशन क्लब सुरु करण्यासाठी शासनाने यापूर्वी क्रमांक-क्रीडायो २००३/प्र.क्र.१७२/क्रीयुसे १, दिनांक २१ ऑगस्ट, २००४ नुसार मान्यता दिली होती व त्यानुसार निविदा प्रक्रिया संचालकांनी सुरु केली होती. त्यावर माननीय खासदार श्री.सुरेश कलमाडी अध्यक्ष, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन यांनी घेतलेल्या तीव्र आक्षेपामुळे हा प्रस्ताव स्थगित करण्याचे आदेश माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सन २००५ मध्ये दिले. (नस्ती क्रमांक प्र.क्र.७४/०५) या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांचे स्तरावर होणारी बैठक अद्याप होऊ शकलेली नाही. पर्यायाने उपरोक्त स्थगिती अद्याप कायम आहे. माननीय श्री.सुरेश कलमाडी यांनी घेतलेल्या आक्षेपाचे स्वरुप क्रीडा संस्कृती जतन करण्यासाठी क्लब व तत्सम मनोरंजन साधणे या परिसरात नको असे होते. तर क्रीडा नगरीच्या विकासाचा सर्वोत्तम मार्ग क्लब हाऊस नाही असे मत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चर्चेत नोंदविल्याचे सदर नस्तीवर नमूद आहे. वरील सर्व विवेचनाचा विचार करता महसूल व वन विभाग व राज्य शासन यांची कोणतीही परवानगी न घेता केवळ राष्ट्रकुल स्पर्धेची तातडी या कारणाखाली सुरु झालेले हे बांधकाम तत्काळ थांबवून विहीत कार्यपद्धतीनुसार प्रकरण हाताळणे आवश्यक वाटते. अन्यथा भविष्यात माहिती अधिकार, विधानमंडळ वा इतर माध्यमातून शासनाकडे विचारणा झाल्यास त्याबाबत उत्तरे देणे व झालेल्या कार्यवाहीचे समर्थन करणे शासनास अडचणीचे ठरु शकेल. त्यामुळे प्रथमतः हे काम थांबविण्याचे आदेश माननीय मंत्री (क्रीडा) यांची मान्यता घेऊन निर्गमित व्हावेत. त्यानंतर ही बाब माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ ठेवावी. त्यांच्याकडून अवलोकन झाल्यावर महसूल व वन विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या अनुषंगाने गठीत केलेल्या राज्य स्तरीय आढावा समितीचे अध्यक्ष माननीय मुख्य सचिव असल्याने त्यांचे मार्फत ही नस्ती सादर झालेली आहे." या नस्तीवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी अभिप्राय नोंदविले.

त्यानंतर माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे फाईल गेली होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने स्थगिती उठविण्यात आलेली नाही अशी समितीने विचारणा केली असता तत्कालिन क्रीडा सचिव यांनी क्लब हाऊसवरील स्थगिती उठविण्यात आलेली नाही. सचिवांच्या निर्णयांना मुख्य सचिव ओव्हररूल करु शकतात असा खुलासा केला असता समितीने स्थगिती उठविण्यात आलेली नसताना क्लब हाऊस आणि हॉटेलचे काम सुरु होते याबाबत विचारणा केली. त्यावर तत्कालिन क्रीडा सचिव यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या स्थगितीमुळे क्लब हाऊसचे काम थांबविण्यात आले होते अशी माहिती समितीस दिली.

क्लब हाऊस आणि हॉटेल अशा दोन वेगळ्या इमारती होत्या काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी असा खुलासा केला की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून ते सन २००६ पासून या समितीचे सदस्य होतो. बालेवाडी येथे कॉम्प्लेक्स उभा राहिलेला आहे. त्याचा वापर कोणी करीत नाही. म्हणून तेथे क्लब हाऊस करावा आणि बाहेरच्या लोकांना प्रवेश द्यावा, अशी कल्पना होती. म्हणून तो विषय विभागीय आयुक्तांसमोर आला. न झालेल्या गोष्टीला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली होती. त्या ठिकाणी क्लब हाऊसचे बांधकाम सुरु झालेले नव्हते. सन २००८ मध्ये क्रीडा संकुल बांधायचे होते. समितीने सर्व निर्णय घेतलेले आहेत. ते बरोबर आहेत की चुकीचे आहेत, हे समितीने ठरवावे.

९९ वर्षाचा केलेला करार, त्याचे भाडे आणि त्याची ॲसेसमेंट ३० रु. प्रति चौ.फु. आहे. तथापि सन २००७ मध्ये जमिनीचे भाडे किती होते आणि आता किती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००७ मध्ये करार झाला आणि दिनांक १ नोव्हेंबर २००८ पासून तो अस्तित्वात आला. सन २००७ मध्ये रेडी रेकनरचे दर ३७०० रु.प्रती चौ.मी.होता. तसेच आता १५,५०० प्रती चौ.मी. इतका दर असुन पाच वर्षात पाच पट वाढ झाली असल्याचा खुलासा जिल्हाधिकाऱ्यांनी केला.

यासाठी २ कोटी ५९ हजार रुपये इतके भाडे ठरविले आहे. आता त्यात वाढ करावयाची आहे. कारण एका खोलीसाठी ३ हजार रुपये भाडे घेतले जाते पण शासनाला मात्र एका खोलीमागे ३० रुपये स्वे.फू.मिळतात आणि समितीला ही तफावत मान्य नाही. एकीकडे

पाचपट भाडेवाढ होत असताना २ कोटी ५९ लाख इतके भाडे आणि त्यातून विकासकांना मिळणारा फायदा यामुळे शासनाला अधिक उत्पन्न मिळायला पाहिजे. याठिकाणी चुकीचे काम झाले आहे. यासंबंधातील सर्व करारनामा महसुल विभागाने ९९ वर्षाचा केला आणि ज्या गतीने भाडे वाढविण्यात आले आहे ते बरोबर होते काय? अशी विचारणा समितीने केली तसेच बालेवाडीत स्पोर्टस्च्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न मर्यादित झाले असून विकासक मात्र ५ लाख, १० लाख भाडे घेतो. या माध्यमातून देखील शासनाचे उत्पन्न वाढले पाहिजे. तेथील विकासक पुढील ९९ वर्षे अशा प्रकारे स्पोर्टस् आयोजित करणार असेल आणि त्यानुसार भाडे गृहीत धरुन बांधकाम करणार असेल तर समितीची हरकत नाही. विकासकाने जी गुंतवणूक केली आहे, त्याप्रमाणे त्याला पैसे मिळतात. तसे शासनानेही आपले उत्पन्न वाढवावे. विकासकाकडून सध्या जे भाडे आकारले जाते त्याच्यामध्ये काळानुरुप वाढ झाली पाहिजे. तसेच बांधकाम करण्यापूर्वी विकासकाने महानगरपालिकेची देखील परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे तेथील बांधकाम अनधिकृत आहे. तेथे बांधकाम करण्यापूर्वी त्यांनी कोणताही प्लॅन सादर केलेला नाही आणि त्यामुळे तो स्वाभाविकरित्या मंजूर देखील केलेला नाही. त्यामुळे एकीकडे संबंधित लोकांना आयते कुरण मिळाले. मात्र दुसरीकडे भाड्यामध्ये वाढ केली जाऊ नये असे त्यांचे म्हणणे समितीला मान्य नाही असे समितीने अभिप्राय दिले.

समितीने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मोकळ्या जागेवर तारेचे कुंपण केले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. २२ कोटी रुपयांच्या बाबतीत शासनाने आदेश दिला आणि त्याप्रमाणे संबंधित आयोजन समितीला चेकव्दारे पैसे दिले. जो निधी होता त्यातील २-३ कोटी रुपये शिल्लक होते. मात्र कॉन्टीजन्सी फंडातील पैसे वापरले आणि त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आणि ३ कोटी रुपये शासनाला परत मिळावयास पाहिजे होते. पण ते तसेच बँकेत राहिले. याबाबत पुढे काय झाले याची माहिती समितीला द्यावी असे समितीने विचारले असता दिनांक २६-९-२००८ मध्ये १४ कोटी रुपयांचा पहिला चेक आणि ६ कोटी रुपयांचा दुसरा चेक ६-११-२००८ रोजी ओ.सी.कॉमनवेल्थ युथ गेम्स्, पुणे २००८ या नावाने काढला होता. तसेच ५ कोटी १२ लाख रुपयांचा तिसरा चेक १४-६-२००९ रोजी ओ.सी.कॉमनवेल्थ युथ गेम्स्, पुणे २००८ या नावाने काढला होता अशी माहिती आयुक्त, क्रीडा यांनी समितीस दिली. बँक ऑफ महाराष्ट्रकडून देण्यात आलेला चेक कुठे काढण्यात आला?

अशी विचारणा समितीने केली त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, त्यांचे अकाऊंटस् नंबर्स् मिळालेले आहेत. परंतु त्यांच्याकडे अकाऊंन्टस्चे तपशील घ्यावे लागतील.

याचे लेखापरिक्षण झाले नाही काय? आपण त्यांना तीन चेक दिले ते त्यांनी त्यांच्या खात्यामध्ये जमा केले. नंतर त्या खात्यातून पैसे काढण्यात आले. हे काढलेले पैसे त्यांनी ठेकेदाराला दिले की मंडप घालणाऱ्या माणसाला दिले की आणखी कोणाला दिले याची माहिती आहे काय? तसेच ज्या बँकेमध्ये पैसे जमा झालेले आहेत, त्या बँकेला पत्र पाठवून त्याचे तपशील मागवून घेण्याबाबत समितीने आग्रही भूमिका घेऊन अकाऊंट नंबर काढायला इतका अवधी का लागतो याबाबत विचारणा केली तसेच याकरिता बँकेकडे अर्ज कधी करण्यात आला अशी विचारणा केली असता दि.२० फेब्रुवारी रोजी या संबंधीचे पत्र बँकेला देण्यात आले होते. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

२५ ते ३० कोटी रुपयांचे चेक दिल्यावर त्यांनी तसा खर्च केलेला आहे. पण ऑडीटरने पैशाची रिसीट देखील महालेखाकर यांच्याकडे देत नाहीत. जर आयोजन समितीला चेक दिले, तर त्याचा हिशोब ठेवावयास पाहिजे. तेथे ३२ कोटी रुपयांचे ऑडीट झालेले नाही. अशा वेळी बँकेकडून संपूर्ण अकाऊंट डिटेल्स् मागितले पाहिजेत. पण विभागाकडून केवळ अकाऊंट नंबर आणला जातो. पण बँकेकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही. याबाबतीत बँकेला पत्र का दिले नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, आतापर्यंत महाराष्ट्र बँकेला ॲप्रोच केले होते. त्याच्या अकाऊंटमधून जे ट्रॅन्झॅक्शन झालेले आहे, त्याची माहिती मागविण्याचा प्रयत्न करीत आहोत. "If you are not willing to give their Account Numbers then, we will take strict action against you.", अशा आशयाचे पत्र त्यांना देण्यात येईल.

शासनाकडे अधिकृतपणे सक्षम यंत्रणा आहे. त्या यंत्रणेकडून जागा मोजून घेतली आहे काय? तेथे किती जागेवर अतिक्रमण आहे व त्याबाबतीत कोणती कारवाई करण्यात आली याबाबत समितीने विचारणा केली असता याची शहानिशा झालेली असुन याबाबतीत १२ तारखेला समितीसमोर नकाशा सादर केला असल्याचे तसेच तेथे ४४-आर जागेवर अतिक्रमण असुन त्याठिकाणी जे अतिक्रमण आहे, त्याबाबतीत पी.एम.सी.ने नोटीस दिली असून त्यांना दि.३ मार्च पर्यंत मुदत दिली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शासनाची जागा असताना, दुसराच माणूस तेथे बांधकाम करतो तेव्हा सदरहू बांधकाम पाडण्याचे अधिकार शासनाला आहेत. तुम्ही संबंधित व्यक्तीला कोर्टात जाण्याची संधी देत असून त्यांना नोटीस का दिली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता त्यांच्याकडे पाणीपुरवठ्याचा आणि लॉजिंगचा परवाना असून कराच्या बाबतीत थकबाकी होती. तसेच अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमणाच्या बाबतीत ऑगस्ट २०१२ रोजी पहिली नोटीस देण्यात आली होती. डायरेक्टर स्पोर्टस् आणि बीडब्ल्यू हायवे स्टार प्रायव्हेट लिमिटेड यांना २८ जानेवारी रोजी एम.आर.टी.पी.ॲक्टच्या सेक्शन-५२ अंतर्गत नोटीस दिली होती त्याची मुदत ३ मार्च रोजी संपते. संबंधितांची कलम २६० (१) (बी) तरतुदीप्रमाणे सुनावणी केली होती. याबाबत दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे तेथील अतिक्रमण काढणे आणि दुसरे म्हणजे अनधिकृतपणे केलेले बांधकाम पाडणे. या दोन मुद्यांबाबत आपले काय म्हणणे आहे असे संबंधितांना विचारले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, २० फेब्रुवारी रोजी मुंबई हायकोर्टाने दोन आठवड्यांसाठी स्टेटस्-को ची ऑर्डर दिलेली आहे असा खुलासा आयुक्तांनी केला.

समितीने पुणे येथील बैठकीत अधिकाऱ्यांना सांगितले होते की, संबंधितांना नोटीस देण्यात येऊ नये. कारण नोटीस दिली तर संबंधितांना कोर्टामध्ये जाण्याची संधी संधी मिळेल आणि तसेच झाले आहे. समितीने असे मत व्यक्त करुन देखील संबंधितांना नोटीस का दिली? व याबाबतीत न्यायालयात कॅव्हीएट दाखल केले होते काय? अशी विचारणा समितीने केली असता प्रॉपर्टी टॅक्सच्या बाबतीत स्टेटस्-को ची ऑर्डर देण्यात आली होती. नंतर तो स्टे व्हेकेट करण्यात आला होता. परंतु या प्रकरणात उच्च न्यायालयाने एक्स-पार्टे ऑर्डर पास केलेली असून दोन आठवड्यासाठी स्टेटस को आदेश झालेला आहे. विभागाकडे जी माहिती आली आहे, त्यामध्ये त्यांना रिलीफ देणे योग्य आहे असे दिसत नसल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी समितीची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये समितीने स्पष्ट सूचना केली होती की, ४४ आर जागेवर अतिक्रमण केलेले आहे ती जागा शासनाच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे. कारण ती जागा शासनाच्या मालकीची आहे. पुढे वाढविता येऊ शकते अशा तऱ्हेने ते अतिक्रमित बांधकाम केलेले आहे. कोणत्याही परिस्थितीत अतिक्रमण केलेल्यांना नोटीस देऊ नये, कारण त्या नोटीसचा आधार घेऊन त्यांना न्यायालयात जाता येईल. विभागाने दिलेल्या नोटीसमुळे त्यांना न्यायालयात जाण्यास आधार मिळाला असून

समितीची स्पष्ट सूचना असताना नोटीस देण्याचे कारण काय होते? अशी समितीने पुन: विचारणा केली असता २८ जानेवारीच्या नोटीसबद्दल समितीला सांगितले होते. एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत दिलेल्या या नोटीसमध्ये एक महिन्याची मुदत दिलेली आहे. अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात ही नोटीस देण्यात आली असल्याचा खुलासा आयुक्तांनी केला.

अतिक्रमण नोटीस न देता निष्कासित करण्यास समितीने सांगितले होते, त्याबद्दल काय कारवाई केली? सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आले आहे ते तपासून घेऊ आणि लगेच कारवाई करु असे विभागीय सचिवांनी म्हटले होते याबाबतही समितीने विचारले असता सुप्रीम कोर्टाचे अशा प्रकारचा निकाल आढळून आले नसुन नोटीस देऊ नये असे सुप्रीम कोर्टाचा निकाल नाही. शासनाचे धोरण आहे की, कोणतीही कारवाई करताना नोटीस देणे आवश्यक आहे. तसेच ७/१२ वर शासनाची मालकी असली तरी नोटीस देणे आवश्यक असल्याचे कारण त्यांना कन्सेशन दिले असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

शासकीय जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे ते नोटीस न देता पाडण्यास सांगितले होते, असे असताना त्यांना नोटीस का देण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली त्यावर ४४ गुंठे जागेवर अतिक्रमण झालेले आहे, त्या जागेची मालकी शासनाची आहे. त्यांनी प्लॅन मंजूर केलेला नाही. सरकारी जमिनीवरील अतिक्रमण नोटीस देऊन पाडण्यात येते. त्यांना दि.२० फेब्रुवारी, २०१३ रोजी दुसरी नोटीस दिलेली असल्याचा खुलासा आयुक्त, क्रीडा यांनी केला.

अतिक्रमण झाल्याबद्दल नोटीस न देता बांधकाम निष्कासित करावे असे समितीने सुचविले होते. परंतु नोटीस न देता कारवाई करण्यास समितीने सुचविले असतानाही आपण नोटीस दिली, हा समितीचा अवमान आहे की, दिलेल्या आदेशाचे उल्लंघन आहे?या मुद्यावर विशेष हक्कभंगाची सूचना दाखल होऊ शकते. समितीने नोटीस न देता बांधकाम पाडण्यात यावे असे सांगितले होते. नोटीस देऊन त्यांना कोर्टात जाण्याची संधी दिलेली आहे. कोर्टात काय होणार हे समितीला माहित आहे. समितीने सांगूनही तुम्ही नोटीस का दिली ? अशी विचारणा समितीने केली. त्यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, समितीचा अवमान करण्याचा हेतु अजिबात नसुन विभागाची अशी समजूत होती की, सुप्रीम कोर्टाचे आदेश तपासून पहावेत असे समितीने सुचविले असून त्यामध्ये नमूद केले असेल तर नोटीस देऊ नये.

कॅव्हेट दाखल करा असेही समितीने सांगितले होते? तुम्ही कॅव्हेट दाखल केले होते का? अशी समितीने विचारणा केली या संदर्भात आयुक्त, क्रीडा यांनी कॅव्हेट दाखल केले नाही. दोन आठवड्याचा स्टेट्स-को आदेश आलेला आहे अशी माहिती समितीस दिली. या अनुषंगाने आयुक्त, क्रीडा यांनी समितीला असे अवगत केले की, दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी समिती बैठक झाली. त्यापूर्वी ८ फेब्रुवारी, २०१३ रोजी त्यांना नोटीस दिली होती. त्याच्या विरूध ते कोर्टात गेले आहेत. समितीची बैठक होण्यापूर्वी म्हणजे ८ फेब्रुवारी, २०१३ रोजी नोटीस दिली होती. तसेच त्यावेळी समितीला याची कल्पना दिली होती.

विभागाच्या सचिवांनी अतिरिक्त मुख्य सचिव या नात्याने तसेच विभागाचे प्रमुख म्हणुन त्यांच्यावर कारवाई करावी म्हणून समितीने वारंवार सांगुनही संबंधितांच्या दृष्टीने सोयीची भूमिका घेत असल्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात आयुक्तांनी समितीस अशी माहिती दिली की, कर आकारणीबद्दल महापालिकेने नोटीस दिली होती. त्या अनुषंगाने त्यांनी ५० लाख रुपये भरले आहेत. उर्वरित रक्कम १५ मार्च रोजी देण्याची हमी घेतली आहे. मागील हिशेबाप्रमाणे ६.३९ कोटी रुपये इतकी रक्कम निश्चित झालेली आहे. त्यावर महिन्याला २ टक्केप्रमाणे व्याज द्यावे लागेल त्यांनी ५० लाख रुपये भरले आहेत. हप्ते पाडून घेतले तरी त्यावर व्याज लागणार आहे. ५ लाख रुपये पाणीपुरवठ्याची थकबाकी भरली असुन लॉजिंगच्या आरोग्य परवान्याच्या संदर्भात ५ लाख रुपये भरले आहेत. तीनही प्रकरणाची पूर्ण रक्कम भरण्याची हमी त्यांनी दिली आहे त्यांनी त्यांच्या पत्रात १५ मार्च रोजी पुढील हप्ते भरणार असल्याचे नमूद केले आहे.

यावर समितीने पाणी पुरवठ्यासाठी कोणता दर आकारण्यात आला आहे? अशी विचारणा केली त्याबाबत माहिती देताना आयुक्तांनी असे सांगितले की, दिनांक ३१.३.२०१३ पर्यंतची पूर्ण थकबाकी कळविली आहे. पाणी पुरवठ्यासाठी कमर्शियल दर आकारला आहे. पाणी पुरवठा विभाग, परवाना विभाग, कर आकारणी विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात दुर्लक्ष केले त्यांना नोटीस दिलेली असुन त्याचा निर्णय घेण्यात येईल.

सरकारी जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे, जमिनीच्या ७/१२ रेकॉर्डवर शासनाचे नाव आहे. असे अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी नोटीस द्यावी लागते की नाही ? या समितीच्या प्रश्नावर नोटीस द्यावी लागेल असे आयुक्तांनी स्पष्ट केले. तथापि, रस्त्यावर अतिक्रमण केले असेल तर ते नोटीस न देता निष्कासित करता येते तसा सुप्रीम कोर्टाचा निर्णय असल्याचे

सांगितले. परंतु शासकीय जागेवर अतिक्रमण केले असेल तर ते काढताना नोटीस द्यावी लागेल. अनधिकृत बांधकाम काढण्यासाठी वेगळा नियम आहे. अतिक्रमणाच्या संदर्भात वेगळे नियम आहेत. फक्त मुदतीचा कालावधी वेगवेगळा आहे परंतु नोटीस द्यावी लागते. नियम ५३ अन्वये १ महिन्याची मुदत असते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

यावर दोन वेगवेगळ्या नोटीसा दिलेल्या आहेत. महानगरपालिकेने एक नोटीस दिलेली आहे. क्रीडा संचालकांनी किती तासात अनधिकृत बांधकाम काढण्याची नोटीस दिली आहे? २४ तासात अनधिकृत बांधकाम काढावे असे सांगण्याचा क्रीडा संचालकांना अधिकार आहे तो चालण्याचाच रस्ता आहे त्यांना किती दिवसाच्या मुदतीची नोटीस दिली आहे? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त क्रीडा यांनी समितीस अशी माहिती दिली की, अतिक्रमण मोजणीचा अहवाल दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्राप्त झाला आहे. ही नोटीस त्यापूर्वी देण्यात आली आहे. त्यानुसार ८ फेब्रुवारी, २०१३ च्या प्राथमिक नोटीसमध्ये अनधिकृत बांधकामाबद्दल महानगरपालिकेने नोटीसची प्रत दिली होती त्या नोटीसमधील महत्वाच्या भागाचे वाचन पुढील प्रमाणे समितीपुढे करण्यात आले.

"नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आपणास उद्देशून लिहिलेली व या कार्यालयास पृष्ठांकीत केलेली नोटीस जावक क्रमांक झोन ६/६३४४, दिनांक ३० जानेवारी, २०१३ अन्वये आपणास उक्त परिच्छेदात नमूद केलेल्या जागेचा वापर स्थानिक प्राधिकरणाने मंजूर केलेले नकाशे व उद्दिष्टाप्रमाणे न करता जमिनीचे विकास काम आणि वापरामध्ये बदल केल्याचे माझे निदर्शनास आणण्यात आलेले आहे. आणि ज्याअर्थी सदर नोटीसीमध्ये नमूद केलेल्या कालावधीचे आत आपण जमिनीचा अनधिकृत केलेला विकास व वापर बंद केला नाही, थांबविला नाही, अथवा त्यावर विनापरवाना केलेली बांधकामे पाडून टाकण्यात आली नाहीत तर ही बाब उक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या करारातील अनुच्छेद ५ खालील अटी व शर्तींचा भंग समजण्यात येईल. तसेच करारातील अनुच्छेद १६ मध्ये नमूद केलेल्या व आपणाकडून जाणूनबुजून केलेल्या डिफॉल्ट घटनांपैकी एक समजण्यात येईल आणि आपणाला पुढे असेही कळविण्यात येते की, करारातील अनुच्छेद १६ व अनुच्छेद ५ खालील तरतुदीचे आपण जाणूनबुजून भंग केला असल्यामुळे करारातील अनुच्छेद ३ खालील तरतुदीनुसार आपण दिलेली करार कार्यपूर्ती प्रित्यर्थच्या सुरक्षा ठेवीचे रोखीकरण का करण्यात येवू नये, याचाही खुलासा करावा.

पुढे आपणाला असेही कळविण्यात येते की, या कार्यालयाने उक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या व आपणास भाडेतत्वावर दिलेल्या जागेची मोजणी अधिकृत शासकीय प्राधिकरणाकडून करुन घेतली असून त्यामध्ये असे आढळून आले आहे की, उक्त करारामध्ये नमूद केलेल्या जागेपेक्षा १ एकर ४ गुंठे अतिरिक्त जागेचा अनधिकृत ताबा आपण घेतलेला आहे. सदर अनधिकृतपणे ताब्यात घेतलेल्या जागेचे व्यापारी दराने होणारी भाड्याची रक्कम तत्काळ शासन जमा करण्यात यावी. तसेच पुढे आपणाला असेही कळविण्यात येते की, पुणे महानगरपालिकेच्या उक्त नोटीसीमध्ये ज्या अनधिकृत बांधकामाचा उल्लेख करण्यात आलेला आहे अशी बांधकामे अथवा ज्या उद्दिष्टासाठी जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली होती, त्या उद्दिष्टापेक्षा वेगळ्या कारणासाठी वापर केल्यामुळे आपणास मिळालेली रक्कम तसेच या जागेवर उभा केलेल्या 'कन्व्हेंशन सेंटर' सुरु झाल्यापासून आजपर्यंतच्या उत्पन्नाचा तपशील शासनास सादर करावा." यासंदर्भात कायदेशीर सल्ला घेऊन त्यांना दुसरी नोटीस दिनांक २० फेब्रुवारी रोजी दिलेली आहे. त्यामध्ये पुढील मुद्दे नमूद केले आहेत.

"(a) to remove the illegal construction of shed or any other structure made over the portion of land belonging to my client and which construction is beyond the sanctioned plan and handover the same to my client.

(b) Without prejudice to the above demand you are also called upon to pay an amount of Rs. 2,00,00,000/- to my client as and by way of compensation for illegally using the land belonging to my client, and also continue to pay an amount of Rs. 25,00,000/- per month within 8 days from receipt of this notice by you, failing which my client will be constrained to invoke the Bank Guarantee given by you. You are also called upon to show cause as to why the Agreement dated 26/7/2007 should not be terminated. Non compliance of this notice by you within the period stipulated above will result in my client initiating appropriate legal action against you entirely at your cost and risk including Rs.10,000/- being the charges of this Notice, please note."

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने सेवानिवृत्त तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या बाबींसंदर्भात खुलासा करताना असे सांगितले की, एक मुद्दा कार्यकारी समितीच्या कार्यकक्षेबद्दलचा आहे. माहे जून, २००६ मध्ये शासनाने कार्यकारी समितीला जी

कार्यकक्षा ठरवून दिली, त्या कार्यकक्षेमध्ये समितीने काम केलेले आहे. त्याचप्रमाणे या समितीने जे काही निर्णय घेतले ते राज्यस्तरीय आढावा समिती, ज्या समितीमध्ये मुख्य सचिव अध्यक्ष व वित्त, महसूल, क्रीडा आदी विभागाचे सचिव सदस्य आहेत, या समितीला कार्यकारी समितीच्या निर्णयाची माहिती वेळोवेळी दिलेली आहे. हे सर्व निर्णय कार्यकारी समितीच्या कार्यकक्षेतच येतात असा निर्णय २५ सप्टेंबर, २००६ रोजी उच्चस्तर राज्यस्तरीय समितीने नमूद केलेला आहे. कोणत्याही प्रकारे कार्यकक्षेचे उल्लंघन या समितीकडून झाले नसल्याचे नमूद केले तसेच दुसरा मुद्दा ३० व ६० वर्षाच्या मुदतीबाबत उपस्थित करण्यात आला. २००३ मध्ये सर्व प्रकारची क्रीडा संकुले खाजगीकरणाच्या माध्यमातून उभारताना काय मार्गदर्शक सूचना असाव्यात याचा शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. ज्याचा उल्लेख क्रीडा सचिवांनी केलेला आहे. त्यानुसार किती वर्षाकरिता शासकीय जमीन उद्योजकांकडे सोपविता येईल या विषयी कोणतेही कमाल किंवा किमान कालावधीचे बंधन शासनाने विहित केलेले नाही. शासकीय जमीन ३० वर्षाकरिता जेव्हा भाडेतत्वावर दिली जाते, त्याबद्दल महसूल विभागाचे नियम आहेत, त्यात भुईभाडे वगैरे सर्व गोष्टी अंतर्भूत आहेत. ते नियम बीओटी तत्वावरील प्रकल्पाना लागू होत नाहीत, असेही मत नोंदविले.

बीओटी हा प्रकल्प वेगळ्या पध्दतीचा आहे. त्या ठिकाणी कोणत्या सार्वजनिक सुविधा उपलब्ध करायच्या हे शासन प्रथम ठरवते. रस्ता, पूल, जेट्टी, विमानतळ, जे काही असेल त्याचा सर्व तांत्रिक तपशील निश्चित केला जातो. याकरिता भांडवली गुंतवणूक करण्यासाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे खाजगीकरणाच्या माध्यमातून हा प्रकल्प राबवावा आणि सुविधा निर्माण कराव्यात असा बीओटीचा थोडक्यात अर्थ आहे. त्यामुळे बीओटी तत्वावर प्रकल्प उभारण्यासाठी उद्योजकांना आमंत्रित करतो, त्या कामासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन दिली जाते, तेव्हा त्यांच्याकडून लिज किंवा भुईभाडे अपेक्षित नसून या ना त्याप्रकारे शासनाला त्यांनी काही कन्सेशन फी द्यावी अशी अपेक्षा आहे किंवा यासाठी 'लायसन्स फी' असा शब्द वापरता येईल. काही बीओटी प्रकल्पामध्ये अशा प्रकारची लायसन्स फी सुध्दा घेतली जात नाही. शासन स्वत:हून त्या ठिकाणी वापर शुल्क किंवा टोल निश्चित करते आणि त्या उद्योजकाला सांगितले जाते की, सांगू त्या पध्दतीने सुविधा निर्माण केली पाहिजे. सांगू त्या मुदतीत काम पूर्ण केले पाहिजे. सांगू त्या दराने तुम्हाला टोल घेण्याचा अधिकार असणार आहे. टोल घेण्याचा अधिकार किती वर्षे असेल हा मापदंड लवचिक राहतो बाकी सर्व मापदंड

स्थिर आहेत. किती वर्षांची मुदत असावी हा भाग ही लवचिक असतो. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेसाठी शासनाने करोडो रुपये खर्च करुन जमीन संपादित केली आणि ती २७ वर्षासाठी उद्योजकाकडे सोपविली. त्या उद्योजकाने २७ वर्षे शासनाने निर्धारित केलेल्या दराने टोल वसूल करावयाचा आहे ही सार्वजनिक सुविधा आहे. शासनाला १८०० कोटी रुपये भांडवली गुंतवणूक करणे शक्य नव्हते. म्हणून हे काम खाजगी उद्योजकाला दिले.

तत्कालिन सेवानिवृत्त विभागीय आयुक्त यांनी केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाने २७ वर्षासाठी उद्योजकाला टोल वसुलीचा ठेका दिला आणि नागरिकांना ही सुविधा उपलब्ध करुन दिली. बालेवाडी येथे ४ दिवस राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे सामने भरले होते. त्यावेळी किती लोक आले होते ? आता तेथे पुढील ९९ वर्षे बाहेरचे लोक येतील. शासनाला वर्षाला २ कोटी ५९ लाख रुपये मिळणार आहेत आणि उद्योजकाला मात्र करोडो रुपयांचा फायदा होणार आहे. यावर तत्कालिन विभागीय आयुक्तांनी असा खुलासा केला की, हा प्रकल्प बीओटी तत्वावर करीत असताना इतर मापदंड स्थिर ठेवण्यात आले. किती वर्षांसाठी द्यावे ही बाब लवचिक ठेवण्यात आली. त्यावेळी समितीने असा विचार केला की, आपण करोडो रुपये खर्च करुन आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा नगरी उभी करीत आहोत. क्रीडा विभागाला त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी तरतूद मिळणार नाही. या प्रकल्पातून काही तरी रक्कम मिळावी आणि त्यातून देखभाल दुरुस्तीसाठी रक्कम उभी करण्यात आली. या खुलाशाच्या अनुषंगाने समितीने १ रुपया दराने जमीन दिलेली आहे. याबाबत विचारणा केली असता तत्कालिन विभागीय आयुक्तांनी अशी माहिती समितीस दिली की, जमिनीसाठी १ रुपया दर लावलेला नाही. ३० वर्षाची मुदत स्थिर ठेऊन जो उद्योजक वार्षिक रक्कम जास्तीत जास्त देण्याची बोली लावेल त्याला प्रकल्पाचे काम द्यावे, असा निर्णय समितीने घेतला होता.

दुसरी गोष्ट अशी की, या प्रकल्पाची आर्थिक सुसाध्यता कमी होती. कारण हा प्रकल्प विमानतळापासून २५ किलो मीटर आणि मुख्य शहरापासून १२ ते १५ किलो मीटर अंतर आहे. ४०० खोल्या आणि तेथे १२०० व्यक्तींची राहण्याची सोय होईल, असे एकही हॉटेल पुणे शहर किंवा पुणे परिसरात नव्हते. एवढे मोठे हॉटेल सुरु केल्यानंतर त्यातून किती उत्पन्न मिळेल या विषयी उद्योजकांमध्ये साशंकता होती. वर्कऑर्डर मिळाल्यानंतर काम पूर्ण करण्याचा कालावधी १८ महिन्यांचा होता. एवढ्या कमी मुदतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे बांधकाम करता येईल किंवा

नाही अशी उद्योजकांमध्ये साशंकता होती. उद्योजकांनी ही शंका बोलून दाखविली होती. तज्ज्ञांचे मत घेऊन कार्यकारी समितीने निर्णय घेतला आणि काही अटी शिथील कराव्यात, असे कार्यकारी समितीला वाटले. उद्योजकाने ९९ वर्षाचा करार करुन मागितला होता. परंतु कार्यकारी समितीने तो ६० वर्षे कालावधीचा केला. सुरुवातीला ५ एकर जमीन देण्याची ऑर्डर होती. त्याचबरोबर वाणिज्यिक बांधकाम करण्याची परवानगी देऊन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करता येईल, असा विचार करण्यात आला. हॉटेल तोट्यात चालले तर उद्योजकाला काही तरी उत्पन्न मिळेल अशा प्रकारचा विचार करुन अट शिथील करण्यात आली होती. हा प्रकल्प आर्थिक सुसाध्यतेच्या दृष्टीने कमकुवत असल्यामुळे टेंडर कमी आले. दोन-तीन बैठका घेतल्यानंतर समितीचे सदस्य आणि तज्ज्ञ सहकाऱ्यांच्या असे लक्षात आले की, बीओटी तत्वावर प्रकल्प पूर्ण करण्याच्या यशस्वीतेबाबत साशंकता आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००६ च्या दरम्यान माननीय मुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा केली आणि कार्यकारी समितीसमोर येणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, शासनाकडे एवढे पैसे असते तर आम्ही बीओटी तत्वावर काम करावे असे म्हटले नसते. त्यांनी प्लॅनिंग समितीबरोबर झालेल्या चर्चेचा उल्लेख केला होता. त्यांचे असे म्हणणे होते की, बीओटी तत्वावर काम करावे. आपल्याला असे वाटते काय की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून १८ महिन्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे बांधकाम पूर्ण होईल. एक दिवस जरी विलंब झाला तरी आपली फजिती होईल.

उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने समितीने हा व्यवहार शासन आणि उद्योजक यांच्यामध्ये झालेला आहे. त्या संदर्भात समितीला तांत्रिक माहिती देण्याबाबत सांगितले असता तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी असा खुलासा केला की, बीओटी तत्वावर काम करावे, असे निदेश होते. आजच्या चर्चेत लिज रेंट असा शब्द अनेक वेळा आलेला आहे तो वित्त विभागाने तो शब्द वापरलेला आहे. लिज रेंट हा शब्द चुकीचा आहे. हे कन्सेशनल ॲग्रीमेंट असल्यामुळे लायसन्स फी म्हणणे योग्य होईल. ज्यावेळी राष्ट्रीय युवा क्रीडा स्पर्धा भरल्या त्यातून शासनाला व्यापारी नफा व्हावा, असा उद्देश नव्हता. परंतु या कराराची मुदत संपल्यानंतर तेथे जी मालमत्ता निर्माण झालेली आहे ती ६० वर्षानंतर शासनाला मिळणार आहे. त्या मालमत्तेचे व्हॅल्युएशन किती होईल याचा आपण अंदाज करु शकत नाही. एखादे लॉज, हॉटेल १०० वर्ष जुने असेल तर त्याची बुक व्हॅल्यू शून्य जरी असली तरी नफ्यात चालणारे हॉटेल असल्यामुळे

व ऑनगोईंग कन्सर्न म्हणून पाहिले तर त्याची किंमत हजार कोटी रुपये होऊ शकते. ६० वर्षानंतर हे हॉटेल शासनाच्या मालकीचे होईल आणि त्यावेळी त्याची किंमत भरपूर असेल. या संपूर्ण प्रकल्पाचा खर्च ३०० ते ३०५ कोटी रुपये येईल असे तज्ज्ञांना वाटत होते. परंतु २७० कोटी रुपयांमध्ये हे सर्व काम पूर्ण झालेले आहे. ज्या दिवशी हे काम पूर्ण झाले त्या दिवशी एनपीव्ही २७० कोटी रुपयांची होती. ज्यावेळी कार्यरत होतो त्यावेळी बांधकाम सुरु झाले नव्हते. क्रीडा संचालकांनी दिलेल्या माहितीमध्ये २७० कोटी रुपयांचा उल्लेख आहे. त्यामध्ये फर्निचर, गालिचे, टीव्ही, टेलिफोन इत्यादींचा समावेश आहे. ज्या दिवशी हा प्रकल्प पूर्ण झाला त्यावेळी त्याची किंमत २७० कोटी रुपये होती. ज्यावेळी ६० वर्षानंतर हा प्रकल्प आपल्या ताब्यात मिळेल त्यावेळी त्याची किंमत कित्येक पटीने जास्त असेल. वित्त विभागाने विश्लेषण करताना हा एनपीव्ही लक्षात घेतलेला नाही. वित्त विभागाने शासनाचा तोटा झाला, असे म्हटले आहे. तथापि ही प्रक्रिया अत्यंत योग्य आणि पारदर्शन पद्धतीने झाली असल्याचे सांगितले.

याच विषयाच्या संदर्भात समितीने तत्कालिन विभागीय आयुक्त श्री. बंड यांना आपले म्हणणे मांडावयास सांगितले असता त्यांनी असे सांगितले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून ते सन २००६ पासून या समितीचा सदस्य होते. औरंगाबाद येथून बदली झाल्यानंतर दिनांक १९ जानेवारी, २००९ पासून विभागीय आयुक्त होते. राज्य शासनाने ७.९५ कोटी रुपये मंजूर केले होते, ते समितीला द्यायचे होते. श्री.लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी, कोल्हापूर हे त्यावेळी क्रीडा संचालक होते. आपण यातील काही कामे केलेली आहेत काय हे तपासून घ्यावे आणि आम्हाला अहवाल सादर करावा, असे त्यांना सांगितले होते. २.९५ कोटी रुपये खर्च वजा करुन उर्वरित रक्कम समितीला अदा करण्यात आलेली आहे. दिनांक १५.०६.२००९ रोजी या रकमेचे पेमेंट झालेले आहे हा एक भाग झाला. त्यावेळी कार्यकारी समितीवर असे टेन्शन होते की, या सुविधा सन २००८ पूर्वी पूर्ण झाल्या पाहिजेत आणि स्पर्धा चांगल्या झाल्या पाहिजेत. त्या पार्श्वभूमीवर पारदर्शक पद्धतीने हे सर्व केलेले आहे. सन २००८ पूर्वी काम पूर्ण करुन त्याचा वापर करण्यात आलेला आहे. १२०० खेळाडू तेथे थांबले होते.

यावर समितीने हे हॉटेल बांधण्यासाठी किती खर्च येईल, याचा अंदाज कोणी काढला होता ? अशी विचारणा केली त्यावर तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी मे.शशी प्रभू ॲन्ड असोशिएट्स यांनी ३०५ कोटी रुपये अंदाज काढला होता. बांधकाम पूर्ण

झाल्यानंतर क्रीडा संचालकांनी त्यातील फिक्स ॲसेटचा खर्च सांगितला आहे तो २७० कोटी रुपये आहे. यामध्ये गुंतवणूक बरीच झालेली आहे स्थावर मालमत्ता २७० कोटी रुपयांची आहे. वित्त विभागाने मुल्यांकन ४० कोटी रुपये कसे ठरविले हे कळलेले नसल्याचे समितीस सांगितले असता तत्कालिन विभागीय आयुक्त डॉ.करीर यांनी हे हॉटेल केव्हा बांधण्यात आले, असा पहिला मुद्दा आहे. यावर समितीने तुम्ही कोणत्या कालावधीत विभागीय आयुक्त होता अशी विचारणा केली त्यावर तत्कालिन विभागीय आयुक्त डॉ.करीर यांनी ते एप्रिल-मे, २००७ पासून विभागीय आयुक्त पदावर कार्यरत होतो. त्यावेळी निर्णय झालेले होते, निर्णयांच्या अंमलबजावणीचा तो कालावधी होता. यामध्ये ३ मुद्दे आहेत. हॉस्टेल-हॉटेल असा फरक कसा करण्यात आला, असा समितीने प्रश्न उपस्थित केला आहे. समितीच्या तत्कालीन अध्यक्षांनी जुलै-ऑगस्ट, २००६ मध्ये शासनाला प्रस्ताव पाठविला होता. त्या प्रस्तावात नमूद केलेले आहे की, या स्पर्धेसाठी ६०० खाटांचे वातानुकूलित वसतिगृह (थ्री स्टार हॉटेल) बीओटी तत्वावर बांधण्यास मान्यता द्यावी. पूर्वी हॉस्टेल म्हटले आणि नंतर हॉटेल झाले असे झालेले नसुन या हॉटेलमध्ये ४०० खोल्या आहेत. स्पर्धेच्या वेळी प्रत्येक खोलीमध्ये ३ बेड टाकण्यात आले होते. आता प्रत्येक खोलीमध्ये २ बेड आहेत. स्पर्धेसाठी प्रत्यक्ष १२०० खेळाडू आले होते. खेळाडू किती येणार त्यानुसार खोल्यांचे वाटप करावे लागले. स्पर्धेच्या वेळी हॉटेलमधील सर्व खोल्यांचा वापर करण्यात आला होता असा खुलासा तत्कालिन विभागीय आयुक्तांनी केला.

स्पर्धेच्या वेळी ४०० खोल्यांमध्ये १२०० खेळाडू थांबले होते, असे आपले म्हणणे आहे. परंतु आज ४०० खोल्यांपैकी फक्त २०० खोल्यांचा वापर केला जात आहे. उर्वरित खोल्यांचे काम पूर्ण झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना जे करुन पाहिजे असेल ते न झाल्यामुळे ते उर्वरित खोल्यांचा वापर करीत नसतील. आता त्यांच्याकडून ४०० खोल्यांचे भाडे आकारले जाते काय ? अशी समितीने विचारणा केली असता त्यावर खुलासा करताना तत्कालिन विभागीय आयुक्तांनी असे सांगितले की, टेंडर काढले त्यावेळी जेवढी रक्कम देण्याचे त्यांनी मान्य केले होते. तेवढीच रक्कम त्यांच्याकडून घेतो. ते कमी खोल्यांचा वापर करतात म्हणून त्यांना सवलत दिले जात नाही. त्यावेळी सर्व खोल्या वापरात होत्या. सर्व देशातील खेळाडूंनी दिलेले प्रमाणपत्र रेकॉर्डवर आहे. चांगल्या सुविधा होत्या, आम्हाला आवडले, आम्ही कम्फर्टेबल राहिलो असे खेळाडूंचे म्हणणे होते. त्यानंतर दिल्ली येथे स्पर्धा झाल्या होत्या. त्यातील काही खेळाडूंनी कळविलेले आहे की, पुणे येथे आमची राहण्याची

चांगली सोय झाली होती. तिसरा मुद्दा असा आहे की, फायनान्स विभागाने आक्षेप घेतलेला आहे. खरे म्हणजे तत्कालिन विभागीय आयुक्त श्री.करंदीकर यांनी साक्ष देताना सांगितले की, दरवर्षी शासनाला २ कोटी ५९ लाख रुपये मिळणार होते आणि त्यावर दर ३ वर्षांनी होणारी ५ टक्के वाढ अशी मूळ निविदा होती. तसेच दुसरा फायदा असा की, क्रीडा स्पर्धेच्या वेळी १२०० खेळाडूंसाठी मोफत रहाण्याची, त्यांना सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने व्यवस्था करावयाची होती आणि जेव्हा क्रिडा स्पर्धा होत्या, तेव्हा ५०० ते ५५० खेळाडूंच्या रहाण्याची व्यवस्था बालेवाडी येथील ४०० खोल्यांमध्ये करण्यात आली. तेथील खोल्यांचे नुतनीकरण करुन त्या अपग्रेड केलेल्या आहेत. जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावरुन खेळाडू येतील, तेव्हा या खोल्या अतिशय कमी दरामध्ये वापरावयास मिळतील यादृष्टीने अट टाकण्यात आली आहे. त्यामध्ये शासनाचे दोन फायदे अंतर्भूत आहेत मात्र याचे मुल्यांकन करावे असे माननीय मुख्य सचिवांनी सांगितले. कोणत्याही गोष्टीचे मुल्यांकन करावयाचे असेल तर शहर नियोजन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी मुल्यांकन करावयाचे आहे. साधारणपणे जमिनीचे मूल्य ५ कोटी ७८ लाख इतके आहे. २००७ चे मुल्यांकन साडेपाच कोटी रुपये इतके आहे आणि जे पैसे काढून घेणार आहात त्याचा एन.पी.व्ही. २६ ते २७ कोटी रुपये इतका आहे. संबंधितांना ६० कोटी रुपयांची जमीन देउुन त्यांनी त्याचा वापर करावयाचा आहे. त्यासाठी आपण त्याला जागा वापरण्याचे सवलत दिले असून कायम स्वरुपामध्ये सदरहू जागा दिलेली नाही.

यावर तत्कालिन विभागीय प्रतिनिधी श्री.वैद्य यांनी असे सांगितले की, तत्कालिन विभागीय आयुक्तांनी निधी कसा वितरीत केला जातो ते सांगितले आहे आणि त्यांचे म्हणणे मान्य आहे. यावर सेवानिवृत्त तत्कालिन विभागीय आयुक्त श्री.करंदीकर यांनी समितीस अशी माहिती दिली की, सन २००८ मध्ये ते जिल्हाधिकारी म्हणून काम करीत होते परंतु स्पर्धेच्या वेळी श्री.चंद्रकांत दळवी हे जिल्हाधिकारी आणि कार्यकारी समितीचे अध्यक्ष होते. या संबंधातील बैठकांना जास्त उपस्थिती नसली तरी बऱ्याच बैठकांना उपस्थिती होती आणि त्यामध्ये काही बाबतीत निर्णय झाले होते. त्यानंतर झालेल्या बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांसमोर सादरीकरण सुध्दा करण्यात आले. याबाबत कार्यकारी समितीच्या कक्षा ठरविण्यात आल्या होत्या आणि त्याप्रमाणे निर्णय देखील झाला. त्यावेळी कामाचे टेंडर काढताना त्यात पारदर्शीपणा देखील ठेवण्यात आला होता त्यानंतर सदरहू पेपर आणि टेंडर हे वेबसाईटवर

देखील टाकण्यात आले होते. त्यावेळी उपलब्ध झालेली कागदपत्रे आणि जी माहिती देण्यात आली होती त्यावरुन असे दिसते की,यामध्ये नियमाप्रमाणे कारवाई करण्यात आली होती.

यावर प्रधान महालेखाकार यांनी यहां पर निर्णय लिया गया कि पीपीपी के माध्यम से होटल बनाया जाएगा और उसका उपयोग खिलाड़ियों के लिए किया जाएगा. हमारा कहना है कि यह पीपीपी प्रोजेक्ट एप्रुवल के लिए केबिनेट सब कमेटी के पास जाना चाहिए था. लेकिन इसका एप्रुवल वहां से नहीं लिया गया है. यह बात ठीक नहीं है. एप्रुवल नहीं लिये जाने की वजह से वहां पर प्रोसीजर में बहुत बदल हुआ है और होटल बनाने के संबंध में बहुत सारी कन्सेशन्स दी गयी हैं.इसके अलावा होटल बनाने में खर्च हुए करीब २५६ करोड़ रुपए का हिसाब भी यहां पर नहीं है. यहां पर एक बात यह भी बताना जरुरी है कि माननीय मुख्यमंत्री महोदय द्वारा दिए गए निर्देशों का भी पालन नहीं हुआ है. पहले भी यह मुद्दा उठाया गया था कि ३० करोड़ रुपए कंटींजंसी फंड से विदड्रा किए गए. लेकिन उसका कोई हिसाब नहीं है.फायनेंस डिपार्टमेंट का १९८३ का एक जीआर है.महाराष्ट्र बजट मेन्युअल में इस बात का उल्लेख है कि किन परिस्थितियों में कंटीजेंसी फंड से पैसा निकाला जा सकता है और उसका हिसाब किस तरह से रखा जाना चाहिए.उसमें ऐसा भी बताया गया है कि इस फंड का मंथली हिसाब तैयार करके फायनेंस डिपार्टमेंट को भेजा जाए. लेकिन देखने में ऐसा आ रहा है कि यहां पर कोई हिसाब नहीं रखा गया है. यह हिसाब रखा गया होता तो ए.जी को यूटिलाइजेशन सर्टिफिकेट पर निर्भर नहीं रहना पड़ता. बालेवाडी में कॉमनवेल्थ गेम्स से संबंधित यूटिलाइजेशन सर्टिफिकेट भी ए.जी. को नहीं दिया गया है. यावर प्रधान सचिव (१), नगरविकास विभाग यांनी एमआरटीपी एक्ट के नियम ५८ के तहत किसी भी संस्था के लिए यह चार्ज देय नहीं है असा खुलासा केला या अनुषंगाने(सेवानिवृत्त) तत्कालिन विभागीय आयुक्त श्री.करंदीकर यांनी यह टेंडर एन.पी.व्ही. के आधार पर लेट हुआ, इस बात से मैं सहमत नहीं हूं असे अभिप्राय व्यक्त केले. यावर प्रधान महालेखाकार यांनी फायनेंस डिपार्टमेंट की नोटिंग को ही ए.जी यहां पर कोट कर रहे हैं असे सांगितले.

यावर तत्कालिन विभागीय आयुक्त श्री. करंदीकर यांनी त्यांच्याशी सहमत असल्याचे मत व्यक्त केले. याठिकाणी नियमांचे उल्लंघन केले आहे आणि पी.पी.पी.च्या रुल्स्चे देखील पालन करण्यात आलेले नाही असे विधान केले. या संबंधीच्या नियमाबाबत क्रीडा विभागाचा २००३ मधील शासन निर्णय असून, त्यानंतर माहे मे २००६ आणि जून २००६ मध्ये दोन वेळा

शासन निर्णय काढून एम्पॉवर समिती नेमण्यात आली आणि त्या समितीला अधिकार देण्यात आले. परंतु त्याचे मुल्यांकन झालेले नाही असे म्हणणे असल्याचे नमूद केले असता तत्कालिन विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, बी.ओ.टी.च्या प्रस्तावाबाबत जे नियम आहेत, त्याचे पालन केले नाही कारण ही बाब मंत्रिमंडळासमोर ठेवावयास हवी होती. कार्यकारी समितीने बी.ओ.टी.च्या प्रस्तावाला शासनाने मान्यता द्यावी यासाठी प्रस्ताव पाठविला होता. याबाबत जी आढावा समिती होती, त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री, विभागाचे सचिव, मुख्य सचिव, वित्त सचिव असे सर्वजण होते. त्यांनी असे सांगितले की, हा विषय कार्यकारी समितीच्या अधिकार कक्षेमध्ये येणारा आहे. त्यामुळे त्यांनी याबाबत निर्णय घ्यावा.

जे विषय दोन ते अडीच कोटीच्या खर्चाचे असतात ते सब कमिटीमध्ये जातात. याठिकाणी एकच विषय असा आहे की, जो कॅबिनेट सब कमिटीपुढे गेलाच नाही. याचे कारण काय आहे? आढावा कमिटी ही सब कमिटीला सुपरसीड करू शकत नाही. खरे म्हणजे सब कमिटीपुढे जावयास हवे होते. परंतु याबाबत संबंधितांनी खुलासा पाठविलेला नाही, तसा तो देतील असे वाटते, नाहीतर समिती त्यांना जबाबदार धरेल असे मत समितीने व्यक्त केले यावर वित्त विभागाकडे ४० कोटी रुपयांचा एन.पी.व्ही. असतो असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. याबाबत माननीय मुख्य सचिव यांच्याकडे बैठक झाली असून त्याचे मिनिटस्ही आहेत. या एन.पी.व्ही.चे कॅलक्युलेशन केल्यानंतर ४० कोटी रुपयांचा आकडा कसा येतो हे समजले तर यात बदल करु असे तत्कालिन विभागीय आयुक्त यांनी सांगितले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि शिक्षण मंत्र्यांनी म्हटले आहे की, हे सर्व अधिकार कक्षेच्या बाहेर गेले आहे. ज्या कमिटीला सर्व अधिकार दिले होते ते अधिकारी वेगळे नव्हते तर तेही राज्य शासनाचेच अधिकारी होते. मग याबाबत सब कमिटी का केली नाही? जर वरीष्ठांनी सांगितले असते की, याची गरज नाही, तरी देखील संबंधितांना याबाबत विचारले असते. तसेच या समितीची बालेवाडी येथे बैठक झाली होती आणि त्यावेळी विविध कमिट्या करण्यात आल्या होत्या. यामध्ये राज्यस्तरीय उप समिती ही धोरणात्मक बाबींचा आढावा घेण्यासाठी होती. पण रेकॉर्डनुसार याबाबत त्यांची बैठकही झालेली नसल्याबाबत समितीने विचारणा केली परंतु तत्कालिन विभागीय सचिवांनी त्यांच्या बैठका झाल्या होत्या त्याचे मिनिटस् उपलब्ध असल्याचे समितीस सांगितले.

ही बाब मंत्रिमंडळाच्या सब कमिटीपुढे जावयास हवी होती सर्व अधिकार दिलेले आहेत अशा वेळी त्यांनी टेंडर बोलविले पाहिजे तसेच मुख्य सचिवांच्या अधिकाराखाली काम करीत असल्याने सदरहू सब कमिटी या कामाच्या बाबतीत पुढे गेलीच नाही ही बाब मुख्य सचिवांच्या निदर्शनास आणली आहे काय? निर्णय घेत असताना तो सब कमिटीकडे का पाठविला नाही ? अशी ही विचारणा समितीने केली तसेच माननीय क्रीडा मंत्री महोदयांनी कॅबिनेटसाठी जे नोटींग लिहीले, त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केली. मग हे कार्यकक्षेच्या बाहेर आहे असे त्यांना वाटले. जर या सर्व गोष्टी रेकॉर्डवर आणल्या असत्या तर त्याचे गांभीर्य कमी झाले असते. याठिकाणी जी माहिती देण्यात आली, ती अगोदर सांगितली असती तर विषयच संपला असता. तसेच कार्यकारी समितीला कार्यकक्षेच्या बाहेर जाण्याचा अधिकार कोणी दिला ? या समितीच्या प्रश्नावर क्रीडा संचालकांनी असे सांगितले की, याठिकाणी एन.पी.व्ही. चा मुद्दा मांडण्यात आला. ६ एकर जमिनीचे व्हॅल्यूएशन ३७०० प्रमाणे काढले होते आणि आम्ही त्याच्या ३ पट केले आहे. तसेच एन.पी.व्ही.१७ ऐवजी २५.८७ काढलेला आहे.त्यामुळे एन.पी.व्ही.च्या बाबतीत काही नुकसान होणार नाही. या बाबतीत आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत किंवा आमचे वेगळे मत आहे असे त्यांनी आम्हाला ऑफीशिअली कळविलेले नाही.

समितीने क्रीडा संकुलाला मिळणारे वार्षिक उत्पन्न, जमिनीचा दर आणि ४०० खोल्यांचे प्रतिदिन जे काही भाडे मिळत असेल, साधारणपणे ती किंमत ७० हजार रुपये प्रतिदिन येते. आज क्रीडा संकुलाचा वार्षिक खर्च १० ते १५ कोटी रुपये आहे. समितीला आजही वाटते की, त्या तुलनेत २.५ कोटी रुपये वार्षिक उत्पन्न फार कमी आहे, म्हणून शासनाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे. निदान विकासकाकडून अधिक रक्कम मिळावी. क्रीडा विभागाला दरवर्षी जो निधी मिळतो त्यापेक्षा अधिक निधी मिळावा असे झाले तर समितीला समाधान वाटेल. दरवर्षी ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येतो आणि १.४० कोटी रुपये दिले जातात. क्रीडा संकुलाचे उत्पन्न ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त नसुन तेथे क्रीडा विभागाच्या ॲक्टिव्हीटीज वाढाव्यात, खेळाडूंना सुविधा उपलब्ध व्हाव्यात, कम्फर्टेबल स्टे मिळावा म्हणून अधिक भाडेवाड करुन सरकारचे उत्पन्न कसे वाढेल यादृष्टीने समिती शिफारस करणार आहे. चौकशीची कार्यवाही केव्हा होईल? याबाबत समितीने विचारणा केली यावर ताबडतोब प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करुन सामान्य प्रशासन विभागाला प्रस्ताव पाठवू असे विभागीय सचिवांनी समितीस

सांगितले. तसेच विभागाकडून जी कारवाई केली जाईल ती समितीला कळली पाहिजे. दिल्ली येथे नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षांबरोबर झालेली चर्चा, त्या संदर्भातील सगळया कागदपत्रांची एक सर्टिफाय प्रत समितीला सादर करावी असे निदेश समितीने दिले.

अभिप्राय आणि शिफारशी :-

राष्ट्रकूल युवा क्रीडा स्पर्धा-२००८ करिता पायभूत सुविधा विकास यासंदर्भात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी शासनास सादर केलेला अहवाल महाराष्ट्र विधानमंडळस दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी सादर करण्यात आला सदरहू अहवाल शालेय शिक्षण व क्रीडा, नगरविकास व गृह विभागाशी संबंधित आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, २०१० याचा एक उपकार्यक्रम असलेल्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ पुणे येथे दिनांक १२ ते १८ ऑक्टोबर, २००८ दरम्यान आयोजित करण्यात आल्या होत्या. म्हाळुंगे येथे असलेले शिव छत्रपती क्रीडा संकुल, सुशोभित व अद्ययावत करून स्पर्धा घेण्यात आल्या. सहभागी खेळाडूंना राहण्यासाठी दोन नवीन वसतीगृहे व एक थ्री स्टार हॉटेल बांधण्यात आले होते.

क्रीडा संकुलाचे बांधकाम व सुशोभिकरणाच्या संविदा बहाल करताना व क्रीडा साधने खरेदी करताना नियमांचे उल्लंघन करण्यात आले तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वातून थ्री स्टार हॉटेल बांधकामाबाबतीत अनेक अनियमितता व गंभीर त्रुटी आढळून आल्या. तसेच सुरक्षा साधनांपैकी बरीचशी साधने स्पर्धा समाप्त झाल्यानंतर मागविली गेली वा प्राप्त झाली त्यामुळे त्यांचा स्पर्धे दरम्यान काहीच वापर झाला नाही. व्यवस्था व आयोजनावर देखरेख याबाबत शिखर समिती व आढावा समिती अपयशी ठरली अशा स्वरूपाचे गंभीर आक्षेप महालेखाकार यांनी त्यांच्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, २००८ करीता पायाभुत सुविधांचा विकास या विशेष अहवालात केले.

सदरहू अहवाल विधानमंडळास सादर झाल्यानंतर लोकलेखा समितीकडे विचारार्थ आला. समितीने या विशेष अहवालावर विचार विनिमय करण्याकरिता एकूण ७ बैठका घेतल्या. यात बालेवाडी, पुणे येथे दोन दौऱ्यांमध्ये झालेल्या ४ बैठकींचा देखील समावेश आहे. समितीपुढे विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तसेच समितीने प्रत्यक्ष स्थळी दिलेल्या भेटी दरम्यान वेळी समितीपुढे आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विभागीय

सचिव व संबंधित विभागांच्या प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या. यामध्ये समितीपुढे आलेल्या माहितीच्या अनुषंगाने या स्पर्धांच्या आयोजनामध्ये बऱ्याच गंभीर अनियमितता घडल्या आहेत असे समितीच्या निदर्शनास आले.

समितीच्या अभिप्राय व शिफारशी क्रीडा सुविधा, पायाभूत नागरी सुविधा आणि सुरक्षेच्या पायाभूत सुविधा तीन भागांमध्ये अंतर्भूत केलेल्या आहेत.

क्रीडा सुविधा

महालेखाकारांनी अहवालात समाविष्ट केलेल्या या प्रकरणामध्ये नियोजन आणि वित्तीय व्यवस्थापन यामध्ये पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी आकस्मिकता निधीतून काढलेल्या रक्कमा अनियमितपणे राखून ठेवणे, स्पर्धा ठिकाणच्या विकास मुख्य कामाकरिता कंत्राटदारास नियुक्त करणे, बांधकामाचा दर्जा, CYG मध्ये सहभागी व्यक्तींना राहण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्तवावर थ्री स्टार हॉटेलचे बांधकाम, जागेच्या वापरातील बदल व बांधकाम नियमनातील शिथिलता, निविदा शर्थींचे क्रमशः शिथिलीकरण, निविदा पश्चात वाटाघाटी व कंत्राट बहाल करणे, भूसौंदर्यीकरण, खडकांचे सौंदर्यकरण, शिल्पकला यासंदर्भात अतिशय गंभीर मुद्दे उपस्थित केले होते. या मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने वेळो-वेळी विभागीय सचिव व प्रतिनिधींची साक्ष घेतली.

आयोजन समिती ही राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ कार्यक्रम संचालनाची प्रमुख होती. या आयोजन समितीचे अध्यक्ष श्री.सुरेश कलमाडी व सदस्य सचिव श्री.ललित भानोत हे होते. या समितीने स्पर्धेकरिता तात्पुरता अनपेक्षित स्वरूपाचे खर्च भागविण्यासाठी रुपये ३२.९५ कोटींच्या अतिरिक्त निधीची मागणी ऑगस्ट २००८ मध्ये केली होती. हा निधी स्पर्धा ठिकाण विकास व साधनांकरता मिळालेल्या रु.४२५.५० कोटी व्यतिरिक्त अतिरिक्त निधी म्हणून होता. शासनाने स्पटेंबर २००८ आणि ऑगस्ट २००९ या कालावधीत तात्पुरता निधी म्हणून रु.३२.९५ कोटी तीन हप्त्यात राज्याच्या आकस्मिकता निधी मधून मुक्त केला. या निधी मधून संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे (DSYS) यांनी रुपये २५.१२ कोटी आयोजन समितीकडे वर्ग केले व उर्वरित रु.७.८३ कोटी यापैकी रुपये ४.३६ कोटी DSYS यांनी खर्च करून त्यांच्याकडे शिल्लक राहिलेले रु.३.४७ कोटी शासकीय कोषागारात भरण्याऐवजी अनधिकृतपणे ठेवून घेतले.

समितीपुढे हा विषय चर्चेस आला त्यावेळेस क्रीडा स्पर्धेचे आयोजन करित असताना जी काही कामे करावयाची राहिलेली होती त्यासाठी या निधीची मागणी करण्यात आली होती असे स्पष्ट करण्यात आले होते. सदरहू रुपये ३२.९५ कोटी कोणत्या कामाकरता व ते खर्च करताना कोणती कार्यपद्धती अवलंबविण्यात आली याची माहिती समितीने विचारली होती. त्यावेळी रुपये ३२.९५ कोटीपैकी रु.२५.१२ ऐवढी रक्कम आयोजन समितीस देण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली. सदरहू रक्कमेच्या खर्चाचा तपशील देताना DSYS यांनी खाजगी सनदी लेखापालांनी त्यांच्या लेटरहेडवर एका पानात दिलेल्या खर्चाचा तपशील दिला. **त्यामध्ये ओव्हरलेज फर्निचर अँड फिक्चर्स यावर रु. २० कोटी, ब्रँडिंग व डेकोरेशन रु.५.८५ व नेटवर्कींगसाठी रु.६३.९५ लाख एवढाच तपशील आहे.** या प्रमाणपत्रासोबत कोणतीही देयके, नाहीत तसेच ही रक्कम खर्च करताना कोणती कार्यपद्धती वापरण्यात आली याबाबतची माहिती विभागीय प्रतिनिधी सांगू शकले नाहीत. या खर्चाचा हिशेब वारंवार आयोजन समितीकडे विभागाने मागून देखिल त्याचा तपशील अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. समितीने देखिल या खर्चाच्या रकमेचे तपशील मागवून घेण्याबाबत विभागास सूचित केले होते. पंरतु त्याचा तपशील प्राप्त झाला नाही. त्यामुळे ही रक्कम योग्य कारणाकरिताच वापरली गेली आहे का याबाबत समितीने सांशकता व्यक्त केली. आयोजन समितीने रु.२५.१२ कोटी रकमेचा हिशेब न दिल्यामुळे या रकमेचा गैरव्यवहार, अपहार झाला आहे या निष्कर्षाप्रत समिती आली व समितीचे तसे स्पष्ट मत झाले.

आकस्मिकता निधीतून रक्कम अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये काढण्यात येते. याप्रकरणी राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे हे माहे जुन, २००६ मध्ये निश्चित झाले होते. तसेच या कामाकरिता शासनाने रु.४२५.२५ कोटी एवढा निधी उपलब्धही करून दिला होता त्यामुळे आकस्मिकता निधीची रु.३२.९५ कोटी एवढी रक्कम अत्यंत तातडीने काढण्याचे काहीच कारण नव्हते हा निधी काढताना अर्थसंकल्पीय नियमावलीचे तसेच आकस्मिकता निधी संदर्भात वित्त विभागाच्या सन १९८३ मधील तरतूदीचा योग्य प्रकारे अवलंब करण्यात आलेला नाही याबद्दल समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. या संदर्भात सनदी लेखापालांकडून प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये (Utilisation Certificate) अत्यंत त्रोटक स्वरूपात माहिती प्राप्त झाली असून रु.२५.१२ कोटी एवढया मोठ्या रकमेचा हिशेब फक्त एका पानात देण्यात आल्याचे समितीने आश्चर्य व्यक्त केले व

संशयही व्यक्त केला. वास्तविकता पाहता उपयोगिता प्रमाणपत्र देताना देयके, प्रमाणके तसेच सविस्तर तपशील जसे हा खर्च करताना कोणती कार्यपद्धती अवलंबविण्यात आली, कामाचे कंत्राट देताना विहीत केलेली निविदा प्रक्रिया अवलंबविली किंवा कसे याबाबत तपशीलवार माहिती प्राप्त होणे अपेक्षित असताना अशा प्रकारची कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. **त्यामुळे हा निधी वितरीत करताना कार्यकारी समितीमध्ये असलेल्या तत्कालिन अधिकाऱ्यांनी आकस्मिकता निधीतून प्राप्त झालेला निधी आयोजन समितीस वितरित करताना कोणत्या तातडीच्या बाबीवर खर्च करण्यासाठी या निधीची मागणी केली आहे याची सत्यता पडताळली गेली आहे हे समितीच्या निदर्शनास आले नाही. समितीने दिल्ली येथील अयोजन समितीला दिलेल्या रु. २५.१२ कोटी इतका निधी दिला होता. या निधीच्या विनियोजनाबाबत समितीने उक्त दिनांक ३ व ४ मे, २०१२, दिनांक ८ व ९ जानेवारी, २०१३, दिनांक १२ व १३ फेब्रुवारी, २०१३, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ या तारखाना झालेल्या प्रत्येक बैठकीत विचारणा केली असता त्याबाबत ठोस माहिती समितीस मात्र शेवटपर्यंत मिळू शकली नाही. उलट यासंदर्भात त्यामुळे आकस्मिकता निधीमधून शासनाकडून मिळालेली रु.२५.१२ कोटी एवढी रक्कम वितरित करताना जो निष्काळजीपणा तत्कालिन अधिकाऱ्यांनी व त्यांच्यासमवेत काम करण्याऱ्या लेखा अधिकाऱ्यांनी केला आहे व या खर्चाच्या तपशिलाची मागणी आयोजन समितीकडे केलेली नसल्यामुळे अधिकारी व तसेच त्यांच्या अधिपत्याखाली लेखाविषयक काम हाताळणाऱ्या लेखा अधिकारी यांनी शासकीय कामात कुचराई केलेली असल्याने या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

आकस्मिकता निधीद्वारे अत्यंत तातडीने रक्कम काढून ती दिल्ली येथील आयोजन समितीस देण्याचे काहीच प्रयोजन नव्हते या निष्कर्षाप्रत समिती आली. वास्तविक ही स्पर्धा पुण्याला बालेवाडीत होणार होती. त्यामुळे या संबंधातील सर्व खर्च याठिकाणीच होणे अपेक्षित होते. तथापि, आकस्मिकता निधीमधून रक्कम काढून आयोजन समितीला दिल्ली येथे पाठविण्याची कारणमिमांसा दिसून येत नाही शिवाय या रक्कमेपैकी रु.२० कोटी निधी furniture & fixtures (branding and decoration venues, networking of venues and TSR) याबाबींवर केलेला खर्च पहाता सदर खर्च राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, पुणे येथे आयोजित केलेल्या स्पर्धेकरिता करण्यातच आलेला नसल्यामुळे आयोजन समितीने शासनाचे म्हणजेच जनतेच्या पैशांचा गैरव्यवहार व अपहार केला आहे असे समितीचे ठाम मत आहे.

आयोजन समितीकडून वारंवार या निधीच्या विनियोगाची माहिती मागवून देखील ती विहित नमुन्यात प्राप्त न होणे, त्यासोबत कोणताही तपशील नसणे , लोकलेखा समितीने देखिल वारंवार DSYS यांच्याकडे वारंवार मागणी करून कोणतीच माहिती स्पर्धेच्या आयोजन समिती यांचेकडून समितीस प्राप्त होत नसल्याने रु.२५.१२ कोटींचा गैरव्यवहार, अपहार झाला असल्याने राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ या स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष यांच्यावर शासनाच्या निधीचा अपहार व गैरव्यवहार केल्याप्रकरणी तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

महालेखापालांच्या अहवालामध्ये बॅडमिंटन सभागृह, टेनिस सभागृह व तरणतलाव वगळता क्रीडा संकुलात केलेल्या बांधकामाचा दर्जा सकृतदर्शनी समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे. समितीने क्रीडा संकुलात प्रत्यक्ष भेट दिली. त्यावेळेस बॅडमिंटन हॉल, तरणतलाव, शुटींग रेंज, जिमनॅस्टिक हॉल, बॉक्सिग हॉल, लॉन टेनिस व मुख्य स्टेडियमची पहाणी केली. बॅडमिंटन हॉलमध्ये काही ठिकाणी भिंतीस व कौलाच्या बाजूने तडे गेल्याचे समितीच्या निदर्शनास आले. छतास देखील काही ठिकाणी छिद्रे दिसून आली. जलतरण तलावामध्ये वॉर्म-अप पुलाचे फ्लोरींग तुटणे, डायव्हींग लिफ्ट बंद अवस्थेत असणे तसेच डायव्हींग फ्लॅटफॉर्म तुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. १६ पैकी १० फोकस बंद होते. मुष्टीयुद्ध, टेबल टेनिस व वेटलिफ्टींग सभागृहास बाष्पीभवन वातशितकरण यंत्रणा प्रथम बसविली होती परंतु आयोजन समितीने वातानुकूलीत यंत्रणा बसविण्यास सांगितल्याने प्रथम बसविलेली बाष्पीभवन यंत्रणा वातशितकरण यंत्रणा निष्फळ ठरली व त्यावर अनाठायी खर्च झाल्याचे समितीचे मत झाले.

समितीने भेट दिलेल्या वास्तुपैकी फक्त शुटींग रेंजचे सभागृह अत्यंत अत्याधुनिक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. यासंदर्भात समितीने समाधान देखिल व्यक्त केले.

क्रीडा संकुलात ज्या-ज्या खेळांसाठी सभागृहे/क्रीडांगणे तयार केली आहेत. त्यांचा या स्पर्धेनंतर योग्य प्रमाणात वापर न झाल्याने अस्तित्वात असलेली यंत्रणा पूर्णतः कार्यान्वीत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींकडे निधीबाबत समितीने चौकशी केली असता या क्रीडा संकुलाच्या देखभाल/दुरुस्तीकरिता अत्यंत कमी निधी प्राप्त होतो असे कळाले. त्यामुळे रुपये ५००-५५० कोटी एवढा खर्च एखाद्या स्पर्धेदरम्यान करुन ती

मालमत्ता तयार करण्यात येते तीची देखभाल निधीअभावी होत नाही व राज्याचा क्रीडा विभाग याबाबत किती अनुत्साही आहे याचे शिव छत्रपती क्रीडा संकुल हे उत्तम उदाहरण आहे. **युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्याचे क्रीडा धोरण अत्यंत योग्य प्रकारे अंमलात आणणे आवश्यक आहे व या करीता शासनाचा यात मोठा वाटा आहे. त्यामुळे शासनाने शिव छत्रपती क्रीडा संकुलाची देखभाल होण्यासाठी क्रीडा विभागास आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी देखिल क्रीडा संकुलातील साधनांचा वापर उत्तम प्रकारे होण्यासाठी या सोयीसुविधेचा वापर करण्यास इच्छुक असणाऱ्या खाजगी व्यक्ती वा संस्था यांचेकडून विहित प्रमाणात शुल्क आकारुन त्याचा वापर करु दिल्यास आपल्या मालमत्तेची देखभाल होण्यास मदतच होईल. तसेच रायफल शुटींग खेळामध्ये ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील स्पर्धक व विशेषतः मुली आंतराष्ट्रीय स्पर्घात राज्याचे नाव उंचावित आहे त्यांना याचा फायदाच होईल व त्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती पाऊले उचलावीत अशी समिती शिफारस करीत आहे.**

देशाची व महाराष्ट्राची संस्कृती चित्रीत करणारी शिल्पे व स्मारके यासाठी निविदेत रु.७५ लाखांची तरतूद केली होती. सांस्कृतिक कार्य विभागाच्या सल्ल्याने याची व्याप्ती ठरविणे आवश्यक होते. तथापि, असे असताना, बाजार भावाचा अभ्यास न करता व स्पर्धात्मक दर न मागविता भोवरा, साप-सिडी, लगोरी इत्यादी करीता खाजगी कंत्राटदारांकडून कामे करून घेतली होती. समितीने जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता साप-सिडी, लगोरी, या जागे जवळील परिसर अतिशय दुर्लक्षित असल्याचे दिसले तसेच या वास्तुंचे केलेले बांधकाम हे तकलादू व तात्कालिक होते असे समितीस वाटते. या कामास रुपये ७५ लाख इतका खर्च का व कोणाच्या सल्ल्यानुसार केला या बाबत समितीने सखेद आश्चर्य व्यक्त केले. **समितीला भोवरा या करीता रु.२०.९० लाख, युवा उद्यानाकरिता रु.१७ लाख, योगा उद्यानासाठी रु.९.५० लाख, साप-सिडी करिता रु.१८.९० लाख, कारंज्यासाठी रु.५५ लाख एवढा खर्च झालेला आहे अशी माहिती मिळाली. हा खर्च कोणतीही निविदा प्रक्रिया न करता केलेला असल्याने तो अनावश्यक असल्याचे व कोणत्यातरी ठेकेदाराचा फायदा होण्यासाठी केला असल्याचे समितीचे ठाम मत झाले. जी कामे केली आहेत त्यावर देखील अव्वाच्या सव्वा खर्च झाला असल्याने समितीने नापसंती व्यक्त केली. या कामी कोणत्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केली व कोणाच्या**

दबावाखाली ही कामे करण्यात आली. या बाबत संबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. सौंदर्यीकरणासाठी केलेला हा खर्च वायाच गेला आहे अशी समितीची भावना आहे. त्यामुळे एवढा खर्च करून उभारण्यात आलेल्या या शिल्पांची किमान आता तरी योग्य प्रकारे देखभाल व दुरूस्ती करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

सार्वजनिक - खाजगी भागिदारी तत्वावर थ्री स्टार हॉटेलचे बांधकाम, जागेच्या वापरातील बदल व बांधकाम नियमांतील शिथीलता, निविदा शर्तींचे शिथीलीकरण, निविदा पश्चात वाटाघाटी व कंत्राट बहाल करणे.

क्रीडा संकुलामध्ये १७०० खेळाडू/अधिकारी यांच्यासाठी १५ दिवसांसाठी राहण्याची व्यवस्था करणे आवश्यक होते. क्रीडा संकुलातील तीन वसतिगृहामध्ये केवळ ५०० व्यक्ती राहू शकत असल्याने कार्यकारी समितीने माहे जुलै, २००६ मध्ये सार्वजनिक - खाजगी भागीदारी तत्वावर १२०० पलंग असलेल्या ६०० खोल्यांचे वसतिगृह नंतर वाणिज्यिक वापरासाठी थ्री स्टार हॉटेलमध्ये रुपांतरीत करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी तत्वावर बांधावयाचे ठरविले.

महालेखापालांनी निविदा शर्तींचे क्रमश: शिथिलीकरण या परिच्छेदामध्ये निविदा शर्ती विविध टप्प्यांवर खाली संक्षेपित केल्याप्रमाणे उत्तरोत्तर शिथिल केल्याचे नमूद केले आहे.

भूखंड ठरविणे	१४ ऑक्टोबर, २००६ रोजी प्रसिद्ध झालेल्या निविदा सूचनेस हॉटेलसाठी प्रस्तावित जागा दर्शविली नव्हती. भूखंड ठरविणे व जमिनीचे क्षेत्रफळ मोजणी प्रक्रिया १ नोव्हेंबर, २००६ रोजी सुरु झाली.
क्षेत्रफळ	कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ च्या बैठकीत प्रारंभीच्या पाच एकरांवरुन सहा एकरापर्यंत वाढ झाली. तथापि, ११ डिसेंबर, २००६ च्या बदलाच्या अतिरिक्त सामान्य संचात पाच एकर ठेवले गेले. अखेरीस ६.१ एकर जमीन दिली गेली.
वाहनतळ	कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ च्या बैठकीत २ एकर जागा सुचवली. अखेरिस ३.५ एकर जागा उद्यान व वाहनतळाकरिता रु.१

	प्रति चौ.मी. प्रति वर्ष दराने नाममात्र भाडे आकारुन दिली गेली.
खोल्यांसाठी प्रमाण तीन तारांकित ऐवजी एक तारांकित असे बदलले	कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ च्या बैठकीत प्रमाण बदलले गेले.
आगावू शुल्का ऐवजी वार्षिक भाडेपट्टी	१४ ऑक्टोबर, २००६ च्या निविदा सूचनेत वार्षिक अदायगी दर्शविली होती. ६ नोव्हेंबर, २००६ च्या कार्यकारी समितीच्या बैठकीत आगावू शुल्क सुचविले गेले. परंतु दोन निविदापूर्व बैठकांनंतर निर्गमित केलेल्या निविदा कागदपत्रातील बदलांच्या संचात वार्षिक अदायगी कायम केली.
६०० खोल्या ते ३०० खोल्या	कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ रोजी झालेल्या बैठकीत ६०० खोल्यांची आवश्यकता ३०० खोल्यांपर्यंत (६०० पलंग) कमी केले.
निविदा निकषाप्रमाणे असलेला सवलतीचा कालावधी ६० वर्षे केला	प्रारंभी, ठराविक वार्षिक अदायगीसह सवलतीचा कालावधी हा बोलीचा निकष होता. त्यानंतर तो ३० वर्षाच्या ठराविक सवलत कालावधीत बदलला. सरते शेवटी कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ च्या बैठकीत पूर्वीच्या निविदा कागदपत्रात उल्लेखित ३० वर्षावरुन ६० वर्षांपर्यंत वाढला. भाडेपट्ट्यासाठी वार्षिक अधिमूल्य हा बोलीयोग्य निकष ठरला.
तीन तारांकित हॉटेलच्या बांधकामाचा पूर्व पात्रता अनुभव	११ नोव्हेंबर, २००६ च्या निविदा पूर्व बैठकीच्या आधारावर हा निकष काढून टाकला गेला.

महालेखापालांनी त्यांच्या अहवालात नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने समितीने क्रीडा संकुलांत उभारण्यात आलेल्या हॉटेलमध्ये जाऊन प्रत्यक्ष भेट दिली व तेथिल परिसराची पाहणी देखील केली. त्यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे अधिकारी, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे नगरविकास संबंधी अधिकारी, पुणे महानगरपालिकेचे अग्निशमन अधिकारी, पाणीपुरवठा अधिकारी, आरोग्य अधिकारी तसेच शासनाच्या भू-सर्वेक्षण

विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच समितीने प्रत्यक्ष पाहणीच्या अनुषंगाने पुणे येथे बैठकही आयोजित केली होती.

समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने संचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी शासनाच्यावतीने दि.१६ जुलै, २००७ रोजी मे. बी.डब्ल्यु. हायवे स्टार प्रा.लि. यांच्या समवेत दि.१ नोव्हेंबर, २००८ ते ३१ ऑक्टोबर, २०६८ अशा एकुण ६० वर्षाच्या कालावधीकरिता बीओटी तत्वावर जमिनीचा विकास करण्याकरिता कन्सेशन ॲग्रीमेंट केले होते. त्यानुसार विकासकाने शासनास ६० वर्षाच्या करार कालावधीमध्ये वर्षाला प्रत्येकी २.५९ कोटी लीज प्रिमिअम देण्याचे निश्चित केले होते. तसेच ६.१ एकर जागेवर हॉटेल व ३.५ एकर जागेवर वाहनतळ असे एकूण ९ एकर २४ गुंठे जागेवर हॉटेल बांधणे व चालविण्यासाठी बांधा-वापरा व हस्तांतरण या तत्वावर भाडेपट्टीने जागा दिली होती. या करारानुसार ४०० खोल्यांचे हॉटेल बांधावयाचे होते. समितीने ज्यावेळी प्रत्यक्ष स्थळी भेट दिली त्यावेळेला हॉटेल व्यवस्थापनाने क्रीडा संकुलातील जागेवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले. समितीच्या सूचनेनुसार अधिकृत शासकीय प्राधिकरणाकडून जागेची मोजणी करुन घेतली असता हॉटेलनी १ एकर ४ गुंठे एवढया अतिरिक्त जागेचा अनधिकृत ताबा घेतल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली.

समितीने हॉटेलच्या प्रत्यक्षस्थळी जाऊन पाहणी केली असता समितीस तेथे एका हॉटेलऐवजी दोन हॉटेल म्हणजे मे. विट्स हॉटेल व मे. ऑर्किड हॉटेल अशी दोन हॉटेल प्रत्यक्षात असल्याचे दिसून आले. कन्सेशन ॲग्रीमेंटप्रमाणे तेथे फक्त एकच हॉटेल असणे अपेक्षित होते. यासंदर्भात समितीने विभागीय प्रतिनिधींकडे चौकशी केली असता पूर्वी हॉटेलचे दोन पार्टनर्स असल्यामुळे या दोन भागिदारांनी या हॉटेलची विभागणी उपरोक्तप्रमाणे केल्याचे सांगण्यात आले. परंतु आता हॉटेलची मालकी एकाच व्यक्तीकडे असून मे. विट्स व मे. ऑर्किड या नावने ही हॉटेलस् चालविली जात आहेत.

सदरहू हॉटेलला सन २००८ मध्ये ४१० खोल्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्यात आलेले आहे. परंतु समितीस "ए" व "बी" विंग मधील इमारतीमध्ये इमारतीचे बांधकाम निकषाप्रमाणे झालेले नसल्याचे दिसून आले. या इमारतीमध्ये पुरेशी उद्ववाहन नसणे, अग्निशमन यंत्रणा नसणे, आवश्यक शौचालये नसणे तसेच ड्रेनेज इलेक्ट्रीसीटी अशा इतर सोयी सुविधांचा अभाव असताना देखील महापालिकेने हॉटेलला ऑक्युपेशन सर्टिफिकेट कसे दिले याबद्दल समितीने आश्चर्य व्यक्त केले. "ए" व "बी" विंग मिळून अनुक्रमे ९९४ व ७६०

अशा एकुण १७५४ गाड्यांची पार्कींग करणे आवश्यक होते. तथापि, "ए" विंग मध्ये स्कुटर व सायकलचे पार्कींग व "बी" विंग आणि मेकॅनिकल पार्कींग असे एकुण १७५४ कारचे पार्कींग नकाशात दाखविले आहे. परंतु प्रत्यक्षात तेथे पार्कींची व्यवस्थाच केलेली नाही. यासंदर्भात वाहतुक विभागाकडून पार्किंगला सन २०१४ पर्यंत परवानगी दिली असल्यामुळे ही परवानगी कशाच्या आधारावर दिलेली आहे. तसेच ही परवानगी देताना प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन ती देण्यात आलेली आहे असे समितीच्या निदर्शनास आले नाही. त्यामुळे पार्किंगची परवानगी देतानाही नियमांचे उल्लंघन झाले ही बाब स्पष्ट होत आहे. हॉटेलचा अन्न परवाना देखील सन २००८ पर्यंतच देण्यात आलेला असून या परवान्याचे नुतनीकरण देखील करण्यात आलेले नाही. या हॉटेलमध्ये स्टाफ डायनिंग रुम दाखवून त्या ठिकाणी एक रेस्टॉरंट व रेग्युलर बार चालविणे, कॉफी शॉपची परवानगी घेतली असताना तेथे रेस्टॉरंट चालविणे व परवानगीपेक्षा जास्त जागा याकरिता उपयोगात आणणे, ओपन गार्डन रेस्टॉरंटवर भराव टाकून रेस्टॉरंटची उंची हॉटेलच्या ग्राऊंड फ्लोअर पर्यंत वाढवून रेस्टॉरंट वरच्या बाजुला तात्पुरते शेड उभारणे. २४ हजार चौरस फुटाच्या बांधकामाची परवानगी असताना ५४ हजार चौरस फुटाच्या हॉलचे बांधकाम रनिंग ट्रॅकच्या जागेवर करणे, पार्किंगचे डिमार्केशन न करणे, लँड स्केपिंग न करणे, अशा प्रकारची अनेक अवैध अनधिकृत बांधकामे व्यवस्थापनाने केल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

पुणे महानगरपालिकेने हॉटेलसाठी पाण्याचे कनेक्शन दिले आहे. परंतु आतापर्यंत हॉटेलकडे पाण्याच्या देयकाची ३९ लाख ४८ हजार रुपयांची थकबाकी असतानादेखील त्यांचे पाणी कनेक्शन कसे चालू राहिले आहे व या रक्कमेची वसूली करण्याकरिता पुणे महानगरपालिकेने कोणती ठोस अशी उपाययोजना केल्याचे समितीच्या निदर्शनास दिसून आले नाही. हॉटेलमध्ये असलेल्या टि.व्ही. संचांचा करमणूक कर देखील बाकी असून करमणुक कर अधिकाऱ्यांना त्यांची वसूली करण्याकरिता योग्यरितीने पाठपुरावा करित नसल्याची बाब समितीसमोर आली.

हॉटेलच्या लॉजींग परवान्यासंदर्भात पुणे महानगरपालिकेचा आरोग्य विभाग हा जबाबदार आहे. समितीच्या असे निदर्शनास आले की, सदरहू हॉटेलकरिता ३१ मार्च, २००९ पर्यंत परवाना देण्यात आलेला होता. परंत ही मुदत संपुष्टात आल्यानंतर आजतागायत या हॉटेलच्या परवान्याचे नुतनीकरण केले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. यासंदर्भात पुणे

महानरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे समितीने विचारणा केली असता रु.२५,०९,२१८ एवढी थकबाकी असल्याचे दिसून आले. तीन वर्षांपासून हॉटेलच्या लॉजिंगचा परवाना नसल्याने सदरहू हॉटेल हे बेकायदेशीर चालू असून ते तात्काळ बंद करणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत झाले.

हॉटेल व्यवस्थापनाने क्रीडा संकुलाच्या १ एकर ४ गुंठे जागेवर अतिक्रमण केले असल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येऊन देखील क्रीडा व युवक सेवा संचालकांनी याप्रकरणी कोणतीच कारवाई अद्यापपर्यंत केली नसल्याचे दिसून आले. तसेच वॉल कंपाऊंड टाकणे हे देखील आवश्यक असताना अद्यापपर्यंत ही कार्यवाही का करण्यात आलेली नाही यासंदर्भात समितीला कोणतेही ठोस उत्तर प्राप्त होऊ शकले नाही.

हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल शेजारील लॉनवर मंडप टाकून तात्पूरते मंगल कार्यालय उभारले आहे. या मंगल कार्यालयाच्या वापरासाठी खाजगी व्यक्तींकडून हॉटेल व्यवस्थापन किमान रु.५ लाख एवढा दर एका कार्यक्रमासाठी आकारात आहेत. तसेच हॉटेलच्या शेजारी कन्व्हेन्शन हॉलदेखील बांधण्यात आलेला असून हॉटेल व्यवस्थापन हे स्वत:ला या जागेचे मालकच असल्याचे समजत आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे कार्यालय या हॉटेलच्या अगदी समोर असुन देखील या हॉटेल व्यवस्थापनाकडून हॉटेलमध्ये व हॉटेलच्या शेजारी करण्यात येणा-या अनधिकृत बांधकामाबाबत क्रीडा व युवक सेवा संचालकांनी जाणूनबुजून डोळेझाक केली असल्याची दाट शक्यता समितीने व्यक्त केली.

क्रीडा संकुलाच्या जागेवर बांधण्यात आलेल्या हॉटेलमध्ये उपरोक्तप्रमाणे झालेल्या अनधिकृत कामासंदर्भात पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी, अग्निशमन विभागाचे अधिकारी, कर आकारणी अधिकारी, पाणीपुरवठा अधिकारी तसेच वाहतुक पोलीस अधिकारी, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी यांनी ना-हरकत प्रमाणपत्र देताना कामात अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई केलेली आहे. समितीने ज्यावेळेस या अहवालाच्या संदर्भात बैठका बोलावून विचारविनिमय करण्यास सुरुवात केली त्या कालावधीपर्यंत या सर्व विभागांनी अत्यंत निष्क्रीय राहून हॉटेल व्यवस्थापनाविरुद्ध कोणतीच कारवाई केलेली नव्हती परंतु समितीने संबंधितांच्या साक्षी घेण्यास सुरुवात केल्यानंतर समितीच्या पुढे जसजशी अनियमितता निदर्शनास येऊ लागली त्यावेळीस अत्यंत नाईलाजाने या अधिका-यांना हॉटेल व्यवस्थानाविरुद्ध कारवाई केल्याचे दिसत आहे. त्यामुळे हॉटेल व्यवस्थापनास अवैध काम करण्यास या

विभागाच्या संबंधित अधिका-यांनी प्रोत्साहन दिले असून समितीने पाठपुरावा केल्यामुळेच त्यांना ही कारवाई करणे भाग पडल्याचे दिसून येत आहे. याशिवाय क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने देखील त्यांच्या डोळ्यादेखत सर्व अनधिकृत बांधकामे होत असताना देखील हॉटेल व्यवस्थापनास रोखण्याकरिता समितीपुढे येण्यापूर्वी कोणतीच कारवाई केलेली नव्हती. या संचालकांनी नुसतीच बघ्याची भुमिका घेतली होती. क्रीडा संकुलाची मालमत्ता ही नुसती शासनाची मालमत्ता नसुन त्यावर राज्याच्या जनतेचादेखील तेवढाच हक्क आहे. त्यामुळे उपरोक्त सर्व नमुद केलेल्या क्रीडा व युवक संचालानालय, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यातील अधिका-यांनी "ऑब्लीगेशन ऑफ ड्युटी" या तत्वाचे स्पष्टपणे उल्लंघन केलेले असल्यामुळे हे अधिकारी देखील दोषी असल्याचे दिसून येते. यासर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करुन, वर नमुद केलेली अनियमितता किंवा कामात केलेल्या कुचराईकरिता जे-जे वरिष्ठ अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईबाबत समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावे अशी समिती शिफारस करित आहे.

बालेवाडी क्रीडा संकुलातील ५ एकर जागा सार्वजनिक - खाजगी भागिदारी तत्वावर बांधा, वापरा व हंस्तातरीत करा या पद्धतीने उपलब्ध करुन देण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. या जागेवर ६०० खोल्यांचे हॉस्टेल कम हॉटेल प्रकल्प उभारुन ठराविक वार्षिक अदायगीसह सवलतीचा कालावधी हा बोलीचा निकष होता. त्यानंतर तो ३० वर्षाच्या सवलत कालावधीत बदलला. शेवटी कार्यकारी समितीच्या ४ डिसेंबर, २००६ च्या बैठकीत पुर्वीच्या निविदा कागदपत्रात उल्लेखित ३० वर्षांचा कालावधी ६० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला व भाडेपट्टयासाठी वार्षिक अधिमुल्य हा बोली योग्य निकष ठेवण्यात आला. निविदा शर्तीतील वारंवार व महत्वाच्या केलेल्या बदलास कार्यकारी समितीने निविदा सूचनेच्या प्रतिसादाचा अभाव असे समर्थन केले होते. कार्यकारी समितीने क्रीडा नगरीतील ५ एकर जागेऐवजी ६ एकर जागेवर बांधकाम करण्यासदेखीलही त्याचवेळी बदल केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाची मान्यता मिळण्यासाठी तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर करण्यात आला असता या प्रस्तावात शासनाचे हित जपले गेले आहे काय अशी विचारणा मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून करण्यात आली होती.

वित्त विभागाने देखील बालेवाडी पुणे येथील बीओटी तत्वावर आधारित हॉस्टेल कम हॉटेल बांधकामाबाबत कार्यकारी समितीने जे अधिमुल्य ठरविले आहे. त्याबाबत खालील प्रमाणे आक्षेप घेतले होते.

(१) कार्यकारी समितीने प्रिमिअयची रक्कम ठरविताना एनपीव्ही पाहणे आवश्यक होते.

(२) कार्यकारी समितीने जमिनीचे मुल्यांकन कमी दराने केले आहे. हे वास्तविक रु.४० कोटी गृहित धरुन प्रिमिअमची रक्कम ठरविणे आवश्यक होते.

वित्त विभागाने या जागेच्या प्रिमिअमपोटी मिळणा-या प्रिमिअमची एनपीव्ही ४० कोटी होईल असे गृहित धरुन प्रतीवर्षी प्रिमिअम ठरवावा तसेच पुढे ६० वर्षात ४.०१५ कोटी दरसाल प्रिमिअम मिळणे आवश्यक आहे अशी भुमिका घेतली होती. तर विभागीय आयुक्तांच्या समितीने एनपीव्ही रु.१८.०९ कोटी इतका ठरवुन ६० वर्षाचा विचार करता प्रतीवर्षी रु.१.५६ कोटी एवढे प्रिमिअम ठरविले होते. कार्यकारी समितीने नंतर विकासकाशी वाटाघाटी करुन प्रतिवर्षी रु.२.५९ कोटी प्रिमिअम देण्याचे निश्चित केले. यासंदर्भात मुख्य सचिवांनी रु.२.५९ कोटी प्रतिवर्षी प्रिमिअम चा दर स्विकरण्याचा प्रस्ताव क्रीडा मंत्री यांच्याकडे सादर केला असता त्यांनी प्रस्तुत प्रकल्पास शासनाने मान्यतापुर्व परवानगी दिल्याशिवाय कार्यान्वित केल्याचे सकृतदर्शनी दिसत असून शासनस्तरावरील प्रशासकीय अधिका-यांनी गांभिर्याने न घेता अप्रत्यक्ष समर्थन देऊन प्रस्ताव नियमित करण्याचा प्रकार दिसून येत आहे. विभागीय आयुक्त व क्रीडा संचालक यांनी त्यांच्या कार्यकक्षेच्या बाहेर जाऊन घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे नुकसान झाले आहे हे स्पष्ट होते. राष्ट्रकुल स्पर्धांची तातडी, राहिलेला अपुरा कालावधी पाहता संबंधितांवर शासनाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन प्रस्ताव मान्य करण्याशिवाय पर्याय दिसुन येत नाही असे अभिप्राय नोंदविले होते. यास तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांनी देखील मान्यता दिली होती.

उपरोक्त सर्व गोष्टींचा एकत्रितपणे उहापोह केला असता असे स्पष्ट होते की, कार्यकारी समितीने शासनाच्या मालकीचा असलेला ६ एकरचा भूखंड शासनाची वा मंत्री मंडळाची वा मंत्री मंडळाच्या उपसमितीची कोणतीही पुर्व मान्यता न घेता अथवा त्यांच्या निदर्शनास न आणता खाजगी विकासकास पुर्वी ठरलेल्या ३० वर्षावरुन ६० वर्षाकरिता भाड्याने देताना स्वतःच जणु काही शासन व जमिनीचे मालक असल्यासारखे वागून निर्णय घेतला. हा निर्णय घेताना देखील शासनाचे आर्थिक हित जपले नाही हे तर तत्कालिन मा.क्रीडा मंत्री,

महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अभिप्रायातच मान्य केले आहे. विभागीय आयुक्त व क्रीडा संचालक यांनी त्यांच्या कार्यकक्षेबाहेर जाऊन घेतलेला निर्णय तत्कालिन मुख्य सचिवांना अवगत असूनही त्यांनी या प्रस्तावास अनुमती देण्यापूर्वी मंत्री मंडळाची मान्यता घेण्यास न सुचविणे व या प्रस्तावास मंत्री मंडळाची कार्योत्तर मंजूरी देखील घेण्याची कार्यवाही न करणे त्यामुळे याप्रकरणात दोषी असलेले मुख्य सचिव, तत्कालिन विभागीय आयुक्त व संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्यावर मंत्रीमंडळाच्या उपसमितीची पुर्वमान्यता न घेता विकासकास शासकीय जमिन अत्यंत माफक दरात भाडे तत्वावर ६० वर्षाच्या कालावधीकरिता दिल्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समिती शासनास शिफारस करित आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, माहे फेब्रुवारी, २००८ मध्ये मा.मुख्यमंत्र्यांनी संबंधितांवर कारवाई करण्याचे निदेश देऊन देखील लोकलेखा समितीच्या पुढे ही बाब निदर्शनास येईपर्यंत मा.मुख्यमंत्र्यांच्या आदेशावर कोणतीच कार्यवाही विभागाने केलेली नव्हती. लोकलेखा समितीने हा विषय चर्चेस घेऊन धसास लावला नसता तर या प्रकरणी जी गंभीर अनिमितता यापूर्वी झालेली आहे त्याबाबत कोणास कल्पनाही आली नसती. त्यामुळे फेब्रुवारी, २००८ ते समितीच्या माहे जानेवारी, २०१३ च्या बैठकीत सदरहू बाब निदर्शनास येईपर्यंत हे प्रकरण दडपून ठेवण्याकरिता व या प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी आदेश देऊनही कोणतीही कारवाई न करण्यासाठी जबाबदार असलेल्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील तत्कालिन प्रधान सचिवांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समिती शिफारस करित आहे.

नवी दिल्ली येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, २०१० चा एक उपकार्यक्रम म्हणून राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ आयोजित केला गेला होता. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, २०१० करिता पायाभुत विकास कामांची आवश्यकता असल्याने राष्ट्रकुल क्रीडा परिषदेने तीन संभाव्य ठिकाणांमधून पुणे या शहराची निवड केली होती. सदरहू स्पर्धा दि.१२ ते १८ ऑक्टोबर, २००८ या कालावधीत पुणे येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहे, २००६ रोजी औपचारिकरित्या घोषणाही झाली होती. सदरहू घोषणा झाल्यापासून दोन वर्षांचा कालावधी या स्पर्धेचे आयोजन करण्यारिता उपलब्ध होता.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा आयोजित करणे सुकर व्हावे म्हणून नियोजन आयोगाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाद्वारे (JNNURM) स्पर्धांशी संबंधित पायाभुत नागरी सुविधा प्रकल्पांसाठी ऑक्टोबर, २००६ मध्ये निधीला मंजुरी दिली होती. ही कामे पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी समन्वयाने कार्यान्वित करावयाची होती. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाद्वारे (JNNURM) या दोन्ही महानगरपालिकांतर्गत येणारे रु.७४६.३६ कोटी किंमतीचे रस्ते सुधार प्रकल्प मंजुर झाले होते. या स्पर्धा सुरु होण्यापुर्वी रस्त्याची कामे, विद्युतीकरणाची कामे, बस वाहनतळाची सुविधा, पादचारी भुयारी मार्ग आणि क्षेत्रिय वाहतुक नियंत्रण व्यवस्था यांचे बांधकाम करावयाचे होते. वर नमुद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी समन्वय साधुन कामाचे नियोजन, कार्यान्वय आणि सनियंत्रण करणे आवश्यक होते.

या स्पर्धेच्या अनुषंगाने रस्त्यांची कामे करणे आवश्यक असल्याने रस्त्यास लागून असलेल्या टेलिफोन केबल, जलवाहिन्या, जलनि:सारण वाहिन्या, विद्युत केबल इ. कामे विहित कालावधीत होणे आवश्यक होते. परंतु यासंदर्भात योग्य ते नियोजन न केल्यामुळे सेवा रस्ते, दुय्यम रस्ते, भुमिगत रस्त्यांचे रुंदीकरण, छोटे बगिचे तयार करणे, फरशा बसविणे, पेव्हर ब्लॉक्स बसविणे हि कामे प्रगतिपथावर असताना त्यात वेळोवेळी बदल सुचविले गेले. त्यामुळे कामांना विलंबही झाला तसेच टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्चही झाला. **त्यामुळे नियुक्त केलेल्या कंत्राटदारांना ब-याच मोठ्या प्रमाणात शुल्क अदा करावे लागल्याने कंत्राटदारांचा अवाजवी फायदा झाला. या दोन्ही महानगरपालिकांकडे राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या अनुषंगिक कामांकरिता नियोजन नसल्यामुळे तसेच या महानगरपालिकांमध्ये समन्वय नसल्यामुळे टाळता येण्यासारखा कोट्यावधी रुपयांचा अवाजवी खर्च व निधीचा अपव्यय झाला आहे. या महालेखापालांनी काढलेल्या निष्कर्षावर समिती सहमत आहे. अत: शासकीय निधीचा योग्य वापर करण्यास असमर्थ ठरलेल्या पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील तत्कालिन अधिका-यांवर योग्य ती कडक कारवाई करण्याची समिती शिफारस करित आहे.**

शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, लोहगांव विमानतळ, पुणे आणि कार्यक्रमादरम्यान शहराला भेट देणा-या अतिमहत्वाच्या/महत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेचा आराखडा पोलीस आयुक्त, पुणे यांनी आखला होता. त्याचप्रमाणे आराखड्यामध्ये शुभारंभ

आणि समारोप सोहळ्यासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था, वाहतुक नियंत्रण, शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि संभाव्य अतिरेकी हल्ले या बाबतही विचार केला गेला होता.

सुरक्षा व्यवस्थेसाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने केंद्र शासनाकडे रू.६७.७० कोटीचा प्रस्ताव पाठविला असता तरी पोलीस आयुक्त, पुणे यांनी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे फक्त रू.२३.६९ कोटीचा प्रस्ताव सादर केला होता. ऑक्टोबर, २००८ मध्ये होणा-या स्पर्धांकरिता जून २००८ पूर्वी साधने आणि वाहने मिळणे आवश्यक असताना गृह विभागाने मे ते सप्टेंबर, २००८ दरम्यान टप्प्याटप्प्याने रू.१७.६३ कोटी रुपयांच्या साधनसामुग्रीच्या खरेदीस मान्यता दिली व निधी ऑगस्ट, सप्टेंबर, २००८ मध्ये वितरित केला. या निधी पैकी फक्त रू.९.४० कोटी साधनांच्या खरेदीसाठी खर्च केले आणि रु.५.०५ कोटी साधनांची खरेदी झाली नसतानाही रू.३.१८ कोटी प्रत्यार्पित करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय दर्जाची महत्वाची स्पर्धा असतानादेखील तसेच या स्पर्धेसाठी देश-विदेशातील मान्यवर पाहुणे, खेळाडू मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार याची माहिती असून देखील त्यांची सुरक्षा अत्यंत चोखपणे व्हावी व त्याकरिता सीसीटिव्ही कॅमेरे, एलसीडी टि.व्ही, क्ष-किरण यंत्रे, सुरक्षा वाहने, गस्त व वाहतुक प्रचार वाहने, रुग्णवाहिका, शव वाहिन्या यांची खरेदी होणे अत्यंत आवश्यक असतानादेखील राज्याच्या गृह विभागाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष करुन सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही विचार न करता त्यांच्याकडे पोलीस आयुक्त, पुणे यांच्या कडून प्राप्त झालेला प्रस्ताव अत्यंत कुर्मगतीने मंजूर केला व याकरिता निधी देखील उपलब्ध करताना तो एक रकमी न देता टप्प्या टप्प्याने दिला. यावरुन सुरक्षेच्या दृष्टीने गृह विभाग किती गंभीर आहे याचीच प्रचिती येते.

गृह विभागाने निधी मंजुरीस केलेल्या विलंबामुळे राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा होईपर्यंत पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडे सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असलेली बरीच अशी साधने तसेच वाहने प्राप्त झाली नाहीत. फक्त ५० टक्के साधनेच पोलीस आयुक्तांकडे प्राप्त झाली. स्पर्धा कोणताही घातपात न होता विनाविघ्न समाप्त झाली हे जनतेचे सुदैवच आहे. या स्पर्धेकरिता प्राप्त झालेले सीसी टि.व्ही. कॅमेरे व एलसीडी टि.व्ही. हे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या भांडारात विनावापर पडून असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. कालांतराने पुणे येथे घडलेल्या बॉम्ब स्फोटाच्या घटना पाहता क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या भांडारात पडून असलेल्या या सुरक्षा साहित्याचे महत्व किती होते याची सत्यता जाणवते.

राज्याच्या गृह विभागाकडे सुरक्षाविषयक प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर प्रशासकीय अधिका-यांनी अत्यंत संवेदनशील राहून सदरहू प्रस्तावांचा एका ठराविक विहित कालावधीत निपटारा करण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच राज्यातील विविध शहरांच्या पोलीस आयुक्तांनी शासनाने त्यांच्याकडे सुरक्षाविषयक साधने खरेदी करण्यासाठी सुपूर्द केलेला निधी योग्य प्रयोजनाकरिता तसेच विविध कालावधीत खर्च होतो की नाही याची दक्षता घ्यावी व आगामी कालावधीत तरी प्राप्त झालेला निधी अखर्चित न ठेवता सुरक्षा साधने घेण्याकरिता खर्च करण्याची दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करित आहे.

परिशिष्ट - एक

गुरुवार, दिनांक ३ मे, २०१२

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ३ मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(५) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(९) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(१०) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(११) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
(१२) श्री.भाई जगताप, वि.प.स.
(१३) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
(१४) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह विभाग.

डॉ.अमिताभ राजन, अपर मुख्य सचिव.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(१) श्री.ज.स. सहारिया, अपर मुख्य सचिव.
(२) श्री.शिरीष कारले, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(३) लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी कोल्हापूर (तत्कालीन आयुक्त, क्रीडा संचनालय).

नगरविकास विभाग.

श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव,
श्री.नितीन करीर, प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय.
श्री.महेश पाठक, आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

शुक्रवार, दिनांक ४ मे, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक ४ मे, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(८) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(९) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१०) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
(११) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
(१२) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री.दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वने विभाग.
श्री.प्रवीण परदेशी, प्रधान सचिव (तत्कालीन आयुक्त पुणे महानगरपालिका) .

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
(१) श्री.शिरीष कारले, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(२) लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी कोल्हापूर (तत्कालीन आयुक्त, क्रीडा संचनालय).

नगरविकास विभाग.
श्री.विवेक खरवडकर, तांत्रिक नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

मंगळवार, दिनांक ८ जानेवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथील सभागृहात घेण्यात आली. तत्पूर्वी समितीने सकाळी ११.०० वाजता शिवछत्रपती संकुलातील विविध कामांना भेट देऊन पहाणी केली. बैठक दुपारी ३.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(४) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(४) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(५) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(८) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(९) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(१०) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(११) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१२) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१३) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१४) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१६) श्री.विनायक राऊत, वि.प.स.
(१७) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. वि.द.आठवले, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
(१) श्री.जे.एस. सहारिया, अपर मुख्य सचिव.
(२) श्री.पंकज कुमार, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(३) लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी कोल्हापूर (तत्कालीन आयुक्त, क्रीडा संचनालय).

नगरविकास विभाग.

(१) श्री.श्रीकांत सिंह, प्रधान सचिव.
(२) श्री.महेश पाठक, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
(३) डॉ.श्रीकर परदेशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.

श्री.नितीन करीर, प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय.(तत्कालीन विभागीय आयुक्त, पुणे)
श्री.विकास देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे.

गृह विभाग.

(१) गुलाबराव पोळ, पोलीस आयुक्त, पुणे शहर.
(२) श्री.सं.चं.मोंडकर, उप सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१३ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथील हॉटेल विट्स, हॉटेल ऑरचिड व कन्व्हेंशन सेंटरची प्रत्यक्ष पहाणी केली.

समिती प्रमुख

(२) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(३) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(४) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(५) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(८) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(९) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(१०) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(११) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१२) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१३) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१४) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(१५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१६) श्री.विनायक राऊत, वि.प.स.
(१७) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. वि.द.आठवले, उप सचिव (लेखा व कोषागारे)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात हॉटेल विट्स, हॉटेल ऑरचिड व कन्व्हेंशन सेंटरची प्रत्यक्ष पहाणी केली व हॉटेलच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा केली.

मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजी कौन्सिल हॉल, विधान भवन, पुणे येथे सकाळी १०.३० वाजता सुरु होऊन दुपारी ५.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(३) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(४) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(४) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(१८) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.
(१९) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(२०) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(२१) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(२२) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(२३) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(२४) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. वि.द. आठवले, उप सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
(१) श्री.पंकज कुमार, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(२) श्रीमती कां.च.थोरवे, सह सचिव.

पुणे महानगरपालिका, पुणे
(१) श्री.महेश पाठक, आयुक्त.
(२) श्री.विवेक खरवडकर, अतिरिक्त मुख्य अभियंता.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
(४) श्री.प्रकाश कदम, अतिरिक्त आयुक्त.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी कौन्सिल हॉल, विधान भवन, पुणे येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(७) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(८) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(९) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१०) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(११) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(१२) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :
श्री. वि.द. आठवले, उप सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
(१) श्री.जे.एस. सहारिया, अपर मुख्य सचिव.
(२) श्री.पंकज कुमार, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(३) लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी कोल्हापूर (तत्कालीन आयुक्त, क्रीडा संचनालय).

पुणे महानगरपालिका, पुणे
(१) श्री.महेश पाठक, आयुक्त.
(२) श्री.विवेक खरवडकर, अतिरिक्त मुख्य अभियंता.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
श्री.प्रकाश कदम, अतिरिक्त आयुक्त.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(५) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(१३) श्री.सुनिल केदार, वि.स.स.
(१४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(१५) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१६) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.
(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(२०) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
(२१) श्री.विनायक मेटे, वि.प.स.
(२२) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२३) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
(२) श्रीमती शीला जोग, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(१) श्री.जे.एस. सहारिया, अपर मुख्य सचिव.
(२) श्री.पंकज कुमार, आयुक्त, क्रीडा व युवक संचनालय, पुणे.
(३) लक्ष्मीकांत देशमुख, जिल्हाधिकारी कोल्हापूर (तत्कालीन आयुक्त, क्रीडा संचनालय).

नगरविकास विभाग

श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

श्री.आनंद कुलकर्णी, अप्पर मुख्य सचिव (तत्कालिन क्रीडा सचिव)
डॉ.नितीन करीर, प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय. (तत्कालिन विभागीय आयुक्त पुणे)

पुणे महानगरपालिका, पुणे

(१) श्री.महेश पाठक, आयुक्त.
(२) श्री.प्रभाकर करंदीकर, (सेवानिवृत्त) तत्कालिन विभागीय आयुक्त
(३) श्री.दिलीप बंड, (सेवानिवृत्त) तत्कालिन विभागीय आयुक्त
(४) श्री.विकास देशमुख, जिल्हाधिकारी.
(५) श्री.चंद्रकांत दळवी, तत्कालिन विभागीय आयुक्त
(६) श्री.प्रभाकर देशमुख, विभागीय आयुक्त.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.

डॉ.श्रीकर परदेशी, आयुक्त.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राष्ट्रकुल युवा स्पर्धा,२००८ करिता पायाभुत सुविधा विकास अहवाल क्र.६ संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.

(४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(५) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(७) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(८) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(९) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(१०) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव.
(२) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

समितीने बारावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व संमत केला.